सभापतीस्थानी माननीय उपसभापती

पृ.शी. सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेत युवकांचे स्थान भक्कम करण्यासाठी सर्वागीण धोरण ठरविण्याची आवश्यकता

मु.शी. सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेत युवकांचे स्थान भक्कम करण्यासाठी सर्वागीण धोरण ठरविण्याची आवश्यकता या विषयावर सर्वश्री संजय दत्त,सुरेशदादा देशमुख, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी,श्री.उल्हास पवार,डॉ.वसंत पवार, श्री.भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु.....

श्रीमती शोभाताई फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य यावर्षी सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहे. अद्याप राज्य शासनाने कामगार धोरण ठरविलेले नाही. आज या क्षेत्रातील व्यवस्था ही मालक किंवा कामगार या दोघांच्याही फायद्याची नाही. त्यामुळे शासनाने कामगार धोरण ठरविण्याबरोबरच ते कामगारांच्या हिताचे असण्याची गरज आहे. आज राज्यात मोठया प्रमाणात कारखाने बंद पडले आहेत. ४४९९७ लघुउद्योग बंद पडल्यामुळे १,९७,७९८ कामगार बाधित झाले आहेत. ७८६ मोठे आणि मध्यम उद्योग बंद पडल्यामुळे १,५३,७८६ कामगार बाधित झाले आहेत. अशा पध्दतीने शासन बेरोजगार कामगारांची फौज निर्माण करणार असेल तर या देशाचे स्वास्थ्य बिघडल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक माणसाला पोट आहे आणि त्याला रोज भूक लागते. त्यामुळे आपला संसार चालविण्यासाठी काही ना काही खटपट करावी लागते. कामगारांची उपासमार टाळण्यासाठी, त्यांना जीवनात स्थिरता मिळवून देण्यासाठी बंद असलेले कारखाने पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने धोरण ठरविले पाहिजे. मागील तीन वर्षात बंद पडलेले उद्योग सुरु करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने एकही प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविलेला नाही. हे बंद असलेले उद्योग सुरु करण्यासाठी आणि या उद्योगांमध्ये कामगारांना सामावून घेण्यासाठी शासनाने केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविले पाहिजेत. त्यासाठी राज्याचे कामगार धोरण निश्चित करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, नोकऱ्या उपलब्ध नाहीत असे नेहमी म्हटले जाते. परंतु या राज्यात भरपूर नोकऱ्या उपलब्ध आहेत. विद्यादानाच्या माध्यमातून फक्त मजूर आणि कारकून हे दोनच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रकारचे वर्ग तयार केले जातात. ज्या नोकऱ्या उपलब्ध आहेत त्यासाठी आवश्यक असलेल्या दर्जाचे कुशल युवक उपलब्ध नसल्यामुळे अनेक पदे रिक्त राहतात. अशा पदावर या युवकांना स्थान मिळू शकत नाही. या मुद्याचा शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. ५२ कोटी युवकांना स्कील डेव्हलप करुन कुशल कामगार तयार करण्याची घोषणा माननीय पंतप्रधानांनी केली आहे. केंद्र सरकारच्या या धोरणामध्ये महाराष्ट्राला स्वत:चा वाटा उचलावयाचा असेल तर चांगल्या प्रकारचे स्कील असलेले युवक तयार करावे लागतील. कुशल कामगार तयार करावे लागतील. त्याकरिता शिक्षण हाच मूलभूत पाया आहे. आपल्या राज्यामध्ये स्कील असलेल्या प्रवर्गातील मुले कमी आहेत. राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या बेरोजगारांची संख्या काही वर्षापूर्वी ६.९८ लाख एवढी होती. परंतु २००९ मध्ये ही संख्या २८.७६ लाख इतकी झाली आहे. अधिसूचित केलेल्या पदांची संख्या १.७७ लाख असताना फक्त १७ हजार व्यक्तींना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला. नोकऱ्या भरपूर आहेत. परंतु त्यासाठी कुशल मजूर व कामगार तयार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, राज्यातील तंत्रज्ञान, अभियांत्रिकी क्षेत्रातील ६६१ शिक्षण संस्थांमधील प्रवेश क्षमता १,६८,६४८ इतकी असून १,३८,२२० इतक्याच विद्यार्थ्यांना या संस्थांमध्ये प्रवेश मिळाला आहे. आयुर्वेदिक, ॲलोपॅथी, दंतचिकित्सा शास्त्र या क्षेत्रात १०,६३७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(नंतर बी.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशनच्या संस्थांमधून 5300 विद्यार्थी उत्तीर्ण होतात. अशा परिस्थितीत बेरोजगार 52 कोटी लोकांचे स्कील डेव्हलप करुन त्यांना तयार करावयाचे असेल तर ही संख्या त्या मानाने कमी आहे. या लोकांची कुशलता वाढविण्याकरिता आपल्याला निरनिराळ्या स्कील्ड विद्यार्थ्यांची गरज आहे व त्यासाठी युवा धोरण शासनाला राबवावे लागणार आहे. याबाबत शासनाने नेमके टार्गेट ठरविणे आवश्यक आहे. या 52 कोटीमध्ये कमीत कमी 1/5 कोटी लोक तरी आपल्याकडे आले पाहिजेत, त्या सर्वांना नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत. शेवटी बेरोजगारांची फौज आपण म्हणतो आणि रोज भाषणे करतो परंतु त्यांना स्थायी करण्यासाठी, नोकऱ्या देण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करुन या तरुणांना नोकऱ्या देण्यामध्ये शासन म्हणून आपण कमी पडत असू तर शासनाने याबाबत विचार करुन युवा पॉलिसी, कामगार पॉलिसी निश्चित करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपविते.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सभागृहात उपस्थित झालेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. .....

उपसभापती : माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांची यादी उपलब्ध आहे त्यांच्यापैकी सन्माननीय सदस्य सर्वश्री. संजय दत्त, भगवानराव साळुंखे, संजय केळकर, सुरेशदादा देशमुख, उल्हास पवार, डॉ. वसंत पवार, प्रकाश बिनसाळे, ॲड. उषा दराडे हे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. ते सभागृहात नंतर उपस्थित झाले तरी त्यांना बोलण्याची संधी दिली जाणार नाही.

प्रा. सुरेश नवले : महोदय, युवक किंवा तरुण हे शब्द उच्चारताच ही सर्व तरुणाई डोळ्यासमोर उभी राहते. ज्याप्रमाणे वनराई, वृक्षराई तशाच प्रकारची ही तरुणाई. जेव्हा या तरुणाईकडे आपण पाहतो तेव्हा आशा वाटू लागते की, या देशाचे भवितव्य व भविष्य उज्ज्वल आहे. जसे या देशाचा आधारस्तंभ तरुण आहेत त्याचबरोबर तरुण हे मार्गदर्शकही आहेत. तेव्हा या तरुणाईमधील गुणवत्तेला चालना देण्याचा प्रयत्न झाला तर निश्चितपणे या राज्यातून पुन्हा एकदा सोन्याचा धूर निघाल्याशिवाय राहणार नाही अशी आशा मी व्यक्त करतो. फक्त या मुलांच्या मुखातून बाहेर पडणार धूर थांबविता आला तर हे उपयोगी ठरतील. कारण तो धूर त्यांच्या आई-वडिलांनी थांबवावयाचा, शिक्षकांनी थांबवावयाचा की राज्यकर्त्यांनी थांबवावयाचा हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे. तो थांबविला तरच या देशात सोन्याचा धूर निघू शकेल. आज खेड्या-पाड्यातून, गावोगावी सिगारेट आणि अन्य मादक द्रव्यापर्यंत जाऊन पोहचलेले तरुण पहायला मिळतात हे दुर्दैव आहे. यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी, यातून मार्ग काढण्याचे प्रयत्न समाज धुरिणांनी केले पाहिजेत. असा मार्ग काढत असताना निश्चितपणे ग्रामीण भागातील तरुण या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय हा देखील महत्वाचा प्रश्नन आहे. राज्यात बेकारीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे आणि या युवकांनी वाम मार्गाने जाऊ नये म्हणून त्यांना रोजगार पुरविण्याची जबाबदारी शासनाची आहे. ही जबाबदारी पार पाडली तरच हे शक्य होऊ शकेल, अन्यथा अवघड आहे. 13 व्या वर्षानंतर मुले अतिशय भावनिक व संवेदनक्षम होतात, हा निसर्ग नियम आहे. अशा वयात अपप्रवृत्तीच्या प्रलोभनाला ही मुले बळी पडतात. त्याचे दुष्परिणाम म्हणून ते व्यसनाच्या वाटेने जातात. हे थांबविण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज होती खऱ्या अर्थाने त्यांच्या मनावर संस्कार घडविले पाहिजेत...

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

असे माझ्या सारख्या तसेच समाजामध्ये काम करणा-या कार्यकर्त्याला वाटल्याशिवाय राहत नाही. शरीर वाढत जाते तसे शरीरात आमूलाग्र बदल होत जातात. मुल आणि आई वडील यांचा संवाद होत नाही हे दुर्दैव आहे. आई-वडिलांचा मुलांशी संवाद घडला व ते आपल्या मुलांना सांगू शकतील की, तुझ्या शरीरात जे काही बदल घडत आहेत ते निसर्गतः घडणारे बदल आहेत. शरीराची वाढ होत असतांना मिसरुड फुटते व शारीरिक बदल होत जातात. तुझ्या वयात मी होतो तेव्हा माझ्या शरीरात सुध्दा अशाच प्रकारचे बदल झाले होते. शरीरात जे काही बदल होतात ते होतच राहणार आहेत. अशा प्रकारचा संवाद आई-वडिलांकडून मुलांबरोबर साधला गेला तर निश्चितपणे यातून मार्ग काढता येऊ शकेल.

सभापती महोदय, मुलांचे आयुष्य घडविण्याची जिम्मेदारी या समाजातील धुरिणांवर आहे ती त्यांनी पार पाडावी अशी अपेक्षा आहे. परंतु राज्य शासनाने या सगळया गोष्टींचा विचार करुन मग समाजामध्ये फोफावणारे मादक द्रव्य कोण विकते, त्याच्या पाठीमागे कोण आहे या सर्व गोष्टींचा विचार करावा व त्याला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न झाला तर त्यातून निश्चितपणे मार्ग निघू शकेल.

सभापती महोदय, मुलांवर संस्कार होणे अतिशय महत्वाचे आहे. छत्रपती शिवाजी महारांजावंर जिजाऊ मॉ साहेबांनी संस्कार केले होते. "बोहल्यावर कोणी तरी येऊन तिला घेऊन जावे, कोणावर कोणीही अन्याय करावा हे सर्व दूर करण्याचा प्रयत्न तू केला पाहिजे, हा प्रयत्न तू या राज्यात करणार आहेस काय ?" असा आशावाद जिजाऊंनी व्यक्त केला तेव्हा लहान छत्रपतींनी मुठी आवळीत आईला सांगितले की, "होय, आई. मी तुझे स्वप्न पूर्ण केल्या शिवाय राहणार नाही." ते स्वप्न पूर्ण करण्याची जबाबदारी मुलांवर आहे व त्यासाठी मुलांनी प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, काही वेळा असे होते की, आई स्वत:च एखाद्या क्लबमध्ये जाऊन बसत असेल व तिचे मूल दारुच्या अडयावर बसत असेल तर ही जबाबदारी कोणाची ? अंतिमत: चूक कोणाची हा सर्वात मोठा प्रश्न पडतो. मला असे वाटते की, ही चूक आईचीच आहे, आई-वडिलांची आहे. आई-वडिलांचे मुलांकडे दुर्लक्ष आणि त्यातून व्यसनाधीनता हा सगळा प्रकार थांबविण्यासाठी आई-वडिलांनी मुलांकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे, यासाठी मुलांबरोबर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

संवाद होणे अतिशय आवश्यक आहे. संवादाच्या अभावातून घरामध्ये नवरा-बायको यांच्यामध्ये भांडणे होऊ शकतात. सकाळच्या प्रहरी पती अंघोळीला जात असेल, तेव्हा त्याच्या खांद्यावरील टॉवेल पत्नीने खसकन ओढून त्याच्या खांद्यावर दुसरा टॉवेल टाकला तर काय होईल ? परंतु जर पत्नीने सांगितले की, "अहो तुमच्या खांद्यावर जो टॉवेल होता त्यावर मांजर बसले होते व त्याची दुर्गंधी तुमच्या वाटयाला येऊ नये म्हणून मी तुमच्या अंगावर दुसरा टॉवेल ठेवला आहे यामध्ये गैरसमज करुन घेऊ नका". असा जर संवाद घडला तर त्या पतीच्या मनामध्ये दुसरे विचारच येणार नाही. जर पत्नीने पतीचा गैरसमज दूर केला नाही तर त्याला वाटेल, अरे जर दिवसाची सुरुवात टॉवेल खसकन ओढल्यापासून झाली असेल तर दिवस कसा जायचा आणि रात्र कशी जायची असा विचार त्याच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे संवाद होणे अतिशय महत्वाचे आहे. 24 ऑक्टोबर, 1954 रोजी डॉ. बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांसमोर भाषण करतांना सांगितले होते की, "माझे वडील हे माझे विद्यासन आहे, माझे वडील हे माझे धर्मासन आहे. या धर्मासनाकडे पाहिल्यानंतर माझ्या वडिलांचे उद्‌गार मला आठवतात, माझे वडील असे म्हणाले होते की, हे बघ तुझ्या वाटयाला गरिबी आली तर घाबरून जाऊ नकोस, चिंता करु नकोस. कारण शेवटी गरिबीवर मात करण्याचा प्रयत्न करणे हे तुझे कर्तव्य आहे. तू विद्वान हो, विद्या संपन्न हो." त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे विद्या संपन्न होऊन गरिबीच्या छातीवर उभे राहिले. हा संवाद तेथे घडला नसता तर काय घडले असते ? हा सगळयात मोठा प्रश्न आहे. कुरुक्षेत्रावर भगवान गोपालकृष्ण आणि अर्जुनामध्ये संवाद घडला नसता तर कदाचित भगवद्‌गीता आमच्या वाटयाला आलीच नसती. त्यामुळे सवांद हा सर्व ठिकाणी झालाच पाहिजे असा आग्रह मी शासनाकडे करतो.

या सभागृहात सुध्दा एक प्रकारे संवादच होत असतो. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य मंत्री महोदयांना प्रश्न विचारतात, मंत्री महोदय, उत्तरे देतात. अर्थात उत्तरातून निष्पन्न काहीच होत नाही तरी सुध्दा मंत्री उत्तरे देतच असतात. परंतु हा संवाद अत्यंत महत्वाचा आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील युवकांच्या मनातील भावना जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर मला वाटते त्यातून नक्कीच चांगला मार्ग निघू शकेल. पूर्वी मुलांवर मनाचे श्लोक बिंबवले जायचे, त्यांच्यावर संस्कार केले जायचे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

या लहान मुलांना सांगितले जायचे की, समर्थांची पावन भिक्षा डोळ्यासमोर ठेवा.

कोमल वाणी दे रामा
विमल करणी दे रामा
सज्जन संगती अभेद भक्ती बहुजन मैत्री दे रामा
विद्या वैभव अर्था रोहन दे रामा
जन सुखकारक आंतरी पारख प्रसंगी ओळख दे रामा

हे मागणे मुलांच्या मनावर बिंबविण्याचे प्रयत्न शिक्षकांकडून किंवा राज्यकर्त्यांकडून किंवा समाजधुरिणांकडून झाला तर निश्चितपणे मार्ग निघू शकेल. अर्थात हे काम आता आईवडिलांकडून होत नाही. शिक्षकांकडून देखील होत नाही. शिक्षक आज त्यांची जबाबदारी पार पाडत नाही. एक तारखेला पगार मात्र बरोबर घेतात. तेव्हा ज्यांच्यावर ही जबाबदारी आहे, त्यांनी ती पार पाडावी. या युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी राज्य शासनाची जी संस्था आहे तिने पुढाकार घ्यावा आणि विरोधी पक्षासह सर्वांनी त्यास पाठिंबा द्यावा. माझी या सदनाला विनंती आहे. पूर्वी राजे-महाराजे सैन्य 8 महिने कार्यरत ठेवायचे आणि 4 महिने डेरेदाखल व्हायचे. 4 महिने ते सैन्य काम करीत नव्हते. तसेच पक्षीय लोकांनी 4 महिने युवकांना संस्कारीत करण्याचा प्रयत्न केला तर मला असे वाटते की, त्यातून चांगले घडू शकेल. हातात दगड देणे आणि ते फेकण्याचे कौशल्य शिकवणे योग्य नाही. त्या ऐवजी हातामध्ये चिरे देऊन ते घडविण्याचे कसब शिकविले तर बरे राहील. जय भवानी, जय शिवाजी म्हणायचे आणि हातात दगड द्यायचे हा उद्योग या राज्यामध्ये थांबला तर निश्चितपणे या राज्यामध्ये युवकांना उत्तम प्रकारचे मार्गदर्शन होऊ शकेल. एवढे मार्गदर्शन राज्यकर्ते म्हणून श्री.सुरेश शेट्टीसाहेब आपण करावे. आपण प्रौढ तरूण मंत्री आहात. अनुभवी प्रौढ तरूण मंत्री आहात. अनुभवी तरूण मंत्र्यांचा उपयोग महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनामध्ये निश्चितपणे अभिप्रेत आहे. तो आपण घडवावा एवढीच अपेक्षा आहे. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.चंद्रकांत पाटील)

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,आजच्या युवक धोरणाच्या चर्चेमध्ये सहभागी होताना मला थोडक्यात माझे म्हणणे आपल्यासमोर सादर करावयाचे आहे. 21 व्या शतकात वाटचाल करीत असताना आपण देशाच्या आणि राज्याच्या संपूर्णपणे बदललेल्या परिस्थितीचा विचार प्रामुख्याने करायला पाहिजे. नुकताच सगळ्यांना शिक्षणाचा हक्क आपण प्राप्त करून दिला आहे. राष्ट्रीय पातळी पासून राज्य पातळी पर्यंत आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यावर राज्य आणि केंद्र शासनाचा मोठ्या प्रमाणावर भर आहे. हे सगळे युवा धोरण ठरविताना आवश्यक असणारे इन्फ्रास्ट्रक्चर मधले कंपोनंटस् आहेत, असे मला वाटते. ही परिस्थिती बदलते आहे. त्यामुळे युवक ज्या वयोगटात येतो त्या अगोदर पासून काय घडते आहे, आणि काय घडणार आहे याचा थोडा मागोवा आपण प्रामुख्याने घेणे जरुरीचे आहे. आजकाल बहुतेक ठिकाणी मग तो ग्रामीण भाग असो, शहरी भाग असो अर्थार्जनासाठी घरातील दोघांनाही म्हणजे मुलांच्या पालकांना घराबाहेर जास्त रहावे लागते. मूल जन्माला आल्यानंतर त्याचा पहिला वर्षभराचा काळ संपल्यानंतर त्याची पाळणा घरापासून जीवनाला सुरूवात होते. म्हणजे जिथून संस्कार व्हायला पाहिजेत ते संस्कार पाळणा घराच्या माध्यमातून पुढे येतात. त्यानंतर शाळेचे वेळापत्रक पाहिली पासून त्याच्या अंगावर कोसळते. त्यामध्ये त्याचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता आजच्या या पद्धतीमध्ये आपल्याला अधिक जाणवते. पाश्चिमात्य देशांशी तुलना केल्यानंतर आपल्या निश्चित लक्षात येईल की, तरूणांनी किंवा या वयोगटातील मुलामुलींनी किती काळ आपल्या आईवडिलांचा हात धरून चालायचे. म्हणजे त्यांना पॉकेट मनी पाहिजे असेल तर ते पालकांवर अवलंबून राहणार. कुठे जायचे असेल तर ते पालकांवर अवलंबून. माझ्या शालेय जीवनात एसीसी होते. तो एनसीसीचा छोटा भाऊ असण्याची शक्यता आहे. त्यावेळी वर्षातून 8 दिवस सर्व मुलांना स्व कमाई करून दाखवा अशा पद्धतीचा प्रकल्प द्यायचे.

यानंतर श्री.अजित....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.हेमंत टकले...

त्यावेळी आम्हाला श्रमाचे महत्व कळायचे. झाडलोट आणि कोणाचीही किरकोळ कामे करण्यापासून जो काही आम्हाला मेहनताना मिळेल ती आमची स्वकष्टाची कमाई. ही जाणीव आम्हाला पाचवी-सहावी इयत्तेमध्ये शिकत असताना देण्याची पध्दत होती. अशातऱ्हेची पध्दत आपण लक्षात घ्यावयास पाहिजे. पाश्चिमात्य देशामध्ये मुलगा कॉलेजला जायला लागला की त्याचे आईवडिल त्याला सांगतात की यापुढील शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्यासाठी लागणाऱ्या खर्चासाठी जोड म्हणून तुलाही काही काम करावे लागेल. मग तो मुलगा कॉलेजचा अभ्यास सांभाळून पेट्रोल पंपावर किंवा कॅफे हाऊसमध्ये काम करतो. या निमित्ताने मी आपणास एक गोष्ट सांगतो. एका मुलाने अशाप्रकारे हळू हळू काम करुन वडिलांच्या कंपनीतील शेअर्स विकत घेतले. एक दिवस तो आपल्या वडिलांना म्हणाला, आपल्या कंपनीचे भवितव्य ठीक दिसत नाही, तेव्हा मला माझ शेअर्स विकासवेसे वाटतात. स्वत: निर्णय घेण्याची क्षमता आणि काहीतरी करुन दाखविण्याची इच्छा असेल तर असे घडू शकते. आपल्याकडे असे घडू शकेल काय ?

सभापती महोदय, राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात आपल्याला काही खात्याची पुनर्रचना करण्याची आवश्यकता आहे. आपण युवा धोरण ठरवित असताना आपल्याकडे युवा आणि क्रीडा खाते वेगळे, शिक्षण खाते वेगळे, उच्च शिक्षण खाते वेगळे, सामाजिक न्याय खाते वेगळे आहे. हे सर्व विभाग वेगळे असले तरी मनुष्य बळ या विषयाशी या सर्व खात्यांचा संबंध येतो. तेव्हा केंद्र सरकारच्या धर्तीवर ह्युमन रिर्सोसेस सारखी वेगळी यंत्रणा आपल्याकडे करता येईल का हे पाहिले पाहिजे. मध्यंतरी माझ्या असे वाचनात आले की, महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना उपस्थित राहिणे अनिवार्य आहे. परंतु हा सर्व कागदोपत्री पूर्तता करण्याचा भाग असतो. वर्गामध्ये काही शिकविले जात नाही आणि मग खाजगी क्लासेसकडे विद्यार्थ्यांचा ओढा अधिक वाढतो. अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर शासन हतबल होते. नुकतेच माझ्या असेही वाचनात आले की, काही खाजगी क्लासेसना ज्युनिअर कॉलेजेसची परवागनी देण्याचा विचार शासन करीत आहे. या सर्व बदलाच्या परिस्थितीमध्ये समाज विघटनाचे बिजे रोवली आहेत की काय अशी मला भीती वाटते. त्यातून "आहे रे आणि नाही रे " असा वर्ग तयार होतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

सभापती महोदय, शिक्षण आणि आरोग्य या दोन महत्वाच्या जबाबदाऱ्या राज्य शासनावर आहेत. तेव्हा शिक्षणामध्ये बी.ओ.टी.आणू नये असे मला वाटते. सन 2020 मध्ये भारत देश सर्वात जास्त तरुण असलेला देश म्हणून ओळखला जाणार आहे. हाच वर्ग काही वर्षानंतर वृध्दत्वाकडे गेल्यानंतर वृध्दांची संख्या वाढेल आणि आपला तरुणांचा देश असलेली ओळख पुढील काळात कमी होत जाईल अशीही शक्यता आहे.

सभापती महोदय, परवा एका परिसंवादामध्ये शासनाच्या वरिष्ठ पातळीवरील एक अधिकारी माझ्याकडे जे बोलले ते मला अतिशय भावले. ते मला म्हणाले की, मी आता या महानगराच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीत आहे, परंतु आता आऊट ऑफ बॉक्स करण्याची गरज आहे. एक वेगळा विचार समोर आणला पाहिजे कदाचित तो विचार क्रांतिकारक असू शकेल. आपण असे केले तरच हे प्रश्न सुटू शकतील. आपण युवा धोरण ठरविताना आपल्याला जे सल्ला देतात त्याच्या पलिकडे जाऊन आपली व्हीजन काय आहे, आपण निश्चित काय करु शकतो, आपल्याला काय करता येईल, याचा थोडा आग्रही विचार करुन धाडसीपणे धोरण राबविले पाहिजे. आपल्यासमोर केंद्रीय मनुष्यबळ मंत्री श्री.कपिल सिब्बल यांचे उदाहरण आहे. मागील एक-दीड वर्षात त्यांनी सबंध क्षेत्रामध्ये परिवर्तनाच्या दृष्टीने पावले उचलेली आहेत. हा आदर्श आपण डोळ्यासमोर ठेवला तर युवा धोरण ठरविताना आपणास निश्चितपणे फायदा होईल.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या पिढीतील दुसरा भाग असा सांगता येईल की, ज्युनिअर कॉलेजमधील शिक्षण संपल्यानंतर आयुष्याचे नियोजन करणारे देखील काही विद्यार्थी आहेत .वयाच्या 45 व्या वर्षी माझे सेव्हींग अमुक इतके झाले असले पाहिजे आणि मी जे काम करीत आहे त्यातून मला निवृत्त होता आले पाहिजे याचा देखील विचार करणारे काही विद्यार्थी मला भेटले होते. त्यावेळी अर्थाजनासाठी शिक्षणाचे जे विविध स्त्रोत आहेत त्या अनुषंगाने त्या त्या क्षेत्रामध्ये काम करण्याची त्यांची इच्छा आहे अशा प्रकारे विविध क्षेत्रात काम करण्यासाठी वा त्याला जो काही छंद असेल तो छंद जोपासण्यासाठी तो विषय आवडीने पुढे नेण्यासाठी प्रयत्न करणारी पिढी जर पुढे आली तर त्यांच्या उद्योगी प्रवृत्तीमधून वेगवेगळया प्रकारचे विश्व ते आपआपल्या परीने निश्चित निर्माण करु शकतील तेव्हा अशा प्रकारची संधी त्यांना उपलब्ध करुन द्यावी असे मला सांगावयाचे आहे परंतु आज अशा प्रकारची संधी त्यांना उपलब्ध होत नाही. आज दहावीची परीक्षा म्हटल्यानंतर शिक्षक, पालक आणि विद्यार्थी या सगळयांचीच परीक्षा होत असते. विद्यार्थ्याने ही परीक्षा दिल्यानंतर त्याला कॉलेजमध्ये प्रवेश घेत असतांना काही अडचणी येत असतात. अशा प्रकारे त्या विद्यार्थ्याला कसे तरी शिक्षण पूर्ण करावे लागते. पूर्वी एकदा शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ती व्यक्ती नोकरीला लागली की तिचे लग्न लवकर करुन दिले जात होते. त्या काळात 20-22 वर्षी लग्ने होत असत. आजची तरुण पिढी 20 व्या आणि 22 व्या वर्षी लग्न करण्यास तयार होत नाही . स्वत:च्या पायावर उभे राहण्यासाठी वयाची तिशी जरी गाठली आणि त्या नंतर लग्न झाले तरी त्यांना चालू शकते. त्यामुळे त्यांचे पालकत्वाचे प्रश्न आताच्या पालकत्वाच्या प्रश्नापेक्षा निश्चितच वेगळे राहणार आहेत. त्यांचे विचार देखील वेगळेच राहणार आहेत. इतकेच नव्हे तर त्यांची जी पुढची पिढी निर्माण होणार आहे त्यांच्यासाठी संस्काराची एक नवीन चौकट समाजामध्ये येण्याची शक्यता आहे. या सर्व परिस्थितीमध्ये जर केवळ शहरी युवक आणि युवतींचा प्रश्न शासनाने समोर न ठेवता महाराष्ट्रातील शेतकरी आणि कामगारांच्या मुलांचा विचार करणे देखील आवश्यक आहे असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.कोणाचा तरी मुलगा पूर्वीच्या काळी नगरपालिकेच्या दिव्या खाली अभ्यास करुन प्राविण्य मिळवतो, स्पर्धेमध्ये पुढे जातो आणि मोठा होतो अशा प्रकारे मोठा होण्याची संधी फार कमी लोकांना प्राप्त होत असते. युवकांना सर्व क्षेत्रात अधिकाधिक संधी कशी मिळू शकेल या दृष्टीने जर युवा धोरण राबवता आले आणि त्यामध्ये सर्वांचा सहभाग करुन घेता आला तर अधिक बरे होईल असे मला सांगावयाचे आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले .....

सभापती महोदय, सध्याच्या बदलत्या परिस्थितीमध्ये शिक्षक वर्गाला आर्थिक दृष्टया संपन्नावस्था प्राप्त झालेली आहे असे मला वाटते. त्यांचे काही प्रश्न अजूनही प्रलंबित आहेत परंतु आर्थिक दृष्टया त्यांची स्थिती सुधारलेली आहे. आज त्यांना जी कामे नेमून देण्यात आलेली आहेत त्यामध्ये लोकसंख्या मोजणीचे काम, कुटुंब नियोजनाच्या प्रसाराचे काम ही कामे देखील त्यांच्याकडे देण्यात आली आहेत तेव्हा ही कामे त्यांच्याकडून करवून घेण्या पेक्षा युवकांवर संस्कार करण्याचे काम त्यांच्याकडे देण्यात आले पाहिजे शिक्षकांच्या कामाचा एक भाग म्हणून जेव्हा त्यांना या कामामध्ये सहभागी करुन घेण्यात येईल आणि त्याच शाळांमधून संस्कार करण्याची व्यवस्था करण्यात आली तर या तरुणांमधून देशाला शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, सेवा देणारे लोक निर्माण होऊ शकतील. अशा प्रकारे चांगले व आदर्श मनुष्यबळ तयार करण्याची क्षमता असलेले युवा धोरण राज्य सरकारने तयार करावे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. सभापती महोदय, हे धोरण ठरविण्यासाठी शासनाने अधिक वेळ घालवता कामा नये. धोरण ठरविण्यासाठी जितका वेळ जाईल तितके हे युवक वयाने वाढत जातील त्याचबरोबर आज जे प्रश्न निर्माण झालेले दिसत आहेत त्याचे स्वरुप अधिक गंभीर होईल..वयाच्या सोळाव्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेचा संकल्प केला होता आणि राज्याभिषेक होत असतांना त्यांचे वय 40 च्या पुढे गेले होते. राज्याभिषेक होण्यासाठी इतकी वर्षे त्यांना संघर्ष करावा लागला होता. हा कालावधी डोळयासमोर ठेवून आजचा पंधरा वर्षाचा विद्यार्थी पुढच्या दोन दशकात आयुष्यात जगाला सामोरे जाण्यासाठी अधिक सक्षम कसा तयार होईल या दृष्टीने या धोरणाची आखणी करावी असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने मला विचार मांडण्याची आपण संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

नंतर श्री.सरफरे

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, या जगातील इतर देशांच्या तुलनेत सर्वात जास्त युवकांची संख्या असणाऱ्या या हिंदुस्थानातील...

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाच्या माननीय सदस्यांकडून चर्चेला सुरुवात झाल्यानंतर सत्ताधारी बाजूकडून माननीय सदस्य बोलले. त्यानंतर मी हात वर केलेला असतांना पुन्हा भारतीय जनता पक्षाच्या माननीय सदस्यांना बोलण्यासाठी संधी दिली गेली.

तालिका सभापती (श्री. चंद्रकांत पाटील) : काल माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना बोलण्याची संधी देण्यात आलेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी कालचे विचारीत नाही. आज भारतीय जनता पक्षाकडून चर्चेची सुरुवात झाल्यानंतर सत्ताधारी पक्षाकडून एक माननीय सदस्य बोलले. त्यानंतर क्रमवारीनुसार शिवसेनेला संधी मिळाली पाहिजे. त्याकरिता मी हात वर केला होता. असे असतांना पुन्हा भारतीय जनता पक्षाला संधी दिली आहे. असे करणे योग्य नाही, हा माझ्यावर अन्याय आहे.

तालिका सभापती : माननीय सदस्यांचे भाषण संपल्यानंतर आपणास संधी दिली जाईल.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, या हिंदुस्थानातील पुरोगामी महाराष्ट्राच्या विधानपरिषद या ज्येष्ठांच्या असलेल्या सभागृहामध्ये नियम 260 अन्वये युवा धोरणासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या सभागृहातील एक तरुण सदस्य म्हणून मी या प्रस्तावाचे स्वागत करतो. या युवा धोरणाच्या प्रस्तावावर चर्चा करीत असतांना खरे तर या युवा धोरणाशी निगडीत अनेक धोरणे आहेत, त्यांचा सुध्दा याठिकाणी विचार होणे आवश्यक आहे. यामध्ये कृषी,उद्योग, क्रीडा शिक्षण, रोजगार व स्वयं रोजगार, पर्यटन, सांस्कृतिक कार्य, या सर्व विषयांशी युवा धोरण निगडीत आहे, हे आपल्याला विसरुन चालणार नाही. या प्रस्तावाच्या चर्चेच्या निमित्ताने शिक्षणासंबंधीचे काही महत्वाचे मुद्दे मी याठिकाणी उपस्थित करणार आहे. या देशामध्ये यु.जी.सी. व एच.आर.डी. या दोघांनी महाराष्ट्राच्या बाबतीत एक अहवाल दिला. त्यामध्ये सांगितले की, पहिल्या इयत्तेमध्ये 100 विद्यार्थी येतात, त्यानंतर उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी फक्त 12 विद्यार्थी शिल्लक रहातात. अशाप्रकारे शैक्षणिक गळती या राज्याच्या काही जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणावर आहे. त्यामध्ये जालना, बुलढाणा, गडचिरोली या जिल्हयांमध्ये तर 12 विद्यार्थ्यांपेक्षा कमी प्रमाण आहे. आणि म्हणून शिक्षण घेण्यामध्ये अशाप्रकारे गळती असेल तर या युवा धोरणाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे....

निमित्ताने आपण जगातील नैपुण्य, कौशल्य या राज्यातील व देशातील युवकांना आपण कसे देणार हा विषय सुध्दा चर्चिला गेला पाहिजे.

सभापती महोदय, जगामध्ये चार देशांनी एक ऑर्गनायझेशन केली आहे. त्यामध्ये ब्राझील, रशिया, इंडिया व चायना या चार देशांचा समावेश आहे. या ऑर्गनायझेशनमध्ये असा विचार झाला आहे की, येणाऱ्या कालखंडामध्ये हिंदुस्थान व इतर तीन देशांमध्ये सर्वात जास्त तरुणांची संख्या राहणार आहे. आणि त्याचबरोबर इतर देशांप्रमाणे युरोपसारख्या सब कॉन्टिनेन्टल देशामध्ये मात्र तरुणांची संख्या कमी होणार आहे, व ते ज्येष्ठांचा देश म्हणून ओळखले जाणार आहेत. युरोप आणि सब कॉन्टिनेन्टल देशामध्ये बाकीचे सर्व इन्फ्रास्ट्रक्चर मिळेल, परंतु त्याठिकाणी स्किलफुल युवक, कौशल्य परिपूर्ण असलेला युवक मिळणार नाही. आणि म्हणून या विषयावर चर्चा करीत असतांना एकच विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये येणाऱ्या कालखंडामध्ये कौशल्यपूर्ण तरुणाई निर्माण करण्यासाठी या युवा धोरणाचा अवलंब होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, दोन वर्षापासून युवा धोरणाबाबत चर्चा होत आहे. दोन महिन्यापूर्वी महाराष्ट्रामध्ये युवा धोरण आणणार असल्याची चर्चा झाली. व त्यादृष्टीने हा प्रस्ताव सभागृहात चर्चेला आला. याठिकाणी उपस्थित असलेल्या माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी साहेबांना विनंती करतो की, आपण पहिल्यांदा एक विषय लवकरात लवकर निकालात काढा.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे.....

पहिल्यांदा व्हाईस चॅन्सलरची मिटिंग घेऊन अभ्यासक्रम बदलण्या संबंधी त्यांना शिफारस करावी लागेल. आपल्या परंपरागत अभ्यासक्रमामध्ये कौशल्य ओरिएन्टेड अभ्यासक्रम नाही म्हणून आज कौशल्यपूर्ण युवक आज या महाराष्ट्रात घडत नाहीत. याला जबाबदार परंपरागत अभ्यासक्रम आहे. म्हणून या परंपरागत अभ्यासक्रमाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, या राज्यातील जनगणनेचे काम असो की कुठलाही सर्व्हे असो त्या सर्व्हेचे काम शिक्षकांकडे देण्यात येते. आज या राज्यात 50 लाख युवक उच्च माध्यमिक शिक्षण घेत आहेत. ते राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये एन.एस.एस.मध्ये काम करीत असतात. या विद्यार्थ्यांवर एन.एस.एस.च्या माध्यमातून अशा प्रकारच्या सर्व्हेची जबाबदारी टाकली तर मला विश्वास आहे की, अतिशय चांगले रिपोर्ट आपल्या राज्याला मिळाल्या शिवाय राहाणार नाहीत. या माध्यमातून शिक्षकांवरील बोजा देखील शासनाला कमी करता येईल. तसेच एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव निश्चितपणे होईल. तेव्हा युवा धोरणामध्ये याचा निश्चितपणे विचार करण्यात यावा.

सभापती महोदय, युवा धोरणाचा विचार करीत असताना क्रीडा धोरण देखील अतिशय महत्वाचे आहे. पुण्याला बालेवाडी येथे अद्ययावत सगळया सोयी-सुविधांनी युक्त क्रीडांगण आहे. आपल्या राज्यात आणि देशात खेळाडूंना दोन हजार रुपये मदत देण्यात येते. अमरावती,जळगाव,औरंगाबाद आणि पुणे अशा चार-पाच ठिकाणी क्रीडा विद्यापीठे स्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे. या क्रीडा विद्यापीठांच्या माध्यमातून आपल्याला दोन हजार खेळाडू तयार करता येऊ शकतात. सध्या खेळाडूंना दोन हजार रुपये मदत देण्यात येते. ती वाढवून दहा हजार रुपये मदत दिली तर या राज्यावर 24 कोटी रुपयांचा बोजा पडेल पण नक्कीच ॲथलॅटिक्समध्ये आणि इतर विविध खेळांमध्ये हे खेळाडू आपले नैपुण्य दाखवू शकतील.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या सर्व सन्माननीय वक्त्यांनी रोजगाराबाबत या ठिकाणी चर्चा केलेली आहे. खरे तर हा रोजगार कुठले एक क्षेत्र देऊ शकतो तर मला सांगण्यास अभिमान वाटतो की, शेती मधून सगळयात जास्त रोजगार या देशात आणि राज्यात उपलब्ध होऊ शकतो एवढी क्षमता या देशामध्ये आहे. पण या क्षेत्राकडे सुरुवातीपासून दुर्लक्ष झालेले आहे. या देशाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

स्वातंत्र्य मिळाल्यापासून आज पर्यंत कृषि आणि शेतीच्या बाबतीत वेगवेगळी धोरणे अवलंबितली गेली. त्यामध्ये बदल होत गेले म्हणून आज सगळयात मोठया अशा बेरोजगारीच्या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. आज एकीकडे या युवा धोरणावर चर्चा करण्यात येत आहे आणि दुसरीकडे बेरोजगारांची संख्या मोठी आहे. 2010 मध्ये 35 लाख 93 हजार इतकी बेरोजगारांची संख्या आहे. हा अधिकृत आकडा आहे. एवढया मोठया तरुणांच्या हाताला रोजगार नसेल तर महाराष्ट्राचे भविष्य काय ? याचा विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, प्रत्येक तालुक्यात दोन आय.टी.आय. काढण्यात आले आहेत. हे आय.टी.आय. काढत असताना या गोष्टीचा विचार केला गेला काय कां, या आय.टी.आय.मधून पास झालेल्या तरुणांचे पुढे काय झाले? भविष्यात त्यांना नोकरी मिळाली काय? सभापती महोदय, अशा प्रकारचे असेसमेन्ट आपल्या राज्यात कधीच झाले नाही. प्रशिक्षित मनुष्यबळ या राज्याला किती लागणार आहे?

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ...

या प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभ्यास राज्याने कधी केला नाही त्यामुळे आजच्या परिस्थितीमध्ये राज्यासमोर बेरोजगारीची समस्या आहे. म्हणून युवा धोरणाचा विचार करीत असताना येणाऱ्या काळात या राज्यामध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ किती लागणार आहे याचा प्रथम विचार होणे आवश्यक आहे. या ठिकाणी नुसती विद्यार्थी संख्या वाढवून चालणार नाही. एकीकडे या सभागृहामध्य शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने ज्यावेळी बेस्ट ऑफ फाईव्हचा विषय सभागृहात चर्चेला आला त्यावेळी राज्यातील 16 लाख विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने या सभागृहामध्ये बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात दीड तास चर्चा झाली. आज या सभागृहामध्ये युवा धोरणाच्या बाबतीत चर्चा होत असताना ही चर्चा दोन दिवसामध्ये सहा तासात संपवावयाची असा प्रयत्न होत आहे. माझी अशी विनंती आहे की, आपण या चर्चेच्या बाबतीत वेळ वाढविला पाहिजे. शेवटी या राज्याच्या अर्ध्या लोकसंख्येचा हा विषय आहे. राज्यातील अर्ध्या लोकसंख्येच्या बाबतीत विचार करीत असताना आपण सहा तासामध्ये ही चर्चा संपविणार असू तर येणाऱ्या काळामध्ये जे युवा धोरण राज्य सरकार अंमलात आणणार आहे त्यामध्ये कोठे तरी त्रुटी राहून जातील. यासंदर्भात या सभागृहामध्ये सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. म्हणून या चर्चेसाठी वेळ वाढवून द्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी केवळ विद्यार्थ्यांचे गुण वाढवून उपयोगाचे नाही तर या ठिकाणी कौशल्यपूर्ण विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. मागे आपल्या राज्यामध्ये ज्या अनेक नोकरभरत्या झाल्या त्याच्या परीक्षा एमकेसीएलने घेतल्या. त्या एमकेसीएलचे अध्यक्ष श्री. विवेक सावंत यांनी चीन देशाचा संपूर्ण अभ्यास करुन एक अहवाल दिलेला आहे. त्या अहवालात त्यांनी असे सांगितले आहे की, चीनमध्ये वेगवेगळ्या पाच हजार कौशल्यांचा विचार होतो. परंतु आपल्या देशामध्ये फक्त 300 कौशल्ये आहेत आणि आपल्या देशाच्या तुलनेत आपल्या राज्यामध्ये फारच कमी म्हणजे 100 ते 150 कौशल्ये विचारात घेतली जातात. माझे असे म्हणणे आहे की, कोठे तरी त्या अहवालावर विचार केला गेला पाहिजे. आज खऱ्या अर्थाने या देशाला वेगवेगळ्या पाच हजार कौशल्यांची आवश्यकता आहे. म्हणून कौशल्ये निर्माण करणारी विद्यापीठे राज्यामध्ये निर्माण होणे आवश्यक आहे. येणाऱ्या काळात नुसती शैक्षणिक विद्यापीठे निर्माण करुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. धनंजय मुंडे ....

चालणार नाही तर या देशामध्ये कौशल्ये विकसित करणारी विद्यापीठे निर्माण होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आज बेरोजगारीच्या बाबतीत विचार करीत असताना, परप्रांतीयांचा विचार करीत असताना या महाराष्ट्राच्या मातीतील तरुणांचा विचार येतो. ज्यावेळी आपण महाराष्ट्राच्या मातीतील तरुणांचा विचार करतो त्यावेळी असे दिसते की, त्यांच्या हाताला रोजगार नाही. याबाबत मी एक उदाहरण देऊ इच्छितो. परवा मी औरंगाबादवरुन मुंबईला येत असताना रात्री विमानाला उशीर झाल्यामुळे विमानतळावर वेगळ्या ठिकाणी ते विमान पार्क केले गेले. मी किंगफिशरच्या असिस्टंटला विचारले की, विमान एवढ्या लांब का पार्क केले ? तो हिंदीमध्ये बोलत होता. मी त्याला विचारले तेव्हा त्याने सांगितले की, मला मराठी येत नाही. त्याने सांगितले की, मी दिल्लीचा आहे. मी दुसऱ्या असिस्टंटला विचारले. त्याने सांगितले की, मी लखनौचा आहे. त्यानंतर बसमध्ये बसल्यानंतर ते दोघे हिंदीमध्ये बोलत होते म्हणून मी ड्रायव्हरशी हिंदीमध्ये बोलावयास लागलो. त्यावेळी तो ड्रायव्हर माझ्याशी मराठीत बोलला. कारण ड्रायव्हर मराठी होता. म्हणजे बाकीच्या सगळ्या महत्वाच्या पदांवर परप्रांतीय होते. असे का ? याचे कारण असे आहे की, आपण या ठिकाणी कौशल्ये विकसित केली नाहीत. आज लाकडाचे किंवा कार्पेटरचे काम करावयाचे म्हटले तर राजस्थानवरुन कार्पेटर येतो. इमारतीचे बांधकाम करावयाचे असेल तर छत्तीसगडचा कॉन्ट्रॅक्टर येतो. स्टील प्लँटमध्ये काम करावयाचे असेल तर बिहारमधील मुले येतात. असे झाले तर महाराष्ट्रातील तरुणांनी कोठे जावयाचे ? यामध्ये महाराष्ट्रातील तरुणांचा दोष नाही. आपण गेली अनेक वर्षे या ठिकाणी राज्य करीत असताना ज्या चुका घडल्या त्या त्यांच्या माथी पडल्या त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या युवकांमध्ये कौशल्य निर्माण करण्याच्या दृष्टीने या ठिकाणी विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आपण पाहतो की, ज्या दिवशी निकाल असतो त्या दिवशी सकाळी पहाटे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या होतात. मी पास होईल की नाही याबद्दल त्यांच्या मनामध्ये आत्मविश्वास नसतो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

त्यामुळे तो विद्यार्थी सकाळी 6 वाजता आत्महत्या करतो. परंतु सकाळी 11 वाजता लागलेल्या निकालात तो विद्यार्थी पास झालेला असतो. म्हणून विद्यार्थ्यांच्या मानसिकतेमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, स्वामी विवेकानंद यांचा दिग्विजय दिवस दिनांक 13 सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. त्यामुळे किमान त्यादिवशी तरी शासनाने युवा धोरण जाहीर करावे अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. आज ग्रामीण भागात तरुणांचे प्रमाण खूप आहे. हा तरुण वर्ग शेतीवर अवलंबून असणारा आहे. आज शेतक-याचा मुलगा शेती करण्यास तयार होत नाही. कारण त्याने वाईट दिवस पाहिलेले असतात. त्याने हेही पाहिले आहे की, 50 वर्षापासून आपले वडील शेती कसत आहेत. मागील 50 वर्षांपासून आपले वडील शेती कसत असतानाही त्यांच्या डोक्यावरील कर्ज एक रुपयानेही कमी झालेले नाही. माझ्या वडिलांना सणासुदीच्या दिवसात एक जोडी धोतर घेता आलेली नाही. त्यामुळे शासनाने या गोष्टी युवा धोरण निश्चित करताना विचारात घ्याव्यात. युवा धोरण आणण्यासाठी शासनाला 50 वर्षे लागली आहेत. सुवर्ण महोत्सवी वर्षाची वाट पहावी लागली आहे. आता यापुढे आणखी 50 वर्षे युवा धोरणासाठी लागू नयेत, हे युवा धोरण 13 सप्टेंबर, 2010 रोजी जाहीर करावे अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय दत्त, सुरेशदादा देशमुख, गुरुनाथ कुलकर्णी, उल्हास पवार, डॉ.वसंत पवार व श्री.भाई जगताप यांनी नियम 260 अन्वये प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे. या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हा प्रस्ताव सत्तारुढ पक्षाकडून आलेला आहे. ज्यावेळी सत्तारुढ पक्षाकडून एखादा प्रस्ताव सभागृहात मांडला जातो त्यावेळी सरकारकडून वेगळी अपेक्षा असते. परंतु प्रत्येक वेळी शासनाकडून त्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात. सत्तारुढ पक्षाकडून आलेला हा प्रस्ताव असल्यामुळे त्याच्यातून विशेष निष्पन्न होईल अशा भावनेने हा प्रस्ताव आणला असावा असे मला निश्चितपणे वाटते. याबाबतीत शासनाची मानसिकता चांगली असेल असे मला वाटते. सभापती महोदय, माननीय उद्योग मंत्र्यांनी एका तारांकित प्रश्नाला उत्तर देताना राज्यात नोंदणीकृत बेरोजगारांची संख्या 28 लाख आहे असे सांगितले होते. सभापती महोदय, राज्यातील विशेषत: ग्रामीण भागामधील आई-वडील स्वत:च्या पोटाला चिमटा घेऊन आपल्या मुलाला शिकवितात. प्रसंगी उपाशी राहून ते त्याला शिकवित असतात. त्यांची अशी भावना असते की, म्हातारपणी माझा मुलगा माझी काठी व्हावा. त्या आई-वडिलांची ही भावना चुकीची आहे असे मला वाटत नाही. कधीकधी मुंबईत असे उदाहरण ऐकावयास मिळते की, एखादा मुलगा आपल्या आईला फोन करुन सांगतो की, मला मुंबईत नोकरी मिळणार आहे. परंतु मधल्या दलालाला 1 लाख रुपये द्यावयाचे आहेत. आपल्या मुलाला 1 लाख रुपये दिल्यानंतर नोकरी मिळणार आहे या आशेने आई-वडील आपली शेती गहाण टाकतात, प्रसंगी आई आपले मंगळसूत्र विकते आणि म्हातारपणाची काठी मजबूत व्हावी म्हणून 1 लाख रुपयांची जमवाजमव करुन त्याला पैसे पाठविते. पण कधी कधी असेही होते की, तो मधला भामटा ते पैसे घेऊन पसार होतो. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आणि अन्य सदस्यांनी हा महत्वाचा प्रस्ताव आणलेला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

या प्रस्तावावरील चर्चा वांझोटी ठरता कामा नये. या चर्चेतून काही तरी ठोस अशा स्वरुपाचे निष्पन्न झाले पाहिजे. सभापती महोदय, बेरोजगारांच्या हाताला काम देण्यासंबंधीचा प्रस्ताव या सभागृहामध्ये चर्चेला आणित असताना राज्यातील 28 लाख बेरोजगारांना राज्य शासन कशा प्रकारे नोक-या देणार आहे याचा खुलासा होण्याची आवश्यकता आहे. आज अनेक पदवीधर हातामध्ये पदव्या घेऊन नोकरीच्या शोधात भटकत आहेत. शेवटी त्या मुलांना नैराश्य येऊन ती व्यवसनाधीन होतात आणि आत्महत्या करतात. आज राज्यामध्ये 5 हजार मेगावॉट विजेचा तुटवडा असल्यामुळे अनेक कारखाने बंद होत आहेत.बंद पडलेल्या कारखान्यांची यादी माझ्याकडे आहे. उद्योग क्षेत्रामध्ये महाराष्ट्र हे देशात प्रथम क्रमांकावर असलेले राज्य आहे असा दावा आपण करतो. परंतु हा दावा अगदी फोल आणि दिशाभूल करणारा आहे. केन्द्र सरकारच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्याचे उद्योग विकास आयुक्तालयाकडून सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये राज्यातील 30 हजार लघुउद्योग बंद असल्याचे नमूद केलेले आहे. एका बाजूला महाराष्ट्राच्या या विधिमंडळामध्ये महाराष्ट्रातील तरुण बेरोजगारांना नोक-या देण्यासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा करीत असताना शासनाकडून जे सर्वेक्षण करण्यात आले त्यामध्ये 30 हजार लघुउद्योग बंद असल्याचे सांगितलेले आहे. जिल्हानिहाय सर्वेक्षणामध्ये 1,47,192 नोंदणीकृत उद्योगापैकी 74,072 उद्योग बंद पडले असल्याचे आढळून आलेले आहे. ही महाराष्ट्राची आजची उद्योग क्षेत्राची अवस्था आहे. एका बाजूला महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे आणि दुस-या बाजूला उद्योग बंद पडत आहेत, अनेक उद्योग परप्रांतात जात आहेत.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये शासनाने युवा धोरणासंबंधीचा प्रस्ताव आणला ही फार चांगली गोष्ट आहे. आता निवडणुका नाहीत त्यामुळे शासनाचा हेतू चांगला दिसतो. हा प्रस्ताव जर निवडणुकीच्या तोंडावर आला असता तर शासनाच्या हेतू बद्दल संशय घेता आला असता. माननीय मंत्री महोदयांवर माझा विश्वास आहे. त्यांचा हेतू चांगला आहे. एका बाजूला राज्यातील उद्योग बंद पडत असल्यामुळे 5 लाख लोक बेरोजगार झालेले आहेत आणि दुस-या बाजूला आपण राज्यातील युवा धोरणाची चर्चा करीत आहोत. हे शासनाचे काय कोडे आहे ते मला काही उलगडत नाही. "तुझ ो आहे तुजपाशी, परी तू जागा चुकलाशी" अशी आज सरकारची अवस्था झालेली आहे. या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

उक्तीच्या अनुषंगाने मी एक उदाहरण देतो. राज्यातील खाजगी सुरक्षा रक्षक मंडळामध्ये 5 लाख सुरक्षा रक्षक काम करतात. या 5 लाख सुरक्षा रक्षकांपैकी 2 लाख सुरक्षा रक्षक परप्रांतीय आहेत. मग प्रश्न असा निर्माण होतो की, महाराष्ट्रातील बेरोजगार तरुणांना नोक-या देण्यासाठी हे शासन काय करीत आहे आणि काय करणार आहे ? आपण राज्य सुरक्षा रक्षक मंडळ काढले. मुंबईमध्ये आज 45 हजार सुरक्षा रक्षकांची मागणी असताना ते तुम्ही देऊ शकत नाही. तर मग हा प्रस्ताव येथे कशासाठी आणला ? सुरक्षा रक्षक मंडळामध्येही फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो. चांगल्या अे.सी. कार्यालयामध्ये आणि घराच्या जवळ सुरक्षा रक्षकाचे काम मिळण्यासाठी पैसे घेतले जातात.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

तेथे देखील भ्रष्टाचार सुरु झालेला आहे. तरुणांचे शोषण केले जात आहे. मी शासनाला नावे द्यायला तयार आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप त्या मंडळाचे सदस्य आहेत.....

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, हा माझ्यावर अन्याय आहे. मला माझे विचार मांडण्यासाठी अधिक वेळ द्यावा अशी मी विनंती करतो.

तालिका सभापती : या प्रस्तावावरील चर्चा सुरु होऊन दीड तास झालेला आहे. यानंतर मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण व्हावयाचे आहे.

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, "युवा नीति" बहुत महत्वपूर्ण विषय है. इस विषय पर हम सबको अपने विचार रखने हैं. युवा नीति निर्धारित करने के लिए एक कमेटी की स्थापना की गई है. इसलिए इस विषय पर विस्तार से चर्चा होना जरुरी है. अतएव इस विषय पर चर्चा करने के लिए थोड़ा समय बढ़ाया जाए, ऐसी हमारी विनती है.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय असल्यामुळे चर्चेसाठी वेळ वाढविण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, युवा धोरणासंबंधी पहिल्यांदा या सभागृहात चर्चा होत आहे. महाराष्ट्र शासनाने या संदर्भातील निर्णय घेण्यासाठी समिती नेमली असून त्या समितीवर दोन्ही सभागृहाच्या काही सन्माननीय सदस्यांना घेण्यात आले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांकडून ज्या सूचना करण्यात येतील त्या सूचनांचा अंतर्भाव करुन धोरण तयार करणार आहोत. त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चेसाठी पुरेसा मिळावा यासाठी उत्तराचे भाषण मी सोमवारी देण्यास तयार आहे. सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु आहे. महाराष्ट्रातील २८ लाख बेरोजगार तरुणांचा हा प्रश्न आहे. या सभागृहामध्ये अनेक विषयांवर चर्चा होत असते. एका बाजूला कामकाज नाही म्हणून अधिवेशन लवकर संपविण्यात येणार आहे. दुसऱ्या बाजूला प्रत्येक दिवशी सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येत आहे. हा विरोधाभास आपल्याला नजरेआड करुन चालणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

की, सुरक्षा रक्षक मंडळामध्ये श्री.महाजन व जे इतर पदाधिकारी कार्यरत आहेत त्यांच्याकडून माहिती घेण्यात यावी. त्याठिकाणी शोषण करण्याचे काम सुरु आहे. १५००-२००० हजार रुपये घेऊन जवळपास ड्युटी देण्याचे काम केले जाते. त्या माध्यमातून भ्रष्टाचार केला जात आहे. तूझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलासी.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये ४५ हजार सुरक्षा रक्षकांची मागणी असताना ती पूर्ण करु शकत नाही. खाजगी सुरक्षा रक्षक मंडळाच्या माध्यमातून २ लाख परप्रांतीयांना रोजगार उपलब्ध करुन दिला, त्याठिकाणी मराठी तरुणांना रोजगार देऊ शकलो असतो. पण तो प्रयत्न का होत नाही? नियमाप्रमाणे ६५०० रुपये किमान वेतन देण्याची तरतूद केलेली आहे. परंतु परप्रांतातून आलेले भैय्ये २०००-२५०० रुपये वेतनावर हातात दंडुका घेऊन सुरक्षा रक्षकाचे काम करीत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील स्थानिकांना सुरक्षा रक्षकाची नोकरी मिळू शकत नाही. या परप्रांतीयांकडे डोमिसाईल नाही. त्याबाबत कोणती चौकशी केली जात नाही. आज नवी मुंबई परिसरात अनेक कंपन्या आहेत, त्याठिकाणी परप्रांतातून आलेले भैय्ये हातात दंडुका घेऊन सुरक्षा रक्षकाचे काम करीत असल्याचे आपल्याला दिसून येत आहे. रत्नागिरी जिल्हयातील लोटे परशुराम येथील एमआयडीसीमध्ये १६० कंपन्या आहेत. तेथे परप्रांतीयांना रोजगार मिळत असल्याचे आम्ही अनुभवले आहे. या सर्व गोष्टींचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्यादृष्टीने हा प्रस्ताव महत्वाचा आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देता येईल. कोकणामध्ये मोठया प्रमाणात काजूचे उत्पादन होते. आज कोकणात उत्तर भारतीय भैय्ये गावागावात जाऊन ग्रामस्थांना पाव, बटर, बिस्किट देतात व त्या बदल्यात काजू बिया गोळा करण्याचे काम करीत आहेत. मी स्वत: आफ्रिकेत जाऊन ३०० टन काजू बिया आणल्या, १०० कटर मशिन्स उपलब्ध करुन दिल्या व त्या ठिकाणी ५०० लोकांना खेड तालुक्यात रोजगार उपलब्ध करुन दिला. परंतु या परप्रांतीयांनी ग्रामस्थांना पाव, बटर, बिस्किट देऊन काजू बिया गोळा करण्याची पध्दत सुरु केल्यामुळे काजू बियांवर प्रक्रिया करणाऱ्या मशिन्स बंद पडल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. बेरोजगार तरुणांच्या हाताला निश्चितपणे काम देता येईल. कोकणात आंबा, जांभूळ, आवळा, करवंद या फळ पिकाचे मोठया प्रमाणावर उत्पादन होते. या फळ पिकांवर

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

प्रक्रिया करणारे उद्योग उभे करुन त्या माध्यमातून मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होऊ शकतो. यासाठी १:९ प्रमाणात भांडवल मिळावे अशी शासनाकडे अनेकदा मागणी केली. परंतु शासनाची मानसिकता नसल्यामुळे शासन १:९ प्रमाणात भांडवल देण्यास तयार नाही.

नंतर एम.१...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

शासन फक्त ऊस कारखानदारांनाच सगळे देऊ शकते, गरिबांना तसेच बेरोजगारांना मात्र काहीच देण्याची शासनाची मानसिकता नाही. महाराष्ट्र राज्य हे कर्जबाजारी कसे झाले याची श्वेतपत्रिका शासनाने काढावी पण ती शासन काढू शकत नाही. जेथे बेरोजगारांना काम द्यावयाचे ते काम मात्र हे शासन करीत नाही. आज तरुणांच्या हाताला काम देण्याच्या दृष्टीने शासन काय उपाययोजना करणार आहे ? याचा खुलासा झाला पाहिजे. तसेच राज्यात जे परप्रांतीय खाजगी सुरक्षा रक्षकांमध्ये घुसलेले आहेत त्यांना बाहेर घालविण्यासाठी शासन काय करणार आहे हे देखील उत्तरात सांगणे आवश्यक आहे. बिगर जाहिरातीने नोकरीमध्ये घेतले जाते त्यासाठी शासन काय करणार आहे याचीही स्पष्टता होणे आवश्यक आहे. सभागृहात अशाच मुद्यावर मी परवा सभात्याग केला असता सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे सुध्दा माझ्याबरोबर उठले होते, कारण शेवटी कोकणी माणूस आहे. माझी अशी विनंती आहे की, कोणत्याही बाबतीत राजकारणाच्या नजरेतून पाहण्याची गरज नाही. राज्यात 28 लाख बेरोजगार आहेत त्यांना कशा पध्दतीने शासन नोकऱ्यादेणार आहे ? ग्रामीण भागातील बेरोजगारांना काम देण्याचा प्रयत्न शासन करणार की नाही याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले पाहिजे, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : महोदय, नियम 260 अन्वये सभागृहात अतिशय चांगल्या प्रस्तावावर चर्चा उपस्थित केली त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांचे मी आभार मानतो तसेच या प्रस्तावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन उत्तरासाठी वेळ झाला तरी मंत्री महोदयांकडून जास्तीत जास्त मुद्यांची उत्तरे कशी मिळतील हे पहावे. तसेच मंत्री महोदय सुध्दा या प्रस्तावाच्या बाबतीत अतिशय सकारात्मक भूमिका घेत आहेत, त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. आजच्या तरुण पिढीवर जे संस्कार व्हायला पाहिजेत ते खरोखरच होतात काय हे पाहणे आवश्यक आहे. राष्ट्रीय भावना तरुणांमध्ये जोपासली जाते काय हा मुद्दा येथे महत्वाचा आहे. आज माणूस समाजाच्या सहकार्याशिवाय सुख, समाधानाने जगू शकत नाही. म्हणून समाजातील प्रत्येक घटकाला सामाजिक समतेच्या मान-मर्यादा असतात त्या मान-मर्यादा मुलांकडून पाळल्या जातात काय ? त्याकडे पालकांचे लक्ष आहे की नाही, याचाही विचार करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सामाजिक बांधिलकी, सामाजिक ऋण ही जाण सर्व तरुणांमध्ये आहे काय, त्यांना तशी शिकवण आहे काय हा तर संशोधनाचा विषय होऊन बसलेला आहे. आज खरे तर सामाजिक बांधिलकीची पायमल्लीच होतानादिसत आहे. तशी ती होऊ नये म्हणून समाजातील सर्व घटकांने प्रामाणिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे असे मला वाटते. पूर्वी 15 ऑगस्ट, 26 जानेवारी तसेच 1 मे म्हटल्यानंतर एनसीसी किंवा स्काऊट गाईडमधील सगळी मुले या तारखांची वाट पाहत असत. कारण त्याकाळात राष्ट्रीय भावना प्रखरतेने निर्माण होत असे. आज केवळ हे सोपस्कार झालेले दिसून येतात. कोणीतरी एक जण जातो आणि 15 ऑगस्टचा झेंडा फडकवितो आणि अधिकारी वगैरे त्याला हजेरी लावतात. तसेच या निमित्ताने पूर्वी वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा असे कार्यक्रम सादर केले जात होते परंतु ही राष्ट्रीयत्वाची भावनाच लोप पावण्याची भिती वाटत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

तरुणांमध्ये राष्ट्रीय भावना येण्यासाठी एनसीसी आणि स्काऊट गाईड आपल्याकडे कार्यरत आहेत परंतु यासाठी आपल्याला वेगळे धोरण आखता येतील काय याचा विचार करावा लागणार आहे. मूल्ये जतन करता येतील काय, मूल्ये निर्माण करता येईल काय हा प्रमुख विषय आपल्यापुढे आहे. सभागृहातील ब-याच सन्माननीय सदस्यांनी शैक्षणिक धोरणात बदल केला पाहिजे असे विचार या ठिकाणी व्यक्त केले आहेत.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम साहेबांनी सांगितले की, रोजगार कार्यालयात 28 लक्ष तरुणांचे अर्ज आलेले आहेत. आपल्याकडे 28 लक्ष तरुण आज सुध्दा बेकार आहेत. छोटया छोटया खेडयात दोन दोनशे तीनशे शिक्षित बेकार तरुण आपल्याला दिसतात. या तरुण बेकांराच्या हाताला काम देण्याची आवश्यकता आहे. मी माझ्या सिंधुदुर्ग जिल्हयाचे उदाहरण आपल्याला सांगतो. सिंधुदुर्गच्या रोजगार कार्यालयातील कर्मचा-यांचा वर्षाचा खर्च 40 ते 50 लाखाच्या वर आहे. परंतु शासन जो काही या कार्यालयावर खर्च करते तेवढे तरी हे कार्यालय आपल्या तरुण बेकारांना काम मिळवून देतात काय हा खरा प्रश्न आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील रोजगार कार्यालयातून गेल्या 3 वर्षात फक्त 24 ते 25 तरुणांनाच नोक-या उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यामुळे याबाबतीत सुध्दा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. शासन तरुण बेकांरासाठी विविध उपक्रम राबवित असते. केंद्र सरकार तसेच राज्य सरकार जे काही उपक्रम राबवित असते त्याचा खरोखरच तरुणांना फायदा होतो का याचा सुध्दा विचार होण्याची आवश्यकता आहे. परवा आमच्याकडे 11 महिन्याच्या पदांसाठी इंटरव्हयू होता परंतु या 11 महिन्याच्या पदांसाठी 74 कॉल आले व प्रत्येक कॉलसाठी 200 रुपयांचा डीडी घेतला गेला त्यामुळे याबाबतीत आपण काही विचार करणार आहोत की, नाही हा माझा सवाल आहे.

वास्तविक पाहता या राज्याचा आणि आपल्या देशाचा अभिमान वाटावा अशी आज आपली परिस्थिती आहे. भारताच्या लोकसंख्येचा दर सन 2000 च्या जनगणेनुसार 2.4 होता तो आता 2.1 झाला आहे. परंतु सन 2021 मध्ये सर्व जगात जास्त तरुणांची संख्या ही भारतामध्येच राहणार आहे. एकूण लोकसंख्येच्या 56 टक्के तरुण पस्तीशीच्या आतील राहणार आहेत. जागात सर्वात जास्त मानवी क्रयशक्ती ही भारतामध्ये राहणार आहे. जगात एक नंबरची क्रयशक्ती भारतामध्येच राहणार आहे. जपान,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

इंग्लड तसेच चीन या विकसित देशातील तरुणांच्या संख्येपेक्षा अधिक तरुण आपल्या देशात राहणार आहेत. त्यामुळे सर्वात जास्त क्रयशक्ती असलेल्या देशातील तरुणांसाठी आपण आज पासूनच नियोजन करण्याची आवश्यकता आहे. आपल्या देशातील आजचा तरुण उच्च शिक्षित आहे व या पुढेही आपले तरुण अधिक उच्च शिक्षित होणार आहेत. या तरुणांवरील संस्कार, त्यांच्यातील राष्ट्रीय प्रेम कमी होत चालले आहे. आपल्या सांस्कृतिक मूल्यांचा तसेच आपल्या स्वातंत्र्य लढयाचा, इतिहासाचा त्यांना विसर पडत चालला आहे. देशासाठी आपण काही तरी करावे ही भावना आता बोथट होत चालली आहे. हे देशपेम आपण त्यांच्यामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. आजचे तरुण परदेशात नोकरी मिळवण्यासाठी का जातात याचा सुध्दा आपल्याला विचार करावा लागणार आहे. जास्त पगाराच्या नोक-या परदेशात मिळवण्याचा ते प्रयत्न करीत असतात. त्यामुळे तरुण पिढी आपल्याकडे कशी राहील यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे. उच्च शिक्षण घेऊन तरुण पिढी पैसे कमावण्यासाठी व स्वत:चे वैयक्तिक जीवन सुखी करण्यासाठी परदेशात जात. आपला देश उभा करणे, देशासाठी काम करणे ही भावना आता तरुणामधून लोप पावत चालली आहे. या तरुणांना आपल्या देशातच जास्त पगाराच्या नोक-या कशा मिळतील यासाठी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. भारतीय वंशांचे लोक कर्तृत्ववान आहेत, विद्वान आहेत हे जगन्मान्य आहे त्याबाबत काहीही वाद नाही. त्यामुळे अपेक्षित प्रगती साध्य करण्यासाठी शासनाने तशा प्रकारचे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

वॉटर कन्झर्व्हेशनमध्ये मेगासेस पुरस्कार मिळालेले आंतरराष्ट्रीय पाणी तज्ञ श्री. राजेंद्रसिंह हे तरुणपणी पाणी वापरावर संशोधन करत असतांना उत्तर प्रदेशातील त्यांच्या गावातील म्हता-या खेडुतांनी दिलेल्या माहितीमुळेच मी येथपर्यंत पोहचू शकलो ही नम्र कबुली देतात हीच नम्रता आजच्या तरुणामध्ये आणणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात आतापासूनच बदल करणे गरजेचे आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी शैक्षणिक बदलाच्या संदर्भात विचार मांडलेले आहेत. शिक्षणाच्या संदर्भात मी एक लक्षवेधी सूचना सुध्दा दिलेली आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

या लक्षवेधी सूचनेवर उत्तर कोणी द्यायचे हा प्रश्न निर्माण झाला आहे. माझी लक्षवेधी फलोत्पादनाशी संबंधित आहे. सदर लक्षवेधी सूचना कोकणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची अशी आहे. आंबा, काजू, जांभूळ, कोकम या फळांवर प्रक्रिया केल्यानंतर, 20 टक्के मटेरियल वापरल्यानंतर 800 ते 900 कोटी रूपये दरवर्षी शेतकऱ्याला मिळू शकतील. त्यातून दीड ते दोन लाख रोजगार निर्मिती होऊ शकेल, अशी भावना कृषि विद्यापीठाची आहे. त्यासंबंधातील माझी लक्षवेधी सूचना आहे. अशा प्रकारचे धोरण शासन स्वीकारणार आहे की नाही ? फलोत्पादन विभाग म्हणतो हा विषय पणन विभागाशी संबंधित आहे. पणन विभाग म्हणतो हा विषय उद्योग विभागाशी संबंधित आहे. त्यामुळे हा विषय नक्की कोणत्या विभागाकडे आहे हे शासनाने ठरविणे आवश्यक आहे. कोकणामध्ये फळफळावळ आहे. फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग कोकणात आणले तर केवढे तरी काम मिळेल. तशा प्रकारचा प्रयत्न शासनाने करणे गरजेचे आहे, असे मला वाटते.

सभापती महोदय, 12 जानेवारी हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन पाळला जातो. तो पर्यंत शासन युवा धोरण जाहीर करणार आहे काय ? असा माझा या निमित्ताने सवाल आहे. सभागृहात अतिशय चांगला विषय चर्चेला आणला आहे. म्हणून माझी विनंती आहे की, युवा धोरण लवकरात लवकर कसे आणता येईल या दृष्टीने प्रयत्न करावा. जाता जाता एवढीच मागणी करतो की, युवासाठी स्वतंत्र खाते निर्माण करण्यात यावे. 2021 मध्ये जगात जास्त युवा असलेला देश म्हणून भारत देशाची गणना होणार आहे. तेव्हा आपण त्याचे आतापासून नियोजन करण्यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करणे आवश्यक आहे. या खात्यासाठी निधीची देखील तरतूद करावी व युवकांच्या हाताला काम द्यावे

आपण राज्यासाठी क्रीडा धोरण आखले आहे. त्याच प्रमाणे युवकांसाठी गावागावात ग्रंथालयांची स्थापना करणे आवश्यक आहे. खेळाडूंना प्रोत्साहित करण्यासाठी राज्य व केंद्र शासनाने क्रीडा धोरण आखले आहे. या धोरणांचा एकत्रितपणे आढावा घ्यावा. मी जिल्हा परिषदेमध्ये काम केले आहे. सदर धोरण हे कागदोपत्री आहे. वर्तमानपत्रात फक्त बातम्या देतात. बाकी काहीही होत नाही. अधिकारी फक्त सोपस्कार उरकून घेतात. त्यामुळेच युवा धोरण पूर्णपणाने राबविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो आणि तसा प्रयत्न आपण कराल अशी मी खात्री बाळगतो आणि माझे विचार संपवितो. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयासंबंधी, युवा धोरणासंबंधी सदनासमोर प्रस्तावर आलेला आहे. सन 1988 साली आंतरराष्ट्रीय युवा धोरण जाहीर झाले. सन 2003 मध्ये 13 ते 35 वर्षे वयोगटातील युवकांचा विचार करून राष्ट्रीय धोरण जाहीर केले. त्यात पौंगडावस्थेतील युवकांकरिता शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, विज्ञान,नागरीशास्त्र इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला. महाराष्ट्रामध्ये 42 टक्के युवकांची संख्या आहे. यासाठी महाराष्ट्राचे युवा धोरण असले पाहिजे अशा प्रकारची चर्चा सुरू झाली. त्यासाठी यशवंतराव प्रतिष्ठानमध्ये खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्त्वाखाली बैठक होऊन प्रारूप आराखडा महाराष्ट्र शासनाला सादर करण्यात आला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक बैठक झाली. त्या बैठकीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण,रोजगार शिक्षण्, ग्रामीण विभाग विकास परिषद आणि इतर अशा एकूण पाच कमिट्या स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या कमिट्यांवर त्या त्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने युवा धोरणाबाबत काही शिफारशी केलेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने या शिफारशींची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. इतक्या वर्षांनंतर आपणास युवा धोरण जाहीर करण्याची आवश्यकता का भासली ? आज तरुण कोणत्या पध्दतीने जात आहे ? याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, जगामध्ये मक्तेदारी भांडवली अर्थव्यवस्था मजबूत झालेली आहे. आपला देशसुध्दा अशाप्रकारच्या संमिश्र अर्थव्यवस्थेकडे पाऊल टाकून पुढे जात आहे. या भांडवली अर्थव्यवस्थेचे अविभाज्य अंग म्हणजे बेकारी. गरीब अत्यंत गरीब होत आहे तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. या कचाट्यात आपण देखील सापडलो आहोत. आपल्याकडे श्रमशक्ती आहे. आपल्या युवकांमध्ये बौध्दिक, मानसिक, शारीरिक श्रम करण्याची शक्ती आहे. या श्रमशक्तीला योग्य प्रवाहामध्ये आणून त्यांच्यासाठी योग्य उद्योगधंदे निर्माण करणे आणि त्यांची क्रयशक्ती वाढविणे आवश्यक आहे. युवकांची क्रयशक्ती वाढविणे ही राज्य आणि केंद्र सरकारची जबाबदारी आहे. राज्यात बेकारांची संख्या 28 लाख 75 हजार 988 इतकी आहे. ही शासनाची आकडेवारी आहे. ही नोंदणीकृत बेकारांची संख्या आहे. माध्यमिक शाळांमध्ये 4 लाख 16 हजार 991 व्यक्तींची निरक्षर म्हणून नोंदणी झालेली आहे, त्यामध्ये स्त्रियांची संख्या फक्त 1 लाख 42 हजार 991 नोंदविण्यात आलेली आहे. म्हणजे 28 लाख 75 हजार 988 हा आकडा फसवा आहे. यापेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणावर सुशिक्षित बेकारांची संख्या महाराष्ट्रात आहे आणि त्यामध्ये तरुणींची संख्या देखील आहे. या तरुण मुलींना लहानपणी ज्या पध्दतीने वागविले जाते, वाढविले जाते म्हणजे अ ब क ड शिकविण्याच्यावेळी सुध्दा सांगितले जायचे की, 10वी पर्यंत शिकलीस तर 12वी शिकलेला नवरा मिळेल, 12 वी पर्यंत शिकलीस तर 15 वी पर्यंत शिक्षण झालेला नवरा मिळेल,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

डी.एड.शिकलीस तर डी.एड. झालेला नवरा मिळेल, डॉक्टर झालीस की डॉक्टर नवरा मिळेल. मुलीला वाढवित असताना या देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये तिचा समान सहभाग असला पाहिजे या भूमिकेतून एकाही मुलीला वाढविले जात नाही. म्हणून महाराष्ट्रातील अर्धी लोकसंख्या ही फक्त मुले निर्माण करणे या प्रक्रियेशी जोडलेली आहेत. (अडथळा) आमदार असेल आमदार आणि खासदार असेल तर खासदार यावर बोलायला लागले तर वादळ उठेल. मला त्यामध्ये बोलायला लावू नका. आमदार किंवा खासदाराचा मुलगा असणे हा काही दोष नाही... या देशामध्ये तरुण बेकारांची एक फळी निर्माण झालेली आहे त्यांचा आपण विचार करणार आहोत की नाही, त्यांना योग्य दिशेला लावणार आहात की नाही ?

सभापती महोदय, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी शिक्षणासंबंधी उल्लेख केला. जॉब ओरिएन्टेड शिक्षण असले पाहिजे. ज्या विषयाची त्याला आवश्यकता नाही तो विषय सुध्दा सक्तीचा केला जातो. मी दहावीला होते त्यावेळी आमची स्मरणशक्ती परीक्षा घेतली होती. म्हणजे एका खोलीमध्ये भरपूर वस्तू ठेवायच्या त्या वस्तू पाहण्यासाठी 5-10 मिनिटांचा वेळ द्यायचा आणि नंतर त्या वस्तुंची नावे आपण लिहायची अशी ती पध्दत होती. अशा पध्दतीची परीक्षा असेल तर ती अत्यंत चुकीची परीक्षा आहे.

सभापती महोदय, तरुणांमध्ये कोणती शक्ती आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. भगतसिंगने संसदेच्या गॅलेरीमध्ये बॉम्ब टाकला त्यावेळी भगतसिंग किती वर्षाचा होता ? भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव फासावर गेले.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या स्वातंत्र्य सैनिकांच्या बाबतीत मी असे म्हणू इच्छिते की,

"मादरे हिंद के खादिम थे,
गुनहगार न थे,
जुर्म इतना ही था कि,
फाँसी की सजावट न थे.
मर गए, मर मिटे अपने वतन के वास्ते,
बुलबुलें कुर्बान होती हैं,
चमन के वास्ते."

सभापती महोदय, भगतसिंगाने देशासाठी बलिदान केले होते त्यावेळी त्यांचे वय किती होते ? युवापिढीमध्ये देशासाठी स्वत:चे बलिदान करण्याची भावना निर्माण होऊ शकते परंतु त्यासाठी चळवळीचे सामर्थ्य असणे आवश्यक आहे. तशा प्रकारच्या चळवळी आज निर्माण व्हावयास पाहिजेत. त्यावेळी स्वातंत्र्याचा लढा सुरु होता आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी बलिदान दिले होते.सुभाषचंद्र बोस यांना देखील अत्यंत कमी वयामध्ये कॉग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचा मान मिळाला होता. त्याचप्रमाणे पंडित जवाहरलाल नेहरु यांनासुध्दा राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचा आणि देशाचे पंतप्रधान होण्याचा मान अत्यंत कमी वयात मिळाला होता. ज्ञानेश्वर माऊली यांनी अत्यंत लहान वयामध्ये गीतेचे प्राकृतमध्ये भाषांतर करुन सामान्य माणसाला ज्ञानाचे भांडार उघडे करुन दिले इतकेच नव्हे तर त्यांनी रेडयाला वेद म्हणावयास लावले. मूठभर लोकांच्या दावणीला सरस्वती होती ती बहुजन समाजाच्या दावणीला आणण्याचा प्रयत्न ज्ञानेश्वर माऊलींमुळे झाला होता. महाराष्ट्रातील युवा शक्तीला योग्य दिशा देणे गरजेचे आहे सामाजिक बांधिलकी, सामाजिक संबंध आणि देशाची विकास प्रक्रिया यामध्ये युवकांचा सहभाग असला पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर पुष्कळ बोलण्यासारखे आहे परंतु माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जी बैठक झाली होती त्या बैठकीत जे काही निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ...

अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात आली पाहिजे आणि युवा धोरण लवकर जाहीर करण्यात यावे अशी मी शासनाला विनंती करते.

तालिका सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख बोलतील. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांना बोलण्यासाठी थोडा अधिक वेळ द्यावा लागेल.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, बेल वाजविल्यानंतर मी कधीही जास्त वेळ बोलत नाही परंतु युवक चळवळीमध्ये काम करीत असतांना दोन वर्षे मी जेलमध्ये काढली आहेत..युवा धोरणावर बोलत असतांना मला चळवळीतील काही अनुभव येथे सांगावयाचे होते. मराठवाडा विकास आंदोलनासंबंधी आलेला अनुभव, मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी झालेल्या चळवळीचा अनुभव सांगावयाचा होता .हे सर्व अनुभव सांगण्याची संधी मिळावयास पाहिजे होती परंतु वेळेचे भान ठेवून मी माझे भाषण येथेच संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) सभापती महोदय, युवा धोरणाच्या संदर्भात या ठिकाणी मांडण्यात आलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलण्यासाठी मला वेळ दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. ज्येष्ठ सदस्यांनी किती वेळ बोलावयाचे याचे दडपण आमच्या मनावर सतत असल्यामुळे थोडक्यात विचार मांडण्याची आम्हाला सवय लागलेली आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे त्यामध्ये सुरुवातीला "राज्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वात जास्त प्रमाण तरुण वर्गाचे आहे " असे म्हटलेले आहे आणि शेवटी असे म्हटलेले आहे की, "युवकांचे स्थान भक्कम करण्यासाठी सर्वांगीण धोरण ठरविणे आवश्यक असून त्यावर करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी "

सभापती महोदय, युवकांच्या समोर असलेल्या अनेक प्रश्नांचा आणि समस्यांचा प्रस्तावामध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे त्या प्रस्तावावर बोलत असतांना वेळेचे भान ठेवून युवकांच्या दृष्टीने मला जे महत्वाचे दोन प्रश्न वाटतात ते प्रश्न मी या ठिकाणी मांडणार आहे.
माझा पहिला प्रश्न असा आहे की, खूप स्पर्धा असलेल्या अभ्यासक्रमामध्ये, शिक्षणक्रमामध्ये प्रवेश मिळविणे हा आजच्या तरुणांसमोर सर्वात मोठा प्रश्न आहे. त्याचबरोबर आपल्या गुणवत्तेनुसार सार्वजनिक सेवेत प्रवेश मिळविणे हा देखील तितकाच महत्वाचा प्रश्न असून त्याबाबतीत मी माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, राज्यातील युवकांसाठी धोरण ठरवित असतांना माननीय मंत्रिमहोदयांना या मुद्यांची आठवण कोणीही करुन दिली नाही असे होऊ नये म्हणून मी मुद्दाम दहा मिनिटामध्ये माझे मुद्दे मांडण्याचे ठरविलेले आहे.

सभापती महोदय, भारताच्या इतर कोणत्याही भागामध्ये अशा प्रकारची व्यवस्थां नाही आणि ती व्यवस्था असूही शकत नाही. या राज्यातील निरनिराळया भागाना समन्यायी वाटप
नोक-यांमध्ये आणि अभ्यासक्रमात द्यावे अशा प्रकारची व्यवस्था भारताच्या घटनेनुसार भारताच्या कोणत्याही राज्यात नव्हती. 1994 पूर्वी महाराष्ट्र राज्यामध्ये तशा प्रकारची व्यवस्था उपलब्ध नव्हती.परंतु 1994 सालानंतर ही व्यवस्था घटनेने उपलब्ध झाली आहे.याची आठवण करुन देण्यासाठी मी मुद्दाम सभागृहामध्ये हा विषय मांडत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय , महाराष्ट्र राज्याची आणि त्यावेळच्या गुजराथची विशिष्ट रचना लक्षात घेऊन घटनेमध्ये 371 (2) कलम टाकण्यात आले आहे. त्या कलमातील दोन ओळी मी या ठिकाणी वाचून दाखवतो. त्यात असे म्हटलेले आहे की,

" महाराष्ट्र आणि गुजराथ या राज्यांबाबत विशेष उपबंध -

या संविधानात काहीही असले तरी महाराष्ट्र आणि गुजराथ या राज्याबाबत आदेश करुन त्याव्दारे राष्ट्रपतींना पुढील गोष्टीसाठी राज्यपालांवर कोणतीही विशेष जबाबदारी सोपविण्याचा उपबंध करता येईल. "

या विशिष्ट गोष्टी पुढील प्रमाणे आहेत.

"तर राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोक-यांची पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्यायानुसार व्यवस्था स्थापित करणे .ही एक महत्वाची गोष्ट आहे. त्याचबरोबर तंत्र शिक्षण आणि व्यवसाय प्रशिक्षण यांच्यामध्ये समन्यायी वाटप झाले पाहिजे ही दुसरी महत्वाची गोष्ट आहे. त्याचबरोबर विकासाच्या निधीचे समन्यायी वाटप झाले पाहिजे ही तिसरी महत्वाची गोष्ट आहे." विकासाच्या निधीच्या समन्यायी वाटपाच्या संदर्भात या ठिकाणी एवढे महाभारत झालेले आहे की त्याविषयी मी जास्त काही बोलत नाही .....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

त्यामधील एका क्षेत्राविषयी आदेश पारीत झाले आणि त्याची नंतर जी काही फरफट झाली तो वेगळा भाग आहे. सभापती महोदय, घटनेमध्ये कलम असले तरी माननीय राष्ट्रपतींना ते अधिकार आहेत. ते आदेश काढतील व नंतर ती व्यवस्था अंमलात येईल. या विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी 26 जुलै 1984 रोजी एकमताने ठराव पारीत करुन देशाच्या माननीय राष्ट्रपतींना विनंती केली की, तुम्ही तुमचे कलम 371(2) चे अधिकार वापरा आणि ही समन्यायी वाटप व्यवस्था महाराष्ट्रात अंमलात आणा. 26 जुलै 1984 ला हा ठराव संमत झाल्यानंतर दहा वर्षांनी म्हणजे 9 मार्च 1994 रोजी या देशाच्या माननीय राष्ट्रपतींनी आदेश काढला. त्या आदेशाची प्रत मी याठिकाणी वाचून दाखवीत नाही. मंत्रिमहोदय त्याची जरुर नोंद घेतील. हा आदेश जसाच्या तसा न वाचून दाखविता त्यामध्ये काय म्हटले आहे तेवढे सभागृहाला सांगू इच्छितो. "मी शंकरदयाळ शर्मा, या देशाचा राष्ट्रपती, भारतीय संविधानाच्या 371(2) अन्वये मला जे अधिकार दिले आहेत त्यांचा वापर करुन आता महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवीत आहे. त्यांनी या तीन बाबतीत समन्यायी वाटपाची व्यवस्था अंमलात आणावी. 1) नोकऱ्यांमध्ये संधी 2) विकासाच्या निधीचे वाटप 3) अभ्यासक्रमामध्ये प्रवेशाची संधी." 1994 ला ही ऑर्डर पास झाली. आणि त्यानंतर एक-दीड वर्षानंतर विदर्भ,मराठवाडयावर संकट आले. ती ऑर्डर पास झाल्यानंतर विदर्भातील विद्यार्थ्यांच्या मेडिकलच्या जागा मोठया प्रमाणावर कापण्यात आल्या. या सभागृहामध्ये त्या विरोधात मोठा संघर्ष झाला, हायकोर्टामध्ये मोठा संघर्ष झाला, सुप्रिम कोर्टामध्ये सुध्दा तो संघर्ष झाला. मी आपल्या माहितीसाठी मुद्दाम ते ऐतिहासिक संदर्भ देऊ इच्छितो. या संदर्भाची नोंद घेतल्याशिवाय आपल्याला हे धोरण ठरविता येणार नाही. आणि ठरविले तर ते अयशस्वी होईल. म्हणून मी याठिकाणी मुद्दाम ते संदर्भ देऊ इच्छितो. हायकोर्टाने दिलेल्या एका निर्णयामध्ये असे म्हटले आहे की, या जागांच्या बाबतीत झालेल्या अन्यायाबाबत तात्पुरती व्यवस्था करावी. तोपर्यंत समन्यायी वाटपाचा प्रश्न अनिर्णित ठेवतो. सभापती महोदय, सुप्रिम कोर्टाने 27 मार्च 1995 ला निर्णय देतांना असे सांगितले की, हा प्रश्न अनिर्णित ठेवण्यासारखा नाही. Mr. Chairman, Sir, I beg your pardon to read out the order passed by the Hon'ble Supreme Court. I quote, " So far as question of equitable distribution is concerned, which has been dealt with in paragraphs 99 and 99A & 99B, we are inclined to think

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

that the question is likely to raise its head year after year and therefore, it would be desirable to put an end to the contention rather than keeping the question open as the High Court has done. We, therefore, set aside that part of the High Court order and remit the matter back to the High Court decision on the question regarding equitable distribution of seats as raised before it." तुम्ही इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनचा प्रश्न अनिर्णित ठेवला ही गोष्ट योग्य झाली नाही. तुमचा हा निर्णय quash and set aside करतो आणि तुम्ही इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनचा प्रश्न निकालात काढण्याकरिता ही केस परत तुमच्याकडे पाठवितो.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. याठिकाणी राज्याच्या युवा धोरणाच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. सभागृहाचे माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी या सभागृहात माननीय राष्ट्रपतींनी घटनेच्या कलम 371(2) अन्वये राज्य सरकारला जे निदेश दिले होते त्याच्याशी संबंधित मुद्दा मांडलेला आहे. हा विषय संपूर्ण महाराष्ट्राशी संबंधित नाही. परंतु याठिकाणी युवा धोरण संपूर्ण महाराष्ट्रासाठी आहे. या महाराष्ट्रामध्ये अनुशेषग्रस्त भाग आहेत, त्यामध्ये विदर्भाचा भाग आहे किंवा अन्य भाग आहेत. त्याठिकाणी कलम 371(2) चा अर्थ काय?

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी संपूर्ण महाराष्ट्राबद्दल बोलत आहे फक्त मराठवाडा आणि विदर्भापुरते बोलत नाही.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सभागृहाच्या बैठकीची वेळ पाच मिनिटांनी वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : घटनेच्या कलम 371 (2) अन्वये आदेश काढले हे बरोबर आहे. परंतु विदर्भ आणि मराठवाडा महाराष्ट्रात नाही काय? ही चर्चा महाराष्ट्राची चालली आहे. विदर्भ आणि मराठवाडयामध्ये शैक्षणिक अनुशेष आहे. तेथील तरुण यामध्ये येत नाहीत काय? त्यांच्या संदर्भात ही चर्चा चालू आहे. सन्माननीय सदस्या ॲड. दराडे यांनी या ठिकाणी शिक्षणाच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. विदर्भ, मराठवाडयातील तरुणांना तंत्र शिक्षणामध्ये आणि वैद्यकीय शिक्षणामध्ये संधी मिळत नाही हा विषय आहे. मग ही चर्चा महाराष्ट्राची चाललेली आहे असे कसे म्हणता येईल? मराठवाडा, विदर्भाच्या संदर्भात अशा प्रकारची भूमिका मांडण्यात येऊ नये. हा विषय घटनात्मक आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : मराठवाडा व विदर्भातील सिंचनाचा अनुशेष सोडला तर बाकी शिक्षणातील अनुशेष भरुन काढलेला आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ज्येष्ठ सदस्य सन्माननीय ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांचा चुकून असा समज झालेला आहे की, मी शिक्षणाच्या अनुशेषा विषयी बोलत आहे. पण मी शिक्षणाच्या अनुशेषा विषयी बोलत नाही. शिक्षणाचा अनुशेष, सिंचनाचा अनुशेष हा त्या तीन पैकी एक भाग आहे. समन्यायी वाटप अभ्यासक्रमाच्या संधीमध्ये आणि समन्यायी वाटप नोकऱ्यांमध्ये राज्य शासनाच्या अखत्यारित असलेल्या सेवांमध्ये असा स्पष्ट शब्द आहे. या दोन बाबतीत समन्यायी वाटप ठरवत असताना मी जे बोलत आहे ते संपूर्ण राज्याच्या बाबतीत बोलत आहे. एका भागाचे बोलत नाही.सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या दोन बाबींची दखल घ्यावी म्हणून एक सूत्र मी पाच-सात मिनिटात मांडू इच्छितो. राज्याच्या अखत्यारित असलेल्या शासकीय सेवांमध्ये हे जे प्रकार चालतात इकडच्या जिल्हयात गेले की इकडच्यांनी झोडपायचे आणि तिकडच्या जिल्हयात गेले की, तिकडच्यांनी झोडपायचे हे बरोबर नाही. त्यामुळे महाराष्ट्राची किर्ती वाढत नाही. त्यासाठी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख....

शासनाजवळ घटनात्मक उपाययोजना आहे ती वापरावी हे सांगण्यासाठी मी यातील फक्त महत्वाचे मुद्दे माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देतो. सुप्रिम कोर्टाने असे सोगितले की, हायकोर्टाच्या निर्णयामध्ये ही एक चूक आहे. इक्विटेबल डिस्ट्रिब्युशनचा मुद्दा त्यांनी अनिर्णित ठेवला. त्या निर्णयात पुन्हा असे म्हटलेले आहे की, " In order that this question is settled at the earliest and before the question of admission to the next academic year begins, it is desirable that the High Court gives priority to this matter and disposes it of as early as possible as the question being of recurring nature. We, therefore, remit the matter for this limited purpose to the High Court with a request to the High Court to give priority to the question at issue and dispose it of as early as possible preferably before the next academic year commences."

सभापती महोदय, त्याच वेळेला या सभागृहामध्ये सुध्दा याबाबतीत जबरदस्त संघर्ष सुरु होता. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांचे सभागृहातील सारे कोटेशन मी वाचून दाखवित नाही. त्यांनी जाहीरपणे असे सांगितले की, हा अन्याय झालेला आहे. म्हणून तळेगाव दाभाडे येथे जी काही नवीन कॉलेज सुरु झालेले आहेत त्या ठिकाणी 50 जागा विदर्भाला दिल्या जातील. सभापती महोदय, साधारणतः विद्यार्थी हा रोलिंग स्टॉक असतो. ज्यांनी प्रवेश घेतला ते पुढे निघून जातात. डॉक्टर होतात. हा प्रश्न सुटला होता त्यामुळे तणाव कमी झाला आणि. या संदर्भातील सभागृहातील चर्चाही बंद झाली. याबाबतीत हायकोर्टाने जो निर्णय दिलेला आहे त्या चार ओळी मी या ठिकाणी वाचून दाखवितो म्हणजे हा प्रश्न कुठे आहे हे माननीय मंत्रिमहोदयांना कळेल.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ....

त्या निर्णयात असे म्हटले आहे की, " Shri S. C. Aney, Learned 'A' Panel Counsel for the Respondent Nos. 1 and 2, has submitted that twice the Minister concerned has given an assurance and the State has accepted the principle of equitable distribution. As the State Government has accepted the principle of equitable distribution as the criteria for admission of students throughout the State and therefore, there is no contest any more in the positions. Hence, we propose to dispose of these writ petitions, giving time as prayed to the State Government to complete the exercise and process to formulate the principles of equitable distribution." त्या ठिकाणी आता आपण उभे आहोत. सभापती महोदय, दोन मिनिटांमध्ये मी माझे भाषण संपविणार आहे. माझे एकच म्हणणे आहे की.....

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : आता या प्रस्तावावरील चर्चा थांबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांचे भाषण अपूर्ण आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.35 ते 12.45 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधी</u>

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ज्या विषयामुळे संपूर्ण भारत बंद झाला होता, त्या विषयासंबंधी आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आज नियम 289 अन्वये आलेल्या प्रस्तावाच्या सूचनांना दालनामध्ये अनुमती नाकारलेली आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

बुलढाणा जिल्ह्यामध्ये जर्मन अर्थसहाय्यातंर्गत मंजूरी मिळालेल्या साठवण तलावाबाबत

(१) * ७०५९ श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये जर्मन अर्थसहाय्यातंर्गत ४ साठवण तलावांना प्रशासकीय मान्यता मिळून निविदा प्रक्रियासुद्धा पुर्ण करण्यात आली होती, तसेच जमीन भूसंपादनाची, कलम ४ अंतर्गत कारवाई सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) सदर साठवण तलावांना मा.मुख्यमंत्र्यांनी सुद्धा तत्त्वत: मान्यता दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ४ साठवण तलाव मंजूर झाल्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील संबंधीत भाग पंतप्रधान पॅकेजच्या फायद्यापासून जाणिवपूर्वक वंचित ठेवण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) अचानक जर्मन अर्थसहाय्यातंर्गत सदर प्रकल्प रद्द झाल्याने शासनाने सदर साठवण तलाव पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला आहे काय,

(५) नसल्यास, बुलढाणा हा आत्महत्याग्रस्त तसेच अनुशेषग्रस्त जिल्हा असल्याने निधी केव्हा उपलब्ध करुन देणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) व (२) बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील मोहदरी, धानोरी-२, गणेशपुर-२ व घारोड-१ या चार साठवण तलावांच्या कामांना जर्मन अर्थसहाय्यांतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे तसेच भूसंपादन प्रस्तावाची कलम ४ ची कार्यवाही प्रगतीत आहे. जर्मन अर्थसहाय्यित लघुपाटबंधारे कार्यक्रम-महाराष्ट्र (MIP-M) अंतर्गत १२ नवीन योजनांना पुर्वनिधी उपलब्ध करुन देणेबाबतच्या प्रस्तावास मा.मुख्यमंत्री महोदय यांनी मान्यता दिली आहे. तथापि, नवीन प्रकल्पांना के.एफ.डब्ल्यू. बँकेद्वारा कोणतेही अर्थसहाय्य दिले जाणार नसल्याचे के.एफ.डब्ल्यू बँकेने दिनांक १९ मार्च, २०१० च्या पत्रान्वये कळविले असल्याने या चार योजनांची पुढील कार्यवाही थांबविण्यात आली आहे.

(३) नाही.

(४) व (५) उपरोक्त ४ नवीन योजनांना शासनस्तरावरुन निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लेखी उत्तरात दुरुस्ती करु इच्छितो. प्रश्न भाग 1 मधील पहिल्या ओळीत "बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील" असे नमूद केले आहे. त्याऐवजी "बुलढाणा जिल्हयातील चिखली व खामगांव तालुक्यातील" असे वाचावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यातील मोहदरी, धानोरा-2 आणि खामगांव तालुक्यातील गणेशपुर-2 व घारोड-1 असे हे 4 प्रकल्प आहेत. या प्रकल्पांना शासनाने दिनांक 13 जानेवारी, 2009 रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर मार्च,

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2009 या महिन्यात निविदेची प्रक्रिया पूर्ण झाली. त्यानंतर कामाची वर्क ऑर्डरही निघाली होती. त्यानंतर कलम 4 नुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु झाली. परंतु आता लेखी उत्तरात माननीय मंत्री महोदयांनी असे म्हटले आहे की, "के.एफ.डब्ल्यू बँकेने दिनांक 19 मार्च, 2010 च्या पत्रान्वये कळविले असल्याने या चार योजनांची पुढील कार्यवाही थांबविण्यात आली आहे." पूर्ण विचाराअंती हे चारही प्रकल्प हाती घेतले होते. तेथे पाण्याची उपलब्धता असल्याचे प्रमाणपत्र मिळाले होते. जर्मन अर्थसहाय्यित म्हणून त्या योजनांना मान्यता मिळाली होती. कलम 4 प्रमाणे भूसंपादनाच्या नोटीसेस शेतकऱ्यांना दिल्या होत्या. आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या जिल्हयांसाठी पॅकेज जाहीर झाले होते. पण हे प्रकल्प होणार म्हणून त्याच्यातून या जिल्हयाला वगळण्यात आले. तसेच या चारही गावातील विहिरी, जलसंधारणाची कामे थांबविण्यात आली. माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. इतकी सगळी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ऐनवेळी जर्मन बँकेने पैसा देण्यास नकार दिला आहे. या जर्मन बँकेने नकार देण्याचे कारण काय ? राज्यपालांच्या निदेशानुसार विदर्भातील सिंचनासाठी 250 कोटी रुपये दिले आहेत. आता जर्मन बँक या प्रकल्पांना पैसा देणार नसल्यामुळे त्याच्यातून 18 कोटी रुपये दिले जाणार आहेत का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयातील 4 योजना असल्या तरी एकूण 12 योजना रखडलेल्या आहेत. हया योजना प्रामुख्याने विदर्भातील अनुशेषग्रस्त जिल्हयातील आहेत. के.एफ.डब्ल्यू.नावाची जर्मन बँक आणि राज्य शासन यामध्ये करार झालेला आहे. या जिल्हयांमधील बाकी प्रकल्प मंजूर झाले असले तरी ज्या 12 योजना घेतल्या होत्या त्यामध्ये या 4 योजना आहेत. या योजनांची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. परंतु दिनांक 26 मार्च रोजी जर्मन बँकेने असे सांगितले की, यापुढे प्रकल्पाला पैसा देता येणार नाही. या प्रकल्पांसंबंधी पाठपुरावा केल्यानंतर तुम्हाला पैसे देऊ असे त्यांनी म्हटले होते. परंतु बँकेने नंतर तेही नाकारले आहे. एकूण 12 योजना आहेत. या 12 योजनांची किंमत 60 कोटी 14 लाख इतकी आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

या योजनांवर प्रथम शासनाने खर्च करावा आणि नंतर त्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येईल अशी तयारी त्यांनी दर्शविली होती. परंतु त्यांनी नंतर विविध कारणे देऊन अर्थसहाय्य देण्यास नकार दिला. हा कार्यक्रम 2011 सालापर्यन्त पूर्ण करावयाचा आहे असे त्यांनी सांगितले. आपली योजनांची परिस्थिती पाहता हा कार्यक्रम 2011 सालापर्यन्त पूर्ण होऊ शकत नव्हता. तसेच साठवण तलावांची उंची 22 मीटरपेक्ष जास्त असू नये असे त्यांनी सांगितले होते. परंतु उंची 22 मीटर पेक्षा जास्त झालेली आहे. अशा प्रकारच्या त्रुटी काढून अर्थसहाय्य देण्यास त्यांनी नकार दिला. शासन हा कार्यक्रम पूर्ण करणार काय अशी विचारणा सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी केली. तसा देखील प्रयत्न आपण केला होता. जलसंधारण विभाग या योजना पूर्ण करण्याच्या प्रयत्नामध्ये आहे. परंतु नवीन योजना सुरु करु नयेत असे माननीय राज्यपाल महोदयांनी निदेश दिलेले आहेत. याबाबतीत पाठपुरावा करण्यात येत आहे. वर्क ऑर्डर देण्याच्या स्टेजला या योजना आलेल्या असल्यामुळे या योजनांना मान्यता द्यावी अशा प्रकारची विनंती आम्ही राज्यपाल महोदयांना करीत आहोत.

श्री. अरुण गुजराथी : महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे एकूण किती प्रकल्प आहेत ? हे प्रकल्प राज्य शासनाला अचानक बंद करावे लागण्याची कारणे काय आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात : एकूण 12 प्रकल्प आहेत. हे 12 प्रकल्प विदर्भातील आहेत. हे प्रकल्प घेणार नाही असे त्यांनी सांगितल्यानंतर त्यांच्या बरोबर 2 बैठका झाल्या. महाराष्ट्र शासनाने या प्रकल्पावर प्रथम खर्च करावा आणि नंतर त्याची प्रतिपूर्ती आम्ही करु, असे त्यांनी सांगितले होते. त्यानंतर त्यासंबंधीची फाईल तयार करुन त्यास माननीय मुख्यमंत्र्यांची संमती घेतली. हा कार्यक्रम त्यांना 2011 पर्यन्त संपायचा आहे. या प्रकल्पास विलंब होत आहे. हे इण्डो-जर्मन प्रकल्प 2011 पर्यन्त पूर्ण होणार नाही हे कारण दाखवून त्यांनी ही मदत नाकारली.

प्रा. बी.टी.देशमुख : जर्मन बँकेने अर्थसहाय्य दिले नाही म्हणून अनुशेषग्रस्त भागातील प्रकल्प होत नाहीत आणि शासन देखील त्यांना मदत देत नाही. सभापती महोदय, विदर्भातील तीन-चार जिल्हे हे महत्तम अनुशेष असलेले जिल्हे आहेत. वॉटर रेग्युलेटरी ॲथॉरिटीने काढलेल्या निष्कर्षानुसार हे महत्तम अनुशेष असलेले जिल्हे आहेत. माननीय राज्यपाल महोदयांना राज्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने असे कळवावे की 94च्या सरासरीवर काढलेले हे महत्तम अनुशेष असलेले जिल्हे आहेत. 2007-2008च्या राज्य सरासरीप्रमाणे हा अनुशेष वाढलेला आहे. या लहान लहान योजना बाबत नकारात्मक चर्चा होणे हे अत्यंत वाईट आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, अनुशेषग्रस्त भागातील योजनांच्या बाबतीत आपण ठामपणे पुढे गेले पाहिजे. 2007-2008च्या राज्य सरासरी प्रमाणे बुलढाणा जिल्ह्याचा अनुशेष जास्त आहे. तो लक्षात घेऊन या योजनांना परवानगी द्यावी अशी विनंती राज्य सरकारने राज्यपाल महोदयांना करावी.

श्री. बाळासाहेब थोरात : हा महत्तम अनुशेष असलेला भाग असल्यामुळे नवीन योजना घेऊन आधीच्या योजनांचे प्राथ्यम्य सौम्य करु नये असे राज्यपाल महोदयांनी निदेश दिलेले आहेत.आम्ही अनुशेष ग्रस्त भागातील आधीच्या योजनांचे प्राथम्य सौम्य करत नाही अशा प्रकारची भूमिका आम्ही माननीय राज्यपाल महोदयांकडे मांडणार आहोत.

सय्यद जमा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख के प्रश्न के उत्तर में कहा कि माननीय राज्यपाल महोदय का आदेश है कि जब तक सिंचन का बॅकलॉग खत्म नहीं होता है, तब तक नई योजनाएं नहीं लेनी चाहिए. बुलढाणा जिले के 4 तालाबों के लिए के.एफ.डब्ल्यू. बँक की तरफ से पैसा देने की योजना थी और शासन की तरफ से प्रशासकीय मान्यता की प्रक्रिया पूरी हो गई थी. मंत्री महोदय ने बताया कि वाटर स्टोरेज के 12 प्रोजक्ट के लिए कुल मिलाकर 60 करोड़ रुपए का खर्च है. के.एफ.डब्ल्यू. बँक ने पैसा देने से मना कर दिया है तो शासन को सप्लीमेंटरी डिमांड्स लाकर इस कार्य को पूरा करना चाहिए. इसके अतिरिक्त माननीय मुख्यमंत्री महोदय ने 10 हजार करोड़ रुपए का विशेष पॅकेज दिया है और इसमें से काम शुरु नहीं हुए हैं. वाटर स्टोरेज के इन कामों को इसमें शामिल करने के लिए आपको रि-एप्रोप्रिएशन करना होगा. इन वाटर स्टोरेज का कार्य पूरा किया जाएगा , क्या इस प्रकार का विश्वास माननीय मंत्री महोदय देंगे.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : तसाच शासनाचा प्रयत्न आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक १३.१.२००९ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जाणार आहेत त्यांना भूसंपादनाची नोटीस मिळाली, त्यामुळे त्यांना दोन वर्षे पीक धेता आले नाही. आपल्या जमिनी संपादित होणार आहेत म्हणून त्यांनी पेरणी केली नाही. गेल्या दीड वर्षात शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही. प्रशासकीय मान्यता मिळाल्याबरोबर कामाला सुरुवात झाली असती तर हे चारही प्रकल्प जून, २०१० पर्यंत पूर्ण झाले असते. विदर्भातील १२ प्रकल्पांची एकूण किंमत ६० कोटी आहे. बुलढाणा जिल्हा हा विदर्भातील सिंचनाचा महत्तम अनुशेष असलेला जिल्हा आहे. त्या जिल्हयासाठी शासनाने अशी निराशाजनक भूमिका घेणे योग्य नाही. १८ कोटी रुपये खर्चाचे हे चारही प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत निधीअभावी थांबविले जाणार नाहीत असे ठाम आश्वासन मंत्रीमहोदय देतील काय? सन्माननीय सदस्य श्री.सय्यद ज़मा यांनी सुचविल्याप्रमाणे या प्रकल्पांच्या कामासाठी पुरवणी मागणी वा पुनर्विनियोजनाद्वारे किंवा माननीय राज्यपालांना विनंती करुन विभागामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जाईल काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या संदर्भात विभागाची पूर्णपणे इच्छा आहे की, हे चारही प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत. विभागाच्या निधीतून हे प्रकल्प पूर्ण व्हावेत यासाठी नियोजन विभागाकडे प्रस्ताव सादर केला होता. परंतु नियोजन विभागाने कळविले की, माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे ही कामे सुरु करता येणार नाहीत. मागील मार्च महिन्यात निविदा काढून वर्क ऑर्डर देण्याच्या काळातच केएफडब्ल्यू बँकेने कळविले की, ही कामे पुढे नेता येणार नाहीत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केएफडब्ल्यू बँकेने अगोदर होकार दिल्यानंतर निविदेबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असताना नकार देण्याची कारणे काय आहेत?

श्री.बाळासाहेब थोरात : त्या बँकेने नकार दिल्यानंतर शासनाने पुन्हा त्यांच्याकडे पाठपुरावा केला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या खर्चाने कामे पूर्ण करायची आणि जर्मन बँकेने तो खर्च रिइम्बर्स करायचा यासाठी प्रयत्न करण्यात आले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.७०५९.....

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते वारंवार विचारणा करीत आहेत की, जर्मन बँकेने नकार देण्याची कारणे काय आहेत? या प्रश्नाचे उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे.

श्री.बाळासाहेब थोरात : नकार देण्याची कारणे मी यापूर्वीच सांगितली आहेत. २०११ पर्यंत ही कामे पूर्ण व्हावयाची होती. तसा करार झालेला आहे. परंतु एकूण परिस्थिती पाहता ही कामे २०११ पर्यंत पूर्ण होऊ शकत नसल्यामुळे आम्हाला ही कामे पुढे न्यायची नाहीत असे त्यांनी कळविले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : प्रशासकीय मान्यता २००९ मध्ये मिळाली, वर्क ऑर्डर २००९ मध्ये देण्यात आली. प्रशासकीय मान्यता मिळाल्याबरोबर प्रकल्पाची कामे सुरु झाली असती तर आतापर्यंत हे प्रकल्प पूर्णत्वाला गेले असते.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अनुशेषग्रस्त भागातील महत्तम सिंचनाचा अनुशेष असलेल्या बुलढाणा जिल्हयातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी चार प्रकल्प उभारण्यास केएफडब्ल्यू बँकेशी करार करण्यात आला. परंतु करारात नमूद केल्याप्रमाणे २०११ पर्यंत ही कामे पूर्ण होणार नाहीत म्हणून त्या बँकेने नकार देणे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर दीड वर्षात प्रकल्पाची कामे सुरु झाली नाहीत म्हणून जर्मन बँकेने सांगितले की, तुमच्याकडून उजेड पडत नाही म्हणून आम्ही निधी देणार नाही. करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रोसेस पूर्ण करणार आहात काय?

श्री.बाळासाहेब थोरात : ही प्रोसेस पूर्ण करण्यास वेळ लागला. प्रोसेस पूर्ण झाल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली, त्यानंतर वित्त व नियोजन विभागाने मान्यता दिली.

नंतर एक्स.१..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7059..... श्री. बाळासाहेब थोरात.....

त्यानंतर जर्मन बँकेने सांगितले की, आम्ही आता निधी देऊ शकत नाही. त्याची कारणमिमांसा देताना त्यात म्हटले आहे की, 22 मीटरची उंची वगैरे असावी अशी अनेक कारणे दिली आहेत. यामध्ये जलसंधारण विभागाकडून उशिर झालेला नाही तर तसा प्रयत्न सुरुच होता. तरी देखील हे चारही प्रकल्प जलसंधारण विभागाच्या निधीतून पूर्ण करण्याचा प्रयत्न शासनाकडून करण्यात येईल. तसेच माननीय राज्यपालांचे जे निदेश आहेत त्याबाबतीत त्यांच्याकडे ही कामे पूर्ण करण्याचा आग्रह धरण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, मागासलेल्या विभागाच्या बाबतीत शासनाने अशा प्रकारे आडमुठ्ठेपणाची भूमिका घेणे योग्य नाही तर शासनाने हे सांगितले पाहिजे की, आम्ही हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोठूनही निधी आणू परंतु काम पूर्ण करणारच आहोत, अशी आमची अपेक्षा आहे. कारण बुलडाणा जिल्हा हा सर्वात जास्त मागासलेला जिल्हा असताना ही भूमिका योग्य नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, जलसंधारण विभागामार्फत हे प्रकल्प पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. केवळ राज्यपालांच्या निदेशाची अडचण असल्याने हे होऊ शकत नाही.....

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या निदेशात प्रकल्प घेऊ नये असे सांगितले आहे काय ? तसेच हे निदेश कोणत्या वर्षात दिलेले आहेत, आणि प्रकल्प कोणत्या वर्षात मान्य झालेला आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, ज्यावेळेस या प्रकल्पासाठी मदत करण्याचे बँकेने नाकारले त्यानंतर सन 2010-11 मध्ये शासनाने माननीय राज्यपालांकडे प्रस्ताव पाठविला होता की अशा कारणास्तव ही कामे रखडली असल्याने ती पूर्ण करण्याची परवानगी देण्यात यावी....

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, या प्रकल्पांची प्रशासकीय मान्यता जानेवारी, 2009 ची असून सन 2010-11 मध्ये माननीय राज्यपालांनी निदेश दिलेले आहेत, वर्क ऑर्डर्स सुध्दा त्याच वर्षातील असल्याने हे प्रकल्प नवीन नाहीत.

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, माननीय राज्यपालांकडे जाऊन या प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी परवानगी घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7059.....

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, राजमाता जिजाऊ यांचा हा जिल्हा असून या जिल्ह्यासाठी शासन अशा प्रकारची भूमिका घेत असेल तर ते योग्य नाही. त्यांनी ठामपणे सांगायला पाहिजे की, या प्रकल्पासाठी जे 18 कोटी रुपये लागतील ती रक्कम देऊन ही कामे पूर्ण करण्यात येतील.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, महत्तम अनुशेष असलेला हा बुलडाणा जिल्हा असूनही अशा चारही प्रकल्पांना ठेचून मारणे हे योग्य नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, मी आताच सांगितलेले आहे की, हे प्रकल्प पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करु....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, माननीय राज्यपालांना शासनाने सांगितले पाहिजे की, अगोदर आपल्याला चुकीची माहिती दिली. सन 2008 च्या राज्य सरासरीमध्ये या जिल्ह्याचा सर्वात जास्त अनुशेष आहे.....

श्री. रामदास कदम : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी किमान सहा वेळा तरी सांगितले की, या प्रकल्पाला सन 2009 मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेली असून त्याच वर्षात वर्क ऑर्डर सुध्दा मिळाली आहे. माननीय राज्यपालांनी सन 2010 मध्ये निदेश दिलेले आहेत. म्हणून विदर्भासारख्या मागासलेल्या विशेषकरुन बुलडाणा जिल्ह्यातील या चार प्रकल्पांना केवळ 18 कोटीचीच गरज असल्याने केवळ ते काम करण्याचा प्रयत्न करतो असे उत्तर न देता स्पेसिफिक ही रक्कम देऊन प्रकल्प पूर्ण करण्यात येतील असे उत्तर देणे अपेक्षित होते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 7059....

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, महत्तम अनुशेष् असलेल्या चार जिल्हयांपैकी हा एक जिल्हा आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी आम्हाला ठामपणे सांगितले पाहिजे की, आम्ही पैसा कोठूनही उपलब्ध करु परंतु बुलढाणा जिल्हयातील चार प्रकल्प पूर्ण करुच असे उत्तर दिले पाहिजे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, राज्य शासनाच्या जलसंधारण विभागाच्या निधीतून हे प्रकल्प पूर्ण केले जातील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हेल्पर्स ऑफ दि. हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेने सुरु केलेल्या समर्थ विद्यामंदीर शाळेच्या इयत्ता मान्यतेबाबत

(२) * ७७९४ श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.संजय केळकर : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हेल्पर्स ऑफ दि. हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर या संस्थेच्या अपंग बालकांच्या शैक्षणिक पुनर्वसनात येणाऱ्या अडचणीचा अभ्यास करुन माहे जून २००० मध्ये संस्थेने समर्थ विद्यामंदीर नावाची अपंग व सुदृढ बालकांसाठी शाळा सुरु केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेच्या इमारतीसाठी तसेच अपंग विद्यार्थ्यांच्या निवासी वसतिगृह पुनर्वसन केंद्रासाठी जमीन देऊन महाराष्ट्र शासनाने या कामात महत्वाचे योगदान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) परंतु महाराष्ट्र शासन आणि प्रशासन यांच्या अनास्थेमुळे व बरीच निवेदने देऊन नैसर्गिक वाढीनुसार इयत्ता मान्यतेचा प्रश्न अद्यापही प्रलंबीत आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, याबाबत दिनांक ६ मे, २००८ मध्ये शिक्षणाधिकारी यांच्याकडे अर्ज केला आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) होय.

(२) व (३) होय, सदर संस्थेने कायम विनाअनुदान तत्वावर मराठी माध्यमाची माध्यमिक शाळा सुरु करण्याकरिता सन २००८ मध्ये प्रस्ताव दाखल केलेला होता. सदर प्रस्तावास दोन्ही समित्यांची शिफारस नसल्याने तसेच मंत्रिमंडळाने मराठी माध्यमाचे सर्व प्रस्ताव रद्दबातल केले असल्याने सदर प्रस्ताव अमान्य झालेला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आधीच्या प्रश्नाच्या होकारार्थी उत्तराप्रमाणे या प्रश्नासही होकारार्थी उत्तर द्यावे अशी विनंती करुन प्रश्न मांडतो. हेल्पर्स ऑफ दि. हॅन्डिकॅप्ड्, कोल्हापूर येथील संस्था असून ही संस्था श्रीमती नसीमा हुरजूक या अपंग महिलेने सुरु केलेली आहे. या प्रकल्पाला जागतिक स्तरावर पुरस्कार देखील मिळालेला आहे. पहिली ते सातवी पर्यंत या ठिकाणी परवानगी मिळालेली आहे परंतु आठवी व नववीला परवानगी नाकारण्यात आल्यामुळे या ठिकाणच्या अनेक मुलांना शिक्षण घेणे कठीण झाले आहे. मंत्री महोदयांनी उत्तरात असे म्हटले आहे की, "मंत्रिमंडळाने मराठी माध्यमाचे सर्व प्रस्ताव रद्दबातल केले असल्याने सदर प्रस्ताव अमान्य झालेला आहे". ही एक वेगळी शाळा आहे. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी या शाळेला अपवाद करुन आधीच्या प्रश्ना प्रमाणे होकारार्थी उत्तर द्यावे अशी विनंती आपल्या माध्यमातून करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 7794....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही मराठी माध्यमाची शाळा आहे. शाळांना मान्यता देत असताना प्रथम पूर्णपणे आराखडा तयार करण्यात यावा व आवश्यक तेथेच शाळेला मंजूरी द्यावी असा निर्णय झालेला आहे. या ठिकाणच्या शाळेला सातवी पर्यंत मान्यता आहे परंतु आठवीसाठी मान्यता मागितलेली आहे. परंतु आरखडयानंतर मान्यता द्यावी अशा प्रकारचा निर्णय घेतला गेला आहे त्यामुळे या शाळेला मान्यता देता येत नाही.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, अपंगाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न आहे . अपंगाचे शिक्षण सामान्य शाळेत झाले तर त्यामध्ये अडचणी निर्माण होत असतात. आताची संकल्पना इंटीग्रेटेड एज्यूकेशन वरुन इन्क्ल्यूजीव्ह एज्यूकेशन पर्यंत पोहचलेले आहे. अपंगाच्या शाळेमध्ये अपंगाचे सामिलीकरण होत नसल्यामुळे हा एक नवीन प्रयोग आहे. या ठिकाणच्या शाळेला मान्यता दिली तर या ठिकाणच्या अपंग विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण घेता येईल. त्यामुळे महत्वाचे धोरण म्हणून अपंगासाठी कोणी इन्क्ल्यूजीव्ह एज्यूकेशनची मराठी माध्यमातून शाळा सुरु करीत असेल तर त्याला शासनाने निश्चित मान्यता द्यावी. अशा प्रकारची परवानगी मिळाली तर अपंग विद्यार्थ्यांना न्याय मिळू शकेल. त्यामुळे शासनाने या शाळेच्या संदर्भात मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या सूचनेची नोंद घेण्यात आली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्याचे मराठीच्या धोरणा विषयी जे मत आहे ती वेगळी बाब आहे. परंतु कोल्हापूर येथे श्रीमती नसीमाताईंनी अंपग विद्यार्थ्यांसाठी प्रकल्प सुरु केलेला असून या प्रकल्पाला माजी राष्ट्रपती डॉ.अब्दूल कलाम सुध्दा यांनी सुध्दा भेट दिलेली आहे. या ठिकाणच्या वसतीगृहात राहणारी मुले या शाळेत शिक्षण घेतात. या प्रकल्पाला अनेक सन्माननीय सदस्यांनी भेटी सुध्दा दिलेल्या आहेत. या ठिकाणच्या मुलांना दोन्ही हात नसल्यामुळे पायाने लिहून त्यांना दहावी पर्यंत नेतात याचा आम्हाला अभिमान आहे. त्यामुळे अशा पध्दतीने जे काम करतात त्यांना शासनाने ख-या अर्थाने प्रोत्साहन दिले पाहिजे. या शाळेला अनुदान नको आहे. या शाळेला मान्यता हवी आहे. आपण आता अपंग शब्द वापरत नाही त्यामुळे या ठिकाणी जी विशेष मुले आहेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र. : 7794....

श्री. विनोद तावडे....

त्या मुलांसाठी शासन चाकोरीतून बाहेर जाऊन विचार करणार आहे काय ? संवेदनशील मंत्र्यांनी संवेदनशील निर्णय घेण्याचा मुद्दा आहे. सभागृहात जर आपण या शाळेच्या संदर्भात निर्णय घोषित केला तर राज्यामध्ये एक प्रकारचा चांगला संदेश जाईल. प्रामाणिकपणे काम करणा-या एनजीओ यांना प्रोत्साहन दिल्यासारखे होईल. त्यामुळे या शाळेला मंत्री महोदयांनी मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही एक वेगळी संस्था आहे हे मी नाकारीत नाही. या विषयाच्या संदर्भात या शाळेचे लोक माझ्याकडे आले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7794....

श्री.बाळासाहेब थोरात...

सध्या हे पॉलिसीमध्ये बसत नाही, ही वस्तुस्थिती आहे. सदर शाळा कायम स्वरूपाची विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता मागत आहे. मध्यंतरी कायम विनाअनुदानित तत्त्व घेऊन विनाअनुदान तत्त्वावर मान्यता मागणारे प्रस्ताव आले. त्यामुळे एक संभ्रमाची अवस्था निर्माण झाली. जे खरोखरच कायम स्वरूपी विनाअनुदान तत्त्वावर मान्यता मागत आहेत, अशांसाठी वेगळ्या पद्धतीचा निर्णय होणे आवश्यक आहे. त्यामुळे अशा शाळांकरिता तशा पद्धतीचा निर्णय घेण्यासंबंधी विचार केला जाईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इतिवृत्तामधील मतैक्यांच्या मुद्यावर संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून कारवाई न होणे

(3) * 7088 प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक 2598 ला दिनांक 1 एप्रिल, 2010 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) प्रतिनिधी व महाराष्ट्र शासनाच्यावतीने मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री व मुख्य सचिव यांच्या मंत्रालयातील, मुख्य सचिवांच्या दालनात दिनांक 26 ऑगस्ट, 2009 रोजी झालेल्या चर्चेअंती निरनिराळ्या 10 मुद्यांवर मतैक्य झाले त्यापैकी क्रमांक दहाच्या मुद्यावर संचालक उच्च व तंत्र शिक्षण यांनी पुढील कारवाई करावी असे शासनाने दिनांक 7 सप्टेंबर, 2009 रोजी आदेश दिलेले असताना संचालक उच्च व तंत्र शिक्षण यांचेकडून मात्र याबाबतच्या सूचना किंवा परिपत्रक निर्गमित करण्याची कोणतीही कारवाई पार पडली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत उच्च व तंत्र शिक्षण संचालकांनी कोणतीही कारवाई न करण्याचे कारण काय आहे,

(3) कारवाई केलेली असल्यास, करण्यात आलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे ?

श्रीमती वर्षा गायकवाड,श्री.राजेशे टोपे यांच्याकरिता : (1) नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) विभागीय सह संचालकांनी त्यांचे स्तरावर आवश्यक कारवाई करण्याकरिता दि.18-1-2010 नुसार सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 10 मुद्यांसंबंधीचा प्रश्न होता. जवळ जवळ बहुतेक प्रश्नांसबंधी शासनाने समाधानकारक कारवाई केली आहे. 9 आणि 10 मुद्यांसंबंधी थोडी गडबड झाली होती. माझे एकेका वाक्याचे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, दिनांक 18.1.2010 रोजी शासनाने शासन निर्णय निर्गमित केला आहे. सहसंचालकांना, संचालकांनी सूचना निर्गमित केल्या आहेत हे खरे आहे काय ? संचालकांना देखील काही सूचना द्यावयाच्या होत्या. त्या कोणी दिल्या आहेत. त्या सूचना या पत्रकामध्ये आहेत काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नासंबंधी असे सांगू इच्छिते की, संचालकांनी, सहसंचालकांना दिनांक 18.1.2010 रोजी पत्र पाठविले आहे. .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क. 7088

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना असे विचारू इच्छितो की,संचालकांनी बैठक घ्यायची होती. त्यांना देण्यात आलेल्या सूचना ह्या त्याच पत्रात आहे काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड : होय.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मग माझा दुसरा प्रश्न नवव्या मुद्यासंबंधी आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी शासन निर्णय दोन महिन्यात निर्गमित करण्यात येईल असे 3 महिन्यापूर्वी सांगितले होते. तो शासन निर्णय अजून निर्गमित झालेला नाही. याबाबत काही त्रुटी AICT ने काढल्या होत्या, हे त्यामध्ये आले आहे. दहा मुद्यांपैकी जो नववा मुद्दा आहे त्यासंबंधी येत्या दोन महिन्यामध्ये जी.आर.काढणार असे सांगितले होते तो अद्याप निर्गमित झालेला नाही. आता निदान 15 किंवा एक महिन्यात त्याबाबतचे आदेश निर्गमित होतील काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांसाठी सहाव्या वेतन आयोगामध्ये सांगितल्याप्रमाणे प्रस्ताव येत्या कॅबिनेटसमोर घेऊन जाऊ व तो कॅबिनेटमध्ये मान्य केला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, आपण काही तरी टाईम बॉऊंडमध्ये सांगितले पाहिजे की, महिन्यामध्ये, पंधरा दिवसामध्ये हे आदेश निर्गमित होतील. त्याप्रमाणे आपण उत्तर द्यावे

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, येत्या महिन्याभरामध्ये ही प्रोसेस पूर्ण केली जाईल.

.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्मचाऱ्यांच्या नजरचुकीमुळे आय.टी.आय निदेशकांची ससेहोलपट होत असल्याबाबत

(4) * 6779 श्री.विक्रम काळे , प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.रामनाथ मोते, श्री.विनोद तावडे, श्री.संजय केळकर , श्री.सतीश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक 3400 ला दिनांक 1 एप्रिल, 2010 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासन निर्णय व त्याबाबतच्या टिप्पणीमध्ये टंकलेखनाच्या राहून गेलेल्या चुकांमुळे वेतनश्रेण्यांचे आकडे चुकीचे पडल्यासंदर्भात, या चुकांची जबाबदारी निश्चित करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(2) असल्यास, याबाबतची जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात आलेली आहे,

(3) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

(4) उक्त चुक दुरुस्त न केल्यामुळे अनेकांची आर्थिक कुचंबणा होत असून अनेकांकडून आर्थिक वसूली करण्यात येत आहे, अनेकांची सेवानिवृत्ती वेतन प्रकरणे प्रलंबित आहेत, अशी तक्रार करणारे जे निवेदन दिनांक 20 जून, 2008 रोजी किंवा त्यासुमारास महाराष्ट्र राज्य आय.टी.आय.निदेशक संघटनेच्या सचिवांनी प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांना सादर केलेले आहे ते लक्षात घेता ही चूक एका आठवड्यामध्ये दुरुस्त करणारा शासन निर्णय निर्गमित झाला, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, सदरहू शासननिर्णय कोणत्या तारखेला निर्गमित झाला आहे ?

श्रीमती वर्षा गायकवाड,श्री.राजेश टोपे यांच्याकरिता : (1) होय.

(2) व (3) जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(4) व (5) रु.7450-11500/- या वेतनश्रेणी ऐवजी शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांप्रमाणे रु.7500-12000/- अशी सुधारणा करण्याच्या शासन निर्णयाचे प्रारुप अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर केले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, 50 महिन्यांनी आयटीआय कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचे काम शासनाने केले आहे. शासनाने 19 जुलै 2010 रोजी जी.आर.निर्गमित केला आहे. या जी.आर.मध्ये रूपये 50/- दुरूस्ती करण्यात आली आहे. सदर फरक देण्यासाठी रक्कम लागणार आहे, आर्थिक तरतूद लागणार आहे, ती तरतूद शासन केव्हा करणार आहे आणि ती रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांना केव्हा पर्यंत अदा करण्यात येणार आहे ?

श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, डयू डिफरन्स एक महिन्यात दिला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6779 ....

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, शासन निर्णय निर्गमित झाल्याबद्दल मी आभार मानीत आहे. पण ते कशाचे मानत आहे हे देखील सांगून टाकतो. 1996 मध्ये झालेली चूक 2003 मध्ये दुरूस्त करण्यात आली. ती दुरूस्त करताना टायपिंग मिस्टेक झाली. सभागृहात वेगळे सांगितले गेले. जी.आर. देखील निघाला. पण नंतर असे कळले की, कॅबिनेट समोर प्रस्ताव ठेवला त्यात एका कारकूनाने रूपये 500/- ऐवजी रूपये 450/- अशी रक्कम नमूद केली. अशा प्रकारे टायपिंग मिस्टेक झाली. आता ती टायपिंग मिस्टेक 4-5 वर्षांनी दुरूस्त झाली याबद्दल शासनाचे आभार. पण या चुकीमुळे 4 प्रकारचे लोक भाजलेले आहेत. एक म्हणजे या चुकीमुळे काही सेवानिवृत्तीधारकांना डिसॲडव्हान्टेज झाला आहे. दोन- काही लोक न्यायालयात गेले आहेत. तीन-काही लोकांची आपण थकबाकी अडवून ठेवली आहे. या सर्व लोकांची प्रकरणे आपण आता जी दुरूस्ती केली आहे त्या अनुषंगाने दुरूस्त केली जातील असे आदेश शासनातर्फे दिले जातील काय?

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 6799...

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, एकूण 118 जण न्यायालयात गेले होते. न्यायालयाच्या निर्णयानुसार त्यांना 9 टक्के व्याजदराने पैसे द्यावयाचे आहेत. याबाबत आम्ही वित्त विभागाकडे शिफारस करु. डयु फिडरन्सबाबत काय करणार आहे असा दुसरा प्रश्न विचारला होता त्याबाबत सांगू इच्छिते की, त्याबाबत एक महिन्यात निर्णय घेण्यात येईल. तसेच त्यांचे पे फिक्सेशन देखील एक महिन्यात करण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 5 व 8 वरील प्रश्न एकत्रित चर्चेला घेणेबाबत

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 5 व 8 वरील अनुक्रमे प्रश्न क्रमांक 7561 आणि प्रश्न क्रमांक 7556 हे दोन्ही प्रश्न एकाच विषयाशी संबंधीत आहेत. तेव्हा आपण हे दोन्ही प्रश्न एकत्रित घ्यावेत अशी विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक 7561 व 7556 हे दोन्ही प्रश्न एकत्रितरित्या चर्चेला घेण्यात येत आहेत.

.3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शालेय शिक्षण विभागातील पे युनिट मधील अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे शिक्षकाचे पगार उशिरा होत असल्याबाबत

(5) * 7561 श्री.कपिल पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शालेय शिक्षण विभागातील पे युनिट मधील अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे शिक्षकांचे वेतन उशिरा होत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, 20 वर्षांपासून पे युनिट मध्ये नवीन कर्मचाऱ्यांची भरती न झाल्याने तसेच कामाचे प्रमाण वाढल्याने काम वेळेवर होत नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शिक्षकांना नियमितपणे वेतन मिळण्याबाबत शासनाने काय उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील शिक्षकांचे पगार राष्ट्रीयकृत बँकेमार्फत सुरु करण्याबाबत

(८) * ७५५६ श्री.राजन तेली , श्री.कपिल पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षकांचे पगार राष्ट्रीयकृत बँकेमार्फत करण्यासंबंधी वित्तविभागाने शिक्षण विभागास सूचना केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँक ऑफ महाराष्ट्र आणि युनियन बँक यांनी त्याबाबतचे प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षक भारती संघटनेने मुंबई विभागातील शिक्षकांना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत पगार सुरु करण्याबाबत वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय, व मा. वित्तमंत्र्यांनी याबाबत बैठक बोलावली होती हे ही खरे आहे काय,

(४) याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7561 व 7556..

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी या सभागृहात पहिल्यांदा आल्यानंतर जो प्रश्न विचारला होता तोच प्रश्न आज चार वर्षानंतर विचारत आहे. शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत अशी तक्रार सातत्याने होत आहे. आपण वेतन पथकातील कर्मचाऱ्यांची संख्या गेल्या 20 वर्षापासून वाढविलेली नाही त्यामुळे त्यांच्यावर कामाचा प्रचंड ताण येतो. म्हणून पगार विलंबाने होतात. तेव्हा वेतन पथकातील कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात येईल काय ? मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात काही ठिकाणी सहकारी बँकांचे जाळे कमी आहे त्यामुळे पगारास विलंब होतो आणि सहकारी बँका पैसे वापरतात. मंत्रालयातील कर्मचाऱ्यांचे पगार राष्ट्रीयकृत बँकेमार्फत होतात. तेव्हा शिक्षकांचे पगार देखील राष्ट्रीयकृत बँकामार्फत देण्यात येतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, वेतन पथकामध्ये कर्मचारीसंख्या कमी आहे म्हणून पगारास विलंब होतो ही वस्तुस्थिती नाही. या संदर्भातील कागदपत्रे पूर्ण करण्यासंदर्भातील दिवस कसे कमी करता येईल आणि महिन्याच्या एक तारखेला पगार होईल यादृष्टीने विभागाचा प्रयत्न सुरु आहे. आम्ही ऑन लाईन पध्दतीचा सुध्दा विचार करीत असून त्याबाबतचे एक सॉफ्टवेअर तयार करण्याच्या दृष्टीने विभागाचा प्रयत्न सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले की, मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील काही भागांमध्ये सहकारी बँकाचे जाळे कमी असल्यामुळे काही अडचणी येत आहेत त्याबाबत तपासून कार्यवाही केली जाईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, इतर क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे पगार महिन्याच्या एक तारखेला होतात. परंतु शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार कधीही वेळेवर होत नाहीत. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी जे धोरणात्मक उत्तर दिले त्याची अंमलबजावणी किती दिवसांत करणार आहात ? गेल्या 20 वर्षात वेतन पथकाच्या स्टापिंग पॅटर्नमध्ये काहीही बदल झालेला नाही. त्याठिकाणी अनेक रिक्त पदे आहेत. तेव्हा वेतन पथकाचा स्टापिंग पॅटर्न आणि रिक्त पदे भरण्याबाबतचा निर्णय शासन किती दिवसांत घेणार आहे ? अनेक जिल्ह्यातील वेतनपथक कार्यालयांची अतिशय दुरवस्था झालेली आहे. ठाणे कार्यालयात स्लॅब कोसळून अनेक कर्मचारी जखमी झाले. ते कार्यालय आता स्थलांतरित करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातील

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7561 व 7556..

श्री.रामनाथ मोते...

कार्यालय भाड्याच्या इमारतीमध्ये आहे, अनेक जिल्ह्यांमध्ये ही अवस्था आहे. तेव्हा वेतन पथकाच्या कार्यालयांची दुरुस्ती करण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, वेतनपथक कार्यालयात "ब" वर्गातील 18 पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याची प्रक्रिया अंतिम स्तरावर आहे. क आणि ड वर्गातील पदे भरण्याबाबत वित्त विभागाने स्थगिती दिली असल्यामुळे त्या वर्गातील रिक्त पदे भरण्यात आलेली नाहीत. वेतनपथकाच्या कार्यालयाच्या दुरवस्थेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला त्याबाबत सांगू इच्छितो की, त्याबाबत तपासणी करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, वेतन अधीक्षक कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. अकोला आणि वाशिम असे दोन नवीन जिल्हे झाले. परंतु वाशिम जिल्ह्यामध्ये वेतन अधीक्षक कार्यालयात एकही कर्मचारी नाही. त्यामुळे शिक्षकांचे पगार महिन्याच्या एक तारखेला कधीच होत नाहीत. तसेच शिक्षकांच्या भविष्य निर्वाह निधीची प्रकरणे अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7561 व 7556 श्री.वंसतराव खोटरे..

त्याठिकाणी पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे शिक्षकांचे पगार वेळेवर होत नाहीत.या बाबतीत मला असे विचारावयाचे आहे की, ज्या ठिकाणच्या पे युनिटमध्ये कर्मचारी कमी आहेत त्या ठिकाणच्या पे युनिटमध्ये कर्मचा-याची लवकरात लवकर नियुक्ती केली जाणार आहे काय आणि 1 तारखेला शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचे पगार झाले पाहिजे यादृष्टीने कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, वाशिम जिल्हयामध्ये जर काही वेगळे प्रश्न असतील तर त्याची तपासणी करुन त्याबाबतीत योग्य ती कार्यवाही केली जाईल त्याचबरोबर कर्मचा-यांच्या भरतीसंबंधी मी यापूर्वी सांगितले आहे. त्याचप्रमाणे कागदपत्रे टाळून ऑन लाईन पध्दतीने जर हे काम करु शकलो तर अत्यंत मर्यादित कर्मचा-यांमध्ये, कमी श्रमामध्ये हे काम होऊ शकेल आणि एक तारखेला पगार होऊ शकतील तेव्हा ऑन लाईन पध्दतीने पगार कसा देता येईल या दृष्टीने देखील शासन विचार करीत आहे. या पुढच्या काळात त्यासंदर्भात निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय,पे युनिटमध्ये कर्मचारी कमी आहेत. एक तारखेला पगार काढण्याच्या संदर्भात शासनाने जी.आर. काढला असून त्यामध्ये ब्रेकअप देण्यात आला आहे. त्या ब्रेकअपची अंमलबजावणी त्या त्या घटकाकडून होत नाही त्या ठिकाणी बीडीएस इफेक्टीव्ह नाही उलट ही सिस्टीम सुरु झाल्यामुळे आणखी उशीर होण्यास सुरुवात झालेली आहे म्हणून ही सिस्टीम अधिक सुसज्ज करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर वित्त विभागाकडून शिक्षण विभागाकडे निधी येतो आणि शिक्षण विभागाकडून शिक्षण डायरेक्टरांच्या माध्यमातून शिक्षणाधिका-याकडे पाठविण्यात येतो त्यामुळे बराच उशीर लागतो. तेव्हा एक तारखेला पगार करण्याच्या संदर्भात जी आर.मध्ये तो ब्रेकप ठरवून देण्यात आलेला आहे त्यामध्ये अधिक वेगाने काम कसे होईल यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे काय ? . त्याचबरोबर को ऑपरेटिव्ह बॅका ही जाणूबुजून पगार देण्यास विलंब करतात आणि आठ ते पंधरा दिवस बिले यासाठी प्रलंबित ठेवतात आणि या रकमेवरील व्याज स्वत: कमावतात ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7561.व.7556..

श्री.जयंत प्र.पाटील : असे होत नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या बॅके विषयी बोलत नाही जाणूनबुजून आठ ते दहा दिवस पगाराची बिले सहकारी बॅका प्रलंबित ठेवतात . शिक्षकांचे पगार त्यांच्या खात्यावर लवकर जमा करावेत अशा सूचना सहकारी बॅकेला देण्यात येतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : पगाराची बिले कशा पध्दतीने तयार करण्यात यावीत याचे शेडयूल ठरवून दिलेले असून त्याची प्रत माझ्याकडे आहे.सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सहकारी बॅकांना सूचना देण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सहकारी बॅकांवर अन्याय केला जात आहे.शिक्षकांना लवकर पगार दिला पाहिजे हे म्हणणे ठीक आहे.रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या माध्यमातून मी शिक्षकांना ॲडव्हॉन्समध्ये पगार देत असतो . माननीय मंत्री महोदय देखील सहकार क्षेत्रामध्ये काम करीत आहेत. जिल्हयामध्ये सर्वात जास्त सहकारी बॅकांच्या शाखा आहेत. मुंबई सहकारी बॅक ही सर्वात चांगली बॅक आहे. तिची आर्थिक स्थिती देखील चांगली आहे. सहकारी बॅकेच्या माध्यमातून ॲडव्हान्स मध्ये शिक्षकांना पगार देण्याची योजना राज्य शासन सुरु करील काय ?.प्रायोगिक तत्वावर मी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत ही योजना सुरु केलेली आहे.सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, सहकारी बॅका आपल्या आहेत आपल्या मालकीच्या आहेत. राष्ट्रीयकृत बॅका मात्र आपल्या मालकीच्या नाहीत.त्याचबरोबर शेतक-याना चार टक्के व्याजाने कर्जाचा पुरवठा करावा म्हणून वारंवार सांगण्यात येते . नफा कमविण्या-या योजना राष्ट्रीयकृत बॅकांकडे ठेवण्याचा राज्य सरकारचा प्रयोग सुरु आहे व त्याला माझा विरोध आहे. माननीय मंत्रीमहोदयांना मला एक विनंती करावयाची आहे. सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना "विचार करु" असे आपण म्हटलेले आहे त्या ऐवजी विचार करता येणार नाही आणि सहकारी बँका मार्फतच शिक्षकांचे पगार होतील असे उत्तर द्यावे त्याचप्रमाणे पुढच्या महिन्याचा पगार ॲडव्हान्समध्ये सहकारी बॅका देऊ शकतील तेव्हा त्या पध्दतीची योजना राज्य शासन सुरु करील काय ?

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7561 व..7556..

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ॲडव्हान्समध्ये पगार देण्याची योजना सुरु करण्याची आवश्यकता नाही. सध्याची जी सिस्टीम आहे त्यामध्ये सुधारणा करु शकलो आणि ऑन लाईन पध्दत सुरु करु शकलो तर यामध्ये सुधारणा होऊ शकेल सहकारी बॅकेमध्ये जर कोठे त्रृटी असतील तर त्या देखील दुरुस्त करण्यास त्यांना सांगण्यात येईल.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7561, 7556...

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्यांनी को-ऑपरेटिव्ह बँका आपल्या असून नॅशनलाईज्ड बँका आपल्या नसल्याचे सांगितले आहे. मला त्यांना सांगावयाचे आहे की, नॅशनलाईज्ड बँकाही आपल्या आहेत. आपण प्रथम भारतीय आहोत त्यानंतर आपण राज्याचे नागरीक आहोत...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांना माझा मुद्दा न समजल्यामुळे त्यांचे चुकीचे म्हणणे रेकॉर्ड होत आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, नॅशनलाईज्ड बँका या सर्व जनतेच्या आहेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, गेल्या चार वर्षापासून सातत्याने त्रुटी दूर करण्याचे आश्वासन दिले जात आहे, तरीही या त्रुटी दूर झालेल्या नाहीत. माझा पहिला प्रश्न असा की, आपण ऑनलाईनचे आश्वासन दिले आहे हे काम किती महिन्यात पूर्ण करणार आहात? दुसरा प्रश्न असा की, माननीय वित्तमंत्र्यांनी मंत्रालयातील कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर मुंबईतील सर्व शिक्षकांचे पगार नॅशनलाईज्ड बँकामार्फत करण्याचे आदेश दिले आहेत हे खरे आहे काय? असल्यास, त्याची अंमलबजावणी केव्हा करणार?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी दिलेल्या आदेशाची प्रत माझ्याजवळ नाही, परंतु ही वस्तुस्थिती आहे. यामधील त्रुटी सहा महिन्यात दूर करण्याचा आपण प्रयत्न करु.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, गोंदिया हा नवीन जिल्हा निर्माण झाल्यानंतर एक अधीक्षक, एक सिनियर ऑडिटर, एक लिपिक, एक चपराशी अशी चार पदे कायम स्वरुपात रिक्त आहेत. त्यामुळे त्याठिकाणी नागपूरहून कायम स्वरुपात प्रतिनियुक्तीवर हे कर्मचारी पाठविले जातात. त्यामुळे पे युनिटमध्ये अडचणी निर्माण होतात. तेव्हा ही चार पदे आपण तातडीने केव्हा भरणार आहात?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ब वर्गातील पदे तातडीने भरली जातील. परंतु क आणि ड या पदांना असलेली स्थगिती उठल्यानंतर त्वरित भरली जातील. त्या संदर्भात जाहिरात सुध्दा दिली गेली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक

(६) * ६९१२ श्री.दिलीपराव सोनवणे , प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे : दिनांक २६ मार्च, २०१० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या पाचव्या यादीतील प्रश्न क्रमांक १६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीबाबत मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई झालेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड, श्री.राजेश टोपे यांच्याकरिता : (१),(२) व (३) संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता मिळालेली नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

"संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याच्या प्रस्तावास शासन मान्यता मिळालेली नाही" याऐवजी "संगणकशास्त्र या विषयास अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे" असे वाचण्यात यावे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी छापील उत्तरामध्ये केलेली दुरुस्ती स्वागतार्ह आहे. याचे कारण अगोदर देण्यात आलेले उत्तर स्वागतार्ह नव्हते. भेदभावपूर्ण वागणूक दिल्याचे प्रकरण हायकोर्टामध्ये मांडण्यात आले तेव्हा दि. २६ नोव्हेंबर २००७ रोजी हायकोर्टाने निर्णय दिला की, हा एवढा भेदभाव आहे तो तुम्ही तपासा व आठ दिवसात त्याबाबत निर्णय करा. हायकोर्टाने आठ दिवसात निर्णय करा असे सांगितल्यानंतरही तो निर्णय झाला नाही. हायकोर्टाने त्या शिक्षकांना, पिटीशनर्सना, मॅनेजमेंटला सांगितले होते की, तुमच्याकडे असलेले मुद्दे तुम्ही त्यांच्यासमोर मांडा. त्याप्रमाणे त्यांनी २३ भेदभावाचे मुद्दे असलेले निवेदन मंत्रिमहोदयांकडे, शासनाकडे दिल्यानंतर हे भेदभावाचे मुद्दे असल्याचे मंत्रिमहोदयांनी सभागृहामध्ये कबूल केले होते.

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र.६९१२...

प्रा.बी.टी.देशमुख...

आणि हे भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी पॉझीटीव्ह निर्णय घेऊ असे ते म्हणाले. दिनांक २३ डिसेंबर २००८ रोजी म्हणाले की, "हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी आणला जाईल आणि पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेतला जाईल." असे सांगितल्यानंतर हे भयानक उत्तर याठिकाणी "भयानक" हा शब्द लागू पडतो ते दुरुस्त केल्याबद्दल मी आपला आभारी आहे. कुणीतरी त्यासाठी निर्णयासाठी वेळ दिला पाहिजे हे हायकोर्टाने सांगितल्यानंतर एका हप्त्यामध्ये निर्णय घेतला नाही हे योग्य झाले नाही. आपण सांगितल्यानंतर सुध्दा त्याबद्दल निर्णय झाला नाही. आणि म्हणून याठिकाणी देण्यात आलेले उत्तर चुकीचे होते त्याबद्दल मी जास्त बोलत नाही ते आपण दुरुस्त केले आहे. तेव्हा यासंबंधीचा निर्णय केव्हा होईल? आठ दिवसात होईल? एक महिन्यात होईल की, दोन महिन्यात होईल?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, शासन वारंवार म्हणते की, सर्वांनी कॉम्प्युटर शिकले पाहिजे. कॉम्प्युटर चालविण्याचे ज्ञान सर्वांना असले पाहिजे. पूर्वी अशी म्हण होती की, "ज्याला लिहिता वाचता येते तो साक्षर" त्याप्रमाणे ज्याला कॉम्प्युटर चालविता येते तो साक्षर म्हटले जाते. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी लवकरात लवकर निर्णय घेऊ असे सांगितले आहे. हा विषय मंत्रिमंडळासमोर गेला आहे की नाही? गेला असेल तर या प्रस्तावाला आपण किती दिवसात मान्यता घेणार आहात?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6912...

प्रा. वर्षा गायकवाड : सभापतीम महोदय, या प्रश्नाचे उत्तर आधीच दिलेले आहे. या संदर्भातील विचार लवकर करुन लवकरात लवकर हा प्रश्न मंत्रिमंडळासमोर नेण्याचा प्रयत्न करु.

श्री.वसंतराव पवार : सभापती महोदय, संगणक शास्त्राचे महत्व सन्माननीय सदस्यांनी सांगितलेलेच आहे. माझा प्रश्न असा आहे की, संगणक घेण्यासाठी आणि संगणक शिकविणाऱ्या शिक्षकांच्या पगारासाठी या दोन्ही बाबींचा अंतर्भात या अनुदानामध्ये आहे काय? माझा दुसरा प्रश्न असा की, शासनाने या वर्षी कुठल्याही नवीन महाविद्यालयांना परवानगी दिलेली नाही असे समजते. शासन संगणक शास्त्राचे तसेच व्यवस्थापन शास्त्राचे नवीन महाविद्यालय देण्याचे धोरण स्वीकारणार आहे काय?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, संगणक शिकविणाऱ्या शिक्षकांसाठी पैसे देण्यात येणार आहेत.सभापती महोदय, सर्व सन्माननीय सदस्यांचे जे म्हणणे आहे तेच शासनाचे म्हणणे आहे. आजचे युग हे संगणकीय युग आहे आणि त्यादृष्टिकोनातून शासनाच्या माध्यमातून लवकरात लवकर पाऊले उचलण्यात येत आहेत.

श्री. वसंत पवार : सभापती महोदय, इयत्ता दहावीचा मोठया प्रमाणात निकाल लागलेला आहे तसेच इयत्ता बारावीचा निकाल देखील चांगला लागलेला आहे. म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात नवीन महाविद्यालये देण्याची गरज आहे. पण शासनाचे या बाबतीत आखडते धोरण आहे. अनुदानित नाही तर विनाअनुदानित महाविद्यालयांना परवानगी का देण्यात येत नाही?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, संगणकशास्त्र हा विषय सीनिअर कॉलेजला देऊन जवळ जवळ दहा वर्षे झालेली आहेत.या विषयाचे प्राध्यापक त्या ठिकाणी काम करीत आहेत. कॉलेजेस ग्रॅन्टेबल आहेत पण विषय मात्र ग्रॅन्टेंबल नाहीत. त्यासाठी प्रचंड प्रमाणात फी घेतली जाते. शिक्षकला योग्य पगार दिला जात नाही. त्या शिक्षकाच्या हाताखाली शिकलेला विद्यार्थी तीन-तीन लाख रुपयाचे पॅकेज घेत आहे पण दहा वर्ष एम.सी.ए. झालेला प्राध्यापक हजार आणि दोन हजार रुपयावर राबत आहे. त्याची आता चाळीशी ओलांडत आलेली आहे. त्यांना संस्था काही देत

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6912...

श्री. भगवान साळुंखे...

नाहीत आणि शासन जबाबदारी घेत नाही. या कॉलेजेसना अनुदान देण्याची शासनाची मानसिकता नाही. म्हणून संगणक खरेदी करण्यापासून प्राध्यापकाला सीनियरचे स्केल देण्याबाबतची कारवाई शासनाने तातडीने केली पाहिजे. या संबंधात शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर आधीच दिले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी या ठिकाणी महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करु इच्छितो. जे सभागृहात बोलणे उचित नाही जे उत्तर देणे योग्य नाही असे उत्तर या ठिकाणी दिले जाऊ नये. माननीय राज्यमंत्र्यांनी ते दुरुस्त करावे किंवा माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी बसलेले आहेत त्यांनी ते दुरुस्त करावे. सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्णयाची एक ओळ मी याठिकाणी वाचून दाखवितो. "The Government is directed to take decision in this respect within a period of 8 weeks from the date of receipt of such representation." 19 डिसेंबर,2007 ला शासनाला हे निवेदन मिळाले. हे निवेदन मिळाल्यापासून आठ आठवडयाच्या आत असे हायकोर्टाचे आदेशच आहेत. मी मुद्दाम सांगत आहे की, माननीय राज्यमंत्री महोदयांनी लवकरात लवकर असे म्हटले आहे. आमचा कन्टेम्प्ट आम्ही सहन करुन घेऊ. सभागृहाचा कन्टेम्प्ट सभागृह काही वेळा सहन करु शकेल पण हायकोर्टाच्या बाबतीत असा निर्णय झाल्यानंतर असे उत्तर देणे हे बरोबर नाही. त्यामुळे कृपया माननीय मंत्रिमहोदयांनी ते उत्तर दुरुस्त करावे.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सभागृहाचा मान ठेवला पाहिजे आणि कोर्टाचा सुध्दा मान ठेवला पाहिजे. सभागृहाची भावना ओळखून यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे सोमवारी बैठक घेण्यात येईल.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

नविन अंशदायी निवृत्तीवेतन योजना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना लागू करणेबाबत कार्यपध्दतीबाबतच्या सूचना अभावी येत असलेल्या अडचणी

(7) * 6802 श्री.वसंतराव खोटरे , प्रा.बी.टी.देशमुख , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे : **तारांकित प्रश्न क्रमांक 20 ला दिनांक 11 डिसेंबर, 2009 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासकिय कर्मचारी व सर्व स्तरावरचे शिक्षक यांना दिनांक 31 ऑक्टोबर 2005 च्या एकाच शासननिर्णयाने नविन अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आलेली असली तरी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नवीन योजनेच्या अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीबाबत दिनांक 7 जुलै, 2007 ला जसा शासननिर्णय निर्गमित करण्यात आला तसा तपशिलवार सूचना देणारा आदेश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत निर्गमित न झाल्यामुळे त्यांना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, याबाबत अंमलबजावणी करण्याच्या सूचना राज्य शासनाने शिक्षण संचालक यांना दिलेल्या असूनही त्यांनी याबाबत तपशिलवार सूचना निर्गमित करण्याची कोणतीही कारवाई केलेली नाही अशी तक्रार करणारे एक निवेदन दिनांक 25 एप्रिल, 2010 रोजी किंवा त्यासुमारास सचिव, शालेय शिक्षण विभाग यांच्याकडे शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती, यांच्या मार्फत विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हा कार्यवाह यांनी पाठविले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अशा तपशिलवार सूचनांच्या अभावी कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे, याची माहिती देणारे व त्याबाबतीत मार्गदर्शन मागविणारे एक निवेदन शिक्षणाधिकारी (माध्यमिक), अमरावती यांनी दिनांक 1 ऑक्टोबर, 2009 रोजी वा त्या सुमारास शिक्षण संचालक यांचेकडे पाठविले हे ही खरे आहे काय,

(3) अद्याप, सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ शिक्षण संचालकांनी काय उपाययोजना केलेली आहे,

(4) अद्याप, उपाययोजना केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : (1) होय.

(2) होय.

(3) व (4) कार्यवाही सुरु आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6802....

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. राज्य शासकीय कर्मचारी व सर्व स्तरावरचे शिक्षक यांना दिनांक 31 ऑक्टोबर,2005 च्या एकाच शासन निर्णयाने नवीन अंशदायी निवृत्ती योजना लागू करण्यात आलेली आहे.तेव्हा पासून शिक्षण सेवक व इतर कर्मचारी यांना भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्यास अजूनही आदेश दिलेले नाहीत किंवा अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 6802 ..... श्री. वसंतराव खोटरे.....

शासनाने 13 एप्रिल, 2010 रोजी ज्या भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांना भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक देण्यात आलेला नाही अशांना भविष्य निर्वाह निधी वर्गणीदार खाते क्रमांक देण्याबाबत आदेश काढलेला आहे परंतु त्यामध्ये शालेय शिक्षण विभागाचा उल्लेख नाही. जे हजारो शिक्षण सेवक आहेत तसेच विनाअनुदान तत्वावर असणारे शिक्षक आहेत त्यांचे खाते बंद केले. त्यामध्ये त्यांचा भविष्य निर्वाह निधी जमा होत नाही. हजारो शिक्षण सेवक आणि शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांचे भविष्य निर्वाह निधी खाते उघडण्याबाबत शासन 8 दिवसात कार्यवाही करणार काय आणि त्यामध्ये शासनाचा जो वाटा आहे तो वर्ग करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, 2005 पासून नवीन अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आहे. अनेक विभागांमध्ये त्याचे काम चालू असताना शिक्षण विभागाचे क्षेत्र मोठे असल्यामुळे तसेच ज्या खाजगी संस्था आहेत त्या ठिकाणी याबाबतचे काम अजून पूर्ण झालेले नाही. याबाबतीत मंत्रालयीन पातळीवर चर्चा झाली आणि ग्रामविकास विभागाने एक मॉडेल तयार करावे अशा सूचना दिलेल्या होत्या. त्यांनी ते मॉडेल तयार केलेले आहे. त्याचा जी.आर. आलेला आहे. आता शिक्षण विभागाचा सुध्दा त्या पध्दतीचा जी.आर. निघणार आहे. यामध्ये ज्या शासकीय सूचना निर्गमित करावयास पाहिजे त्या सर्व सूचना एक महिन्यामध्ये निर्गमित होतील. त्यानंतरच्या एका महिन्यामध्ये संपूर्ण खाती उघडण्याच्या बाबतीत कार्यवाही होईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षण सेवकांना सुध्दा भविष्य निर्वाह निधीचे खाते सुरु करावे, जुनी पेन्शन योजना लागू आहे अशा प्रकारचे आदेश या सभागृहात अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने माननीय शालेय शिक्षण विभागाच्या माननीय मंत्रिमहोदयांनी काढले. त्यानंतर वित्त विभागाचा 28 फेब्रुवारी, 2008 चा जी.आर. निघाला. तो जी.आर. त्याला छेद देणारा होता. त्यामुळे प्रकरणे न्यायालयामध्ये गेली. न्यायालयामध्ये किमान 100 याचिका दाखल झालेल्या आहेत. त्या 100 याचिकांमध्ये न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत की. ज्या शिक्षकांची नियुक्ती 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी झालेली आहे त्यांचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भविष्य निर्वाह निधीचे खाते सुरु करावे. त्यांना अंशदायी पेन्शन योजना सध्या लागू करु नये. शासनाच्या आदेशाला स्थगिती दिलेली आहे. म्हणून न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार शासन अंमलबजावणी करणार काय ? दुसरा प्रश्न असा की, यासंदर्भामध्ये 7 मे रोजी माननीय सचिव यांच्याकडे चर्चा झाली आणि त्यांनी सांगितले की, कायदा खात्याचा सल्ला घेऊन तातडीने आदेश काढतो. हे दोन्ही आदेश लवकरात लवकर काढून ते लागू करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये दोन वेगवेगळे प्रश्न आहेत. 2005 च्या अगोदरचे शिक्षण सेवक, कृषी सेवक असा जो सेवकवर्ग आहे त्यांना आपली पेन्शन योजना लागू राहिलेली नाही. त्यामुळे कोर्टामध्ये काही रिट झाल्या. न्यायालयाचे ज्या पध्दतीचे निर्णय असतील त्या पध्दतीने कार्यवाही केली जाईल. बाकीच्या बाबतीत सुध्दा मी आताच सांगितले की, हे कशा पध्दतीने करावयाचे याबाबतच्या सर्व सूचना या महिन्यामध्ये समजतील आणि त्यानंतर एक महिना आपण खाते उघडण्यासाठी ठेऊ.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, 1 ऑक्टोबर, 2005 पासून नवीन योजना सुरु झाली. नवीन योजना सुरु झाल्यानंतर शासकीय कर्मचारी आणि शिक्षकांना ती योजना लागू आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नवीन योजना कशी अंमलात आणावयाची याबाबतचे तपशीलवार आदेश 2007 मध्ये निर्गमित करण्यात आले. परंतु या ठिकाणी अजूनही ते आदेश निर्गमित न झाल्यामुळे भविष्य निर्वाह निधीची मासिक कपात होत नाही आणि कपात झाली तर ती कोठे जमा करावी असा प्रश्न येतो. इन्कम टॅक्समध्ये जी 80-सीची सुविधा मिळते ती सुध्दा यामुळे मिळत नाही. वाढीव वेतनवाढीची रक्कम एका वार्षिक हप्त्याने त्या खात्यामध्ये जमा करावयाची होती ती रक्कमही जमा होऊ शकत नाही आणि त्या रकमेवर त्यामुळे व्याजही मिळत नाही तसेच ठेव संलग्न योजना सुध्दा त्यामुळे लागू झाली नाही. ही स्थिती सतत गेली पाच वर्षे चालू आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी एका महिन्यात आदेश काढतो असे सांगितले ही अतिशय चांगली गोष्ट आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, आम्ही याठिकाणी प्रश्न विचारला असता पूर्वी असे उत्तर देण्यात आले होते की, संचालकांना सूचना दिल्या आहेत. संचालक असे म्हणतात की, आम्हाला सूचना आल्या आहेत. परंतु मी काय करु ? शासन स्तरावरुन संचालकांना तपशीलवार सूचना दिल्या पाहिजेत. भविष्य निर्वाह निधीची खाती एक महिन्यात उघडली जाणार आहेत. हे सर्व काम दोन महिन्यात मार्गी लावण्याच्या सूचना विभागीय अधिका-यांना देण्यात येतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या पध्दतीनेच शासनाने नियोजन केलेले आहे आणि त्या पध्दतीनेच हे काम होईल.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, अंशदायी निवृत्ती योजना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे व केंद्र शासनाच्या निर्णयाप्रमाणे लागू झालेली आहे. मंत्री महोदयांनी यासंदर्भात निर्णयही घेतलेला आहे. आता मंत्री महोदयांनी असे म्हटले आहे की, शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी दोन महिन्यात करणार आहे. ही अंमलबजावणी निश्चितपणे करणार आहे असे सभागृहाला आश्वासन दिलेले आहे. दोन महिन्यामध्ये ही प्रक्रिया करताना पी.एफ.संबंधी संभ्रम निर्माण झालेला आहे. त्यांची खाती दोन महिन्यात उघडली जाणार आहेत. पण अंशदायी योजनेमध्ये मॅनेजमेंटचा कोटा भरावयाचा आहे, त्यासंबंधी मॅनेजमेंटचे असे म्हणणे आहे की, आम्ही एक पैसाही देणार नाही. कारण आमचे वेतनेतर अनुदान 2004 सालापासून बंद करण्यात आले आहे. म्हणून यादृष्टीने सुध्दा विचार करुन शासन दोन महिन्यात निर्णय घेणार आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : यामध्ये दोन भाग आहेत. जेथे शासन पेमेंट करते तेथे जादा अनुदानासाठी पुरवणी मागण्यांद्वारे निधी प्राप्त करुन घ्यावा लागेल. मूळ जी.आर.मध्ये मॅनेजमेंट हा शब्द होता. म्हणून मॅनेजमेंटचा कोटा पूर्ण करण्यासंबंधी काय करता येईल यादृष्टीने निर्णय करु.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, नोव्हेंबर, 2005 नंतर जे कर्मचारी सेवेत लागले त्यांच्यासाठी ही अंशदायी योजना आहे. 2005 पूर्वी जे शिक्षण सेवक नोकरीत लागले आहेत. त्यांच्याबाबत कोर्टाने काही निर्णय दिलेले आहेत. त्यांना मात्र जुन्या पध्दतीनेच योजना लागू करण्याची आवश्यकता आहे. शासन कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे सर्व कर्मचा-यांना जुनी पध्दत लागू करणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : न्यायालयाचे निर्णय असतील ते शासन मान्य करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सर्व शिक्षा अभियानांतर्गत मंडळाची पाठ्यपुस्तके उचलण्यास होत असलेला विलंब

(९) * ७१६० श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री.उल्हास पवार , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शिक्षा अभियानांतर्गत मंडळाची पाठ्यपुस्तके अद्यापी शाळांपर्यंत न पोहचता मंडळाच्या भांडारातच पडून असल्याचे माहे मे, २०१० च्या पहिल्याच आठवड्यात एका सर्वेक्षणाद्वारे शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाठ्यपुस्तकांचे वाटप शाळांना करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : (१) हे खरे नाही. पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्या दि. १३/६/२०१० च्या अहवालानुसार ९२.११% पुस्तकांचा पुरवठा झालेला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, त्याप्रमाणे सर्व शिक्षा अभियानांतर्गत राज्यामध्ये पाठ्यपुस्तके व स्वाध्यायची पुस्तके स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून म्हणजे जिल्हा परिषद व महानगरपालिकेच्या माध्यमातून वितरित केली जातात. या संस्थांकडून किती पुस्तकांची मागणी करण्यात आली आणि किती पुरवठा करण्यात आला ? दुसरी गोष्ट अशी आहे की, महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रांमध्ये सर्व शिक्षा अभियान हे आता सर्व भ्रष्ट अभियान झालेले आहे अशाप्रकारची एक मालिका छापून आली होती. या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे शासनाने आदेश दिले होते. ही चौकशी कोणत्या यंत्रणेमार्फत चालू आहे आणि त्याचे पुढे काय झाले ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत 9 कोटी 63 लाख पुस्तकांचे वितरण करावयाचे होते. आतापर्यंत 99 टक्क्यापेक्षा जास्त पुस्तकांचे वितरण झालेले आहे. सर्व शिक्षा अभियानाच्या संदर्भात एका दैनिकातून एक मालिका प्रसारित झाली होती. सर्व शिक्षा अभियान सुरु झाल्यानंतर राज्यात मागील 8 वर्षात ज्या निरनिराळया घटना घडल्या आहेत त्याची वर्गवारी केलेली आहे. प्रधान सचिवांना अशा सूचना दिलेल्या आहेत की, या योजनेमध्ये जे दोष असतील आणि चुकीचे घडले असेल त्यासंबंधी कारवाई करण्यासाठी पुढील उपाययोजना करावी.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7160.....

श्री.विक्रम काळे : आताच मंत्री महोदयांनी कबूल केले आहे की, वर्तमानपत्रामध्ये सर्व शिक्षा अभियानातील भ्रष्टाचारासंबंधी एक मालिका दोन महिन्यांपासून सुरु होती. या सर्व प्रकरणांची शासनाने दखल घेतलेली आहे. या सर्व प्रकरणाचा तपास करण्यासाठी एक चौकशी समिती नेमली जाणार आहे का ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांमार्फत खात्यातीलच प्रमुख अधिका-यांचा उपयोग करुन घेऊन सर्व प्रकरणांचा तपास केला जाईल आणि त्याच्यामध्ये जर चुकीचे घडले असेल तर कारवाई केली जाईल.

उपसभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवणे

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय विधान परिषदेच्या सन 2010च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक 18 मार्च 2010 ते 23 एप्रिल 2010 या कालावधीत माननीय मंत्री/ माननीय राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 765 आश्वासनांची यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी.)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आश्वासनावरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे

श्री. विजय वडेट्टीवार (संसदीय कार्य राज्यमंत्री) सभापती महोदय, विधान परिषदेच्या सन 1992च्या तिस-या अधिवेशनापासून ते सन 2009च्या चौथ्या अधिवेशनापर्यन्त देण्यात आलेल्या 250 आश्वासनांवरील पूर्ततेसंबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी आपल्याअनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस: येथे सोबत जोडलेली विवरणपत्रांची यादी छापावी.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा. वर्षा गायकवाड (पर्यटन व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादितचा सन 2002-2003, 2003-2004 व 2004-2005चा अनुक्रमे अठ्ठाविसावा, एकोणतिसावा व तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

प्रा. फौजिया खान (महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादितचा सन 1996-97, 1997-1998, 1998-1999 व 1999-2000 चा अनुक्रमे बाविसावा, तेविसावा, चोविसावा व पंचविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ, पुणे यांचा सन 2008-2009 चा तेरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

उपसभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, या महामंडळांचे आठ-दहा वर्षापूर्वीचे वार्षिक अहवाल सभागृहाला आता सादर होत आहेत. हे वार्षिक अहवाल त्या त्या वर्षी सभागृहाला सादर करण्यासंबंधीच्या सूचना आपण दिलेल्या आहेत. त्या सूचनांची अंमलबजावणी होत नाही.

उपसभापती : याबाबतीत आपण डिसिप्लिनरी ॲक्शन घेण्याच्या सूचना देऊ.

23-07-2010 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) GG-4
MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:45

पृ.शी./मु.शी.: सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सादर करणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू.जमा (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सदस्य अनुपस्थिती समितीचा पहिला अहवाल (2010-2011)सादर करतो.

समितीची बैठक गुरुवार, दिनांक 22 जुलै, 2010 रोजी दुपारी 2.00 वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. या बैठकीमध्ये सर्वश्री नितीन गडकरी, राजेंद्र जैन, महादेवराव महाडिक, वि.प.स. यांच्या रजेचे अर्ज विचारात घेण्यात आले.

श्री. नितीन गडकरी, वि.प.स. यांना पक्षाच्या अधिवेशनासाठी व बैठकींसाठी मुंबईबाहेर प्रामुख्याने दिल्लीमध्ये रहावे लागल्याने दिनांक 29 मार्च ते 23 एप्रिल, 2010 पर्यंत एकूण 26 दिवस, श्री राजेंद्र जैन, वि.प.स. यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे दिनांक 18 मार्च ते 23 एप्रिल, 2010 पर्यंत एकूण 37 दिवस, श्री. महादेवराव महाडिक, वि.प.स. हे घरगुती धार्मिक कारणामुळे दिनांक 5 एप्रिल ते 19 एप्रिल, 2010 पर्यंत एकूण 15 दिवस विधानपरिषदेच्या बैठकीस अनुपस्थित असल्याने त्यांनी सादर केलेल्या अर्जावर समितीने विचार केला. तसेच विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्यासंबंधी त्यांनी रजेच्या अर्जात दिलेली कारणे ग्राह्य धरुन त्यांना उपरोक्त कालावधीत विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

उपसभापती : सदस्य अनुपस्थिती समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

समितीने सादर केलेल्या अहवालात उल्लेखिलेल्या कालावधीसाठी सर्वश्री. नितीन गडकरी, राजेंद्र जैन, महादेवराव महाडिक, वि.प.स. यांना विधानपरिषदेच्या बैठकींना अनुपस्थित राहण्याची अनुमती देण्यात यावी अशी समितीने शिफारस केली आहे. तरी अनुमती द्यावी काय ? (थोडे थांबून) अनुमती देण्यात येत आहे. सदस्यांना तसे कळविण्यात येईल.

...नंतर श्री. भोगले..

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयक व ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शनिवार, दिनांक 24 जुलै, 2010 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 22 जुलै, 2010 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

<u>बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>

1) श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 14 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2) श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 68 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3) श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 80 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही समितीने शिफारस केली आहे.

उपसभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री विक्रम काळे, दिलीपराव सोनवणे यांनी "वाशिम येथील पाटणी चौकात शहर वाहतूक शाखेचे निरीक्षक बुलबुले व त्यांच्या पोलीस शिपायांनी कोणतीही चौकशी न करता तोरणाळा येथील ज्ञानराज माऊली विद्यालयाचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण सोलव व इतरांना मारहाण करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे यांनी "ठाणे जिल्हयातील शिधावाटप नियंत्रकाच्या अखत्यारितील पाचही परिमंडळातील 32 लाख शिधापत्रिकांपैकी फ परिमंडळाने 28 हजार शिधापत्रिका रद्द केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे यांनी "सावित्री माध्यमिक विद्यालय आंबेर, (ता.म्हसळा, जि.रायगड) या शासनमान्य अनुदानित माध्यमिक शाळेचे व्यवस्थापन 12 वर्षापेक्षा अधिक कालावधीसाठी शासन नियुक्त प्रशासकाकडे असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "व्ही.जे.टी.आय.या अभियांत्रिकी शिक्षण संस्थेमध्ये नियमित प्राध्यापकांच्या 100 पेक्षा अधिक जागा रिक्त असून कंत्राटी शिक्षक नियुक्त केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्हयात एस.टी.भरतीसाठी दि.4 जुलै, 2010 रोजी झालेल्या लेखी परीक्षेसाठी काढण्यात आलेल्या कॉल लेटरमध्ये घोटाळा झाल्याने 220 उमेदवारांना लेखी परीक्षेस बसता न आल्याबाबत"

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती.....

या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "राज्यात डी.एड.अभ्यासक्रम हा दोन वर्षाचा कालावधीचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सहा महिने आंतरवासिता व त्या कालावधीत सीईटी परीक्षा शिक्षण सेवक भरतीसाठी शासनाने निश्चित केली असल्याने सीईटी परीक्षा नापास झाल्यास उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "महाराष्ट्र स्टेट एडस् कंट्रोल सोसायटी या संस्थेच्या माध्यमातून एडस्च्या दुष्परिणामाबाबत व त्यावरील उपाययोजनेसंदर्भात प्रसिध्दी माध्यमे व प्रसार साहित्याची रक्कम मे.ओमसाई ॲडव्हर्टायझिंग या संस्थेला देण्यात येत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "ठाणे जिल्हयातील 15 तालुका स्तरावरील समित्यांवर 153 अशासकीय सदस्यांची नियुक्ती न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर यांनी "राज्यात यावर्षी झालेल्या कमी पावसामुळे विदर्भातील धान परिपक्व झाले नसल्यामुळे कच्च्या धानाची भरडाई करताना तांदुळाचा तुकडा पडणे, त्यामुळे राईस मिलधारकांनी धानाची भरडाई बंद केल्याने विदर्भातील धान उत्पादकांना जबर फटका बसणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

------- नंतर 2आय.1...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आदिवासी विभागातील आयटीआय मधील शिक्षकाना अजूनही कंत्राटी पध्दतीनेच वेतन मिळणे

मु. शी. : आदिवासी विभागातील आयटीआय मधील शिक्षकाना अजूनही कंत्राटी पध्दतीनेच वेतन मिळणे याबाबत सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर, गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर, गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी "आदिवासी विभागातील आयटीआय मधील शिक्षकाना अजूनही कंत्राटी पध्दतीनेच वेतन मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : महोदय, आदिवासी भागातील आश्रमशाळांना जोडलेल्या 28 आयटीआयमध्ये जवळपास 414 शिक्षकांपैकी 313 शिक्षक कार्यरत आहेत. त्यांना नियमित करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. त्याचबरोबर त्यांना वेतनवाढ देण्याच्या संदर्भात शासन काय प्रयत्न करणार आहे तसेच कोणता निर्णय घेणार आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : महोदय, आयटीआय मार्फत जी प्रशिक्षण केंद्रे आदिवासी भागात चालविण्यात येतात त्यातील शिक्षकांना 5 हजार रुपयाऐवजी 15 हजार रुपये मानधन देण्याबाबत शासनाने तयारी केली आहे. तसेच त्यांना नियमित सेवेत घेण्याबाबत सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करुन माननीय मंत्र्यांबरोबर बैठक बोलाविण्यात येईल.

डॉ. वसंत पवार : महोदय, विना अनुदानित तत्वावर जे आयटीआय चालू आहेत त्यातील निदेशक तसेच इतर स्टाफच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिले होते की, अशा संस्थांना सॅलरी आणि नॉन सॅलरी ग्रांट देण्याचा विचार शासन करीत आहे. तेव्हा यासंदर्भात आयटीआयमधील सर्व स्टाफना कॅटेगरीज अे, बी, सी अशा सर्व बाबतीत उपरोक्त अनुदान देण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : महोदय, सन्माननीय सदस्यांनी वर्ग-1 ते वर्ग-3 च्या बाबतीत जी मागणी केली आहे ती बाब शासनाच्या विचाराधीन असून निश्चितच त्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयात घातक रसायने खाडीत सोडल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे

मु. शी. : ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयात घातक रसायने खाडीत सोडल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, गुरुमुख जगवानी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्य मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, गुरुमुख जगवानी, वि. प. स. यांनी " ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्टयात घातक रसायने खाडीत सोडल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : महोदय, ठाणे-बेलापूर पट्टयातील औद्योगिक पट्टा हा आशिया खंडातील क्रमांक एकचा भाग आहे. या भागात छोटे मोठे सर्वच प्रकारचे उद्योजक आहेत. या भागात ठाणे खाडीत मोठ्या प्रमाणात घातक रसायने सोडल्यामुळे खाडी पूर्णत: नष्ट झालेली आहे. हे मीच सांगत नाही तर नवी मुंबई परिसरातील महापालिकेच्या पर्यावरण विभागाचाही अहवाल आहे. या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, या भागात खाडी नष्ट होऊन पर्यावरणाचा जो ऱ्हास होत आहे त्या अनुषंगाने या निवेदनात मात्र समाधानकारक उत्तर दिलेले नाही. कारण ही नासाडी आजही थांबलेली नाही. म्हणून ज्या कारखान्यांमधून अशा प्रकारचे रसायन सोडले जाते त्या कारखान्यांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. सचिन अहिर : महोदय, उत्तरात कोणत्याही प्रकारची नकारात्मक भूमिका घेतलेली नाही. जे उत्तर दिले आहे ती वस्तुस्थिती आहे. यापूर्वी एमआयडीसीच्या जमिनीवर याच औद्योगिक पट्टयामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. काल परवा सुध्दा हाच विषय सभागृहात उपस्थित झाला होता. शासनाने राज्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण व्हावे अशी भूमिका यापूर्वी घेतली होती त्याचा परिणाम कालांतराने शहरीकरण वाढण्यावर झालेला आहे. अशा परिस्थितीत इंडस्ट्रीयल भागातील सिव्हरेज डायरेक्टली डिस्पोज करतो त्यामुळे असे प्रश्न निर्माण होतात. त्यामध्ये एकच करावे लागेल की, एकंदरित या सर्वांशी क्लस्टर ॲप्रोच ठेवून ज्याप्रमाणे झोपडपट्टी मुक्त धोरण घेण्याची भूमिका शासनाने घेतली त्याच धर्तीवर एमआयडीसीला सूचना देऊन एखादी चांगली योजना घेण्याची भूमिका शासनाने घेतली आहे. त्याची पूर्तता म्हणून त्यासंबंधीचा ठराव सुध्दा बोर्डात केला व भविष्यात अशा प्रकारची अतिक्रमणे असतील त्यांना डेडलाईन दिली आहे व त्यापूर्वीचे पात्र असतील त्यांना न्याय देण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

त्यातून सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॅट तयार केला तर हा विषय सुटू शकेल. वेस्ट वर ट्रिटमेंट न करता वेस्ट टाकण्याचे काम झाले तर त्यांच्यावर कारवाई केली जाते तसेच महानगरपालिकेला आदेश देण्याचे काम राज्यशासनाने वेळोवेळी केलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील मालाड, कादिवली, बोरिवली, दहिसर पश्चिमेकडील नार्वे, चारकोप, गोराई खाडी अशा 14 कि.मी.पट्टयात मॅन्ग्रोव्हजची कत्तल करुन बेकायदा केलेले बांधकाम

मु. शी. : मुंबईतील मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर पश्चिमेकडील नार्वे, चारकोप, गोराई खाडी अशा 14 कि.मी.पट्टयात मॅन्ग्रोव्हजची कत्तल करुन बेकायदा केलेले बांधकाम
याबाबत सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सचिन अहिर (पर्यावरण राज्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री परशुराम उपरकर, किरण पावसकर यांनी "मुंबईतील मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर पश्चिमेकडील नार्वे, चारकोप, गोराई खाडी अशा 14 कि.मी.पट्टयात मॅन्ग्रोव्हजची कत्तल करुन बेकायदा केलेले बांधकाम" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, पर्यावरणाच्या विषयी हे निवेदन आहे. संदर्भात मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर पश्चिमेकडील नार्वे, चारकोप, गोराई खाडी अशा 14 कि.मी. किनारपट्टी लगतची खार फुटीच्या जंगलाची कत्तल करुन बेकायदा बांधकाम करण्यात आलेले आहे, मॅन्ग्रोव्हजच्या जंगलाची कत्तल करुन बांधकामे करण्यात आलेली आहेत. मॅन्ग्रोव्हजच्या संदर्भात या सभागृहात ब-याच वेळा चर्चा झालेली आहे. आपण या निवेदनाच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी आपल्या मुख्यमंत्री महोदयांना सल्ला दिला होता की, गुजरात सरकार जसे पर्यावरणाचा समतोल सांभाळते तशा पध्दतीने आपण सुध्दा पर्यावरणाचा समतोल राखावा. त्यामुळे आपण केंद्रीय मंत्र्यांचा सल्ला तरी पाळणार आहात काय ? समुद्र किना-या लगतच्या झाडांची कत्तल केल्याशिवाय बेकायदेशीर बांधकाम होऊ शकत नाही. या ठिकाणी आपण उच्च न्यायालयाच्या याचिकेचे समर्थन करतात. आजही कांदळवनाच्या संदर्भात राज्यामध्ये अनेक ठिकाणी जंगलातोड होत आहे. महसूल खात्याने ही जमीन मोजावयाची असते व मोजणी झाल्यनंतर वनखात्याला त्यासंदर्भात माहिती सुपुर्द करावयाची असते परंतु मोजणीसाठी पैसे नाहीत असे महसूल खात्याकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे महसूल खात्याकडून मोजणी केली जाणार आहे का ? केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी आपल्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सल्ला दिला तो पाळणार का ? एमएमआरडीएचे आयुक्त ज्या इमारतीमध्ये राहतात त्या इमारती समोरच 9 कोटी रुपये खर्च करुन मॅन्ग्रोव्हजची कत्तल करुन ब्युटीफिकेशन करण्यात आले. मॅन्ग्रोव्हजच्या संदर्भात उच्च न्यायालयाचे आदेश असतांना आपण या ठिकाणी मॅन्ग्रोजची कत्तल कशी काय केली ? मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर पश्चिमेकडील नार्वे, चारकोप, गोराई खाडी अशा 14 कि.मी. किनारपट्टी लगतची खार फुटीची झाडे तोडलेली आहेत. आपल्या निदर्शनास सर्व गोष्टी आणून दिल्यानंतर अशा प्रकारच्या गोष्टी होत असतील तर अशा अधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात याची माहिती मंत्रीमहोदयांनी द्यावी.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या दोन प्रश्नाला उत्तर "होय" आहे व तिस-या प्रश्नाचा या निवेदनाशी संबंध येत नसल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात प्रश्न विचारावा.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मालाड, कांदिवली, बोरिवली, दहिसर पश्चिमेकडील नार्वे, चारकोप, गोराई खाडी अशा 14 कि.मी. किनारपट्टी लगतची खार फुटीच्या झाडांची कत्तल करण्यात आलेली आहे हा भाग एमएमआरडीएमध्ये येत नाही काय ? एमएमआरडीएच्या आयुक्ताच्या घरासमोरील मॅन्ग्रोव्हज तोडण्यात आलेले आहे. मॅन्ग्रोव्हजची झाडे तोडण्यासाठी 9 कोटी रुपये खर्च झाला या खर्चासाठी सँक्शन घेण्यात आले होते काय ?

श्री. सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे वक्तव्य केलेले आहे त्याची निश्चितपणे माहिती घेण्यात येईल व योग्य ती कारवाई करण्यात येईल.

...5..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : निवेदन क्रमांक 4 व 5 यांचे विषय सारखेच असल्यामुळे ही दोन्ही निवेदने एकत्र घेण्यात येतील.

पृ. शी. : मुंबईतील शिवडीच्या बी.पी.टी.च्या गोदामातून विषारी वायुची इ ालेली गळती

मु. शी. : मुंबईतील शिवडीच्या बी.पी.टी.च्या गोदामातून विषारी वायुची इ ालेली गळती. याबाबत सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, गुरुमुख जगवानी, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री. धनंजय मुंडे, वि.स.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सचिन अहिर (पर्यावरण राज्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, सर्वश्री सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील, गुरुमुख जगवानी, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री. धनंजय मुंडे. यांनी मुंबईतील शिवडी बी.पी.टी.च्या गोदामातून विषारी वायुची झालेली गळती या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात मुंबई पोर्ट ट्रस्टच्या उपाध्यक्षांकडे चौकशीचे काम दिले होते त्यामुळे हा प्रश्न परवा राखून ठेवण्यात आला होता. त्यांच्याकडे चौकशीचे काम देण्यात येऊ नये असा प्रश्न आम्ही उपस्थित केला होता. दुसरे असे की, आज आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, या ठिकाणी 5 क्लोरीन वायुचे सिलेंडर नव्हते तर 105 सिलेंडर क्लोरीन वायुने भरलेले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

असे चौकशीत निदर्शनास आले हे खरे आहे काय ? उपाध्यक्षा ऐवजी सदर प्रकरणाची चौकशी कोणाकडे दिलेली आहे ? सदर घटनेच्या चौकशीचा अहवाल केव्हा सादर होणार आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, बीपीटीचे उपाध्यक्ष श्री.श्रीकांत सिंह यांना घटनेची चौकशी करण्यासाठी नेमले आहे हे खरे आहे. हा अधिकारी बीपीटीच्या अंतर्गत चौकशीसाठी नेमला आहे. हा अधिकारी संपूर्ण चौकशी करून त्याचा अहवाल पोलीस अधिकाऱ्याकडे सादर करणार आहे. या शिवाय शिवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक या घटनेचा स्वतंत्रपणे तपास करीत आहेत. बीपीटी हे केंद्र सरकारचे प्राधिकरण आहे. बीपीटीचे उपाध्यक्ष हे या घटनेची चौकशी त्यांच्या अंतर्गत करणार आहेत. त्यांनी दिलेला चौकशीचा अहवाल पोलीस विभागाला बंधनकारक नाही. शिवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक या घटनेचा स्वतंत्रपणे तपास करीत आहेत. शिवडी पोलीस ठाण्याने मुंबई पोर्ट ट्रस्ट, कस्टम विभाग, संनियंत्रके स्फोटके विभाग, भारत सरकार, डॉक सेफ्टी बोर्ड, पर्यावरण विभाग, अग्निशमन दल अशा निरनिराळ्या विभागांशी 11 वेळा पत्रव्यवहार केला आहे. त्यांचा अहवाल आल्यानंतर जो कोणी त्यात दोषी आढळून येईल त्याप्रमाणे त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या घटनेला बीपीटीचे उपाध्यक्ष जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. त्यांनी क्लोरीन वायू नष्ट करण्यासाठी उपाययोजना केली नाही. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई न करता त्यांना चौकशीचे प्रमुख नेमणे हे न्यायाला धरून नाही.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, त्यांना प्रमुख नेमलेले नाही. ते फक्त त्यांच्या विभागाची अंतर्गत चौकशी करणार आहेत. या घटनेची चौकशी पोलीस विभागामार्फत सुरू आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, क्लोरीन वायूचे सिलेंडर परवा वरळी समुद्र किनारी सापडले आहे. हे सिलेंडर गॅसने भरलेले आहे. हा गंभीर प्रश्न आहे. परवा अधिवेशन संपणार आहे. त्यामुळे एका प्रश्नाच्या पलीकडे आपण जावे, अशी आमची कळकळीची विनंती आहे. हे सिलेंडर समुद्रात सोडल्यानंतर परत किनारी लागत आहे. तेव्हा यासंबंधी शासनाने ठोस उत्तर दिले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, रिकाम्या सिलेंडरची संख्या 100 आहे. वरळी कोळीवाड्याजवळील वरळी किल्ल्याजवळ एक रिकामे सिलेंडर मिळाले आहे. त्याचा नंबर 5654 आहे. दिनांक 21.7.2010 रोजी रात्रौ हे सिलेंडर सापडले आहे. यासंबंधातील माहिती मुंबई अग्निशमन दलाला मिळाली. त्यानंतर सीआयएफच्या कमांडरना कळविण्यात आले. त्यांनी रात्री 12.00 वाजता हे सिलेंडर हाजी बंदर, शिवडी येथे नेऊन ठेवले आहे. ते सिलेंडर धोकादायक नाही, रिकामे आहे अशा प्रकारचा त्यांनी अहवाल दिला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या घटनेचा संबंध बंदरे खात्याशी देखील आहे. आम्ही टी.व्ही.वर बघितले की,बंदरे मंत्र्यांनी तेथे भेट दिली आहे व निवेदन देखील केले आहे. बीपीटीमध्ये बल्क कार्गो उतरविला जातो. बीपीटीमध्ये कंटनेर कार्गोसाठी खास सुविधा केली आहे. यासाठी जेएनपीटी बंदराची निर्मिती करण्यात आली. मुंबईमध्ये वाहतुकीची कोंडी होते म्हणून येथील बल्क कार्गो बंद केले होते. त्याचा विचार शासन गांभीर्याने करणार आहे काय ? कायदेशीर कारवाईचे उत्तर गृह विभाग देईल. येथे बंदरे मंत्री उपस्थित आहेत, त्यांनी तेथे भेट दिल्यानंतर काय माहिती मिळविली याचे देखील उत्तर सभागृहात द्यावे.

यानंतर श्री.अजित....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी अगोदरच स्पष्ट केलेले आहे की, एमपीटीचे उपाध्यक्ष.. .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. एमपीटी येथे बल्क कार्गो उतरविण्यावर राज्य शासन बंदी घालणार आहे काय ? हे पर्यावरणाच्या दृष्टीने बरोबर नाही. मुंबईतील वाहतूक व प्रदूषण कमी होण्याच्या जे.एन.पी.टी. उभारण्यात आले. तेव्हा याबाबत विचार करण्यात येईल काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, या संदर्भात तपासून निर्णय घेण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याचे मुद्दे

(पुढे चालू.....)

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालय,उप विभागीय कार्यालय, तहसील कार्यालय, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयात काम करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांनी अनधिकृतपणे उमेदवार कार्यालयीन कामासाठी ठेवले आहेत. हे उमेदवार कार्यालयीन अभिलेखाची हाताळणी करीत असून, स्वैरपणे सामान्य जनतेस वेठीस धरत आहेत. त्यामुळे संपूर्ण प्रशासन बदनात होत आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी यांनी दिनांक 29.6.2010 रोजी एक परिपत्रक काढले होते. परंतु त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही.

सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील अनेक सरकारी कार्यालयांमध्ये अधिकारी कर्मचारी स्वत:च्या हाताखाली अनधिकृतपणे एक कर्मचारी नेमून त्याच्यामार्फत काम करुन घेत आहे आणि हे पुणे जिल्हाधिकारी यांनी हे मान्य केलेले आहे.ही अतिशय भयंकर घटना असल्यामुळे औचित्याच्या मुद्दाद्वारे मी हा प्रश्न मांडत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासाठी चैत्यभूमीला लागून असलेली इंदू मिलची साडेबारा एकरची जमीन देण्यात यावी असा ऐतिहासिक निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी दिनांक 7 ऑगस्ट 2004 रोजी तत्कालीन केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री श्री.शंकरसिंह बाघेला यांच्या उपस्थितीत घेतला होता.

त्या अनुषंगाने आधाडी सरकारच्या जाहीरनाम्यातही रीतसर आश्वासित करण्यात आले आहे. युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनीही राज्याचे मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण व श्री.माणिकराव ठाकरे यांना विधानसभा निवडणुकीत जनतेला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी जाहीरनाम्याकडे लक्ष द्या असे नुकतेच सांगितले आहे.

तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय स्मारकाची जागा केंद्र सरकारकडून त्वरित वितरीत करुन घ्यावी.

या सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या मुद्याबाबत मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, लोकांना दिलेल्या जाहीरनाम्याचे पालन राज्यकर्त्यांकडून होत नाही म्हणून काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी सरकारला कानपिचक्या दिल्या हे सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी त्यांचा औचित्या मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. अधिवेशन सुरु असताना म्हणजे दिनांक 22 जुलै 2010 रोजी पुणे येथे राहणाऱ्या श्रीमती पौणिमा प्रभू यांचे घर बळकाविण्यासाठी दिपक मानकर आणि त्यांच्या गुडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला होता. त्या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने दिनांक 22 जुलै रोजी श्री.अनामी रॉय यांना सांगितले की, पीएसआय श्री.घोरपडे आणि येवले यांना सहआरोपी करावे. या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे अधिकार श्री. अनामी रॉय यांच्याकडे असताना देखील त्यांनी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांचे निलंबन अतिरिक्त पोलीस आयुक्त यांच्यामार्फत केले. आज या घटनेतील आरोपी मोकाट फिरत आहेत. यापूर्वी देखील तत्कालीन गृह मंत्री श्री.जयंत पाटील यांच्याकडे हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, दीपक मानकरच्या विरुध्द असलेले सर्व खटले पुण्याच्या सत्र न्यायालयात एकत्रित करावे आणि खटल्यामध्ये सरकारी वकील म्हणून ॲड.उज्ज्वल निकम यांची नियुक्ती करावी. परंतु त्याबाबत पुढे काहीही कार्यवाही झाली नाही. पुणे शहरातील पोलिसांनी श्रीमती पोर्णिमा प्रभू यांच्या खटल्यात दिरंगाई आणि दिशाभूल केलेली आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या बाबतीत गृह विभागाने तातडीने दखल घ्यावी व हे प्रकरण विशेष न्यायालयाकडे एकत्रितपणे वर्ग करावे यासाठी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये आपण 106 हुतात्म्यांना आदरांजली वाहिली आहे. त्याचबरोबर त्यांचे नाव घेऊन सन्माननीय सदस्यांच्या भाषणाची सुरुवात होत असते. 106 हुतात्म्यामुळे आपण सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे केले आहे परंतु दुर्देवाने मला पुढीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा मांडावा लागत आहे.

सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राच्या 106 हुतात्म्यांची आठवण म्हणून दिनांक 21 नोव्हेंबर 1961 रोजी हुतात्मा स्मारक उभारले. या देदीप्यमान घटनेची आठवण टपाल तिकीटाच्या स्वरुपात जपली जावी म्हणून 1999 पासून या तिकीटासाठी पाठपुरावा केला जात असून सरकारकडून या मागणीकडे दुर्लक्ष होत असून राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त भव्यदिव्य कार्यक्रम साजरे होत असतांना व सुवर्ण महोत्सची वर्षाचे औचित्य साधून या तिकीटाचे प्रकाशन
झाले असते तर हुतात्म्यांना मन:पूर्वक आदरांजली वाहिली गेली असती परंतु केन्द्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात राज्यातील नेत्यांची इच्छाशक्ती नसल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत असून ही दुर्देवी बाब आहे.या बाबत गेली नऊ वर्षे संयुक्त महाराष्ट्र लढा स्मृती मंडळाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र लढयाचे अभ्यासक श्री.महादेव उर्फ भाऊ सावंत प्रयत्न करत असून सुवर्ण महोत्सवी वर्षात हे तिकीट प्रकाशित व्हावे असे औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यानी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा

श्री.पांडुरंग फुंडकर:सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या राज्याच्या विधानसभेच्या निवडणुका झाल्या त्या निवडणुकीपूर्वी 21 नोव्हेंबर 2009 च्या दरम्यान राज्य सरकारने अरबी समुद्रामध्ये डोळयाचे पारणे फिटणारे शिवस्मारक 2011 पूर्वी उभे केले जाईल अशा प्रकारचे स्पष्ट आश्वासन राज्यातील जनतेला दिले होते. त्याला आठ महिने होऊन गेले आहेत. 2004 साली या स्मारकाच्या कामाला मान्यता देण्यात आली होती. त्याचे आराखडे तयार करण्यात आले होते पंरतु गेल्या आठ महिन्या पासून या स्मारकाच्या बाबतीत पुढे कोणतीही प्रगती झालेली नाही.माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्याचबरोबर माननीय अर्थमंत्र्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणांमध्ये अरबी समुद्रातील शिवस्मारकाचा उल्लेख सरकारने केला होता . छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राची अस्मिता नाही तर संपूर्ण देशाची अस्मिता आहे.देशाच्या अस्मितेच्या नावावर राज्यातील जनतेची मते घेऊन हे सरकार सत्तेवर आले आहे परंतु छत्रपती शिवाजी महाराजाचे स्मारक उभे करण्याचे काम मागे टाकण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केलेला आहे. यासबंधी आजच्या सकाळ या वर्तमानपत्रात मोठी बातमी प्रसिध्द झालेली आहे. त्यामुळे राज्य सरकारची बदनामी झालेली आहे.राज्यातील दहा कोटी जनतेला सरकारने जे आश्वासन दिले होते ते आश्वासन पाळण्यात येणार आहे किंवा नाही ? की इतर कामासारखेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे सुध्दा होणार आहे ? यासंबंधीची माहिती जनतेला सभागृहाच्या माध्यमातून मिळाली पाहिजे. तेव्हा या कामाची सद्यस्थिती काय आहे हे महाराष्ट्रातील जनतेला समजण्यासाठी राज्य सरकारने निवेदन केले पाहिजे अशी मी या औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्यासंबंधीचा औचित्याचा मुद्दा माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी मांडला आहे. त्यासंबंधी मी बोलू इच्छितो. सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाला आणि कार्याला शोभेल असे स्मारक अरबी समुद्रात व्हावे यासाठी 1995 मध्ये त्या वेळचे मुख्यमंत्री श्री मनोहर जोशी यांनी श्री.सुधीर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली होती.

नंतर श्री.सरफरे

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे...

तेव्हापासून अनेक वेळा बैठका झाल्या आहेत. माननीय श्री. सुधीर जोशी यांनी अनेक जागांची पहाणी केली होती. तेव्हापासून आज सन 2010 सालापर्यंत 15 वर्षे झाल्यानंतरही छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्र शासनाकडून न्यायाच्या अपेक्षेमध्ये उभे आहेत. त्यांच्या स्मारकाला आपण अजून सुरुवात करु शकलो नाही. याकरिता अनेक लोकांनी आंदोलने केली आहेत. सभागृहातही अनेक वेळा विषय उपस्थित करण्यात आला आहे. माजी मुख्यमंत्री माननीय श्री. मनोहर जोशी साहेबांच्यावेळी समिती गठीत झाली होती, त्यानंतर आलेले माजी मुख्यमंत्री माननीय श्री. विलासराव देशमुख साहेबांच्यावेळी समिती गठीत झाली होती. त्यानंतर माननीय श्री. अशोक चव्हाण साहेब मुख्यमंत्री झाल्यानंतर समिती गठीत झाली. परंतु आजतागायत जागा निश्चित करण्यात आलेली नाही. जागा निश्चित झाल्याचे सांगून शासनाने नोटिफिकेशन काढले व त्याकरिता 50 कोटी रुपये दिले, त्यानंतर 300 कोटी रुपये दिले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. या स्मारकासाठी महाराष्ट्र सरकार वेळ काढीत आहे. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून या सभागृहात उपस्थित असलेल्या ज्येष्ठ मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, या संदर्भात आपण आपली भूमिका निश्चित करणार आहात की नाही? या स्मारकाचे भूमिपूजन, जलपूजन लवकरात लवकर करण्यासाठी आपण कालबध्द कार्यक्रम आखणार की नाही?

उपसभापती : शासनाने यासंबंधी सोमवारपर्यंत निवेदन करावे असे मी निदेश देतो.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, निवेदन केले जाईल.

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.22 ते 3.00 मध्यंतर)

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ. शी. : विनाअनुदानित शाळांमधील तसेच तुकडयांमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन व पुस्तके न मिळणे .

मु. शी.: विनाअनुदानित शाळांमधील तसेच तुकडयांमधील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन व पुस्तके न मिळणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे,भगवान साळुंखे, व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत पाटील,कपिल पाटील,प्रा.सुरेश नवले वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील(पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"संपूर्ण महाराष्ट्र राज्यात विनाअनुदानित शाळांची संख्या साडेतीन हजारांपेक्षा अधिक असणे, लाखो विद्यार्थी तेथे शिक्षण घेत असणे, शासन धोरणानुसार राज्यातील विनाअनुदानित 3 हजार 600 शाळांतील लाखो विद्यार्थ्यांना पुस्तके नसणे, मध्यान्ह भोजन नसणे, शिवाय कायम विनाअनुदानित संस्था मागील "कायम" शब्द काढण्याचा निर्णय होऊनही अंमलबजावणी न होणे, एकाच संस्थेच्या अनुदानित तुकडीत विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार मिळणे आणि विनाअनुदानित तुकडीतील विद्यार्थी मात्र त्यापासून वंचित राहणे, गेल्या 10 वर्षात अशा सर्व शाळांतील शिक्षकांना विनावेतन काम करावे लागणे, परंतु किमान विद्यार्थ्यांना इतर अनुदानित शाळांप्रमाणे पाठयपुस्तके व मध्यान्ह भोजन शासनाने न दिल्याने सर्व सामान्य जनतेत शासनाच्या विरोधात असंतोषाचे वातावरण पसरणे, यावर शासनाची प्रतिक्रिया. "

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हा विषय वांरवार या सभागृहासमोर येतो. महाराष्ट्रात एकूण 3600 शाळा कायम विनाअनुदानित आहेत. माझा प्रश्न असा आहे की, या कायम विनाअनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना पाठयपुस्तके आणि मध्यान्ह भोजन मिळणे आवश्यक आहे. जी शाळा विनाअनुदानित आहे अशा शाळेला हे न मिळणे मी समजू शकतो परंतु एखाद्या शाळेत काही तुकडया अनुदानित आहेत आणि काही तुकडया विनाअनुदानित आहेत. म्हणजे एकाच शाळेतील काही तुकडयातील मुलांना मध्यान्ह भोजन आणि पाठयपुस्तके मिळतात आणि काही तुकडयातील मुलांना मध्यान्ह भोजन आणि पाठयपुस्तके मिळत नाहीत. याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे की, हा केंद्र शासनचा विषय आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, ज्या शाळांमध्ये काही तुकडया अनुदानित आहेत आणि काही तुकडया विनाअनुदानित आहेत. या विनाअनुदानित तुकडयांची संख्या फार मोठी नसेल त्या शाळांमध्ये किमान अनुदानित तुकडयाप्रमाणे मध्यान्ह भोजन आणि पाठयपुस्तके देण्यात येतील काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, पाठयपुस्तके देणे हा सर्व शिक्षा अभियानांतर्गत केंद्र शासनाचा विषय आहे, हे बरोबर आहे. तसेच शालेय पोषण आहार ही योजना देखील केंद्र शासनाचीच आहे. आत्ताच शासनाने कायम विनाअनुदानित धोरण रद्द केलेले आहे. आता कायम हा शब्द राहिलेला नसल्यामुळे त्या शाळा टप्प्याटप्प्याने जसजशा अनुदानावर येतील तसतशी त्यांना ही सुविधा मिळणार आहे. यासंदर्भात केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता परंतु केंद्र शासनाने याला नकार दिलेला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, विनाअनुदानित शाळांना व तुकडयांना अनुदानितवर आणायला दोन वर्षे लागणार आहेत तोपर्यंत महाराष्ट्र शासन मध्यान्ह भोजन आणि पुस्तकांच्या बाबतीत विचार करील काय?

प्रा. फौजिया खान : महाराष्ट्र शासनाने या बाबतीत विचार केलेला असून यासंदर्भाती प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला होता. यासाठी 206.43 कोटी रुपये लागणार आहेत पण तो प्रस्ताव वित्त विभागाने आणि नियोजन विभागाने स्वीकारलेला नाही. परंतु ज्या शाळां अनुदानित आहेत पण त्या शाळेतील काही तुकडया विनाअनुदानित असतील तर त्यांच्या बाबतीत देखील प्रस्ताव पाठविला होता. त्यासाठी 11 कोटी केंद्र शासनाकडून आणि 2 कोटी 98 लाख रुपये राज्य शासनाकडून अपेक्षित होते. पण याला देखील वित्त विभागाने दि.19-9-2009 रोजी नकार दिलेला आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/ KGS/ ST/

डॉ. वसंतराव पवार : सभापती महोदय, या राज्यातील 1834 माध्यमिक आणि 1678 प्राथमिक विनाअनुदानित तत्वावरील शाळा आहेत. या शाळांच्या बाबतीत 'कायम' हा शब्द काढण्यात आला आहे असे शासनाने जाहीर केलेले आहे. त्या बद्दल शासनाला मी धन्यवाद देतो. मूल्यांकन करण्यासंबंधी सारखी चर्चा होते, त्यासंबंधीची घोषणा होते. पण मूल्यांकनाचे नेमके निकष काय आहेत? शासन हे निकष किती दिवसात तयार करणार आहे आणि ते या सभागृहाच्या पटलावर केव्हा ठेवण्यात येतील? हा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न महत्वाचा आहे. एखाद्या शाळेत अनुदानित आणि विनाअनुदानित अशा दोन्ही तुकडया असतील तर एका तुकडीला शालेय पोषण आहार दिला जातो आणि एका तुकडीला शालेय पोषण आहार दिला जात नाही. अशा वेळी शालेय व्यवथापन त्या शाळेला जी ग्रँट मिळते त्या ग्रँटमधून सर्व मुलांना शालेय पोषण आहार देत असते. सर्व मुलांना शालेय पोषण आहार द्यावाच लागतो. काही मुलांना पोषण आहार द्यावयाचा आणि काही मुलांना द्यावयाचा नाही असे करता येत नाही. म्हणून जर कोणी अशा पध्दतीने सर्व मुलांना पोषण आहार दिला तर शासनाने त्यांच्यावर कारवाई करु नये. आणि ती न करण्याच्या बाबतीत शासनाने मार्गदर्शन करावे, अशा प्रकारची विनंती आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

आपण नवीन योजना काढली त्याप्रमाणे धान्य वगैरे केंद्रीभूत पध्दतीने खरेदी करुन देणार. त्यामुळे शालेय पोषण आहार देण्यामध्ये अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शालेय पोषण आहार या विषयावर सर्व संबंधित आमदारांची एकदा दालनात बैठक घेतली तर हा विषय चर्चेचा राहणार नाही. त्यामध्ये विद्यार्थ्यांना न्याय मिळू शकतो. त्यामुळे विना अनुदानित विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराच्या बाबतीत अनुदान देणार काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मी आधीच दिलेले आहे की, ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. राज्य शासनाने त्यांच्याकडे प्रस्ताव दिला होता परंतु केंद्र शासनाच्या निर्णयानुसार विनाअनुदानित शाळांना ते देणे शक्य नाही. राज्य शासनाकडून ही योजना राबवू शकतो काय याबाबतही आपण प्रयत्न केला. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मी सुध्दा त्याच्याशी सहमत आहे की, विना अनुदानित मुलांना सुध्दा हे मिळावे. परंतु हे त्या निकषामध्ये बसत नाही आणि राज्य शासनाने योजना केली तर त्यासाठी लागणारा आऊट ले मोठा असल्यामुळे ते सुध्दा शक्य नाही. सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न मूल्यांकनाच्या बाबतीत विचारला. आपण 'कायम' शब्द काढल्यामुळे त्या शाळा अनुदानित व्हाव्यात यासाठी 2012-2013 पासून मूल्यांकन करण्यात येणार आहे त्याचे निकष ठरविण्यासाठी फाईल आज नियोजन विभागाकडे पाठविण्यात आली आहे. त्या निकषामध्ये खासकरुन भौतिक सुविधांसोबतच प्रत्यक्षात एज्युकेशनल आऊटकम काय आहे, शाळेच्या विद्यार्थ्यांना लिहिता वाचता येते की नाही, एज्युकेशनल रिझल्ट् काय आहे हे महत्वाचे निकष असावेत असा आमचा प्रयत्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोयना अभयारण्य व चांदोली राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता

मु. शी. : कोयना अभयारण्य व चांदोली राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात पुरेसा कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता यासंबंधी श्रीमती अलका देसाई, श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"कोल्हापूर, सातारा, सांगली व रत्नागिरी या चार जिल्ह्यांत पसरलेल्या कोयना अभयारण्य व चांदोली राष्ट्रीय उद्यान यांचा समावेश असलेल्या सुमारे १६२६ चौ.कि.मी. क्षेत्रावर नवा व्याघ्र प्रकल्प राबविण्यात येत असणे, मात्र वन्य जीवांच्या संवर्धनाच्या योजना राबविताना यासाठी असणारा कर्मचारी वर्ग अत्यंत अपूरा असणे, कोयना अभयारण्यात किमान ८४ वनरक्षक, २१ वनपाल व ३ वनक्षेत्रपाल इतका कर्मचारी वर्ग आवश्यक असताना फक्त १२ वनरक्षक, १२ वनपाल व २ वनक्षेत्रपाल इतका अपुरा कर्मचारी वर्ग असणे, तसेच, या अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे हत्यार वापरण्याची परवानगी नसणे, पत्र्याच्या शेडमध्ये रहावे लागत असणे, शासनाची वन्यजीव संवर्धन योजना अत्यल्प वन कर्मचारी व अपुऱ्या सोयी सुविधांमुळे असफल होण्याची शक्यता, याबाबत त्वरीत कार्यवाही करुन वन कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत व नवीन पदे निर्माण करुन पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करण्याबाबत करावयाची उपाययोजना व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. पतंगराव कदम (वने मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी फक्त दोनच प्रश्न विचारणार आहे. आपण चांदोली राष्ट्रीय उद्यान विकसित करीत आहोत तसेच त्या ठिकाणी काही वनरक्षक व इतर संबंधित कर्मचारीवर्ग नियुक्त केलेला आहे व्याघ्र प्रकल्प म्हणून, राष्ट्रीय प्रकल्प म्हणून त्याचा विकास करीत आहोत. असे असले तरी त्या जिल्ह्याला लागून असलेला जो सिंधुदुर्ग जिल्हा आहे त्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर जंगल आहे. त्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर प्राणी आहेत त्याचप्रमाणे औषधी वनस्पतींचा हा जिल्हा आहे. याबरोबरच मला त्या ठिकाणी एक गोष्ट दिसते ती म्हणजे खनिज प्रकल्पांसाठी तो जिल्हा फार प्रसिध्द आहे. त्या ठिकाणी जेव्हा खनिजांचे उत्खनन होत असते तेव्हा वन खात्याच्या अधिकाऱ्यांना किंवा वन मंत्रालयाला विश्वासात घेतले जात नाही. त्यांच्याकडून परवानगी घेतली जात नाही. एका बाजूने मोठ्या प्रमाणावर खनिजांचे उत्खनन होते आणि दुसऱ्या बाजूने मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होते. त्यामुळे त्या ठिकाणी वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या नेमणुका होणे गरजेचे आहे. या नेमणुका शासन कधी करणार ? नुसता व्याघ्र प्रकल्प करुन चालणार नाही. अपुऱ्या कर्मचारीवर्गामुळे वाघांचे संरक्षण होणार नाही. म्हणून जो अपुरा कर्मचारीवर्ग आहे त्यादृष्टीने प्राधान्य देऊन त्या ठिकाणी शासन नेमणुका करणार काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती अलका देसाई यांनी एका प्रश्नातून दोन तीन प्रश्न निर्माण केलेले आहेत. पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, कोणतेही खनिज किंवा माईन्स वनक्षेत्रामध्ये घ्यावयाचे असतील तर त्याला वन विभागाची परवानगी लागते. त्याशिवाय त्यांना ते करता येत नाही.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. पतंगराव कदम...

सन्माननीय सदस्यांनी दुसरी गोष्ट सांगितली ती खरी आहे. त्या ठिकाणी कर्मचारी वर्ग अपुरा आहे. कोयना अभयारण्यामध्ये 22 कर्मचारी आहेत. तेथे 51 कर्मचा-यांची आवश्यकता आहे. चांदोलीमध्ये 14 पदे मंजूर आहेत आणि 55 पदांची आवश्यकता आहे. यासाठी दोन गोष्टी करता येतील. एक म्हणजे काही कर्मचारी बाहेरुन बदलून आणाता येतील आणि दुसरे म्हणजे सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाकडे कर्मचारी वर्ग मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर करता येईल.

श्री. मोहन जोशी : हा व्याघ्र प्रकल्प राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. या जंगलामध्ये वृक्षतोड फार मोठ्या प्रमाणावर होते. चंदनाच्या झाडाची तस्करी देखील मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे पर्यावरणालाही फार मोठा धोका निर्माण होत आहे. वन मंत्री हे अतिशय तडफदार आणि कर्तबगार आहेत. त्यांनी वृक्षतोडीला आणि तस्करीला आळा घालण्यासाठी अतिशय कडक कायदा करण्यात येईल असे सांगितले. हा कायदा शासन कधी करणार आहे ?

डॉ. पतंगराव कदम :या वनामधून जी वृक्षतोड आणि तस्करी होते तिला आळा घालण्यासाठी आपण उपाययोजना करीत आहोत. कोकणातील चार जिल्ह्यामध्ये वृक्षतोडीला बंदी घातलेली आहे. तसेच जेथे 10 टक्क्यापेक्ष कमी वन आहे तेथे सुध्दा बंदी घालण्याचा आमचा विचार आहे. पर्यावरणाच्या दृष्टीने अशा तस्करीच्या बातीत कडक कारवाई करण्याची तरतूद कायद्यामध्ये आहे. यापेक्षा अधिक काही करावे लागले तर ते करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : वाघ वाचवा अशा प्रकारचे आदेश केन्द्र शासनाने काढलेले आहेत. एका वन रक्षकाकडे 32.30 चौ.कि.मी.चे क्षेत्र असते आणि रेंजरकडे त्याच्या तिप्पट क्षेत्र असते. आपल्या चांदोली अभयारण्यामध्ये 53 पट्टेदार वाघ आणि 123 बिबटे आहेत. असे असताना तेथील वन रक्षक आणि रेंजरची संख्या फार कमी आहे. तेव्हा या गोष्टीचा विचार करुन त्या ठिकाणचे अधिकारी आणि कर्मचारी वाढविणार आहात काय ?

डॉ. पतंगराव कदम : त्या ठिकाणचे सर्व कर्मचारी भरण्याच्या दृष्टीने कारवाई सुरु आहे. अधिका-यांची पदे भरलेली आहेत. बाकीच्या कर्मचा-यांची पदे भरण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मौजे डोणज (ता.मंगळवेढा, जि. सोलापूर) येथील तलाव परिसरातील चित्रबलाक पक्षाची होत असलेली कत्तल

मु.शी. : मौजे डोणज (ता.मंगळवेढा, जि. सोलापूर) येथील तलाव परिसरातील चित्रबलाक पक्षाची होत असलेली कत्तल यासंबंधी ॲड गुरुनाथ कुलकणी, सर्वश्री. रमेश शेंडगे, सतीश चव्हाण, हेमंत टकले, विक्रम काळे व अरुण गुजराथी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे डोणज (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथील तलाव परिसरात वास्तव्यास आलेल्या 'चित्रबलाक' या स्थलांतरीत पक्षांची माहे मे, २०१० पासून नित्याने होत असलेली कत्तल, याशिवाय धर्मवीर संभाजी तलावातील जांभळी, पाणकोंबडी, कांडेसर, कुदळया यांचीही होत असलेली चोरटी शिकार, वन अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या पक्ष्यांच्या कत्तलीत नित्याने होत असलेली वाढ, याबाबत सविस्तर चौकशी करुन संबंधित वन अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

डॉ. पतंगराव कदम (वने मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्यातील मौजे डोणज येथील तलाव परिसरात वास्तव्यास आलेल्या चित्रबलाक या स्थलांतरित पक्षांची माहे मे, 2010 पासून नित्याने होत असलेली कत्तल, या शिवाय धर्मवीर संभाजी तलावातील जांभळी, पाणकोंबडी, कांडेसर, कुदळ्या यांचीही होत असलेली चोरटी शिकार, वन अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे या पक्षांच्या कत्तलीत नित्याने होत असलेली वाढ. याबाबत चौकशी करुन कडक कारवाई करण्याची आवश्यकता अशा प्रकारची ही लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे पट्टेदार वाघांची आणि बिबट्यांची शिकार राज्यात मोठ्या प्रमाणावर होत आहे. कोकणामध्ये बिबट्याची शिकार केली जाते. त्यासाठी कोणत्या तरी प्रकारचे बॉम्ब आणले जातात आणि ते जंगलामध्ये ठेवले जातात. त्या बॉम्बच्या आजुबाजूला जनावरे आली की त्याचा स्फोट होतो आणि जनावरे मरतात.

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाघ, बिबटे किंवा पक्षी त्याठिकाणी आढळून येतात. माझ्या माहितीप्रमाणे हे पक्षी सरोवराच्या काठावर विहार करीत असतात. त्याठिकाणी दिवसाढवळया पक्ष्यांची शिकार केली जाते. मी टीव्हीवर देखील काही कार्यक्रमाच्या माध्यमातून पाहिले आहे. शासनाने निवेदनामध्ये जी वस्तुस्थिती नमूद केली आहे ती योग्य आहे की नाही याची मला माहिती नाही. याबाबत मंत्रीमहोदय खुलासा करु शकतील. मोठया प्रमाणात तलावाच्या काठावर असलेल्या वृक्षांवरील पक्ष्यांची शिकार केली जाते अशी माझी माहिती आहे. अशा प्रकारची शिकार करण्याला प्रतिबंध घालण्यासाठी वन विभागामार्फत सक्षम यंत्रणा राबविण्यात येईल काय?

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर भाष्य केले आहे. डोणज, ता.मंगळवेढा याठिकाणी वेगळ्या पध्दतीचे चित्रबलाक पक्षी ऋतुमानानुसार वास्तव्यासाठी येत असतात. काटेरी वृक्षांवर असलेल्या घरट्यातून नवजात पिल्लू खाद्य शोधण्यास अथवा स्वयंप्रेरणेने उडण्यास असमर्थ असल्याने त्यांची इतर भक्षक पक्षी किंवा आसपासचे लोक शिकार करतात. यासाठी तेथे एक वनरक्षक, एक वनपाल यांची कायमस्वरुपी नियुक्ती केलेली आहे. त्या तलावाच्या परिसरास सातत्याने अधिकाऱ्यांनी भेटी दिलेल्या आहेत. तेथील गावकरी सतर्क आहेत. तेथील सरपंचांनी स्वत: निवेदन दिले आणि सांगितले की, गावकऱ्यांकडून संरक्षण होत नसल्यामुळे आम्ही संरक्षण करु. अशा पक्ष्यांची शिकार होऊ नये याची काळजी घेण्याचे काम वन विभागाकडून होत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पक्षीधनाचे संरक्षण करण्याची वन विभागाची जबाबदारी आहे. नॅशनल जिऑग्राफी मासिकाची स्वत:ची टीम आहे. ती टीम छायाचित्रकारांसमवेत चित्रीकरण करुन पक्षाची राहणी कशी आहे याचे निरीक्षण करते. मोठे पक्षी छोट्या पक्ष्यांची शिकार करतात हे नैसर्गिक असू शकेल. याचा निश्चित ठावठिकाणा घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन या पक्ष्यांचे संरक्षण करण्याचा विचार केला जाईल काय?

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माळढोक पक्ष्यांच्या संरक्षणाबाबत वन खात्याने संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. वन विभागाकडून तेथे संरक्षक भिंत बांधली जाईल काय? डोणज परिसरात एका महाविद्यालयाने 30 एकर जमीन खरेदी करुन त्याठिकाणी वनक्षेत्र निर्माण करण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

प्रयत्न केला आहे. त्या जमिनीवर झाडे लावून देण्याबाबत शासन विचार करणार आहे का? त्या परिसरात रात्रीच्या वेळी बाहेरचे लोक येऊन हरीण, चितळ यांची शिकार करतात व त्यांचे मांस जवळपासच्या धाब्यांना पुरवितात. याबाबत शासन दक्षता घेणार आहे काय? महापालिकेने ठराव करुन सुध्दा तेथील वनाचे संरक्षण आणि कंपाऊंड वॉल बांधण्याचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित आहे. त्याबाबत तातडीने निर्णय घेण्यात येईल काय?

डॉ.पंतगराव कदम : वन विभागाचा कायदा अतिशय कडक आहे. अशी कोणती वन्यप्राण्याची शिकार झाली आणि ती उघडकीस आली तर संबंधितांना कडक शिक्षा केली जाते. अशा वन्यप्राण्यांची शिकार होणार नाही यासाठी स्थानिक लोक व वन विभाग सतर्क आहेत. त्यामुळे चोरुन असे प्रकार घडले तरी कधी ना कधी ते उघडकीस येत असतात. त्यामुळे वन कायद्याची जबरदस्त दहशत त्यांच्यावर असते.

नंतर 2एस.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मुरुड (जि.रायगड) शहराजवळच्या समुद्रकिनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारा बांधणे

मु.शी.: मुरुड (जि.रायगड) शहराजवळच्या समुद्रकिनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारा बांधणे संबंधी सर्वश्री जयंत पाटील व कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय बंदरे मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुरुड (जि. रायगड) शहराच्या पूर्वेकडील एकदरा खाडी लगतच्या भागात सुमारे 10 हेक्टर क्षेत्रामध्ये नारळी-फोफळीच्या असलेल्या बागा, या बागायती लगत धूप प्रतिबंधक बंधारा नसणे, समुद्राच्या भरतीच्या वेळी पाणी बागामध्ये शिरुन बागायतदारांचे प्रचंड प्रमाणात नुकसान होणे, आतापर्यंत सुमारे 6 मीटर क्षेत्राची धूप झालेली असणे, यामुळे लाखो रुपयांची उलाढाल असलेल्या या बागायती नष्ट होऊन अनेक स्थानिक बेरोजगार होण्याची शक्यता, या ठिकाणी तातडीने धूप प्रतिबंधक बंधारा बांधण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही. "

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (बंदरे विकासमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, केंद्रीय जल व विद्युत संशोधन संस्था, खडकवासला यांच्याकडून संयुक्त पाहणीचा अहवाल शासनाने मागितला होता तो अहवाल शासनाकडे आलेला आहे काय ? नसल्यास पत्तन अभियंता यांनी त्यासंदर्भात कोणते प्रयत्न केले ? मुरुड शहरात जे बागायती क्षेत्र आहे ते या पाण्यामुळे नष्ट होत आहे. त्यासाठी 20 कोटीची गरज आहे. हा निधी डीपीडीसीकडून मिळू शकेल असे वाटत नाही. सन्माननीय अर्थमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांच्या नजरेस आणून देणार आहे की, आपण मुरुड शहरात गेला त्यावेळेस सांगितले होते की, या कामासाठी हा निधी जिल्हा नियोजन समिती तसेच स्टेट पुलमधून मिळेल. तो निधी मिळाला काय ? नसल्यास मेरीटाईम बोर्डाकडून ही तरतूद शासन करणार काय ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : महोदय, अशा प्रकारचा धूप बंधारा बांधण्याची ही योजना असून डीपीडीसीची योजना म्हणून जिल्हा नियोजनातून त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. ही सर्व तरतूद पाहता साधारणपणे प्रत्येक वर्षी चार-पाच जिल्हे मिळून 30-35 कोटीचा निधी उपलब्ध होतो. यातून बंधारा बांधावा अशी मागणी पुढे आली, ही यातील वस्तुस्थिती बरोबर आहे. परंतु राज्यस्तरावर ही योजना घ्यावी आणि त्यातून निधी उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाच्या दृष्टीने असून तो निर्णय शासनाकडून घेण्यात येईल. तसेच केंद्राकडून या कामासाठी आपल्या राज्याला 13 व्या वित्त आयोगामार्फत जवळपास 234 कोटी रुपये प्राप्त होतात. तसेच एडीबीकडून 172 किलोमीटरच्या समुद्र किनाऱ्यालगत प्रतिबंधक कारवाई म्हणून धूप बंधारा बांधण्याची स्वतंत्र योजना डीपीडीसीमधून घ्यावी व त्याला मान्यता मिळाल्यानंतर या कामासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, आगरदांडा येथे नवीन पोर्ट बांधण्यात येत असून त्या कामासाठी जवळपास 5000 कोटीचा खर्च आहे. शासनाच्या वतीने या ठिकाणी प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून या किनाऱ्यावर धूप बंधारा बांधण्यासाठी त्यांना विनंती केली तर ते सुध्दा हा धूप बंधारा बांधू शकतात. तसेच या भागात पाण्याचे मोठमोठे ओहोळ येत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. म्हणून या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, त्यांना विनंती केली तर 180 कोटीचे हे काम ते सहज करुन देऊ शकतात. म्हणून शासन त्यांना विनंती करणार काय ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सन्माननीय सदस्यांची भावना बरोबर आहे की अशा प्रकारचे बंधारे बांधताना गावात पाण्याचा ओहोळ येतो व त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. मघाशी एका प्रश्नाचे उत्तर राहून गेले की, केंद्रीय जल व विद्युत संशोधन संस्थेकडून जो अहवाल मागविला तो दोन महिन्यात प्राप्त होणार आहे. परंतु त्या विषयाचा या लक्षवेधीशी संबंध नाही. तसेच सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे या नवीन योजनेच्या माध्यमातून ही काळजी घेण्यात येईल.

लक्षवेधी क्रमांक 5 संबंधी

उपसभापती : आजच्या कामकाज पत्रिकेतील लक्षवेधी क्र. 5 पुढे ढकलण्यात येत आहे.

यानतर श्री. जुन्नरे ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यात दोन वर्षापूर्वी आलेल्या फयान वादळग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत

मु. शी. : राज्यात दोन वर्षापूर्वी आलेल्या फयान वादळग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यासंबंधी सर्वश्री परशुराम उपरकर, दिवाकर रावते वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात दोन वर्षा पूर्वी आलेल्या 'फयान' वादळामुळे कोकणातील मच्छीमार उध्वस्त होणे, राणीच्या जाळया,फायबर होडया, बोटींबरोबरच किनारपट्टीतील घरांमध्ये समुद्राचे पाणी घुसून मच्छीमारांचे झालेले लाखोंचे नुकसान, या नुकसानीपोटी शासनाच्या नियमानुसार दिलेल्या ४ कोटी रुपयांचा निधी झालेल्या पंचनाम्याप्रमाणे वितरित न करता पावणेतीन कोटी रुपयांच्या निधीचा अधिकाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे विनियोग न होणे, या नुकसानीचे पंचनामे शासनाच्याच अधिकाऱ्यांनी केले असतांना आता ते पंचनामे याच अधिकाऱ्यांनी खोटे ठरविणे, याबाबत राज्याच्या विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांत झालेल्या चर्चेच्या वेळी याबाबतचे निकष बदलण्याचे आश्वासन देवूनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न होणे, सिंधुदुर्ग जिल्हा श्रमजीवी रापण मच्छीमार संघाने माहे एप्रिल,२०१० च्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदन देवून याबाबत कार्यवाही करण्याची केलेली मागणी, मच्छीमारांमध्ये निर्माण झालेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेवून नुकसानभरपाई देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

डॉ. नितीन राऊत (मत्स्यव्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, फयान वादळाच्या संदर्भात या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. मंत्री महोदयांनी सुध्दा फयान वादळाच्या बाबतीत सहानुभूतीने विचार केला होता. परंतु मधील काळात फयान ग्रस्तांसाठी आलेला 4 कोटी निधी परत गेला. सिंधुदुर्ग जिल्हयातील श्रमजीवी रापण मच्छीमार संघाने सातत्याने यासंदर्भात पाठपुरावा केला होता तसेच संघाने गेल्या 17 तारखेला मोर्चा सुध्दा काढला होता. 101 पैकी 57 रापण संघांना निधी मिळालेला नाही. या ठिकाणच्या मच्छीमारांचे जे जाळयाचे नुकसान झालेले आहे त्याची नुकसान भरपाई शासन देणार आहे काय ? त्याच बरोबर शासनाने विशेष सानुग्रह अनुदान देण्याचे जाहीर केले होते त्यातील काही अनुदान काही संस्थेकडे शिल्लक आहेत. 12000 पैकी 3000 लोकांचे अनुदान आले होते व 9000 लोकांचे अनुदान देण्याचे शिल्लक होते. त्यामुळे हे अनुदान देण्यासाठी शासन काही उपाययोजना करणार आहे काय? तसेच शिल्लक असलेल्या अनुदानाचे वाटप करण्यासाठी आदेश काढणार आहे काय ?

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना या सभागृहात तिस-यांदा आलेली आहे. तेच तेच प्रश्न सभागृहात उपस्थित होत असतात याचे मला आश्चर्य वाटते. मी आपणास सांगू इच्छितो की, 19 नोव्हेंबर 2009 च्या राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे रापण संघाना निधीचे वाटप करण्यात आले होते. सिंधुदुर्ग जिल्हयातील 51 रापण संघांनी नुकसान भरपाईची मागणी केली होती. ज्या ज्या मच्छीमारांनी शासनाकडे सदरचे जाळे विकत घेण्यासाठी कर्ज घेतलेले आहे याची नोंद नोंदणीकृत मच्छीमार सोसायटीमध्ये असते, त्या संबंधीचा पुरावा किंवा बँकेतून कर्ज घेतले असेल तर त्याचा पुरावा किंवा जाळे कोणाच्या मालकीचे आहे याचा सबळ पुरावा मत्स्य व्यवसाय विभागातील अधिका-यांनी तपासून घ्यावयाचा आहे व त्याची नोंद पंचनाम्यात करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने ज्या ज्या मच्छीमारांनी कागदपत्र सादर केले होते त्या त्या लोकांना लाभ देण्यात आलेला आहे. पूर्ण नष्ट झालेल्या नौका 63 होत्या त्यांना 33.97 लक्ष रुपये देण्यात आलेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयातील 50 टक्क्यापर्यंत नुकसान झालेल्या नौका 414 होत्या त्यांना 35.95 लक्ष रुपये देण्यात आले. लहान जाळयाचे नुकसान झाले असे लाभार्थी 419 होते त्यांना 51.44 लक्ष रुपये देण्यात आले होते. मोठया जाळयांचे नुकसान झालेले लाभार्थी 51 होते त्यांना 12.97 लक्ष रुपये दिलेली आहे. एकूण 947 लाभार्थ्यांना 124.33 लक्ष रुपये आतापर्यंत देण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही लोकांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही. त्यांनी नियमानुसार कागदपत्रांची पूर्तता केली असेल तर नुकसान भरपाई देण्याचा नक्की विचार केला जाईल.

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, एकच लक्षवेधी सूचना वारंवार येत आहे. त्यासंबंधी मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, ज्याचे जळते त्याला कळते. फयान वादळामुळे कोकणातील मच्छिमारांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत, त्यांचा व्यवसाय उद्ध्वस्त झाला आहे. मच्छिमारांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आपण 4 कोटी रूपयांचे अनुदान जाहीर केले. हे अनुदान चॅरिटी म्हणून दिलेले नाही. ठाणे, रायगड,रत्नागिरी,सिंधुदुर्ग हे जिल्हे समुद्र किनारी आहेत. फयान वादळामुळे ठाणे-रायगड येथील मच्छिमारांचे जास्त नुकसान झाले नाही. मात्र, रत्नागिरी-सिंधुदुर्ग येथील मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यासाठी आपण 13 कोटी रूपयांची तरतूद केली. या 13 कोटी रूपयांपैकी 10 कोटी रूपयाचे वाटप केले असे मंत्रिमहोदय म्हणाले. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी 4 कोटी रूपये वाटप करण्यासाठी मिळाले. त्यापैकी 1 कोटी 34 लाख रूपये आपण खर्च केले. ज्या मच्छिमारांचे नुकसान झाले आहे, त्यांना दाखले देण्याचे, पंचनामे करण्याचे काम आपल्या विभागाचे होते. पण यात महसूल विभाग आणि आपल्या विभागात एक वाक्यता असल्याचे दिसून येत नाही. एकूण तरतुदी पैकी आपण 1 कोटी 34 लाख रूपयाचे वाटप केले. उर्वरित रकमेचे वाटप करावयाचे आहे. ते शासन कधी करणार आहे ? ज्या मच्छिमारांचे नुकसान झाले होते ते लोक मला येऊन भेटले होते. त्यांनी मालवण येथे आंदोलन केले होते. उपोषणाला बसले होते. त्यावेळी आपल्या विभागाच्या, बंदर विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या मागणीकडे लक्ष देतो असे सांगितले होते. असे असताना येथे मंत्रिमहोदय वेगळे उत्तर देत आहेत. रापण संघाने मागणी केली आहे की, त्यांच्याकडे पुरावे आहेत. फयान वादळामुळे सर्व जाळ्या गेल्या आहेत. तेव्हा त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी उर्वरित रक्कम शासन त्यांना देणार आहे काय ? असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, फयान वादळात सापडलेल्या मच्छिमारांना नुकसान भरपाई द्यावी म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी एक समिती स्थापन केली होती. या समितीचे प्रमुख माननीय महसूल मंत्री होते. महसूल मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली ज्या ज्या लोकांचे नुकसान झाले होते त्यांचे पंचनामे करण्यात आले होते. एवढेच नव्हे तर तेथील स्थानिक लोकांना देखील बोलाविण्यात आले होते. ज्यांचे नुकसान झाले होते त्यांना बोलावून, पंचनामे झाल्यानंतर नुकसानीबद्दलचे पैसे देण्यात आले आहेत. काही लोकांचे म्हणणे आहे की, आम्हाला नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यांनी जर पुरावा दिला तर त्यांना निश्चितपणे मदत करण्याची भूमिका घेतली जाईल. शासनाने 947 मच्छिमारांना मदत केलेली आहे. जाळ्यांचे नुकसान बघून रूपये 25000/- इतकी मदत दिली जाते. परंतु. रूपये 50,000/- इतकी मदत देण्याचा निर्णय समितीने घेतला व त्याप्रमाणे त्यांना मदत करण्यात आली आहे. म्हणजे मदतीची रक्कम शासनाने दुप्पट केली आहे. शासनाचा 19 नोव्हेंबर 2010 चा जी.आर.स्पष्ट आहे. त्या निकषात जे कोणी वंचित मच्छिमार बसत असतील तर त्यांना अजूनही नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही शासन निश्चितपणे करील.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सबळ पुरावा दिल्यानंतर आपदग्रस्तांना मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. मी स्वत: कार्यालयात जाऊन आलो आहे. तेथील अधिकाऱ्यांना 60-70 पावत्या पुरावे म्हणून दाखविल्या आहेत. तरी देखील मच्छिमार नुकसान भरपाई पासून वंचित आहेत. कोकणातील मच्छिमारांच्या जाळ्यांना वॅट नसल्यामुळे रोपणकार संघ तो देखील पुरावा देऊ शकत नाही. रोपण संघातील सदस्य समुद्र किनारी असलेल्या झोपडीत एकत्रितपणे आपले सामान बांधून ठेवतात. साधारणत: 40 जण एकत्र आलेले असतात. या झोपडीमध्ये त्यांचा व्यवहार होत असतो. पण त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे त्यांनी फायलिंग केलेले कागदपत्र नसतात.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर..

त्यामुळे पावत्या मागणे उचित होणार नाही. तसेच जाळ्यांवर व्हॅट नाही. मी याठिकाणी सांगू इच्छितो की, तीन-चार अधिकाऱ्यांनी पंचनामे करुन सह्या केलेल्या आहेत. मी या संदर्भात नियम 93 अन्वये हा विषय मांडला होता त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की," दिनांक 19 नोव्हेंबर, 2009 रोजीच्या शासन निर्णयाची अट वगळण्या संबंधीचा प्रस्ताव शासन स्तरावर लवकरात लवकर घेण्यात येईल." आता मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यापासून वंचित का ठेवण्यात येत आहे ? आज मच्छिमार पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. मासळीचा दुष्काळ असताना देखील शासन दुष्काळ नाही असे सांगत आहे. तेव्हा मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासन सहानुभूतीपूर्वक विचार करेल काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, माझी सन्माननीय सदस्यांना आपल्यामार्फत विनंती आहे की, त्यांनी हे प्रकरण पुनः तपासून पहावे. नुकसान भरपाई देण्यासंदर्भात ज्या पावत्या दाखविण्यात आल्या त्या बनावट आहेत. ज्या कंपनीच्या पावत्या देण्यात आल्या आहेत त्या कंपन्या बंद झालेल्या आहेत. बनावट पावत्यांवर अनुदान द्यायचे काय याबाबत आपणच मला मार्गदर्शन करावे. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर वाचून दाखविले. त्याबाबत सांगू इच्छितो की, राज्य सरकारची एक नियमावली आहे. त्या नियमावलीनुसार सरकार काम करीत असते. नियमावलीनुसार जे पात्र असतील त्यांना निश्चिपणे नुकसान भरपाई देण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी आणि श्री.परशुराम उपरकर यांनी कोकणात फयान वादळात झालेल्या नुकसानीबाबत मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा विषय येथे मांडला. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, मच्छिमारांनी बनावट पावत्या दिलेल्या आहेत आणि सन्माननीय सदस्यांनी त्याची तपासणी करावी. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, मच्छिमारांच्या प्रश्नासंदर्भात माननीय मंत्रिमहोदय कोकणात एक बैठक घेऊन सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी आणि सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांच्याशी चर्चा करतील काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

------ ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : संजय गांधी व श्रावण बाळ योजनेतील निराधार लाभार्थ्यांना अनुदान न मिळणे

मु. शी. : संजय गांधी व श्रावण बाळ योजनेतील निराधार लाभार्थ्यांना अनुदान न मिळणे याबाबत ॲड.उषा दराडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे(विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

केंद्र व राज्य शासनाच्यावतीने निराधारासाठी संजय गांधी व श्रावण बाळ योजनेसाठी निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे धनादेश केज तहसीलदार कार्यालयामार्फत माहे मे 2010 मध्ये नांदूरघाट येथील महाराष्ट्र बँकेत पाठवूनही बँक व्यवस्थापकाच्या आडमुठ्या धोरणामुळे लाभार्थ्यांना महिनो-महिने उशिराने अनुदान होणे, अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांना वेळेत मिळत नसल्याने लाभार्थ्यांत पसरलेला असंतोष व निराशेची भावना, याबाबत सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन निराधार लाभार्थ्यांना वेळेत अनुदान देणेबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने गणवेषांची विल्हेवाट लावण्याकरिता मागविलेल्या निविदा

मु. शी. : महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने गणवेषांची विल्हेवाट लावण्याकरिता मागविलेल्या निविदा याबाबत श्री. सुभाष चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री. सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांनी दिनांक 19 जुलै 2010 रोजी शाळेतील मुलामुर्लीचे गणवेष अंदाजे नग 7000 यांची विल्हेवाट लावण्याकरिता मोहरबंद निविदा मागविल्या आहेत. या गणवेषाची महामंडळाने निश्चित केलेली किंमत रुपये 2.15 लक्ष इतकी आहे. म्हणजेच एका नगाची अंदाजे किंमत रुपये 30-31 इतकी निश्चित करण्यात आली आहे.

एकीकडे शासनाच्या शाळेतील मुलांना वेळेवर व पुरेशा प्रमाणात गणवेष उपलब्ध होत नाहीत अथवा त्यांचा वेळेवर पुरवठा करण्यात येत नाही. हे गणवेष बनविण्यासाठी अंदाजे रुपये 100ते 150 रुपये खर्च केला जातो. नंतर हेच गणवेष नाममात्र किंमतीत विकले जातात. या सर्व प्रकारावर शासनाचे नियंत्रण असण्याची गरज आहे. यासाठी या सार्वजनिक दृष्टया महत्वाच्या बाबीकडे या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

पृ. शी. : एलफिन्स्टन महाविद्यालयातील प्राचार्याचा सुरु असलेला मनमानी कारभार

मु. शी. : एलफिन्स्टन महाविद्यालयातील प्राचार्याचा सुरु असलेला मनमानी कारभार याबाबत श्री. भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. भगवान साळुंखे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबई हे शासकीय वरिष्ठ महाविद्यालय असून राज्यातील मान्यवर महाविद्यालयांपैकी एक आहे. परंतु या महाविद्यालयाच्या प्राचार्या म्हणून सेवारत असलेल्या डॉ.प्रतिमा जाधव यांच्या मनमानी कारभारामुळे प्राध्यापक, शिक्षकेतर,विद्यार्थी व पालक इत्यादी सर्वजण त्रस्त झ ाले आहेत.

यानंतर श्री.गायकवाड.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे..

डॉ.प्रतिमा जाधव स्वत: वर्गावर जात नाहीत, सहकारी प्राध्यापकांशी अपमानकारक पध्दतीने वर्तन करतात. त्यांच्यावर शिक्षकेतर कर्मचा-यांकडून पाळत ठेवतात, भेटीसाठी आलेल्यांना तासन्तास ताटकळून ठेवतात, विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी प्राध्यापकांना सहकार्य करीत नाहीत तसेच त्या शासन निधीचा गैरवापर करतात, दबावतंत्राचा उपयोग करुन प्राध्यापकांना विद्यार्थ्यांचे गुण वाढविण्यासाठी सक्ती करतात, म्हणून प्राचार्या डॉ. जाधव यांच्या मनमानी कारभाराची सविस्तर चौकशीचे आदेश द्यावेत व त्यानुसार कारवाई करण्यात यावी. अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : देवगड,जि.सिंधुदुर्ग येथील समुद्रकिनाऱ्या जवळ आढळून आलेले जीवंत काडतुसे व द्रवरुप रसायन

मु.शी. : देवगड,जि. सिंधुदुर्ग येथील समुद्रकिना-याजवळ आढळून आलेली जीवंत काडतुसे व द्रवरुप रसायन याबाबत श्री.परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : यानंतर माननीय सदस्य श्री. परशुराम उपकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो :-

"सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड तालुक्यातील देवगड पासून सुमारे 15 किलोमिटर अंतरावरील फणसे गावच्या समुद्रकिनारी घातपात कारवायासाठी वापरण्यात येणारी जींवंत काडतुसे व द्रव स्वरुपातील रसायन दिनांक 21 जुलै 2010 रोजीच्या सुमारास स्थानिक ग्रामस्थांना व मच्छिमारांना सापडले आहे,दहशतवाद्यांची घातपाताची हालचाल सुरु असतांना कोकणामध्ये काडतुसे आणि द्रवरुप रसायन सापडले आहे. त्या ठिकाणी ज्या 12 गस्ती नौका दिलेल्या आहेत त्या गस्ती नौका समुद्रात फक्त उभ्या राहिल्या आहेत. या गस्ती नौकावर प्रशिक्षित कर्मचारी दिलेले नाहीत. त्यामुळे सर्व किनारपट्टीवर वस्ती नसलेल्या ठिकाणी काडतुसे , द्रवरुप रसायने व स्फोटके उतरण्याची शक्यता असून याठिकाणच्या मच्छिमारांना प्रशिक्षण देऊन समुद्रकिना-यावरील गस्ती नौकावर सागरी रक्षक म्हणून या प्रशिक्षित मच्छिमारांची नेमणूक करण्यात यावी यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. राज्यातील सुक्ष्म लघू व मध्यम उद्योगाच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना

मु.शी. : राज्यातील सुक्ष्म,लघू व मध्यम उद्योगाच्या विविध समस्या सोडविण्यासाठी शासनाने करावयाची उपाययोजना याबाबत श्री.मोहन जोशी,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो :-

जागतिक मंदीच्या लाटेत राज्यातील अनेक लहान मोठया उद्योगांच्या निर्यातीवर विपरित परिणाम झाला, यात स्वत: थेट निर्यात करणारे सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग आणि या उद्योगांना पूरक उद्योग म्हणून अवलंबून उद्योगातील कामगारांवर बेकारीची कु-हाड कोसळणे, कोईमतूर भिवंडी, मालेगाव येथील वस्त्रोद्योगाची परिस्थिती हालाखीची झाली ज्या मोठया निर्यातदारांना माल दिला त्यांनी ही उधारी थांबवली त्यामुळे बॅकांचे हप्ते थकले व बुडीत खाती वाढू लागली त्यामुळे असे अनेक सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग मरणासन्न अवस्थेत असणे, महागाई, पगारवाढीचे दडपण आणि मंदीमुळे काम नाही अशा तिहेरी कात्रीत उद्योग सापडले आहे. देशाच्या विकासामध्ये महत्वपूर्ण योगदान देऊनही लघु व मध्यम उद्योगांना आजही बाजारपेठेतील सुविधा आणि निर्यात सवलती मिळण्यासाठी अनेक अडचणींना सामना करावा लागतो या उद्योगांना कर्जपुरवठा वा निधी उपलब्ध करुन देण्यात बॅकांही हात आखडता घेतात त्यामुळे या उद्योगाला मोठी भरारी घेता येत नाही लाखो लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणा-या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना शासनाने पुढाकार घेऊन या क्षेत्रातील अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही या सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. राज्याचे क्रीडा धोरण ठरविणे

मु.शी. राज्याचे क्रीडा धोरण ठरविण्याबाबत श्री.हेमंत टकले,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : यानंतर माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो :-

सभापती महोदय, राज्याच्या प्रत्येक जिल्हयासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी नेमण्यात आलेले आहेत.प्रत्येक जिल्हयाचे क्षेत्रफळ व आकारमान वेगळे असल्यामुळे जिल्हा निहाय आढावा घेऊन जेथे आवश्यक असेल अशा जिल्हयात अतिरिक्त क्रीडा अधिकारी हे पद निर्माण करणे आवश्यक आहे.तसेच प्रत्येक जिल्हयात विशिष्ट देशी आणि विदेशी खेळांचा अग्रक्रम ठरविणे आवश्यक आहे महसूल विभाग पातळीवर, राज्यपातळीवर क्रीडा धोरण राबविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता व राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडापटू जाण्यासाठी विशेष प्रोत्साहन योजना सुरु करण्याबाबत शासनाने घालावयाचे लक्ष व करावयाची कार्यवाही.या सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे याविशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईंट ऑफ प्रोप्रायटीबाबत

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पॉईंट ऑफ प्रोप्रायटीच्या माध्यमातून शासनाकडून माहिती अपेक्षित करीत आहे. राज्यामध्ये मुस्लीम लोकांना ओबीसी या जातीचे प्रमाणपत्र दिले जाते. ते देतांना त्यामध्ये अशी अट घालण्यात येते की, हे प्रमाणपत्र 3 वर्षासाठी व्हॅलीड राहिल. आता शासनाकडून नवीन जी.आर. काढण्यात आला आहे. पहिली गोष्ट अशी की, मुस्लीम धर्मामध्ये जात नाही. जामे मस्जिदचे प्रमुख मौलाना असतात ते प्रमाणपत्र देतात. प्रत्येक सीसी मध्ये मुस्लीम असे लिहिले जाते, परंतु तो कुरेशी आहे की, खाटीक आहे, की सुतार, लोहार आहे, इत्यादी पोटजातीचे प्रमाणपत्र एस.डी.ओ. देतात. आता खासकरुन चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूरमध्ये 300 मुलांचा शुक्रवारी मोर्चा निघाला. त्यावेळी एस.डी.ओ.यांनी सर्वांना प्रमाणपत्र नाकारले आहे. त्याचे पत्र माझ्याजवळ आहे. त्यांचे ओ.बी.सी.चे प्रमाणपत्र फक्त तीन वर्षासाठी व्हॅलिड ठरविले जाते. एखादा मुलगा जर एम.बी.बी.एस. ला असेल तर त्याला पाच वर्षे लागतात, त्या विद्यार्थ्याने तीन वर्षानंतर पुन्हा प्रमाणपत्र घेण्यासाठी जावे काय? सभापती महोदय, दि. 1 जानेवारी 2010 च्या या शासन निर्णयामध्ये असे म्हटले आहे की, "जाती प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपध्दतीबाबत शासनाने निर्गमित केलेले, शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, व क्रीडा विभाग क्रमांक : सीबीसी-1096/प्र.क्र.48/मावक-5, दि. 3 जून, 1996 आणि दि. 1 नोव्हेंबर, 2001 मधील परिशिष्ट - "अ" च्या क्र. 9 येथील नमूद सूचनेनुसार, "मुस्लिम समाजातील मागासवर्गीय व्यक्तींना जातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशिष्ठ अशा जाती संघटनेने दिलेले प्रमाणपत्र सादर करण्याबाबत आग्रह धरण्यात येऊ नये. ज्या जाती/समाजाची संघटना सोसायटी ॲक्ट किंवा सार्वजनिक न्यास अधिनियमांतर्गत नोंदणीकृत झालेली आहे, त्या समाजाच्या/जातीच्या संघटनेकडून सादर केलेले प्रमाणपत्र हे जातीच्या प्रमाणपत्रासाठी सादर करावयाच्या अनेक पुराव्यांपैकी एक पुरावा म्हणून ग्राहय धरण्यात यावे, तसेच इतर पुरावे शासन निर्णय दिनांक 01 नोव्हेंबर, 2001 नुसार आवश्यक आहे, असे सर्व संबंधित प्राधिकाऱ्यांस कळविण्यात येत आहे"
यह विषय बहुत गंभीर है. हमारे मुस्लिम आमदार कम संख्या में हैं.

उप सभापति :आप कागजात मेरे पास भेज दीजिए.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : जाति का प्रमाण पत्र केवल तीन साल के लिए व्हॅलिड रहेगा, ऐसा प्रमाण पत्र पर लिखा है. यह गलत है. पहली बात तो यह है कि ओ.बी.सी. का प्रमाण पत्र नहीं मिलता है और मिलता है तो उस पर "तीन साल के लिए व्हॅलिड " लिख कर मिलता है. अतएव मेरी विनती है कि इस ओर तत्काल ध्यान दिया जाए.एक तर जातीचे प्रमाणपत्र देत नाहीत आणि ते दिले तर तीन वर्षाचे देतात. यामध्ये मंत्रिमहोदयांनी लक्ष घालावे अशी मी विनंती करतो.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन यांनी प्रॉपर डिव्हाईस वापरुन हा प्रश्न उपस्थित केला असता तर त्याला चांगल्या प्रकारे न्याय मिळाला असता. परंतु हा अत्यंत गंभीर स्वरुपाचा प्रश्न आहे. माझ्याकडे काही विद्यार्थी असे विशिष्ट जातीचे प्रमाणपत्र घेऊन आले. त्यांना ते प्रमाणपत्र दिल्यानंतर त्याच्या खाली एक वाक्य आहे "This Certificate is valid for 3 years." मी आपली क्षमा मागून सांगतो की, त्यांचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. त्यासाठी त्यांनी डिव्हाईसचा वापर केला असता तर त्यांना न्याय मिळाला असता. एकदा प्रमाणपत्र दिल्यानंतर ते तीन वर्षासाठी व्हॅलिड राहील अशी पध्दत नाही. त्यामुळे या विषयाला न्याय मिळाला पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

श्री.नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. ..

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कोणत्याही प्रमाणपत्रावर तीन वर्षाची मुदत घातली जात नाही. Once a Certificate is issued, it is permanent.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, ही एक गंभीर बाब आहे. माननीय सदस्यांनी तीन वर्षाचा उल्लेख केला आहे त्याबाबतची माहिती घेण्यात येईल. हा विषय सामाजिक न्याय विभागशी संबंधित आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांच्या दालनामध्ये याकरिता लवकरात लवकर एक बैठक बोलाविण्यात येईल. त्या बैठकीला सन्माननीय सदस्यांनाही निमंत्रित करण्यात येईल. आणि त्यावेळी योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

उपसभापती : जातीचे दाखले देण्यासंदर्भात या सभागृहामध्ये बऱ्याच वेळा चर्चा झाली आहे. सामाजिक न्याय विभागाचे संबंधित अधिकारी व्यवहार केल्याशिवाय दाखले देत नाहीत. यामध्ये घालण्यात आलेली अट अत्यंत गैरलागू आहे. एकदा माणसाची जात डिक्लेअर झाल्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

ती मरेपर्यंत त्याच्याबरोबर असते. त्यामुळे तीन वर्षाची अट काढून टाकण्यासंदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे वक्तव्य केले आहे त्याच्याशी मी देखील सहमत आहे. या संदर्भात मंत्रिमहोदयांनी तातडीने लक्ष घालून मंगळवारी निवेदन करावे.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, होय.

श्री सय्यद ज़मा : जिस अधिकारी ने यह "तीन साल " वाली बात लिखी है, उनके खिलाफ कार्रवाई भी होनी चाहिए.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

उपसभापती : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज शुक्रवार,दिनांक 23 जुलै,2010 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करतांना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया घ्यानात घ्यावे.

विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

उपसभापती : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील :-

(1) उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एच-3, एच-5, एच-6, एच-7, एच-8, एच-9

(2) वैद्यकीय शिक्षण,फलोत्पादन व पर्यटन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक एस-1, एस-4

(3) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक जी-5, ओ-7, ओ-8 ओ-9, ओ-10, ओ-13, ओ-14, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19,ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30 ओ-31,ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43,ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

(4) आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक टी-5, टी-6

(5) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक डब्ल्यू-2,डब्ल्यू-3, डब्ल्यू-4

(6) वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास, औकाफ व माजी सैनिकांचे कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक व्ही-2, व्ही-5, झेड-ई-1

(7) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पर्यावरण, राजशिष्टाचार आणि क्रीडा व युवक कल्याण (अतिरिक्त कार्यभार) मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक आर-1,

(8) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक डी-4, डी-5

आता सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी चर्चेला सुरुवाती करतील.

...3..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2010-3022 च्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर चर्चेला आलेल्या आहेत. सर्वप्रथम मी या पुरवणी मागण्यांचे समर्थन करतो. साधारणत: 10 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सभागृहामध्ये मांडलेल्या आहेत.त्यापैकी मी दोन-चार बाबींवर सभागृहाचे लक्ष वेधणार आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 78 पान क्रमांक 65 वर मी बोलू इच्छितो. या राज्यातील मार्ग व पूल यांचे परीक्षण व दुरुस्ती यांवरील खर्च भागविण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे तसेच मार्ग व पूल यांच्या दुरुस्तीसाठी राज्य क्षेत्राला रुपये 225 कोटी 91 लाख रुपये इतके आणि जिल्हा परिषदांना रुपये 75 काटी रुपये इतके अतिरिक्त अनुदान देण्याचे ठरविण्यात आले आहे. सभापती महोदय, गेली दोन-चार वर्षे मी या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करीत आहे. देवगड तालुक्यातील मीठमुंबरी आणि कुणकेश्वर येथील पूल कित्येक वर्षे रेंगाळलेला आहे. या भागातील जनता गेल्या वीस-पंचवीस वर्षापासून या पुलाची मागणी करीत आहे. परंतु दुर्दैवाने या पुलाबाबत अजून शासनाकडून हिरवा कंदिल दिला गेला नाही. सभापती महोदय, माझ्या माहिती प्रमाणे या पुलाच्या कामासाठी सतरा ते साडे सतरा कोटी रुपये लागणार आहेत. या पुलाच्या बाबतीत आम्हाला सातत्याने सांगण्यात येते की, या पुलाचे काम सीआरएफकडे दिलेले आहे. त्यांनी त्याला मान्यता दिली आहे पण अजून त्याला सॅक्शंन मिळालेले नाही त्यामुळे त्या पुलाचे काम रेंगाळलेले आहे.

सभापती महोदय, मी सातत्याने मून-वानिवडे-टेंबवली या पुलाची देखील सातत्याने मागणी करीत आहे. हा पूल सुध्दा देवगड तालुक्यातील आहे. या पुलाचा सर्व्हे झालेला असून अर्थसंकल्पामध्ये या पुलासाठी अंशत: तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु भरीव तरतूद न केल्यामुळे या दोन्ही पुलाचे बांधकाम रेंगाळलेले आहे. माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, त्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात या दोन्ही पुलांची सद्य:स्थिती सांगावी. आणि यावेळी शक्य होणार नसेल तर पुढच्या हिवाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये या दोन्ही पुलांसाठी तरतूद करण्यात यावी.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

सभापती महोदय, यानंतर मला नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 266 वरील बाब क्रमांक 182 बाबत बोलावयाचे आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या डीपीडीसीचा 2010-2011 चा प्लॅन 95 कोटी 62 लाख रुपयांचा झालेला आहे. त्यासाठी 66 कोटी 81 लाख 37 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आणि यावेळी पुन्हा 28 कोटी 80 लाख 63 हजार रुपयांची ॲडिशनल तरतूद केलेली आहे. डीपीडीसीच्या संदर्भात राज्याचे जे धोरण आहे त्यामध्ये पूर्वी डीपीडीसीच्या माध्यमातून जिल्हा स्तरावर अल्प कामे घेतली जात होती परंतु आता बजेटमधील जी कामे आहेत ती कामे बजेटमध्ये येण्याऐवजी त्या कामांसाठी डीपीडीसीच्या माध्यमातून तरतूद केली जाते. डीपीडीसीच्या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासाच्या संदर्भात भरीव कामे केली जातात.. शासनाने या जिल्ह्याला वाढीव निधी दिला त्याबद्दल मी या निमित्ताने शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, यानंतर मला सांस्कृतिक कार्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 390 वरील बाब क्रमांक 273 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण जयंती महोत्सवासाठी 9 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मला एक गोष्ट या ठिकाणी खेदाने नमूद करावीशी वाटते. सकाळी या ठिकाणी औचित्याच्या मुद्याव्दारे काही प्रश्न उपस्थित झाले. राज्याला 50 वर्षे पूर्ण होत असताना विधान भवनामध्ये एक सामूहिक कार्यक्रम घेतला आणि या राज्याचा जो 50 वर्षाचा सुवर्णकाळ आहे त्याबाबतचा कार्यक्रम त्या ठिकाणी पूर्ण केला असे जे चित्र दुर्दैवाने निर्माण करीत आहोत ते बरोबर नाही. कारण हा कार्यक्रम पूर्ण वर्षभर व्हावयास पाहिजे. निरनिराळ्या भागांमध्ये, मग विदर्भ असेल, मराठवाडा असेल त्या ठिकाणी जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर कार्यक्रम व्हावयास पाहिजेत. 106 हुतात्म्यांच्या बलिदानातून हा महाराष्ट्र आपल्याला मिळाला. गर्वाची बाब आहे की, या संयुक्त महाराष्ट्रासाठी 106 लोक हुतात्मे झाले. याबाबत आम्हाला जितकी जवळीक आणि प्रामाणिकता वाटते तेवढी चिंता विदर्भातील माणसाच्या मनामध्ये नाही. त्यांना असे वाटते की, या संपूर्ण 50 वर्षामध्ये त्यांच्याकडे जेवढे लक्ष द्यावयास पाहिजे होते तेवढे देऊ शकलो नाही आणि त्यामुळे काही प्रमाणात अनुशेष आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामध्ये सिंचनाचा अनुशेष असेल, आरोग्याचा अनुशेष असेल, शिक्षणाचा अनुशेष असेल. परंतु या 50 वर्षामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

महाराष्ट्राने भरीव काम केले आहे. विदर्भाच्या विकासासाठी मग नागपूर जिल्हा असेल किंवा इतर जिल्हे असतील त्या ठिकाणी आपण तुलनात्मक अभ्यास केला तर शेजारी छत्तीसगड किंवा मध्यप्रदेशमधील जे जिल्हे आहेत त्या जिल्ह्यांच्या मानाने महाराष्ट्रात विदर्भातील जिल्ह्यांमध्ये चांगल्या प्रकारचा विकास झालेला आहे, हे नाकारता येणार नाही. या राज्याचा सुवर्णमहोत्सव साजरा करीत असताना वर्षभर कार्यक्रम करावयास पाहिजे होते. आमच्याकडे काहीही कार्यक्रम केलेले नाहीत. सकाळी आपण युवा धोरणाबाबत चर्चा केली. आपल्याकडे क्रीडा धोरण आहे. पण या सुवर्ण महोत्सवाच्या कार्यक्रमाच्या बाबतीत काहीही धोरण नाही. वेळ आली की ती निभाऊन न्यावयाची आणि नंतर आम्ही पुरोगामी आहोत अशा गमजा मारत असतो आणि देशामध्ये आम्ही कोणत्या क्रमांकावर आहोत याची तुलना करण्यामध्ये आपली शक्ती खर्च करीत असतो. या संपूर्ण 50 वर्षामध्ये महाराष्ट्राने जे काम केले त्याचा प्रचार वर्षभर करावयास पाहिजे होता. या ठिकाणी आपण 9 कोटी रुपयांची जी तरतूद केली आहे ती अपुरी आहे. आजही वेळ गेलेली नाही. आपण या कार्यक्रमाचे नियोजन करावे. या राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने कार्यक्रम करावेत.

यानंतर श्री. भोगले ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

सांस्कृतिक कार्यक्रम करावेत आणि महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे, प्रगतीशील राज्य आहे हे या राज्यातील जनतेच्या निदर्शनास येऊ द्या.

सभापती महोदय, बाब क्रमांक २७४, पृष्ठ क्रमांक ३९१ वर नाट्य परिषदेला अर्थसहाय्य देण्यासाठी २५ लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे नाट्य परिषदेला २५ लाखाऐवजी ५० लाख रुपये देण्यात आले आहेत.....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये सांस्कृतिक विभागाचा समावेश नाही. दिनांक २० जुलै, २०१० रोजी पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली त्या दिवशी सांस्कृतिक कार्य व पर्यटन विभागाच्या मागण्या चर्चेला आलेल्या होत्या. त्यावेळी नाट्यपरिषद, राज्याचा सुवर्ण महोत्सव या विषयावर आम्ही विचार मांडले होते व सन्माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनी उत्तर दिले होते एवढेच मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये सांस्कृतिक विभागाच्या मागण्या चर्चेला नसल्या तरी मी उपस्थित केलेल्या मुद्याची शासनाने नोंद घ्यावी एवढीच माझी विनंती आहे.

सभापती महोदय, नाट्य परिषदेच्या वतीने माहीम येथे यशवंत नाट्य संकुल उभारण्यात आले. त्याचा इतिहास पाहिला तर संपूर्ण बांधकाम चुकीच्या पध्दतीने करण्यात आले आहे. अवैध बांधकाम झालेले आहे. पहिले अध्यक्ष जाऊन दुसरे अध्यक्ष आले. त्यांनी राजीनामा दिल्यानंतर नाट्य परिषदेच्या उपाध्यक्षांची हंगामी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आलेली आहे. सध्याचे हंगामी अध्यक्ष या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे आहेत. याठिकाणी पुरवणी मागणीद्वारे नाट्य परिषदेला २५ लाख रुपये देण्यासाठी तरतूद केलेली असली तरी माझ्या माहितीप्रमाणे नाट्य परिषदेला ५० लाख रुपये देण्यात आले आहेत. त्यांच्याकडून कोणते कार्यक्रम आखण्यात आले? ५० लाख रुपये दिले ते कोणत्या बाबीवर खर्च केले याची चौकशी करणार आहात का? अमेरिकेतील न्यूजर्सी येथे नाट्य परिषदेचे संमेलन झाले. त्या संमेलनाला कोण गेले, कोणाला निमंत्रित केले नाही याबद्दल वादंग सुरु आहे. याला नेले नाही, त्याला नेले नाही, घरगड्याला निमंत्रण दिले आणि त्याला न्यूजर्सीला घेऊन गेले. ५० लाख रुपये शासनाच्या वतीने देण्यात आले. आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे प्रमुख श्री.म्हैसकर यांनी ५४ लाख रुपये नाट्य परिषदेला आर्थिक सहाय्य दिले आहे. एकूण १.०४ कोटी रुपये नाट्य परिषदेला उपलब्ध झाले. एकूण ३०

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.परशुराम उपरकर)

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

लोकांना न्यूजर्सी येथे नाट्य संमेलनसाठी नेण्यात आले. अनेक निमंत्रितांपैकी कोणाला पासपोर्ट, व्हिसा मिळाला नाही. त्यामुळे पासपोर्ट, व्हिसा मिळविण्याकरिता कलकत्ता, चेन्नई, दिल्लीला जावे लागले. दिल्ली येथे पासपोर्ट व व्हिसा आणण्यासाठी तेथे जाण्यायेण्याचा, निवासाचा, विमान प्रवासाचा खर्च नाट्य परिषदेने केला. इतके करुनही नाट्य परिषदेला ६४ लाख रुपये देणे बाकी आहे. नाट्य संस्कृती वाढली पाहिजे, नाट्य चळवळ वाढली पाहिजे म्हणून शासनाकडून योगदान दिले जाते.....

नंतर ३बी.१....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

त्यामध्ये अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे पहायला मिळते आणि आजचे अध्यक्ष सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना मात्र या 64 लाखाचा हिशेब मिटवावा लागणार आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, शासनाने यामध्ये लक्ष घालावे आणि याप्रकरणाची संपूर्ण चौकशी करावी. अशा प्रकारे शासनाच्या निधीचा अपव्यय होत असेल तर कडक भूमिका सुध्दा शासनाला घ्यावी लागणार आहे. तशाच प्रकारचे मराठी साहित्य संमेलन दुबई येथे सुध्दा झाले होते. त्यात कोण ते पाटील वर्षानुवर्षे प्रसिडेंट आहेत. ते ठरवतील तेथे जायचे, ते ठरवतील तसेच करायचे. आणि दुबईस्थित श्री. दातार म्हणून एक मसालेवाला आहे तो म्हणाला की मी हा सर्व खर्च करतो हे काय चालविले हेच मला समजत नाही. हे मराठी साहित्य संमेलन कधी अमेरिकेतील न्यू जर्सी शहरात भरविले जाते तर उद्या लंडनमध्ये जायचे असे म्हणतील, परवा आस्ट्रेलियाला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. 10 हजाराचे कॉन्ट्रीब्युशन काढायला कोणीही तयार नाही पण शासनाच्या पैशातून अशा प्रकारे खर्च करण्यासाठी सर्वच पुढे येतात. इकडे आमदारांना मात्र सीपीएच्या माध्यमातून परदेशात जायचे म्हटले तर 1/3 रक्कम अगोदर जमा करावी लागते नंतर शासनाकडून 2/3 रक्कम मिळते पण या मराठी साहित्य संमेलनाची वरात उठली की चालली फॉरेनला, हे सर्व थांबले पाहिजे.

महोदय, पर्यटन विभागाच्या बाब क्र. 283, पृ.क्र.393 च्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील हरिहरेश्वर क्षेत्राचा पर्यटन म्हणून विकास करण्यासाठी 19 कोटीची तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. मुंबई येथील छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या वास्तूवर छत्रपतींचे शिल्प दर्शनीय भागावर ठेवण्यासाठी 3.88 कोटीची गरज आहे. सन 2004 मध्ये राष्ट्रवादी व काँग्रेस पक्षाने जाहिरनाम्यात म्हटल्याप्रमाणे हे काम करावयाचे आहे. ज्याप्रमाणे अमेरिकेत लिबर्टीचा स्टॅच्यू उभा केला आहे त्याच आधारावर समुद्रात छत्रपती शिवाजींच्या नावाने स्मारक उभे करण्यात येईल असे जाहिरनाम्यात सांगितल्यानुसार तो प्रयत्न शासन करीत आहे. त्याचा आराखडा तयार आहे तसेच माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात त्याचा झालेला होता.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पात यासंदर्भात काहीही तरतूद केलेली नाही. हा अत्यंत महत्वाचा विषय असल्याने अर्थमंत्र्यांनी यामध्ये लक्ष घालावे अशी विनंती करतो. मरीन लाईन येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक होण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 284, पृष्ठ क्रमांक 397,मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला प्रतिपूर्ती करण्यासाठी रुपये 14,97,19,000/- शासनाने मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने वितरित केलेली दिनांक 31 मार्च, 2007 पर्यंत थकीत असलेली कर्जे व्याजासह माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला, माफ केलेल्या कर्जाच्या रकमेची प्रतिपूर्ती करण्यासाठी तरतूद केलेली आहे. ही जी तरतूद केलेली आहे ती फार चांगली आहे. गरीब महामंडळांना मदत करण्याची शासनाने जी भूमिका घेतलेली आहे ती फार चांगली आहे. या ठिकाणी आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्रमांक 50, पृष्ठ क्रमांक 36, पशुसंवर्धन विभागावर मी विचार व्यक्त करणार आहे. रायगड जिल्हा परिषदेत पशुसंवर्धन पदाच्या संदर्भात भरती प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. परंतु या पदासाठी जे उमेदवार सिलेक्ट झालेले आहेत त्यांना ऑर्डर दिली जात नाही. काही वजन ठेवल्या शिवाय जिल्हा परिषदेचे सीईओ ऑर्डर काढत नाहीत अशी चर्चा आहे त्यामुळे रायगड जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धनाच्या संदर्भातील पदांच्या आर्डर्स लवकरात लवकर काढण्यात याव्यात अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 336, पृष्ठ क्रमांक 365, वस्त्रोद्योग विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. या राज्यातील जवळ जवळ 100 सूत गिरण्या अर्धवट अवस्थेत सुरु आहेत. या सूत गिरण्यांना राज्य सहकरी बँकानी 400 कोटी रुपयांचे कर्ज दिलेले असून यासंदर्भात शासनाने हमी दिलेली आहे. एवढे पैसे मिळूनही या सूत गिरण्या सुरु होत नाही. सूत गिरण्यांना ज्या कारणासाठी पैसे उपलब्ध करुन दिले त्याचा योग्य विनियोग व्हावा यासाठी शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे या सूत गिरण्या कशा सुरु होतील याकडे शासनाने लक्ष द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 213, पृष्ठ क्रमांक 344, आरोग्य विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. आमच्या रायगड जिल्हयातील जिल्हा रुग्णालयांना सुरक्षेची आवश्यकता आहे. आमच्या जिल्हा रुग्णालयात 10-20 तरुण जातात व गोंधळ करतात. आत मध्ये जे पेंशट असतात त्यांना त्याचा त्रास होतो. डॉक्टर तसेच पेंशटला आज या ठिकाणी सुरक्षेची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

ते तरुण ICU मध्ये देखील जातात. त्यामुळे सुरक्षिततेची हमी आपण दिली पाहिजे. म्हणूनच यासाठी तरतूद केली पाहिजे अशी मी मागणी करतो. तसेच महाड-पोलादपूर ग्रामीण रूग्णालयासाठी बांधकामाची तरतूद केल्याचे कुठेही दिसत नाही.

यानंतर मी बाब क्रमांक 54, पान क्रमांक 38 वर बोलणार आहे. मुंबईत जवळ जवळ 500 ते 600 ट्रॉलर्स आमच्या तालुक्यातील येतात. रायगड जिल्ह्यातील जवळ जवळ 2 हजार ट्रॉलर्स ससून डॉकमध्ये मासे घेऊन येतात. हे मासे नवी मुंबईमध्ये प्रोसेसिंग करण्यासाठी पाठविले जातात. आमच्या येथे छोटे-छोटे स्पॉट आहेत. रेवस, घोटी येथे जर शासनाने छोटी जेट्टी बांधली तर मुंबईमध्ये येण्याची आवश्यता नाही. येथे छोटी जेट्टी बांधली तर सुरळीत व्यवस्था होऊ शकते. त्यामुळे जेट्टीचे बांधकाम करावे अशी मी विनंती करीत आहे.

आता मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 95, पान क्रमांक 85 वर बोलणार आहे. अलिबाग तहसील कार्यालयासाठी नवीन इमारत बांधणे आवश्यक आहे. सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या काळात बांधलेल्या इमारतीमध्ये आजचे कार्यालय आहे. त्यामुळे तहसीलदार कार्यालयासाठी नवीन इमारत बांधावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

यानंतर मी नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 145, पान क्रमांक 298 वर बोलणार आहे. गेल्या अर्थसंकल्पामध्ये माझे मित्र माननीय अर्थ मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी घोषणा केली की, सरखेल कान्होजी आंग्रे स्मारकाभोवती ध्वनी आणि प्रकाश योजना करण्यात येईल. माझी ही मागणी मान्य करीत आहे, असे मला माननीय अर्थ मंत्र्यांनी फोन करून सांगितले होते. परंतु त्यासाठी कोणतीही तरतूद या पूरक मागण्यांमध्ये मला दिसत नाही. त्यामुळे ध्वनी व प्रकाश योजनेसाठी शासनाने तरतूद करावी अशी मी मागणी करीत आहे.

मी अल्पसंख्यांक विभागाच्या बाब क्रमांक 284, पान क्रमांक 397 वर आपले लक्ष वेधणार आहे. अलिबाग मुरुड मधील उर्दू शाळेच्या इमारतीची दुरूस्ती करण्यासाठी तरतूद करण्याची मागणी मी करीत आहे. या शाळेच्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी मी दहा लाख रूपये दिले आहेत. या शाळेत उर्दू बरोबर इंग्रजी हा देखील विषय शिकविला जातो. तेव्हा या शाळेसाठी इमारत दुरूस्तीसाठी निधी द्यावा अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.78, पान क्र.65 कडे आपले लक्ष वेधणार आहे. अलिबाग-मुरुड रस्ता दुरूस्तीच्या कामासाठी तरतूद आहे. .....(अडथळा)..... कोकणामध्ये ज्या पद्धतीने पाऊस पडतो त्या प्रमाणात रस्त्यांच्या दुरूस्तीसाठी तरतूद शासन करीत नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

कोकणातील भौगोलिक परिस्थिती पाहता त्याठिकाणचे नॉर्म्स बदलण्याची आवश्यकता आहे असा उल्लेख मी सभागृहात वारंवार केलेला आहे. आज अलिबाग वरुन मुंबईस पोहोचण्यास साडेचार तास लागतात इतके मोठ्या प्रमाणावर रस्त्यांवर खड्डे आहेत. तेव्हा रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी भरीव वाढीव मदत करण्यात यावी अशी विनंती करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 216 पृष्ठ क्रमांक 345- प्रशासकीय खर्चाकरिता आणि यंत्रसामुग्री खरेदी करण्याकरिता तरतूद करण्यासाठी मागणी केलेली आहे. मी या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष एका गोष्टीकडे वेधू इच्छितो. आज मुंबईत डायलेसिस करुन घेण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. डायलेसिस करण्याचे मशीन फक्त जे.जे.रुग्णालयामध्ये आहे आणि त्याठिकाणी तीन शिफ्टमध्ये काम केले जाते. त्याठिकाणी दिवसाला साधारणत: 20 रुग्णांचे डायलेसिस केले जाते. सेंट जॉर्ज रुग्णालय व जी.टी.रुग्णालय येथे डायलेसिसकरिता आलेले रुग्ण देखील जे.जे.रुग्णालयात पाठविले जातात. तेव्हा माझी मागणी आहे की, सेंट जॉर्ज रुग्णालय आणि जी.टी.रुग्णालयात डायलेसिसची मशीन बसविण्यात यावे जेणेकरुन रुग्णांची गैरसोय होणार नाही.

मी या निमित्ताने एक गोष्ट सांगतो की, मी एका खाजगी रुग्णालयात डीजीटल एक्से-रे मशीन पाहिले. मी ही बाब माननीय मंत्रिमहोदयांच्या नजरेस आणून दिली. त्या मशीनची किंमत 80 लाख रुपये होती. माननीय मंत्रिमहोदयांनी त्या संदर्भात चौकशी करुन तशाप्रकारचे डीजीटल एक्स-रे मशीन शासकीय रुग्णालयात बसविले आहे, त्या मशीनचा फायदा सर्वांना होत आहे. तेव्हा सर्व शासकीय रुग्णालयामध्ये डीजीटल एक्स-रे मशीन बसविण्यात यावे अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 227, पृष्ठ क्रमांक 357 - अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याकरिता तरतूद करणे यासाठी मागणी करण्यात आली आहे. याठिकाणी आदिवासी विभागाचे मंत्री उपस्थित नाहीत. मी याठिकाणी एक अतिशय गंभीर मुद्दा उपस्थित करीत आहे. मी काल ई.टी.व्हीवर एक कार्यक्रम पाहिला. काँग्रेसच्या वतीने जनसंपर्क अभियान सुरु केलेले असून या जनसंपर्क अभियानामध्ये सामाजिक न्याय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे उपस्थित होते. त्यांच्यासमोर जवळपास 60-70 पालक उभे होते. इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अनुदान देत नाही म्हणून त्या माध्यमातील मुलांना अनुदान मिळत नाही असे ते पालकांना सांगत होते. सर्व पालक त्यांच्या अंगावर येताना दिसत होते. आपण एकीकडे इंग्रजी माध्यमांच्या शाळांना अनुदान देत नाही असे सांगत आहात तर दुसरीकडे अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याकरिता तरतूद करीत आहोत असे सांगत आहात. तेव्हा नेमके खरे काय आहे हे जाणून घेण्याची आमची इच्छा आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ...

पिडीत आणि शोषित वर्गातील विद्यार्थी जर इंग्रजी माध्यमातील शाळेत शिक्षण घेत असतील तर एका ठिकाणी जो न्याय दिला जातो तोच न्याय दुस-या ठिकाणी का दिला जात नाही ? हा मुद्दा मी या चर्चेच्या निमित्ताने उपस्थित करीत आहे. काल ही बातमी मोठया प्रमाणावर हायलाईट झाली होती. सर्व शिक्षक आणि विद्यार्थी माननीय मंत्रीमहोदयांना आणि शासनाला शिवीगाळ करीत आहेत असे दृश्य टी.व्ही.वर बघावयास मिळाले. या पूरक मागणीच्या निमित्ताने अशी मागणी करण्यात आली आहे की, इंग्रजी माध्यमातील निवासी शाळेत शिक्षण घेणाऱ्यासाठी अनुदान देण्यात आलेले आहे. तेव्हा हे अनुदान सर्व विद्यार्थ्यांना देण्यात यावे, अशी मी या निमित्ताने मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) सभापती महोदय, 2010-2011 च्या पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सर्व प्रथम मला कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास विभागाची बाब क्रमांक 50 पान नंबर 36 संबंधी बोलावयाचे आहे. मुबईच्या जवळ ठाणे जिल्हयात 50 टक्के भाग आदिवासी बहूल आहे. या क्षेत्रात पशुवैद्यकीय दवाख्ाने मोठया प्रमाणावर आहेत परंतु त्या ठिकाणी पशुवैद्यकीय अधिकारी मात्र हजर नसतात. त्यामुळे तेथील लोकांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत असते. मागच्या वर्षी शहापूर तालुक्यात 500जनावरे साथीच्या रोगामुळे दगावली होती परंतु ही जनावरे मृत झाल्याचे सर्टिफिकेट देण्यास सुध्दा पशुवैद्यकीय अधिकारी हजर नव्हते. त्यामुळे कायम स्वरुपी हजर राहणारे अधिकारी त्या ठिकाणी नेमण्यात आले पाहिजेत. आज असे होते की, एक किंवा दोन दिवस पशुवैद्यकीय अधिकारी त्या दवाखान्यात हजर राहतात आणि बाकीचे दिवस मुंबईला जातात. तेव्हा कायम स्वरुपी तेथे राहणारे वैद्यकीय अधिकारी नेमण्यात आले पाहिजेत. तसेच त्या ठिकाणी नेमणूक करण्यात आल्यानंतरसुध्दा जे अधिकारी त्या ठिकाणी राहत नाहीत त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आली पाहिजे, अशी मी या निमित्ताने सूचना करतो.

सभापती महोदय, दापचरी प्रकल्पाच्या संदर्भात नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा झाली होती. दापचरी प्रकल्पाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी जे आश्वासान दिलेले आहे, ते निश्चितपणे पूर्ण् होईल, अशी मी अपेक्षा करतो.

सभापती महोदय, यानंतर नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 174 पान नंबर 254 सबंधी मला बोलावयाचे आहे. प्रत्येक आमदाराला स्थानिक विकास निधी देण्यात आलेला आहे. हा निधी कोणत्या कामासाठी द्यावयाचा यासंबधी त्या आमदाराला स्वेच्छाधिकार आहे. या संदर्भात जे काही नियम ठरवून देण्यात आलेले आहेत, त्या नियमात बसणा-या कामासाठी लोकप्रतिनिधी निधी मंजूर करीत असतात. मागच्या वर्षी मी ठाणे जिल्हयातील 16 संगणक पुरविण्यासाठी नियोजन विभागाला पत्र पाठविले होते. परतुं अजूनही त्या शाळेला संगणक पुरविले गेले नाहीत. नियोजन विभागाला ज्यावेळी आम्ही पत्र पाठवितो त्यावेळी त्या पत्राची प्रत सबंधित शाळेला पाठवत असतो . त्यामुळे संबंधित शाळा आपल्याला संगणक कधी मिळेल, याची वाट पहात असते. आता संगणक पुरविण्यासाठी शिक्षणाधिका-यांची सुध्दा एन.ओ.सी. घेण्यात यावी, अशी पध्दत ठाणे जिल्हयात सुरु

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आलेली आहे. मात्र इतर जिल्हयात अशी पध्दत नाही. नियोजन विभागाच्या नियमामध्ये जर ही बाब बसत असेल तर पुन्हा शिक्षणाधिका-यांनी एन.ओ.सी. कशासाठी हवी आहे? ही प्रकरणे शिक्षणाधिका-यांकडे गेल्यानंतर त्यांच्याकडून या प्रकरणांना एन.ओ.सी. दिली जाते व त्यानंतर ठराविक एजन्सीला संगणक पुरविण्याची ऑर्डर दिली जाते. त्यानंतर संगणक त्या शाळेला पुरविले जातात. या पध्दतीमुळे शाळांना संगणक पोहोचण्यास विलंब होतो व त्यातून काही अडचणी निर्माण होतात. शिक्षणाधिकारीसुध्दा अशी एनओसी देण्यासाठी पैसे मागतात, असा इतर सन्माननीय सदस्यांना अनुभव आलेला आहे. या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, हा निधी कोणत्या कामासाठी द्यावयाचा आहे, यासाठी आम्हाला स्वेच्छाधिकार दिलेला आहे व त्यासाठी नियमावली तयार करण्यात आली आहे. त्या अंतर्गतच आम्ही त्या कामासाठी निधी देत असतो. असे असताना पुन्हा शिक्षणाधिका-यांची एन.ओ.सी.कशासाठी मागत आहात, त्यासाठी ही नवीन पध्दत कशासाठी सुरु करण्यात येत आहे? शिक्षणाधिका-यांची जी नवीन खिडकी सुरु करण्यात आलेली आहे ती प्रथम बंद करण्यात यावी. सर्वच जिल्हयामध्ये ही खिडकी सुरु करण्यात आलेली नाही. माझा मतदारसंघ चार जिल्हयात आहे. परंतु रायगड जिल्हयामध्ये शिक्षणाधिका-याची एन.ओ.सी मागितली जात नाही. फक्त ठाणे जिल्हयातच ती मागितली जाते. त्यामुळे प्रत्येक जिल्हयासाठी वेगवेगळे नियम नियोजन विभागाले लावले आहेत काय, हे मला माहीत नाही. या चर्चेच्या निमित्ताने मला माननीय मंत्रीमहोदयांना अशी सूचना करावयाची आहे की, त्यांनी या विषयामध्ये तातडीने लक्ष घालावे. आमदार निधीचा उपयोग जनतेसाठी झाला पाहिजे. जनतेला वेळेवर वस्तू पोहोचल्या पाहिजेत. अनेक दुर्गम भागामध्ये ज्या अनुदानित शाळा आहेत, त्यांना संगणक पुरविणे गरजेचे आहेत. परंतु त्यांना जर वर्षभर संगणक पोहोचले नाही तर ते पुन्हा आम्हाला पत्र लिहितात व आम्हाला विचारतात की, नियोजन विभागाला पत्र पाठविण्यात आलेले असले तरी अजूनही आम्हाला संगणक का पोहोचले नाहीत ? तेव्हा या सबंधी नियोजन विभागाने त्या त्या जिल्हयाच्या संबधित अधिका-यांना स्पष्ट सूचना द्याव्यात , अशी मी सूचना करतो.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत पत्र / मुद्रितशोधनाची नाही

श्री.संजय केळकर...

सभापती महोदय, काही तालुका न्यायालयांची अनेक प्रकारे दुरवस्था झाली आहे. शासनाच्या माध्यमातून या न्यायालयांना निधी दिला जात नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे या तालुका न्यायालयाच्या ठिकाणी जी वकील मंडळी रहातात, उदा. एकेका तालुक्यात 200 ते 300 वकील मंडळी प्रॅक्टिस करतात. माननीय मंत्री श्री. जयंत पाटील हे अर्थमंत्री असतांना मी त्यांना एक पत्र दिले होते. आणि त्यांना सांगितले होते की, या वकिलांना बसायला खुर्च्या, टेबल नाहीत, अशिलांना बसायला खुर्च्या टेबल नाहीत. त्यामुळे त्यांची फार मोठी अडचण होते. तेव्हा आमदार निधीमधून खुर्च्या, टेबल घेण्यासाठी विशेष बाब म्हणून आपण परवानगी द्यावी अशी विनंती केली होती. माझ्या पत्रावर माननीय श्री. जयंत पाटील यांनी विशेष बाब म्हणून परवानगी देण्यास हरकत नाही अशाप्रकारचा शेरा मारला होता. परंतु त्यानंतर नियोजन विभागाकडून आलेल्या पत्रानुसार माझी सूचना नामंजूर करण्यात आली होती. एका बाजूला शासन देण्यास तयार नाही आणि दुसऱ्या बाजूला माझ्या आमदार निधीमधून खुर्च्या, टेबल, कपाट घेण्यास आम्ही तयार असल्यास शासनाने तातडीने त्याला मंजूरी द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात अनेक बोलण्यासारख्या बाबी आहेत. त्यामुळे मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. बाब क्र. 219 व पृष्ठ क्र. 346 मध्ये कुष्ठ रोग नियंत्रण पथके व रुग्णालयाकरिता तरतूद केली आहे. ज्या भागात कुष्ठ रोग्यांचे प्रमाण अधिक आहे त्याठिकाणी कुष्ठ रोग तंत्रज्ञ गेला पाहिजे. त्यांची बैठक मुंबईला घेऊन चालणार नाही. थ्री स्टार हॉटेलमध्ये बैठक घेऊन चालणार नाही. कुष्ठ रोग्यांच्या वसाहतीमध्ये जाऊन त्यांच्यामध्ये जागृती आणावयाची असेल तर त्या त्या विभागामध्ये जाऊन आपण काम केले पाहिजे परंतु त्यापध्दतीने काम होत नाही. तेव्हा कुष्ठ रोग्यांच्या वसाहतीमध्ये जाण्यासाठी आपण निदेश द्यावेत. मध्यंतरी आरोग्यमंत्री माननीय श्री. शेट्टी साहेब विक्रमगडच्या ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन करण्यासाठी आले होते. मध्यंतरी मी कर्जतला उप जिल्हा रुग्णालयामध्ये गेलो होतो. त्याठिकाणी अनेक प्रकारच्या इरेग्युलॅरिटीज मला पहावयास मिळाल्या. मी म्हणालो की, हे रुग्णालय बंद झाले आहे काय? याठिकाणी पेशंट नाही, कर्मचारी सकाळी येऊन सह्या करुन गेले. मी एक मस्टर पाहिले असता त्यामध्ये डॉक्टर्सनी पुढील आठवडयातील सह्या अगोदरच केलेल्या होत्या. त्या मस्टरची झेरॉक्स काढून मी आणलेली आहे. त्या हॉस्पिटलमधील खाटा रिकाम्या होत्या, पेशंट नव्हते, जेमतेम डॉक्टर हजर होते. त्यावेळी मी उपरोधाने म्हटले आहे की, या उप जिल्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS

श्री.संजय केळकर...

रुग्णालयाची पाटी आपण काढून टाका आणि त्याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राची पाटी लावा. आपण या रुग्णालयांना ग्रामीण जिल्हा रुग्णालयांचा दर्जा दिला, परंतु त्यामध्ये सुधारणा दिसत नाही. माननीय मंत्री ज्यावेळी त्याठिकाणी आले होते, त्यावेळी त्यांनी जे उद्‌गार काढले होते. त्याचे जागो जागी स्वागत करण्यात आले. तेथील लोकांना उद्देशून माननीय श्री. शेट्टी साहेबांनी सूचना केल्या होत्या. त्या हॉस्पिटलच्या खिडक्यांचे पडदे, हॉस्पिटलची रंगरंगोटी, हॉस्पिटलमधील खाटा, टेबल-खुर्च्या यांच्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी सूचना दिल्या. तेव्हा आपण जर लाल दिव्याच्या गाडीमधून न जाता एखाद्या खाजगी गाडीमधून अचानकपणे गेलात तर ग्रामीण रुग्णालयांची काय अवस्था आहे हे आपल्या लक्षात येईल. आपण प्रत्येक वेळी नियोजन करतो व त्याप्रमाणे कडक वागण्याचा प्रयत्न करतो.परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी होत नाही. मंत्रिमहोदयांनी त्यावेळी केलेल्या भाषणामध्ये ऑनलाईन औषधांचा साठा तपासू असे सांगितले. त्यावेळी मला क्षणभर हसू आले. त्यावेळी मी माझ्या शेजारच्या मित्राला म्हणालो की, हे मुंगेरीलालचे स्वप्न आम्हाला दाखवीत आहेत.

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

विक्रमगडला 12-12 तास लोड शेडिंग आहे. त्या ठिकाणी ऑन लाईनवर साठा कसा तपासणार? सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, ठाणे जिल्हयातील औषधाचा साठा संपलेला आहे अशी माझी मागच्या आठवडयातील माहिती आहे. सेंट्रल पर्चेसिंगची कल्पना आहे त्यामुळे औषधांचा पुरवठा होण्यास एक ते दोन महिन्याची दिरंगाई होणार आहे. सभापती महोदय, पावसाळयामध्ये ग्रामीण भागात मलेरिया, गॅस्ट्रो सारख्या अनेक प्रकरच्या साथी सुरु आहेत. त्या ठिकाणी सर्पदंशाचे प्रकार फार मोठया प्रमाणावर घडतात. त्यामुळे त्याठिकाणी औषधाचा साठा उपलब्ध आहे की नाही हे तपासून पाहिले पाहिजे. यासंबंधात शासनाने लक्ष द्यावे अशा प्रकारची माझी सूचना आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 227 पान क्रमांक 357 वर मी बोलू इच्छितो. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरु करण्याची कल्पना आहे. हे स्वागतार्ह आहे. हे विद्यार्थी देखील पुढे आले पाहिजेत. शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या बरोबरीने त्यांच्या खांद्याला खांदा लावून ते पुढे गेले पाहिजेत. त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळा सुरु झाल्या पाहिजेत, यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, या ठिकाणी खेदाने म्हणावेसे वाटते की, एका बाजूला नवीन योजना राबविण्याचा प्रयत्न करण्यात येतो पण दुसऱ्या बाजूला सध्या सुरु असलेल्या मराठी माध्यमांच्या आश्रमशाळांची दूरवस्था आहे. यासंदर्भात अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून आणि इतर अनेक आयुधांच्या माध्यमातून या आश्रमशाळांची दूरवस्था आपल्या निदर्शनास आलेली आहे. त्यामुळे यासाठी तरतूद करण्यात आलेला निधी योग्य पध्दतीने खर्च होतो की नाही हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. आश्रमशाळांमधील शौचालये, बाथरुम,वर्ग खोल्या यांची दूरवस्था आहे. या विषयावर बोलावयाचे असेल तर अर्धा-तास देखील पुरणार नाही. माननीय आदिवासी विकास मंत्री सांगतात की, या साठी निधीची कमतरता नाही पण सार्वजनिक बांधकाम विभाग बांधकाम करीत नाही त्यामुळे ही दुरवस्था निर्माण होते. त्यामुळे याबाबतीत कुठे तरी नियोजन करावयास पाहिजे. हा या राज्यातील लोकांचा पैसा आहे. त्याचा विनियोग योग्य पध्दतीने व्हावयास पाहिजे. तसेच त्याचे योग्य पध्दतीने ऑडिट देखील झाले पाहिजे. कारण हा निधी त्या आदिवासी विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नसेल तर त्याचा काही उपयोग होणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची बाब क्रमांक 258 पान क्रमांक 377 वर मी बोलू इच्छितो. सभापती महोदय, मोखाडा हा ठाणे जिल्हयातील सर्वात दुर्गम असा भाग आहे. या मोखाडयामधील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये या भागातील विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण मिळाले पाहिजे यासाठी याठिकाणी संगणकाचा ट्रेड सुरु करण्यात आला. परंतु तो ट्रेड आता बंद करण्यात आलेला आहे. याबाबतीत तेथील विद्यार्थ्यांच्या सहीचे एक पत्र माझ्याकडे आहे, मी ते माननीय मंत्रिमहोदयांना देतो. त्या ठिकाणचा संगणक ट्रेड तातडीने सुरु होण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील शेकडो विद्यार्थ्यांना या ट्रेडचा फायदा होणार होता पंरतु संगणकाचे प्रशिक्षण देण्यासाठी त्या ठिकाणी शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे तो ट्रेड बंद करण्यात आला आहे. खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यामध्ये शासन कमी पडत आहे. म्हणून संगणक प्रशिक्षणाचा बंद करण्यात आलेला ट्रेड त्वरित सुरु करण्यात यावा. त्या ठिकाणी शिक्षकाची नेमणूक करण्यात यावी अशा प्रकारची सूचना मी या ठिकाणी करतो.

सभापती महोदय, मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, निरनिराळया संस्थाना अनुदान देण्यात येते. ठाणे जिल्हयात कल्याण गायन समाज नावाची 75 वर्षाची जुनी संस्था आहे. या संसथेच्या माध्यमातून केवळ दिग्गज अशा गायकांचे कार्यक्रम आयोजित केले जातात एवढेच नाही तर त्यांची स्वतंत्र इमारत असून शेकडो विद्यार्थी त्या ठिकाणी ट्रेनिंग घेत आहेत. या संस्थेला अनुदान दिले तर या संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल. सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने मी केलेल्या सूचना संबंधित खात्यांनी स्वीकाराव्यात अशी मी विनंती करतो. कारण ती त्या त्या ठिकाणच्या लोकांची गरज आहे. एवढे बोलून मी माझे पुरवणी मागण्यांवरील भाषण संपवितो. धन्यवाद.

--x--

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, मैं सन् 2010-11 की पूरक मांगणी के ऊपर अपने विचार प्रकट करने के लिए खड़ा हुआ हूँ. पेज क्रमांक 10 से 16 पर बाब क्रमांक 12 से 27 गृह मंत्रालय से संबंधित हैं. महाराष्ट्र शासन के गृह विभाग ने पिछले कुछ सालों में अच्छे कदम उठाए हैं और उससे पुलिस फोर्स का मनोबल बढ़ा है. सन् 2008 में मुंबई पर हुए आतंकवादी हमले के बाद शासन द्वारा उठाए गए उपायों की वजह से मुंबई और महाराष्ट्र के अन्य क्षेत्र की जनता में सेन्स ऑफ सिक्योरिटी बढ़ी है. इसके लिए मैं महाराष्ट्र शासन और विशेषकर गृह मंत्रालय का अभिनन्दन करता हूँ. लेकिन मेरे 3 सुझाव हैं. मेरा पहला सुझाव यह है कि पुलिस फोर्स के वेतन, सुविधाएं और मकान की व्यवस्था करने के लिए अधिक फंड की व्यवस्था करनी चाहिए.

श्री. राजन तेली : सभापति महोदय, गृह विभाग की पूरक मांगों के ऊपर चर्चा हो चुकी है. आज यह विभाग चर्चा के लिए नहीं है.

श्री. सय्यद जमा : ठीक है. मुझे अन्य विभागों के बारे में भी बोलना है. अल्पसंख्यक विकास विभाग की पूरक मांगणी पेज क्रमांक 397 पर बाब क्रमांक 284 के अन्तर्गत दी गई है. इसके द्वारा लगभग 15 करोड़ रुपए का कर्ज माफ किया गया है. यह शासन द्वारा उठाया गया एक अच्छा कदम है. लेकिन अल्पसंख्यक विकास विभाग के पास स्टाफ की कमी है, अधिकारी नहीं है. इस विभाग को बने हुए कई साल हो गए, फिर भी इस विभाग के लिए फंड बहुत कम है. मैं पिछले 2-3 साल से महाराष्ट्र शासन के वित्त विभाग और नियोजन विभाग से इस बात के लिए कोशिश कर रहा हूँ कि माननीय प्रधानमंत्री के 15 सूत्रीय कार्यक्रम के अनुसार जिस समय बजट बनाया जाता है तो हर विभाग में अल्पसंख्यकों के लिए 15 प्रतिशत तरतूद मायनोरिटीज और मायनोरिटीज डोमीनेटेड क्षेत्र के लिए होनी चाहिए. लेकिन इस प्रकार की तरतूद अर्थसंकल्प में नहीं की गई है.

सभापति महोदय, कुछ दिन पहले महाराष्ट्र के माननीय मुख्यमंत्री ने नागपुर अधिवेशन में विदर्भ के लिए 10 हजार करोड़ रुपए का पॅकेज एनाउन्स किया था और कहा कि इसको 3 वर्ष में लागू किया जाएगा. लेकिन बड़े खेद की बात है कि 10 हजार करोड़ रुपए में से अल्पसंख्यक विकास विभाग के लिए एक पैसे का भी प्रावधान नहीं है. इस बारे में वित्त और नियोजन विभाग

. . . 3I-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

से मालूम हुआ कि संबंधित विभाग ने कोई प्रस्ताव बनाकर नहीं भेजा है. मेरा शासन से अुनरोध है कि इस बारे में प्रस्ताव बनाकर शासन को अल्पसंख्यकों के लिए पैसे का प्रावधान करना चाहिए. यह मांग मैं पूरक मांगणी के माध्यम से करता हूँ. अल्पसंख्यक विकास विभाग के अन्दर विभागवार बजट का उल्लेख होना चाहिए. केन्द्र शासन की कुछ योजनाएं हैं, जिसमें यह शर्त है कि 15 प्रतिशत रकम अल्पसंख्यकों या अल्पसंख्यक क्षेत्र में होनी चाहिए, लेकिन बजट में यह बात न आने की वजह से अल्पसंख्यकों के लिए कुछ विशेष नहीं हो पा रहा है. इस बात के लिए मैं महाराष्ट्र शासन और विशेष रुप से वित्त मंत्री और नियोजन मंत्री का ध्यान आकर्षित करना चाहता हूँ कि अगले बजट में वे इस बात का ख्याल रखें.

सभापति महोदय, वक्फ बोर्ड की हालत ठीक नहीं है. वक्फ बोर्ड के लिए पैसे का प्रावधान नहीं किया गया है, उनके पास स्टाफ नहीं है. उनकी जो थोड़ी बहुत आमदनी होती है, उससे उनका काम चलता है. इसलिए महाराष्ट्र सरकार को इस बारे में ख्याल रखना चाहिए. इसी तरह से महाराष्ट्र के मॉयनोरिटी कमीशन के पास बहुत ज्यादा साधन नहीं हैं. पिछले दिनों जो कुछ जातिवादी झगड़े हुए, उसके लिए नेशनल कमीशन ऑफ मॉयनोरिटी ने महाराष्ट्र शासन को बहुत सारे सुझाव और गाइड-लाइन्स दी हैं. ये बहुत स्पेसिफिक सिफारिशें हैं और इन सिफारिशों को लागू करना चाहिए, इन पर अमल करना चाहिए और उसके अनुसार कार्रवाई होनी चाहिए. ऐसा मेरा सुझाव है.

सभापति महोदय, अन्त में मैं महाराष्ट्र में चल रहे मदरसों के बारे में कहना चाहता हूँ कि मदरसों और उनमें कार्य करने वाले लोगों को बदनाम किया जाता है. ऐसा कहा जाता है कि वहां पर धर्म की गलत शिक्षा दी जाती है. लेकिन मैं सभागृह से और सरकार से कहना चाहता हूँ कि महाराष्ट्र में शायद ही कोई ऐसा मदरसा होगा, जिसमें धर्म की गलत शिक्षा दी जाती हो. महाराष्ट्र के मदरसों में धर्म की सही शिक्षा दी जाती है, स्कूली शिक्षा दी जाती है. वहां पर बेसिक एज्यूकेशन के साथ साथ इस्लाम की शिक्षा भी दी जाती है. कई राज्यों में मदरसे का पूरा खर्चा सरकार की तरफ से किया जाता है, वहां पर काम करने वाले लोगों और शिक्षकों के वेतन की जबाबदारी सरकार की होती है. मेरा महाराष्ट्र शासन से अनुरोध है कि मदरसों में पढ़ाने वाले लोगों और शिक्षकों की जबाबदारी सरकार को लेनी चाहिए ताकि वहां पर पढ़ाने वाले लोगों की हालत सुधर सके.

. . . 3I-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा

सभापति महोदय, ओरिएन्टल मेडीकल सर्विस में यूनानी पद्धति का महत्वपूर्ण योगदान है. यूनानी चिकित्सा पध्दति को राष्ट्रीय स्तर पर मान्यता मिली है. लेकिन महाराष्ट्र राज्य में जो संस्थाएं यूनानी चिकित्सा पध्दति (BUMS) की शिक्षा प्रदान करते हैं, उन्हें सरकार की तरफ से कोई अनुदान नहीं मिलता है, कोई सुविधा नहीं मिलती है. इसलिए मैं इतना ही कहना चाहता हूं कि अगर अल्पसंख्यकों का विकास करना होगा तो इन बातों पर भी ध्यान देना होगा. धन्यवाद.

****

. . . भाषण पूर्ण. नंतर श्रीमती दराडे

यांचे मराठी भाषण, श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०१०-२०११ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक २१३, पृष्ठ क्रमांक ३४४ वर आरोग्य विभागाची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. मागील सहा महिन्यांपासून आरोग्य विभागाकडून औषध खरेदी करण्यात आलेली नाही. दवाखान्यांमध्ये औषधांचा तुटवडा निर्माण झाला आहे. महाराष्ट्र शासनाने ताबडतोब औषध खरेदी करावी. बीड जिल्हयामध्ये एकही कार्डियाक ॲम्ब्युलन्स उपलब्ध नाही. त्यामुळे सिव्हील हॉस्पिटल, बीड येथे तातडीने कार्डियाक ॲम्ब्युलन्स उपलब्ध करुन द्यावी अशी मी शासनाला विनंती करते. साधोळा, शिरसाळा आणि पोहनेर येथे प्रा.आ.केंद्रांच्या इमारतीचे बांधकाम होण्याची आवश्यकता आहे. पोहनेर येथील प्रा.आ.केंद्राच्या बांधकामासाठी जागा संपादन करण्याचा प्रश्न चार वर्षापासून प्रलंबित आहे. त्यादृष्टीने शासन पावले उचलत नाही. या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, बाब क्रमांक ७९, पृष्ठ क्रमांक ६६ गोमळवळा येथे सिंदफणा नदीवर पूल बांधण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यादृष्टीने सा.बां.विभागाने त्वरेने निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक २२, पृष्ठ क्रमांक ३५२ स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल कॉलेज, आंबेजोगाई येथे अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे तातडीने भरण्यात यावीत. मागील आठवड्यात दै.नवाकाळ या वृत्तपत्रातील अग्रलेख वाचनात आला. जे.जे.रुग्णालयातील कारभारासंबंधी तो अग्रलेख लिहिण्यात आला होता. आजच्या दै.सामना या वृत्तपत्रात जे.जे.रुग्णालय कारभार किती चांगल्या पध्दतीने काम करीत आहे याचा लेख प्रसिध्द झाला आहे. दै.लोकसत्ता या वृत्तपत्रात सन्माननीय गृहमंत्री यांच्याबद्दल "आबा हे काय चालले आहे" या शीर्षाखाली लेख प्रसिध्द झाला होता. त्या लेखामध्ये जे.जे.रुग्णालयाचे डीन पद्मश्री तात्या लहाने यांना कसा त्रास दिला जातो याचा उल्लेख होता. दै.नवाकाळ, दै.सामना आणि दै.लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेखावरुन स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी चांगल्या पध्दतीने काम करीत असताना राजकीय कार्यकर्त्यांकडून कशा पध्दतीने त्यांना अडचणीत आणले जाते याबाबत महाराष्ट्र शासनाने दखल घेणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने ताबडतोबीने पावले उचलणे गरजेचे आहे.

नंतर ३के.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

महोदय, बाब क्र. 74, पृ.क्र. 33 कृषीशी संबंधित हा विषय आहे. तो परवा सभागृहात होऊन गेला पण वित्त विभागाचा विषय आज सभागृहात असल्याने मी हा मुद्दा उपस्थित करीत आहे. एकीकडे आपण पाण्याची बचत करण्यासाठी जाहिरात व प्रचार मोहीमेवर लाखो रुपये खर्च करतो. दुसरीकडक मात्र ठिबक सिंचन पध्दतीसाठी शेतकऱ्यांना देय असलेले अनुदान वेळेवर मिळत नाही. कंपन्यांनी ही रक्कम बिलातून घेतली असली तरी प्रत्येकाचे सुमारे 400 कोटीच्या आसपास रक्कम अडकून पडलेली आहे. यासंदर्भात दि. 9 जुलै, 2010 रोजी वर्तमानपत्रातून लेख प्रसिध्द झाला होता. त्याबाबत उचित कार्यवाही करावी.

महोदय, बाब क्र. 49, पृ.क्र. 36-पशुसंवर्धन विभागाच्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, वडवणी येथील पशु वैद्यकीय दवाखाना मोडकळीस आलेला आहे. या तालुक्यात एकूण पशुधन 58826 एवढे असून शस्त्रक्रिया गृहाची सोय नाही तर अनेक ठिकाणी ड्रेसरची पदे भरलेली नाहीत. 36 ग्रामपंचायतींना 6 दवाखाने आहेत. त्यानंतर गेवराई तालुक्यात एकूण 21 पशुवैद्यकीय दवाखाने असून 13 दवाखान्यांना वीजपुरवठा नाही, फ्रीज नाही, ड्रेसिंगची व्यवस्था नाही. तसेच पत्र्याच्या शेडमध्ये दवाखाना भरविला जातो. त्याला दरवाजे व खिडक्या सुध्दा नाहीत. सहाय्यक पशुधन विकास अधिकाऱ्यासह दोन पदे या तालुक्यात रिक्त असून अनेक इमारती मोडकळीत आल्या आहेत. तसेच तालखेड येथील पशु चिकित्सालयामध्ये 8 वर्षांपासून वीज पुरवठा नाही, ड्रेसरच्या जागा रिक्त आहेत. शिरुर तालुक्यातील मानूर, पिंपळनेर चिकित्सालयाला इमारत नाही, पिंपळनेर ग्रामपंचायतीमध्ये पशु वैद्यकीय दवाखाना भरविला जातो तर मानूर येथील दवाखाना समाज मंदिरात भरविला जातो. तालुका मोठा असून दवाखान्यांची संख्या कमी आहे. पिण्याच्या पाण्याची सोय देखील नाही. आष्टी तालुक्यात आष्टीचा दवाखाना पाच वर्षापूर्वी बांधलेला असताना तो खचला तसेच दरवाजे मोडकळीस आले आहेत. चार दवाखान्यांमध्ये पशुधन विकास अधिकाऱ्याच्या जागा रिक्त आहेत. या तालुक्यात श्रेणी-1 चे 14 दवाखाने असून श्रेणी-2 चे 21 दवाखाने आहेत. या तालुक्यात फऱ्या, घटसर्प व खुरकून सारखे आजार जनावरांना होतात त्यासाठी लसीकरणाची शिबीरे घेण्याची गरज आहे. माजलगांव तालुक्यातील पशु चिकित्सालयाची इमारत निजाम काळातील असल्याने ती मोडकळीस आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

पशुधन विकास अधिकाऱ्याची दोन पदे या तालुक्यात रिक्त आहेत. तसेच या तालुक्यात एकूण 1 लाख 7 हजार 686 जनावरे असतानाही पशुधन पर्यवेक्षकाचे एक पद रिक्त आहे. किही आडगांव, निमुड, तालखेड या ठिकाणी शस्त्रक्रिया गृह नाही. अंबेजोगाई तालुक्यात एकूण 19 दवाखाने असून त्यात श्रेणी-1 चे 3 आणि श्रेणी-2 चे 16 दवाखाने समाविष्ट आहेत. अनेक दवाखान्यांच्या इमारती मोडकळीस आल्या असून जागाही रिक्त आहेत, फीजची व्यवस्था बहुसंख्य दवाखान्यात नाही. त्यानंतर कडा येथील पशुचिकित्सालय स्मशान भूमीत चालविले जात आहे. डोइठाणचा दवाखाना शाळेच्या खोलीत चालतो तर वेलतुरीच्या दवाखान्याच्या इमारतीमध्ये शेतकरी राहतात. बीडमध्ये जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन कार्यालयातील उपायुक्तांची जागा दोन वर्षांपासून रिक्त असून तो चार्ज पशुधन विकास अधिकाऱ्याकडे दिलेला आहे. तसेच या कार्यालयात वाहनचालक, वरिष्ठ लिपीक आणि कार्यालय अधीक्षकांची पदे रिक्त आहेत, त्याचबरोबर जिल्ह्यातील पशु चिकित्सालयांमध्ये अनेक पदे रिक्त आहेत, ती भरण्याबाबतची कार्यवाही व्हावी. यानंतर परळी येथील पशुचा दवाखाना सारडगांवचे डॉक्टर चालावितात. हा दवाखाना उड्डाण पुलाखाली चालविण्यात येत असून त्यात परळीसह चाळीस गावातील जनावरे तपासली जातात. कारण या दवाखान्याची इमारत मोडकळीस आलेली आहे. या तालुक्यातील एकूण पशुधन 1 लाख 20 हजार एवढे असूनही अनेक पदे रिक्त आहेत तसेच दवाखान्याला संरक्षक भिंत सुध्दा नाही. अशी अवस्था बीड जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांची आहे. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी यासंदर्भात एक विशेष बैठक आयोजित करावी व हे प्रश्न निकाली काढावेत. एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या संदर्भात बाब क्रमांक 225, पृष्ठ क्रमांक 356 वर विचार व्यक्त करणार आहे. आदिवासी क्षेत्रातील शालेय शिक्षण विभागाने ज्या शाळांना मान्यता दिलेली आहे व ज्या शाळा मूल्यांकनानुसार अनुदानास पात्र ठरलेल्या आहेत अशा 47 शाळांना अनुदान देण्याच्या संदर्भात या ठिकाणी तरतूद केलेली आहे. बिगर आदिवासी क्षेत्रात किंवा आदिवासी क्षेत्रात वाढीव तुकड्यांना किंवा शाळांना मान्यता देण्याचे काम त्या शाळांच्या किंवा तुकड्यांच्या निकषानुसार मूल्यांकन करण्याचे काम हे शालेय शिक्षण विभागाकडून केले जात असते. तुकडयांसाठी किंवा शाळांसाठी मग त्या शाळा आदिवासी क्षेत्रातील असतील तर त्यांना अनुदान देण्याचे काम आदिवासी विभागाकडून केले जाते. शालेय शिक्षण विभागाकडून मूल्यांकन करुन ज्या शाळा किंवा तुकड्या अनुदानास पात्र ठरविलेल्या आहेत या 47 शाळा व्यतिरिक्त अनेक शाळा आणि अनेक तुकडया अशा आहेत की, ज्या निकषानुसार अनुदानास पात्र आहेत परंतु अद्यापही या शाळांना आणि तुकडयांना आदिवासी विभागाने अनुदान दिलेले नाही. म्हणून अनुदान देण्याच्या संदर्भात आदिवासी विभागाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. एक वर्षापूर्वी काही आदिवासी क्षेत्रातील वर्ग तुकडयांना शालेय शिक्षण विभागाने अनुदानास पात्र ठरविले होते, आदिवासी विभागाने त्यासाठी अनुदानही सुरु केले. दोन महिने अनुदान दिल्यानंतर गेल्या 14 महिन्यापासून या शाळांना अनुदान सुरु होऊनही आदिवासी विभागाने तरतूद न केल्यामुळे या शाळांना आणि तुकडयांना शासनाकडून अद्यापही अनुदान मिळालेले नाही. या संदर्भात आदिवासी विभागाने दखल घेण्याची आवश्यकता आहे.

आदिवासी क्षेत्रातील शाळांसाठी किंवा अन्य काही कामासाठी जर त्या ठिकाणच्या आदिवासींची संख्या 50 टक्के असेल तरच त्यांना आदिवासी क्षेत्राच्या निधीची लाभ मिळतो परंतु कालच्या चर्चेवरुन असा मुद्दा समोर आला की, केंद्रशासनाच्या ज्या योजना आहेत त्यांना केंद्रशासनाच्या निकषानुसार 40 टक्के आदिवासींची संख्या असेल तर आदिवासी क्षेत्राच्या निधीचा लाभ मिळू शकतो त्यामुळे आदिवासी शाळांसाठी किंवा तुकडयांसाठी लाभ देतांना 50 टक्के विद्यार्थ्यांची जी अट घातली आहे ती अट रद्द करुन 40 टक्के विद्यार्थी असले तरी आदिवासी क्षेत्रातील शाळांसाठी, तुकडयांसाठी अनुदान देण्याच्या संदर्भात शासन विचार करणार आहे काय ? यासंदर्भातही शासनाकडून उत्तर येण्याची आवश्यकता आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

सभापती महोदय, बाब क्रमांक 254, पृष्ट क्रमांक 267, तंत्र शिक्षण विभागावर विचार मांडणार आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने आकृतीबंध जाहीर केलेला आहे. या नवीन आकृतीबंधानुसार तंत्रशिक्षण विभागातील प्लस टू स्तरावरील, असतील किंवा बायफोकल कोर्सेसच्या व तंत्र माध्यमिकच्या शाळेतील कर्मचा-यांच्या आढावा घेतला होता. या आढाव्यामध्ये त्यांनी अनेक पदे रद्द केलेले आहेत. अनेक कर्मचा-यांना अतिरिक्त ठरविलेले आहे. सर्वात महत्वाची बाब अशी आहे की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आमच्या अनेक कर्मचा-यांना पदांच्या आढाव्यामध्ये ही पदे कमी होत असल्यामुळे वरच्या पदावर किंवा उच्च श्रेणीमध्ये काम करणा-या कर्मचा-यांना, खालच्या पदावर, निम्नश्रेणीवर आणण्याचे आदेश काढले आहे. जो कर्मचारी प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून काम करतो त्याला शिपायाच्या पदावर, खालच्या वेतनश्रेणीवर आणण्याचे आदेश काढलेले आहेत. आठ दिवसापूर्वी सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी यासंदर्भातील आदेशाला तूर्त स्थगिती दिलेली आहे आणि तातडीने यासंदर्भात चर्चा करावी अशा प्रकारचे आदेश देऊनही संबंधित विभागातील अधिका-यांनी मंत्रीमहोदयाच्या स्थगितीकडे दुर्लक्ष केलेले आहे. या सर्व कर्मचा-यांचे नवीन आढाव्या नुसार अन्य संस्थांमध्ये समावेशन करणे, पदानवत करणे, खालच्या वेतनश्रेणीवर समायोजित करण्याचे काम विभागाकडून सुरु आहे त्यामुळे यासंदर्भात तातडीने निर्णय होण्याची आवश्यकता आहे. कर्मचा-यांना पदानवत न करण्याची तसेच कर्मचा-यांची वेतनश्रेणी न बदलण्याची कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात वाढीव विद्यार्थ्यांची मान्यता देण्यात आलेली नाही.

अनेक महाविद्यालयामध्ये प्रवेशाचा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. अद्यापही शासनाने नवीन महाविद्यालयांना किंवा तुकडयांना परवानगी दिलेली नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

यासंबंधी कोणताही निर्णय जाहीर केलेला नाही. जी महाविद्यालये सुरू आहेत त्यांना विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची अडचण निर्माण झाली आहे. या महाविद्यालयांनी 10 ते 15 जागा वाढवून देण्याची मागणी केली आहे. पण त्यांच्या विनंतीचा विचार विद्यापीठ आणि शासन करीत नाही. तेव्हा या महाविद्यालयांना वाढीव जागांची मान्यता देण्यासंबंधी कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे अशी मी विनंती करीत आहे.

यानंतर मी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाब क्र.214, पान क्र.344 वर बोलणार आहे. राज्यातील शासकीय सामान्य रूग्णालये यामध्ये कंत्राटी तत्त्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. या निमित्ताने मी एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो. अंध व अपंग व्यक्तींसाठी अपंगत्त्वाचा दाखला, प्रमाणपत्र जिल्ह्याच्या सिव्हील सर्जनकडून दिले जाते. ठाणे जिल्ह्याचा विस्तार फार मोठा आहे. 100 ते 125 कि.मी.अंतरावरून अंध-अपंग व्यक्ती सिव्हील सर्जनकडे अपंगत्त्वाचा दाखला घेण्यासाठी येतात. पण त्यांना त्याच दिवशी दाखला देण्याऐवजी आठवड्यातील कोणत्याही एका दिवशी सिव्हील सर्जनच्या सोयी नुसार दाखला देण्याचे काम केले जाते. तेव्हा माझी विनंती आहे की, अंध-अपंग व्यक्ती ज्या दिवशी दाखला घेण्यासाठी येतील त्याच दिवशी तातडीने त्यांना दाखला देण्याचे काम शासनाने केले पाहिजे.

सभापती महोदय, आता मी आपले लक्ष उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागण्यांवर वेधणार आहे. शालेय शिक्षण विभाग व अन्य विभागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये शासनाने वाढ केली आहे. परंतु, शासकीय तंत्रनिकेतन मध्ये CHB वर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. अशासकीय संस्थांमधील शिक्षक असा त्यांचा उल्लेख असल्यामुळे शासकीय तंत्रनिकेतनमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांना वाढीव मानधनाचा लाभ होत नाही. तेव्हा शासकीय तंत्र निकेतनमध्ये CHB वर काम करणाऱ्या शिक्षकांना सुद्धा वाढीव मानधन देण्याचा शासनाने विचार करावा अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

यानंतर मी आदिवासी विभागाच्या बाब क्र.227, पान क्र.357 वर बोलणार आहे. अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी रूपये 12.50 कोटीची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांना अधिक प्रोत्साहन देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे काय ? यासंबंधी देखील येथे खुलासा होणे आवश्यक आहे. इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण घेण्याकरिता, त्यांचा खर्च भागविण्याकरिता ही तरतूद केली आहे. येथे नामांकित इंग्रजी माध्यमाची शाळा असा शब्द वापरण्यात आला आहे. त्यामुळे नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळा कोणत्या आहेत, कोणत्या विद्यार्थ्यांना तेथे प्रवेश दिला जाणार आहे, किती विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे यासंबंधातील देखील येथे माहिती देणे आवश्यक आहे. तसेच, इंग्रजी माध्यमाच्या ज्या नामांकित शाळा निवडल्या आहेत, त्यांची यादी शासनाने द्यावी अशी मी विनंती करतो आणि मला बोलण्यासाठी वाढीव वेळ दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देतो. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

.....

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

बाब क्रमांक 171 पृष्ठ 253, - वित्त व नियोजन विभाग- सामाजिक कक्ष स्थापन करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे. तसेच बाब क्रमांक 172 मध्ये योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. 10 व्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी केंद्रीय नियोजन मंडळाने सर्व राज्य सरकारला सूचना केल्या होत्या की, सर्व योजनांचे मूल्यमापन केले पाहिजे. आपण योजनांचे मूल्यमापन सरकारी अधिकाऱ्यांमार्फत न करता अंमलबजावणी, आढावा आणि त्याच बरोबर मूल्यमापन हे प्रत्येक स्तरावर त्या त्या विषयातील तज्ज्ञ, संशोधन संस्था, स्वंयसेवी संस्था यांचा सहभाग घेऊन मूल्यमापन केले पाहिजे. मला या निमित्ताने एक सूचना करावयाची आहे की, शासनाच्या अनेक योजना आहेत, जसे की, दारिद्र्य निर्मूलन, सामाजिक न्यायासंबंधीची योजना, महिला विषयक योजना, या योजनांवर महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांनी व इंडियन कौन्सिल फॉर सोशल सायन्स रिसर्च यांनी गेल्या दहा वर्षात स्वत: अभ्यास केलेला आहे. टाटा इन्स्टिटयुट असेल किंवा मुंबई विद्यापीठ असेल त्यांचा समाजशास्त्र विभाग असा अभ्यास करीत असतात. या संशोधकांची तळमळ असते की, हे अभ्यास कोणीतरी वाचावेत आणि समजून घ्यावेत. त्यांनी कोणत्या प्रकारच्या सूचना केलेल्या आहेत, त्यातून कोणते चित्र समोर येणार आहे हे आपण लक्षात घेतले तर आपोआप काही योजनांचे मूल्यमापन समोर येईल. ते योग्य आहे की अयोग्य यावर चर्चा होऊ शकेल. मुळात ज्या विषयाचा अगोदर अभ्यास झालेला आहे त्यावर पुन्हा नव्याने अभ्यास करण्यापेक्षा आपण अगोदरचा रिव्हयू घ्यावा. टाटा इन्स्टिटयुटने देखील अशाप्रकारे अनेक अभ्यास केलेला आहे.

बाब क्रमांक 174, पृष्ठ क्रमांक 254 - आमदार स्थानिक क्षेत्र कार्यक्रमासाठी अतिरिक्त तरतूद करणे- माझी अशी अपेक्षा होती की, माझ्यापूर्वी ज्या सदस्यांनी भाषणे केली ते या बाबीचा उल्लेख करतील,परंतु तसे झालेले नाही. आता आमदार निधी वाढविण्यात आलेला आहे. ही चांगली गोष्ट आहे. कारण विधानपरिषदेतील आमदारांकडून फार मोठ्या प्रमाणावर लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. आता आमदार निधी दीड कोटी रुपये करण्यात आलेला आहे. विधानसभा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सदस्यांद्वारा जे आमदार विधानपरिषदेवर निवडून येतात त्यांना कोणत्याही मतदारसंघात आमदार निधी खर्च करता येतो. कुठेही दुर्घटना घडली वा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाले तर त्याठिकाणी अशा आमदार निधीचा वापर करता येतो. आतापर्यंत अनेक आमदारांनी शेकडो ठिकाणी निधी दिलेला आहे. तेव्हा अशाप्रकारचा निधी कुठे कुठे देण्यात आला याचा एक अहवाल प्रसिध्द करावा. त्यामुळे लोकांना देखील समजेल की कोणत्या आमदाराने कुठे कुठे आमदार निधी खर्च केला आहे. आपल्या विभागात पाच वर्षापूर्वी एक रस्ता झाला होता, तो आता पुन्हा दुरुस्त करण्यात आलेला आहे वगैरे माहिती लोकांना मिळू शकेल. या अहवालाचा आणखी एक फायदा म्हणजे डयुप्लीकेशन ऑफ वर्क होणार नाही. आज समाजसुध्दा सोशल ऑडीट मागत आहे. जे आमदार तळमळीने आमदार निधी खर्च करतात ते माझ्या भूमिकेला पाठिंबा देतील अशी मी आशा व्यक्त करते. आमदार निधीमध्ये अधिक पारदर्शकता येण्यासाठी अशाप्रकारचा अहवाल प्रसिध्द करणे आवश्यक आहे. मी प्रत्येक आमदाराचा अहवाल करण्यास सांगत नाही तर सर्वांचा एकत्रित अहवाल तयार करावा अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 56, पृष्ठ क्रमांक पृष्ठ क्रमांक 39 - आरे दूध वसाहत येथे सीमा भिंतीचे बांधकाम करण्यासाठी तरतूद केलेली आहे. आरे वसाहतीमध्ये कोणी अतिक्रमण करु नये हा हेतू आहे. ही चांगली बाब आहे. माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी स्वत: डॉ.नितीन राऊत यांच्याशी संपर्क साधलेला होता आणि पत्र देखील दिलेले आहे. डॉ.नितीन राऊत यांच्याकडून फार अपेक्षा आहेत. ते गोहत्या बंदी विधेयकावर काही भूमिका घेतील.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..

मी या अगोदर सभागृहात सांगितले होते की, हे विधेयक मान्यतेसाठी राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे पाठविले. केन्द्र सरकारने त्या विधेयकाला मान्यता देऊन राज्य सरकारकडे पुन्हा पाठविले. परंतु या अगोदरचे मंत्री महोदय श्री.अनिस अहमद यांनी त्या विधेयकावर सही न केल्यामुळे, ते विधेयक पुन्हा केन्द्र सरकारकडे पाठविण्यात आले. आज अशी बातमी आली आहे की, मध्यप्रदेश सरकारने गो हत्त्या प्रतिबंधक विधेयकास मान्यता दिलेली आहे. पूरक मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने मला माननीय मंत्री महादेयांना अशी विनंती करावयाची आहे की, या विधेयकाच्या संदर्भात देखील काही अभ्यास करुन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 54 सबंधी बोलावयाचे आहे पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी विकास महामंडळाच्या संदर्भात ही पूरक मागणी करण्यात आली आहे. लहान पशु आणि ससे यांच्या एकात्मिक विकासासाठी मेंढी विकास महामंडळ काम करणार आहे. तेव्हा लहान पशु आणि ससे हे आपल्या निकषात बसतात काय ? सकाळी असे सांगण्यात आले होते की, सरकार नियमाप्रमाणे आणि निकषाप्रमाणें काम करीत आहे. तेव्हा या कामासाठी निधी कशा प्रकारे वापरला जाणार आहे, यासबंधी माहिती देण्यात यावी.

सभापती महोदय यानंतर सार्वजनिक बांधकाम विभ्ागाची बाब क्रमांक 78 पान नबर 65 सबंधी मला बोलावयाचे आहे.मार्ग आणि पूल यांचे परिरक्षण व दुरुस्तीकरिता ही तरतूद करण्यात आली आहे. मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यात पुणे नाशिक महामार्गावर पिंपळवडी येथे कुकडी नदीवर एक पूल असून त्या ठिकाणी नेहमी अपघात होत असतात. सार्वजनिक बांधकाम मंत्री मराठवाडयात रस्ते बांधतात, असे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले आहे . परंतु पुणें जिल्हयात शिवाजी महाराजांच्या काळातील रस्ते अजूनही त्याच अवस्थेत आहेत. त्या रस्त्याची सुधारणा झाली पाहिजे. पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवडी येथील पुलाच्या कामाच्या बाबतीत मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छिते आणि या कामामध्ये त्यांनी लक्ष घालावे अशी विनती करते.

सभापती महोदय, नुकतीच आषाढी एकादशी होऊन गेली आहे. या आषाढी एकादशीच्या निमित्ताने राज्यातून अनेक वारकरी पंढरपूरला येतात. तेव्हा या वारीचा संपूर्ण मार्ग चौपदरी करण्यात यावा, अशा प्रकारची मागणी वारक-यांकडून करण्यात आली आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

1984 सालापासून ही मागणी करण्यात येऊनही ती अजून अनिर्णित आहे. सन्माननीय मंत्री श्री बबनराव पाचपुते हे प्रत्येक वारीला जात असतात. परंतु वारीच्या मार्गाचे चौपदरीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून काहीही प्रयत्न झालेले नाहीत.सर्व पालख्यांचा मार्ग चौपदरी करण्यात यावा अशा प्रकारची मागणी अनेक वर्षापासून करण्यात येत आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या सेवेकरांनी मला फोन करुन याबाबतीत सागितले होते. त्याचबरोबर तुकाराम महाराजांच्या पालखीच्या सेवेक-यांनी माझ्याकडे लेखी मागणी केलेली आहे. यामध्ये शासनाने लक्ष घालावे अशी मी विनती करते.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 84 पान नंबर 68 संबंधी मला बोलावयाचे आहे.बीडीडी चाळीच्या परिरक्षणासाठी आणि दुरुस्तीसाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे ही स्वागतार्ह बाब आहे. बीडीडी चाळीमध्ये राहणा-या लोकांना अत्यंत वाईट अवस्थेत जीवन जगावे लागते. त्यामुळे बीडीडी चाळीचे पुर्ननिर्माण करण्यात यावे, अशी तेथील लोकांची अनेक वर्षापासून मागणी होती. तेव्हा हे काम करीत असतांना त्यामध्ये स्थानिक लोकांना सहभागी करुन घेतले पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 92 पान नंबर 77 संबंधी मला बोलावयाचे आहे. विविध ठिकाणच्या न्यायालयीन इमारतीच्या बांधकामासाठी ही पूरक मागणी करण्यात आलेली आहे. भूम या तालुक्याच्या ठिकाणी न्यायालयीन इमारत बांधण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आह. माझ्या माहिती प्रमाणे भूम हा नवीन तालुका होऊन जवळजवळ 12 वर्षाने ही तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद करणे आवश्यक होते. तेव्हा या इमारतीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात आले पाहिजे आणि न्यायाधीशांची पदे सुध्दा लवकरात लवकर निर्माण करण्यात आली पाहिजेत. शिवाजी नगर येथील कुटुंब न्यायालयासाठी देखील आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. कणकवली येथील न्यायालयाला मी मध्यंतरी भेट दिली होती. ब-याचशा वकिलांची अशी मागणी आहे की अनेक न्यायालयामध्ये वाचनालयासाठी पुरेशा जागा नाहीत. विशेषत: तालुक्याच्या ठिकाणी जी न्यायालये आहेत, त्या ठिकाणी वकिलांसाठी ज्या रुम्स बांधण्यात आल्या आहेत त्या अत्यंत लहान आकाराच्या आहेत. महिला वकिलांसाठी रुम्स बांधण्यात आल्या असल्या तरी त्या खूपच

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लहान आहेत. महिला वकिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे, त्यांच्यासाठी मोठया आकाराच्या खोल्या बांधण्यात आल्या पाहिजेत. त्याचबरोबर वकिलांसाठी ज्या रुम्स बांधण्यात आल्या आहेत त्यांना संलग्न स्वच्छतागृहे नाहीत तेव्हा प्रत्येक रुमला स्वच्छतागृहे संलग्न असावीत, अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय यानंतर बाब क्रमांक 105 पान नंबर 196 सबंधी मला बोलावयाचे आहे. रायगड जिल्हयात महाड येथे ट्रामा केअर युनिटच्या बांधकामासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे.हे ट्रॉमा केअर युनिट तेथील इस्पितळाला जोडून घेण्यात आले पाहिजे .

सभापती महोदय, यानंतर मला सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 213, पान नंबर 344 सबंधी मला बोलावयाचे आहे. महात्मा गांधी स्मारक रुग्णालयासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, माननीय आरोग्य मंत्र्यांनी पुढाकार घेऊन मनोरुग्णालयाची पहाणी करण्यांसाठी सन्माननीय सदस्यांची एक समिती स्थापन केली होती. आम्ही काही मनोरुग्णालयांची पहाणी केल्यानंतर काही बाबी आमच्या निदर्शनास आल्या होत्या. या ठिकाणी मला कोणत्याही विभागावर टीका करावयाची नाही. परंतु वित्त आणि नियोजन विभाग आरोग्य विभागाच्या संदर्भात संवेदनहीन आहे किंवा काय, अशी मला शंका येते. त्याचे कारण असे की, मनोरुग्णालयासाठी लागणारी औषधे खरेदी करण्यासाठी कट लावण्यात येतो .त्यामुळे मनोरुग्णांना काही महिने औषधे मिळतात आणि काही महिने त्यांना कमी प्रमाणात औषधे मिळतात. कट लावल्यामुळे त्या रुग्णांवर किती परिणाम होत असेल याचा विचार विभागाने केला पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे ..

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

मनोरुग्णालयांच्या संदर्भातील समितीने ज्या ज्याठिकाणी आर्थिक त्रुटी आहेत, त्या संदर्भात अनेक शिफारशी केलेल्या आहेत. त्याचबरोबर अनेक ठिकाणी स्वच्छतागृहे नाहीत, जेवणामध्ये दोन चपात्या दुपारी आणि दोन चपात्या संध्याकाळी दिल्या जातात. मधल्या काळात या मनोरुग्णांना भूक लागत नाही काय? असे तेथील संबंधितांना विचारल्यावर त्यांच्यासाठी तेवढाच आहार दिला जातो, आणि त्यासाठी आमच्याकडे तेवढीच तरतूद आहे असे सांगितले जाते. सन्माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी साहेबांनी त्यामध्ये लक्ष घातले आहे. वारंवार मागणी करुन सुध्दा आमच्या समितीला अर्थ विभागाबरोबर भेट मिळाली नाही. शेवटी आम्ही मंत्रिमहोदयांवर ती जबाबदारी सोपविली. मला मुद्दामहून सांगावयाचे आहे की, या इस्पितळांची सुधारणा करण्यासाठी जेवढा निधी लागेल तेवढा देऊन त्यामध्ये कोणतीही कपात न करता या इस्पितळाची सुधारणा झाली पाहिजे. तसेच, कपात करीत असतांना ती कशासाठी करीत आहोत याचाही पुनर्विचार झाला पाहिजे.

डॉ. पांढरवाला हॉस्पिटलमध्ये काही सुधारणा करण्यासाठी निधीची तरतूद केली आहे. परंतु त्याचबरोबर पुण्याच्या औंध हॉस्पिटलची अतिशय दुरवस्था झाली आहे. त्याठिकाणी काम करणारे सर्जन मला भेटले. त्यांनी खाजगीत मला सांगितले की, त्या हॉस्पिटलमध्ये इतके उंदीर झाले आहेत की, त्यांना मारण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्याला 20 रुपये द्यावे लागत आहेत. या हॉस्पिटलची अतिशय दुरवस्था झाली आहे. याची सन्माननीय तालिका सभापतींना कल्पना आहे. तेव्हा या औंध हॉस्पिटलबरोबरच सन्माननीय सदस्य श्री. रामदासजी कदम यांनी सुचविलेल्या रत्नागिरी येथील अल्बानीया हॉस्पिटलमधील 219 पदे रिक्त आहेत ती भरली गेली पाहिजेत. त्याचप्रमाणे पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये अन्यायपीडित शेकडो मुलींना जाण्याची वेळ येते. परंतु या हॉस्पिटलमधील समुपदेशकांची सर्व पदे रिक्त आहेत. यानिमित्ताने माझी दोन्ही मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, या हॉस्पिटलमध्ये अन्यायपीडित मुलीवरील डॉक्टरची ट्रिटमेंट संपल्यानंतर तिचे कौन्सिलिंग करावयाचे झाल्यास त्याठिकाणी समुपदेशक उपलब्ध नाही. आणि म्हणून पुण्याचे ससून हॉस्पिटल असो किंवा पिंपरी-चिंचवडचे यशवंतराव चव्हाण हॉस्पिटल असो, त्याठिकाणी समुपदेशकांची पदे भरली गेली पाहिजेत. सन्माननीय मंत्री प्रा. वर्षाताई गायकवाड यांनी नुकतीच पुण्याच्या ससून हॉस्पिटलला भेट दिली होती. खूप कमी कालावधीत समजल्यामुळे मी त्याठिकाणी जाऊ शकले नाही. परंतु आपल्या निदर्शनास एक गोष्ट आली असेल की, जर्मन बेकरीमध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर ससून हॉस्पिटलमध्ये मृतदेहाचे पोस्ट मार्टेम सुरु होते. प्रत्येक बॉडीच्या

पोस्ट मार्टेमसाठी पाच ते सहा तास लागत होते. याचे कारण असे की, बॉम्बस्फोटामध्ये मृत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे...

झालेल्या लोकांचे एक्स-रे काढण्यासाठी मोठे मशीन नसल्यामुळे शरीराच्या एकेका भागाचे एक्स-रे काढून नंतर ते पोस्ट मार्टेम डिपार्टमेंटला पाठविले जात होते. या प्रोसेसमुळे प्रत्येक मृत व्यक्तीचा मृतदेह मिळावयास खूप दिरंगाई होत होती. शेवटी मृतांचे नातेवाईक जमा होऊन त्याठिकाणी हल्लाबोल होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. त्याकरिता या ससून हॉस्पिटलमध्ये आपत्तीच्या वेळी किंवा अन्य वेळी सुध्दा त्यामधील सोयी-सुविधांकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे याकडे मी आपले लक्ष वेधते.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या मागणीबाबत बोलावयाचे झाले तर इंग्रजी माध्यमाच्या शाळांकरिता तरतूद करण्याकरिता माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यामध्ये त्यांनी या नामांकित शाळा कोणत्या असे विचारले होते? या नामांकित इंग्रजी शाळांमध्ये शिकून आलेल्या आदिवासी मुलींना एअर होस्टेस बनविण्यासाठी नेऊन नंतर त्यांना एअर होस्टेस न बनविता पूर्णपणे फसविले जाते. अशाप्रकारे आदिवासींच्या नावाने खोटारडया संस्था चालविल्या जात आहेत याकडे मी शासनाचे लक्ष वेधते.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या बाब क्र. 58 मध्ये प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारणे याकरिता मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, माझ्याकडे एक अहवाल आहे त्यामध्ये म्हटल्याप्रमाणे फक्त 50 टक्के मागण्यांवर सभागृहात चर्चा होते. आणि 50 टक्के मागण्यांवर चर्चा न होता त्या पास केल्या जातात. म्हणून मंत्रिमहोदयांनी आमचे म्हणणे ऐकण्याचा कंटाळा करु नये असे मला वाटते. शालेय शिक्षणामध्ये शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आपण अनुदान दिले आहे. पी.एम.शहा फाऊंडेशन आणि ॲक्शन फॉर द राईट्स ऑफ द चाईल्ड या दोन संस्थांनी महानगरपालिकांच्या शाळांचा सर्व्हे केला आहे. त्याठिकाणी असलेल्या स्वच्छतागृहांची काय परिस्थिती आहे? याची पहाणी केली आहे. त्यांचा सर्व्हे रिपोर्ट मी मंत्रिमहोदयांकडे पाठविते. त्या अहवालाची आपल्याला मदत घेता येईल. सभापती महोदय, उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या बाबतीत सांगू इच्छिते की, मुंबईच्या ईस्माईल यूसुफ महाविद्यालयाला अनुदान दिले आहे. या महाविद्यालयाच्या संदर्भात आमचे शिवसेनेचे आमदार माननीय श्री. रविंद्र वायकर यांनी तेथील परिस्थिती मला सांगितली आहे. त्या महाविद्यालयाच्या भिंती पडल्या आहेत, त्याठिकाणी अतिक्रमण झाले आहे. महाविद्यालयाचे कर्मचारी वेळेवर हजर रहात नाहीत. त्या कॉलेजमध्ये जाणाऱ्या सर्व मुलांची सातत्याने हेळसांड होत असते. मला आपल्याला विचारावयाचे आहे की, जी शासकीय महाविद्यालये आहेत त्यांची निगराणी करणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

त्याची पाहणी करणे, त्याचा दर्जा चांगला आहे की नाही हे बघणे हे आपले काम आहे की नाही?

सभापती महोदय, बाब क्रमांक 254, पान क्रमांक 376. वर मी बोलू इच्छिते. जे.जे.वास्तूशास्त्र महाविद्यालयात मोठया प्रमाणात अंतर्गत गटबाजी झालेली आहे त्याचा विद्यार्थ्यांवर विपरीत परिणाम होत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 267, पान क्रमांक 380 वर मी बोलणार आहे. वाचनालयाच्या अंशदानात वाढ केलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते पण दादर आणि वांद्रे येथील सार्वजनिक वाचनालयांच्या इमारतीची डागडुजी करणे गरजेचे आहे. या वाचनालयांनी 50 वर्षापूर्वी इमारती बांधलेल्या आहेत त्या आज मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे या वाचनालयातील पुस्तके पावसाच्या पाण्याने भिजत आहेत. तसेच या ठिकाणी लोकांना वाचण्यासाठी कोणतीही सोय करण्यात आलेली नाही. तेव्हा या वाचनालयाच्या बांधकामासाठी शक्य असेल तर काही ना काही अनुदान देण्याचा विचार केला पाहिजे याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. सभापती महोदय, या सर्व पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सदनाला योग्य अशी समर्पक माहिती आणि उत्तरे मिळतील अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांस्कृतिक विभागाशी संबंधित नाटयसंमेलनाचा मुद्दा मांडला. मला वाटते त्यावर वेगळी चर्चा होऊ शकते. पण माननीय आमदारांनी साहित्यामध्ये जास्त ढवळाढवळ करु नये असे मला वाटते. आपण साहित्यप्रेमी म्हणून त्या व्यासपीठावरुन जे काही काम करावयाचे आहे ते करावे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहासमोर सन 2010-11 च्या पुरवणी मागण्या चर्चेसाठी आलेल्या आहेत त्यावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पशुसंवर्धन विभाग बाब क्रमांक 54. पान क्रमांक 38 वर मी बोलू इच्छितो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या बाबतीत एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय मंत्रिमहोदयांना मला आठवण करुन द्यावयाची आहे की, तीन वर्षापूर्वी उस्मानाबादी शेळीच्या संवर्धनासाठी पाच कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झालेला आहे. ते पैसे उपलब्ध असून देखील अद्याप वितरित झालेले नाहीत याकडे माननीय मंत्रिमहोदयांनी आवर्जून लक्ष द्यावे अशी मला या ठिकाणी विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, नियोजन विभाग, बाब क्रमांक 199 पान क्रमांक 308 वर मी बोलू इच्छितो. यामध्ये उस्मानाबाद जिल्हयाचा 2010-11 चा आऊट ले नमूद केलेला आहे. 93 कोटी रुपयांचा हा आऊट ले आहे. आतापर्यंत 60 कोटी रुपये मिळाले आहेत. 32 कोटी रुपयांची तरतूद या पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेली आहे त्याबद्दल मी या ठिकाणी मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच उस्मानाबाद जिल्हयामध्ये 1000 के.टी.वेअर आहेत. त्यांच्या माध्यमातून 25 हजार हेक्टरचे सिंचन होते. या के. टी. वेअरच्या दुरुस्तीसाठी दहा कोटी रुपये मागण्यात आले होते. वित्त व नियोजन मंत्रिमहोदयांनी त्याबाबतची तरतूद करण्याबात शब्द दिला होता याची मला या ठिकाणी आवर्जून आठवण करुन द्यावयाची आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग बाब क्रमांक 215 आणि 217 वर मी बोलू इच्छितो. बाब क्रमांक 215 मध्ये ग्रॅन्ट इन एड नवरोजी वाडिया प्रसूती रुग्णालयासाठी पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मला माननीय मंत्रिमहोदयांना आवर्जून आठवण करुन द्यावयाची आहे की, उस्मानाबादला 100 खाटांचे महिलांसाठी रुग्णालय मंजूर करण्यात आलेले आहे. चार कोटी रुपयाची गुंतवणूक करुन ती इमारत तयार आहे. त्यातील थोडेफार काम राहिलेले आहे आणि स्टाफ कार्यान्वित झालेला नाही याकडे मला माननीय मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 217 वर मी बोलू इच्छितो. जीवनदायी आरोग्य योजनेसाठी 27 कोटी रुपये आकस्मिकता निधीतून घेण्यात आले होते. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना नव्याने सुरुवात करण्यात आलेली आहे. तिच्या पुढच्या सेकंड फेजमध्ये उस्मानाबाद जिल्हा आवर्जून घेण्यात यावा अशी मला या ठिकाणी विनंती करावयची आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्य बाब क्रमांक 224 वर मी बोलू इच्छितो. केंद्र शासनाच्या आरोग्य विभागाने नुकताच एक बीआरएमएस कोर्स मंजुरीसाठी एमसीआयकडे पाठविलेला आहे. ज्या जिल्हयामध्ये वैद्यकीय महाविद्यालय नाही अशा जिल्हयातील सिव्हिल हॉस्पिटलला संलग्न करुन हा कोर्स चालविण्याचा विचार आहे. हा चार वर्षाचा कोर्स घेण्यात येणार आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना मला विनंती करावयाची आहे की, उस्मानाबाद जिल्हयामध्ये मेडिकल कॉलेज नाही पण तेथे असलेल्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये भरपूर जागा उपलब्ध आहेत तेव्हा या ठिकाणी हा कोर्स सुरु करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 255 वर मी बोलू इच्छितो. येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर तंत्र विद्यापीठ, रायगड यासाठी काही तरतूद करण्यात आलेली आहे. उस्मानाबाद जिल्हयामध्ये युनिव्हर्सिटीचे सब सेंटर मंजूर करण्यात आलेले आहे. त्या सब सेंटरच्या बांधकामासाठी पैसे उपलब्ध करुन देण्यासाठी व एमआयडीसीने 55 एकर जागा उपलब्ध करुन दिलेली आहे त्या जागेचे पैसे देण्यासाठी देखील तरतूद होणे गरजेचे आहे असे मला याठिकाणी आवर्जून नमूद करावयाचे आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत/ शीघ्रलिपी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पृष्ठ क्रमांक 65 वरील बाब क्रमांक 78 तसेच पृष्ठ क्रमांक 66 वरील बाब क्रमांक 79 आणि 80 च्या संदर्भात बोलणार आहे. चंद्रपूर व बल्लापूर ही मोठी शहरे असून त्या ठिकाणी बायपास रोड नसल्यामुळे रोज अनेक अपघात होत असतात. या जिल्ह्यामध्ये अनेक मोठमोठे उद्योग आहेत. कोलमाइन्स आहेत तसेच पोलादचे कारखाने आहेत. त्या ठिकाणी जवळजवळ 50 टक्के ट्रकने आणि 50 टक्के रेल्वेने मालाची वाहतूक होत असते. त्या ठिकाणी राखड, सिमेंट, पोलाद, कोळसा इत्यादी अनेक वस्तूंची वाहतूक शहरातून होत आहे. त्या ठिकाणी बायपास रोड होणे जरुरीचे आहे. त्या ठिकाणी रोज अपघात होत असतात. म्हणून माझी अशी विनंती आहे की, चंद्रपूर आणि बल्लापूर शहरामध्ये बायपास रोड या पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर करावेत. तसेच चंद्रपूर शहराच्या मध्यभागी बाबूपेठ रेल्वे गेट आहे त्या ठिकाणी पूल होण्याची आवश्यकता आहे. बल्लारशा, चंद्रपूर येथून आंध्र प्रदेशकडे तसेच दिल्लीकडे आणि मुंबईकडे रेल्वे गाड्यांची वाहतूक होते. अनेक गाड्या पाच-पाच मिनिटांमध्ये येतात आणि तो गेट बंद झाल्यामुळे वाहतूक थांबते. ऑटोरिक्षा, शाळेतील मुले तसेच जनता यांना वाहतुकीचा मोठा त्रास होतो. अनेक वर्षापासून तेथील लोकप्रतिनिधी तसेच जनतेची मागणी आहे. चंद्रपूर नगरपरिषद आपल्या वाट्याचे 60 टक्के पैसे रेल्वेला भरु शकत नाही म्हणून हा प्रोजेक्ट थांबलेला आहे. 24 ते 27 कोटी रुपयांचा हा प्रोजेक्ट आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. अनिल देशमुख तसेच अनेक मंत्रिमहोदय चंद्रपूरच्या दौऱ्यावर येतात आणि आश्वासन देऊन जातात. या पुरवणी मागण्यांच्या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, चंद्रपूर शहराच्या मध्यभागी बाबूपेठ रेल्वे गेटच्या ठिकाणी पूल व्हावा.

सभापती महोदय, अल्पसंख्याक व औकाफ विभागाच्या पृष्ठ क्रमांक 397 वरील बाब क्रमांक 284 बाबत मला बोलावयाचे आहे. अल्पसंख्याक व औकाफ विभागामध्ये मौलाना आझाद महामंडळ आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर होऊन सुध्दा मिळत नाही. उच्च शिक्षणाचे कर्ज मंजूर होऊन सुध्दा ते मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन निधीमध्ये वाढ करावी. उच्च शिक्षणासाठी जे विद्यार्थी फॉर्म भरतात त्यांना 100 टक्के शिष्यवृत्ती मंजूर होते पण शाळेत ती शिष्यवृत्ती मिळत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .....

नाही. मला खात्री आहे की, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जे आघाडी सरकार आहे ते गोरगरीब अल्पसंख्याकांसाठी चांगले कार्य करीत आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे. ज्या विद्यार्थ्यांनी कर्जासाठी अर्ज केले आहेत त्यांचे अर्ज मंजूर आहेत पण त्यांना कर्जाचे चेक मिळत नाहीत किंवा शाळेला जी फी भरावी लागते ती मिळत नाही. त्याकडे माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष घालून मौलाना आझाद महामंडळासाठी पैशाची वाढ करावी. औकाफ विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर पूर्वी मुस्लीम धर्मियांच्या ज्या संस्था आहेत त्यामध्ये मस्जीद, मदरसा, कब्रस्तान यांचे जे ट्रस्ट असतील ते आम्ही प्रत्येक जिल्ह्यामध्ये रजिस्टर करीत होतो. जेव्हापासून औकाफचा कायदा आला तेव्हापासून मुस्लीम धर्मियांच्या ज्या संस्था मस्जीद, मदरसा, कब्रस्तान यांचे रजिस्ट्रेशन औकाफ विभागामध्ये करावे लागते आणि त्याचे मुख्यालय औरंगाबादला आहे. चंद्रपूरच्या जनतेला त्यासाठी औरंगाबादला जावे लागते. त्या ठिकाणी अधिकारीवर्ग कमी आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांकडे तक्रार केली होती. जे अधिकारी आहेत त्यांची फार अरेरावी आहे. जो कोणी रजिस्ट्रेशनसाठी जातो तेव्हा त्याला तिकिटाचा खर्च 2 हजार रुपये येतो आणि त्या ठिकाणी गेल्यानंतर तेथील अधिकारी सांगतात की, एक महिन्यानंतर या. त्यांना नंतरची तारीख देतात. यासंदर्भात अनेक तक्रारी आहेत. माझी अशी मागणी आहे की, औकाफ विभागाच्या बजेटमध्ये वाढ करुन प्रत्येक जिल्ह्यामध्ये चॅरिटी कमिशनरची जशी कार्यालये आहेत तशी औकाफची कार्यालये प्रत्येक जिल्ह्यात व्हावयास पाहिजे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी....

हर जिले में कार्यालय होना चाहिए. मैं हर तालुके में कार्यालय स्थापित करने की मांग नहीं कर रहा हूं, न ही विभागीय स्तर पर कार्यालय स्थापित करने की मांग कर रहा हूं. मैं तो हर जिले में औकाफ का कार्यालय स्थापित करने की मांग कर रहा हूं. एक कहावत है, मांगना हो तो खुदा से खूब मांगों. मैं वैसे ही मांग रहा हूं.औकाफ विभाग नया है, वक्फ़ विभाग नया है. आज औरंगाबाद के कार्यालय में आवश्यक कर्मचारी नहीं है. बजट में तरतूद नहीं है. जिसकी वजह से चंदा वसूल करते हैं.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्ष मुसलमानांना मदत करतात.. असे असेल तर मग तक्रारी कशाला करता ? कशाला भांडता ?

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, हे आमचे प्रेमाचे भांडण आहे.

सभापती महोदय, या पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळास निधी वाढवून द्यावा, औकाफ विभागातील कर्मचारी वाढवून द्यावेत, तसेच औकाफ विभागातील अरेरावी करणा-या अधिका-यांच्या बाबतीत ज्या तक्रारी आलेल्या आहेत त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी, अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

वस्त्राद्योग विभाग, पान क्रमांक 365, बाब क्रमांक 236. महाराष्ट्र राज्य सहकारी सूत गिरणी महासंघ मर्यादित, यास व्यवस्थापकीय अर्थसहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद करीत असताना ज्या सहकारी सूत गिरण्या अर्थसहाय्यापासून वंचित आहेत त्यांनाही आर्थिक सहाय्य करावे. जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुका सहकारी सूत गिरणीला अर्थ सहाय्य करावे अशी मी विनंती करतो.

सार्वजनिक आरोग्य विभाग. पान क्रमांक 345, बाब क्रमांक 216. उप जिल्हा रुग्णालयामध्ये रुग्ण उपचारासठी येत असतात. त्या ठिकाणी डॉक्टर्स असतात परंतु उपकरणे नसतात. अशा उप जिल्हा रुग्णालयातून एक्स-रे, सोनोग्राफी अशी अद्ययावत संयत्रे उपलब्ध करुन द्यावीत अशी मी विनंती करतो.

सार्वजनिक बांधकाम विभाग. पान क्रमांक 345, बाब क्रमांक 217. जीवनदायी आरोग्य योजनेची थकित देयके प्रदान करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. जीवनदायी योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी थकित देयकांचे प्रदान आकस्मिक निधीतून करण्यात आले होते. ते चालू वर्षाच्या रकमेतून देण्यात येणार आहे. या जीवनदायी योजनेसाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्यव्यवसाय विभाग. पान क्रमांक 33, बाब क्रमांक 44. विदर्भ, मराठवाडा व खानदेश विभागात ऊस विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. सन 2010-2011 या चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली नाही. पुरवणी मागण्यामध्ये 14 कोटी 28 लाखाची तरतूद केलेली आहे. ही तरतूद अधिक करावी अशी माझी विनंती आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग. पान क्रमांक 77, बाब क्रमांक 92. विविध ठिकाणच्या न्यायालयीन इमारतीची नवीन बांधकामे आणि चालू बांधकामे यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. जळगाव जिल्हयातील भडगाव तालुक्यात न्यायालय आहे. परंतु या न्यायालयास स्वत:ची इमारत असणे आवश्यक आहे. या न्यायालयाच्या इमारतीसाठी जागा मिळालेली आहे, प्लॅन मंजूर

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिलीपराव सोनवणे...

आहे. मात्र आर्थिक तरतूद केलेली नाही. तेव्हा भडगाव येथील न्यायालयाच्या इमारतीसाठी आर्थिक तरतूद करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सार्वजनिक बांधकाम विभाग. पान क्रमांक 66, बाब क्रमांक 79. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतलेल्या प्रकल्पाकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतलेल्या प्रकल्पामध्ये जळगाव जिल्हयातील रस्ते देखील घ्यावेत अशी मी शासनाला विनंती करतो.

आदिवासी विकास विभाग. पान क्रमांक 357, बाब क्रमांक 227. अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. मी या निमित्ताने अशी विनंती करतो की, आदिवासी क्षेत्रातील तालुक्याच्या ठिकाणी अशा ज्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा असतील त्या शाळांमध्ये त्यांना प्रवेश मिळेल अशी व्यवस्था करावी.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे.....

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक ३५६, बाब क्रमांक २२५ अन्वये माध्यमिक शाळांच्या अनुदान प्राप्त झालेल्या ४७ तुकडयांसाठी तरतूद करण्यात आली आहे. निकषपात्र शाळा होतात, अशा शाळांचे २००३-०४ पासूनचे २४ महिन्यांचे वेतन आजही थकित आहे. त्याचप्रमाणे सात महिन्यांचे वेतनही थकित आहे त्यासाठी शासनाने तरतूद करावी अशी या निमित्ताने मी विनंती करतो.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग बाब क्रमांक २६६, पृष्ठ क्रमांक ३८० अशासकीय अनुदानित कला संस्थांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. अशासकीय अनुदानित कला संस्थांच्या इमारत भाडे व वेतनेतर अनुदानासाठी तरतूद करणे आवश्यक आहे. साक्री येथील यशवंत विद्यालयाचे १९९९ ते २००४ पर्यंत भाडे थकित आहे त्यासाठी तरतूद करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, फलोत्पादन विभाग बाब क्रमांक ३१, पृष्ठ क्रमांक २३ बाबत मला सांगावयाचे आहे की, जळगाव जिल्हयात मोठया प्रमाणात केळी उत्पादन होते. जळगाव हा केळी उत्पादनामध्ये देशातील प्रथम क्रमांकाचा जिल्हा आहे. गेल्या वर्ष दीड वर्षात वादळ, गारपीट व अवेळी पावसामुळे रावेर तालुक्यात हजारो कोटी रुपयांचे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. वित्तीय वर्षात नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी तरतूद झालेली नाही. पंचनामे झाले, आश्वासन देण्यात आले परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांना कोणतीही मदत मिळालेली नाही. केळीचे पीक वाचवायचे असेल तर केळी पिकाचा फळ पिकामध्ये समावेश होणे गरजेचे आहे. केळी पिकाचा विमा उतरविण्यात यावा आणि शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो आणि पुरवणी मागण्यांवर बोलण्याची मला संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन २०१०-२०११ च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक २८४, पृष्ठ क्रमांक ३९७ अल्पसंख्याक विकास विभागाने मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला प्रतिपूर्ती करण्यासाठी तरतूद केलेली आहे. ४५० पृष्ठाच्या या पुरवणी मागण्यांच्या पुस्तिकेमध्ये अल्पसंख्याक विकास विभागासाठी फक्त चार ओळी लिहिलेल्या आहेत. अर्थसंकल्पीय अंदाज तयार करीत असताना ज्या गोष्टींचा अंदाज करता आलेला नाही अशा गोष्टी यामध्ये अंतर्भूत होणे अपेक्षित असते. म्हणूनच चार ओळींचा समावेश आहे असा अर्थ असावा.

सभापती महोदय, प्राथमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेश वाटपासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन दिला आहे. आतापर्यंत कोणत्याही शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप झालेले नाही. याचा शासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. गणवेशाचे वाटप कधी करायचे असते? शैक्षणिक वर्ष सुरु होत असताना गणवेश वाटप करणे आवश्यक आहे. जुलै हा महिना गणवेश वाटप करण्यास योग्य आहे. शासनाकडून गणवेशाचे कधी वाटप केले जाते? शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर गणवेशाचे वाटप केले जाते. शाळेचे शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर गणवेशाचे वाटप होऊ शकते का? ही अत्यंत गंभीर बाब आहे. या संदर्भात काही बदल करता येईल का? याचा जरुर विचार व्हावा. गेल्या वर्षी जे घडले ते घडले. परंतु आता शाळा सुरु झालेल्या आहेत. येत्या ८-१५ दिवसात गणवेशाचे वाटप केले जाईल असे याठिकाणी शासनाने जाहीर केले पाहिजे. अन्यथा ही योजना बंद करावी अशी माझी विनंती आहे.

नंतर ३यू.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

अल्पसंख्यांकांच्या नावावर बजेट दाखवायचे आणि त्यांना ते मिळणारच नसेल तर त्याला काही अर्थ नाही. त्याचबरोबर गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाने उपस्थिती भत्ता देण्याची योजना सुरु केली. निदान या लालसेने तरी मुलांना शाळेत पाठवतील असा शासनाचा उदात्त हेतू यामागे आहे. मी यासंदर्भात माहिती घेतली असता शासनाने 7 कोटीची तरतूद केली असताना सुध्दा एकाही पालकांना असा उपस्थिती भत्ता मिळाला नसल्याचे समजते, म्हणून या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे अशी माझी सूचना आहे. कारण 70 टक्के पालकांना हेच माहीत नाही की आपल्या मुलांना शाळेत पाठविल्यानंतर उपस्थिती भत्ता मिळतो आणि त्याचाच फायदा घेऊन हा भत्ता दिला जात नाही अशी तक्रार आहे. त्यानंतर मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून गेल्या तीन वर्षात 150 कोटीचे वाटप झाले. मला दररोज किमान दोन फोन तरी असतातच की आमचे कर्ज मंजूर झाले, कर्जाच्या रकमेचे चेक मिळाले परंतु पैसे मिळतच नाहीत. याचा अर्थ यात कुठेतरी पाणी मुरत आहे याची शहानिशा झाली पाहिजे. यामध्ये असा संशय व्यक्त केला जातो की, काही लोकांना पैसे मिळाले नाहीत. एक वर्षापूर्वी कर्ज मंजूर झालेल्या अशा 50 केसेस तरी आहेत की ज्यांना चेक मिळाले पण पैसे मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती मंत्री महोदयांनी जाणून घेऊन उचित कार्यवाही करावी. शिष्यवृत्तीमध्ये तर फारच मोठा गोंधळ राज्यात सुरु आहे. आता मी चौकशी केली असता पॉलिटेक्नीक कॉलेजमध्ये मायनॉरिटीच्या मुलांना प्रवेश घेत असताना 25 हजार रुपये मिळणार म्हणून सांगितले जाते पण त्यासाठी आवश्यक असलेले अनुदान सरकारकडून मिळतच नाही म्हणून मुलांना व पालकांनाही शासनाबद्दल विश्वास नाही. त्यात शासनाचा जी.आर. असा आहे की, मायनॉरिटीजच्या कॉलेजेसने विद्यार्थ्यांची संख्या पूर्ण केली नाही तर तीन वर्षात त्या कॉलेजची मान्यता रद्द करण्यात येईल. माझी अशी विनंती आहे की, मायनॉरिटी कॉलेजमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाने विश्वास द्यावा व या कॉलेजेसना शिष्यवृत्तीसाठी अनुदान द्यावे. कारण दोन वर्षापूर्वी अनेक मुलांनी प्रवेश घेतला असताना त्यांना अद्यापही शिष्यवृत्तीची रक्कम मिळाली नाही म्हणून शासनाचे स्वप्न पूर्ण होईल असे मला वाटत नाही. त्याचबरोबर अल्पसंख्यांकबहूल क्षेत्र विकास म्हणून जी योजना आहे त्यासाठी 19 कोटीची योजना मंजूर झाली होती ती योजना आता 10 कोटीवर आणून ठेवली आहे.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

अगोदरच या विभागासाठी बजेट कमी आहे त्यातही शासन आता दिवसेंदिवस कमी कमी करीत आहे. म्हणून माझी विनंती आहे या विभागासाठी भरीव तरतूद करावी. या निमित्ताने मी सभागृहात सांगू इच्छितो की, कोणत्याही मायनॉरिटीच्या वस्तीमध्ये आपण गेलात तर तोंडाला रुमाल लावल्याशिवाय जाऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे, यादृष्टीनेही शासनाने विचार करावा व या विभागाचा निधी वाढवून द्यावा, अशी माझी सूचना आहे. व्यवसाय प्रशिक्षणामध्ये 8-10 कोटी रुपये खरेदीवर खर्च केले त्याचे काय झाले याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांनी वक्फ बोर्डाच्या संदर्भात सांगितले की, औरंगाबाद मध्ये वक्फ बोर्डाचे एकच कार्यालय असून तेथील सर्व अधिकारी ॲरोगंट आहेत. त्या कार्यालयात गेलो आणि आमदार आहे म्हणून सांगितले असता "कोण आमदार" अशी विचारणा करतात आणि म्हणतात की "मुझे आमदार के बारे में कुछ नही समझता, मैं दूसरे विभाग से आया हूँ. आमदारांनाही ते ओळखत नाही, आमदार त्यांना माहीत नाही. अशा कोणत्या विभागाचे अधिकारी तेथे आणून बसविले आहेत ? त्यांनी वक्फची 40 टक्के जमीन विकून टाकली. अशा ठिकाणी एक प्रसिध्दी म्हणून जो माणूस बसवितात तो कोणत्याही प्रकारचा असो, या विभागावर माननीय मंत्री महोदय ज्याप्रमाणे कडक स्वभावाचे आहेत तसेच त्यांनी काम करावे आणि आपली तडफ या विभागावर दाखविणे गरजेचे आहे, पण ते होत नाही याचे वाईट वाटते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

सभापती महोदय, बाब क्रमांक 174, पृष्ठ क्रमांक 254, आरोग्य विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मी माझ्या आरोग्य केंद्रात फोन करुन मेडिकल ऑफिसरला सांगितले की, मला डायबेटीसचा त्रास होत असल्यामुळे मला डायबेटीसच्या संदर्भातील गोळया हव्या आहेत तेव्हा त्या डॉक्टरने मला फोन वर सांगितले की, आमच्याकडे डायबेटीसच्या गोळया नाहीत. सभापती महोदय, जर एखाद्या आमदाराला अशी वागणूक दिली जात असेल तर सामान्य नागरिकाचे काय होत असेल याचा विचारच केलेला बरा. डॉक्टरानी पुढे असे सांगितले की, जोपर्यंत आरोग्य विभाग 3.5 कोटी रुपये देत नाही तोपर्यंत औषधे भेटणार नाहीत. आमच्याकडे औषधे आल्यानंतर तुमच्या औषधाचे बघू. तुम्हाला आता औषध हवे असेल तर तुम्हाला निलंग्यावरुन मिळू शकेल. म्हणजे मी डायबेटीसचे औषध आणण्यासाठी लातूरवरुन निलंग्याला जावे काय ? आमच्या लातूरच्या सुधीर गुत्तेकरांनी रुग्णांना औषध वेळेवर मिळावे म्हणून लातूर येथील महात्मा गांधीच्या पुतळयाला सात दिवस निवेदन दिले होते. अधिका-यांना आणि मंत्र्यांना निवेदन देऊन काही उपयोग होत नसल्यामुळे त्यांनी शेवटी महात्मा गांधीच्या पुतळयालाच निवेदन दिले. आणि शेवटी आठव्या दिवशी उपोषण सुरु केले. आमच्या जिल्हा रुग्णालयातील एमआरआय, सीटी स्कॅन, डायलेसीस, एक्सरे मशीन बंद पडलेले आहे. या मशीन का बंद आहे असे विचारले तर डॉक्टर सांगतात की, आमच्याकडे विद्युत पुरवठा नसल्यामुळे मशीन सुरु करता येत नाही.

सभापती महोदय, मी जीव तोडून माझे विचार मांडीत आहे परंतु सभागृहात संबंधित विषयाच्या संदर्भात कॅबिनेट किंवा राज्य मंत्री सुध्दा उपस्थित नाहीत. त्यामुळे मी जे काही मुद्दे मांडीत आहे त्यासंदर्भात माहिती कोणते मंत्री देतील.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी पुरवणी मागण्यावर चर्चा सुरु आहे असे असतांना संबंधित विभागाचे राज्य मंत्री सुध्दा सभागृहात उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्य सिरिअसली विचार मांडत आहे असे असतांना सभागृहात राज्य मंत्रीही उपस्थित नसणे हे काही योग्य नाही. त्यामुळे जोपर्यंत संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित होत नाही तोपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावे अशी माझी मागणी आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये पुरवणी मागण्यावर चर्चा सुरु असून सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आपले विचार मांडत आहेत. जॉईंट रिस्पॉन्सिबिलीटी म्हणून आम्ही सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांची नोंद घेत आहोत. सन्माननीय सदस्यांच्या मुद्यांना संबंधित विभागाचे मंत्री महोदय उत्तर देतील. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना सभागृहामध्ये येऊ द्यावे. ते येई पर्यंत सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करावी. ज्या विभागाच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरू आहे. त्या विभागाचे एकही मंत्री येथे उपस्थित नाहीत. सभापती महोदय, मी आपल्या हे ही निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, पिठासीन अधिकाऱ्यांना माननीय मंत्र्यांनी त्यांच्या आसनावर बसून आदेश देणे हे चुकीचे आहे. आता माननीय मंत्रिमहोदय हातवारे करून आपल्याला सांगत होते. हे चुकीचे आहे.

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर हे वरिष्ठ सदस्य आहेत. त्यांचा आदर राखून मी बोलत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्हाला सभागृहात माननीय राज्यमंत्री उपस्थित असतील तर ते देखील चालेल.

प्रा.सुरेश नवले (बसून) : आम्हाला देखील पुरवणी मागण्यांवर आमच्या भावना व्यक्त करावयाच्या आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरू असताना किमान राज्यमंत्री तरी सभागृहात उपस्थित असले पाहिजेत. पुरवणी मागण्या मंजूर करून घेणे ही मंत्र्यांची जबाबदारी असते. ती आमची जबाबदारी नाही. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले हे सत्ताधारी पक्षात आहेत. पुरवणी मागण्यांवर आपल्याला विचार व्यक्त करावयाचे नसतील तर करू नका. आपण हे कशासाठी बोलत आहात ? माननीय मंत्री हे खालच्या सदनाचे सदस्य आहेत हे मला मान्य आहे. ते खालच्या सदनामध्ये गेल्यामुळे सभागृहाची बैठक आपण दहा मिनिटांकरिता स्थगित करावी. येथे मंत्रिमहोदय उपस्थित नसणे हे बरोबर नाही.

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर चर्चा सुरू आहे हे बरोबर आहे. पण ज्या विभागाच्या पूरक मागण्यांवर चर्चा सुरू आहे त्या विभागांचे राज्यमंत्री उपस्थित असले पाहिजेत असा नियम नाही. उद्या आपण ....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, असे जर असेल तर या सदनामध्ये फक्त एकच मंत्री बसवावा. हे आम्ही नवीनच ऐकत आहोत. सदनाला मंत्र्यांची गरज नाही हे सन्माननीय सदस्य कसे काय सांगत आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हे कुठल्या नियमामध्ये आहे हे आपण सदनाला दाखवून द्यावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महत्त्वाच्या विषयावर चर्चा असेल तर मी समजू शकतो. काल सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी कॅबिनेट मिटींगला जायचे आहे असे सांगितले. त्यामुळे नगरविकास राज्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित नव्हते. हे मी समजू शकतो. आज 10 हजार कोटी रूपयाच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर आल्या आहेत. पण एकही मंत्री उपस्थित नसेल तर मग या मागण्यांवर चर्चा होऊ शकत नाही. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता स्थगित करावे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी उपसभापती)

श्री.पांडुरंग फुंडकर..

अशापध्दतीने सभागृहाचे कामकाज चालविण योग्य होणार नाही. सभागृहात संबंधित विभागाचे मंत्री येईपर्यंत आपण सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता स्थगित करावे अशी माझी आपणास आग्रहाची विनंती आहे. सभागृहात मंत्री उपस्थित झाल्यानंतर आपण पुन: पुरवणी मागण्यांवरील चर्चेस सुरुवात करु या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, सभागृहात मंत्री उपस्थित असण्याची गरज नाही. आपणही तसेच रुलिंग द्यावे. याठिकाणी एकच मंत्री बसवावा अन्य मंत्र्यांची गरज नाही. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. ..

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी नियम सांगितला....

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, समोरील बाकावरील सदस्य अतिशय समंजस आहेत. काल देखील त्यांनी आम्हाला चांगली मदत केली होती. याठिकाणी दोन-तीन मंत्री उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांची आम्ही नोंद घेत आहोत. संबंधित विभागाचे मंत्री काही कारणाकरिता दहा मिनिटाकरिता बाहेर गेले आहेत, आम्ही त्यांना सभागृहात पुन्हा बोलावितो .आपण आम्हाला सहकार्य करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण या संदर्भात निर्णय द्यावा. पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरु असताना संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. इतर विषयाच्या बाबतीत आम्ही समजू शकतो. परंतु पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्यावेळी मंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. आपण याठिकाणी 10 हजार कोटी रुपयांची मागणी मंजूर करीत आहोत. याठिकाणी मंत्रिमहोदय उपस्थित राहत नसतील तर तो विरोधी पक्षाचा अवमान आहे. आपण सभागृह स्थगित करीत नसाल तर आम्ही बहिर्गमन करतो.

उपसभापती : पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे या आपल्या मताशी मी सहमत आहे. सभागृह सुरु असताना काही वेळा अपरिहार्य परिस्थिती निर्माण होते त्यावेळी आपण एकमेकांना सहकार्य करतो.....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण ही प्रथा सुरु केल्यास पुढील पुरवणी मागण्यांच्यावेळी एकही मंत्री उपस्थित राहणार नाही. सभागृहाचे कामकाज प्रथा,परंपरा आणि नियमाप्रमाणे चालले पाहिजे. आपण कोणत्याही प्रकारच्या वाईट प्रथा पाडू नका अशी माझी विनंती आहे. तेव्हा सभागृहात संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित नसताना पुरवणी मागण्यावंरील चर्चा पुढे चालू ठेऊ नका अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाचे कामकाज सायंकाळी 5 वाजून 59 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाले)

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगिती नंतर

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 6.11 ते 6.20 पर्यंत स्थगित झाली)

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती : सभागृहाचे कामकाज 6.30 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सायं.6.21 ते 6.30 बैठक स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 6.32 ते 6.42 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

उपसभापती : विधानसभा सभागृहामध्ये पुरवणी विनियोजन विधेयकावर चर्चा चालू आहे. ते विधेयक मंजूर झाल्यानंतर कॅबिनेट मंत्री या सभागृहामध्ये येतील व त्यानंतर पुरक मागण्यांवरील चर्चा पुढे सुरु करण्यात येईल. तोपर्यंत सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 1- नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक चर्चेला घेण्यात येईल. माननीय मंत्रिमहोदयांनी आपले विधेयक मांडावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

पृ. शी. : नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. I OF 2010

(A BILL FURTHER TO AMEND THE REGISTRATION ACT, 1908, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 1- नोंदणी अधिनियम, 1908 महाराष्ट्र राज्यात लागू असताना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 1- नोंदणी अधिनियम, 1908 महाराष्ट्र राज्यात लागू असताना, त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, नोंदणी अधिनियम, 1908 महाराष्ट्र राज्यात लागू असताना त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक सभागृहासमोर आणलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नोंदणी अधिनियम हा केन्द्रीय कायदा आहे. परंतु त्यामध्ये राज्यापुरत्या आपल्या राज्य शासनास वेळोवेळी सुधारणा करण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. दस्त नोंदणीच्या संगणीकृत कार्यप्रणालीमुळे दस्त नोंदणी सेवा जनतेला तत्परतेने उपलब्ध व्हावी यासाठी ही सेवा इंटरनेटच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच महसूलातील गळती रोखण्यासाठी काही दस्तांची नोंदणी अनिवार्य करणे, काही विशिष्ट दस्त नोंदणी करण्याचे अधिकार प्रदान करणे, मिळकतीच्या व्यवहारामध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी या अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. सामाईक क्षेत्रामध्ये दुय्यम निबंधक नेमण्याचे अधिकार शासनास आहेत. त्यांच्याकडे सर्व प्रकारच्या दस्तांची नोंदणी करता येते. काही विशिष्ट दस्तांच्या नोंदणीचा अधिकार बँकेसारख्या संस्थांना देणे शक्य व्हावे यासाठी नोंदणी अधिनियम 1908मध्ये कलम 7(1)मध्ये परंतुकाचा समावेश केलेला आहे. यासंबंधात उदाहरण द्यावयाचे झाले तर लिव्ह ॲण्ड लायसन्स सारख्या दस्तांची संख्या मुंबई, पुणे आणि ठाणे या शहरांमध्ये फार मोठी आहे. त्यांची नोंदणी फी ठराविक आहे. म्हणून बँकासारख्या संस्थेकडे हे अधिकार दिले तर सर्वसामान्य जनतेला ते सोयीचे होणार आहे. सध्या नोंदणी कार्यालयाच्या माध्यमातून या दस्तांची नोंद होते.सर्वसामान्य माणसाला जास्त चांगली सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी ही सुधारणा येथे आणलेली आहे. भारतीय नोंदणी कलम 1908 मधील कलम 17 मध्ये कोणकोणेत्या दस्तांची नोंदणी अनिवार्य आहे याची यादी दिलेली आहे. कलम 17 मध्ये "एच" आणि "जी" समाविष्ट करुन डिपॉझिट ऑफ टायटल डीड, कोणत्याही वसुली अधिका-याकडून निर्गमित करण्यात आलेली प्रमाणपत्रे व स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधात करण्यात आलेले कुलमुखत्यारपत्र या दस्तांची नोंदणी अनिवार्य करणे या विधेयकाच्या माध्यमातून शक्य होणार आहे. जेव्हा दस्त नोंदणीसाठी दाखल होतील त्यावेळी मुद्रांक शुल्काची देखील पडताळणी होईल. त्यामुळे शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात वाढेल. दस्तांची नोंदणी अनिवार्य करण्यासाठी कलम 17 मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे अधिनियमाचे कलम 22 (अ) निरसित करावयाचे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या राजस्थान सरकार विरुध्द नाहटा या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने हे कलम घटनेच्या विरुध्द असल्याचे घोषित केलेले आहे. त्यामुळे 22(अ)ची तरतूद निरसित करणे आवश्यक आहे. आता कोणत्याही दस्ताची नोंदणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश सोळंके...

ही जनहित विरोधी म्हणून आपल्याला नाकारता येणार नाही. यापूर्वी या कलमाचा आधार घेऊन लाभ क्षेत्रातील अतिरिक्त जमिनीच्या विक्रीवर बंदी आणलेली होती. तसेच गुंठेवारीची नोंदणी देखील या कलमाचा आधार घेऊन अग्राह्य मानली होती. आता हे कलम घटनाविरोधी असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे या संदर्भात घेतलेले निर्णय रद्द करावे लागले. तसेच हे कलम देखील कायद्यातून काढून टाकावे लागत आहे. म्हणून हे सुधारणा विधेयक येथे आणलेले आहे.

भारतीय नोंदणी अधिनियम कलम 32, 34, 35 आणि 69 मध्ये इंटरनेटच्या माध्यमातून दस्त नोंदणी सादर करताना व्यक्तिगतरित्या उपस्थित राहाणे यापुढे आवश्यक राहाणार नाही.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

सध्या राज्यात जे खरेदी विक्रीचे व्यवहार होतात त्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात खरेदीदार आणि विक्रेता या दोघांनाही उपस्थित रहावे लागते. एखादी व्यक्ती मुंबईमध्ये रहात असेल आणि तिला पुण्यातील एखाद्या दस्तऐवजाची नोंदणी करावयाची असेल तर मुंबईमधील दुय्यम निबंधक कार्यालयात स्वत: जाऊन आपल्या दस्ताची ॲडमिशन करुन घेऊ शकते, अशी सुविधा देण्याची तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आली आहे.

सभापती महोदय, कलम ६९ अन्वये नोंदणी निरीक्षकांना याबाबतचे नियम करता येतील अशी तरतूद केली आहे. आता इंटरनेटद्वारे दस्त नोंदणीच्या कार्यप्रणालीचे नियम करणे शक्य होणार आहे. विधी आयोगाच्या १७८ व्या अहवालामध्ये स्थावर मालमत्तेच्या विक्री व्यवहारात पारदर्शीपणा यावा आणि मिळकत विकत घेणाऱ्या पक्षकारास मिळकतीसंबंधीचे न्यायालयाचे आदेश, मिळकतीवरील बोजा, टाच इत्यादीबाबतची माहिती व्हावी म्हणून नोंदणी अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. यासंबंधीची तरतूद करुन त्याबाबतचे अभिलेखे एका नोंदवहीत दुय्यम निबंधक कार्यालयात उपलब्ध करुन ठेवण्यासाठी कलम ६९ क, ६९ ख, ६९ ग आणि ६९ घ समाविष्ट करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. विशेषत: मुंबई, ठाणे आणि पुणे या महानगरांमध्ये दस्तऐवजांची नोंदणी करणे सर्वसामान्यांच्या दृष्टीने जिकिरीचे झालेले आहे. आजच्या परिस्थितीत प्रत्येक दुय्यम निबंधक कार्यालयात दररोज सरासरी ३५ ते ४० दस्तऐवजांची नोंदणी होते. म्हणून महसूल विभागाने निश्चितपणे काही पावले उचलली आहेत. मुंबई, ठाणे आणि पुणे या ठिकाणी पहिल्या टप्प्यामध्ये जवळजवळ ६० नवीन कार्यालये निर्माण करण्याचे काम या विभागाच्या माध्यमातून सुरु आहे. त्याचबरोबर सुधारित सॉफ्टवेअरच्या माध्यमातून दररोज किमान ८० ते १०० दस्तांची नोंदणी करता येईल अशा प्रकारचे सॉफ्टवेअर विकसित केले असून त्यासंबंधीच्या ट्रायल्स सुरु आहेत. याबाबत टेंडर सुध्दा मागविले आहे. याबाबतचा निर्णय झाल्यानंतर पुढील दोन-तीन महिन्यांच्या काळात या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून गतिमान काम या कार्यालयात होण्यास मदत होणार आहे. या कार्यालयाच्या वेळा बदलण्याचे ठरविले आहे. यापुढे सकाळी ७.०० ते दुपारी २.०० आणि दुपारी २.०० ते सायंकाळी ७.०० पर्यंत दोन शिफ्टमध्ये ही कार्यालये सुरु राहणार आहेत. त्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला सुविधा उपलब्ध होणार आहे. विविध मार्गांनी सर्वसामान्यांकडून मोठया प्रमाणात कर गोळा केला जातो त्या माणसांना दुय्यम

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

निबंधक कार्यालयात गेल्यानंतर जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत या दृष्टीकोनातून हे सुधारणा विधेयक याठिकाणी आणलेले आहे. या विधेयकाला पाठिंबा देऊन ते मंजूर करावे अशी मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक-१ यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाचा खरा उद्देश म्हणजे तातडीने दस्तऐवजांची नोंदणी व्हावी हा आहे. इंटरनेटद्वारे दस्तांची नोंदणी सुलभ व्हावी यासंबंधीची तरतूद पूर्वीच्या कायद्यात नव्हती. आता दस्तऐवजांची नोंदणी इंटरनेटद्वारे करण्याची तरतूद सुधारणेच्या माध्यमातून करण्यात येत आहे असे विधेयक वाचल्यानंतर लक्षात येईल. नोंदणी हा विषय मुळात फार गंभीर आहे. मंत्रीमहोदयांनी याठिकाणी माहिती देणे आवश्यक होते. मी काल वांद्रे येथील नोंदणी कार्यालयात गेलो होतो.

(नंतर ४इ.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मी तेथे पाहणी करण्यासाठी गेलpो नव्हतो तर नोंदणी करण्यासाठीच गेलो होतो त्या कार्यालयात दिलेले संगणक 8 वर्षापूर्वीचे जुने आहेत आणि हीच अवस्था जवळपास राज्यातील सर्वच नोंदणी कार्यालयात आहे. यावरुनच आपली यंत्रणा या तरतुदीनंतरही कशा प्रकारे चालणार हे लक्षात येईल. या विधेयकात सर्वात महत्वाचा भाग जो आलेला आहे तो कलम 17 मधील असून कलम 18 हे इररिव्होकेबल पॉवर ऑफ ॲटर्नीच्या संदर्भातील असून "उक्त अधिनियमाच्या कलम 18 अन्वये स्थावर मालमत्ता हस्तांतरण करण्याच्या संबंधातील रद्द न करता येण्याजोगा मुखत्यारनामा यांची जरी नोंदणी ऐच्छिक असली तरी, बाहुविधवादांच्या परिणामस्वरुप नोंदणी करण्यासाठी भार पडणार आहे. म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 17 च्या तरतुदीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे त्यामुळेच अशा प्रकारचे दस्तऐवज सक्तीच्या नोंदणी कक्षेत घेण्यात येत आहेत" असे आपण यात म्हटले आहे. यापूर्वी असे दस्तऐवज फक्त नोटराईज्ड होत होते आणि त्याची मुदत फक्त तीन वर्षांसाठीच असायची. योग्य-अयोग्य, बरोबर की चूक असे म्हणण्यापेक्षा "बिफोर मी" म्हणून शिक्का मारतो, म्हणजे कोणाला त्रास नको. अशी नोटरी करण्यासाठी कोणीही जायचे आणि शिक्का मारुन आणायचे हे सर्रास चालत होते म्हणून आता इररिव्होकेबल पॉवर ऑफ ॲटर्नी कंपल्सरी केली हा विषय आहे. पूर्वी हे काम एसईओ सुध्दा करुन देत होते. यामध्ये प्रश्न असा निर्माण होतो की, पूर्वी मुखत्यार पत्र करीत होतो ते केवळ 100,200 किंवा 500 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर होत होते आता मात्र ही इररिव्होकेबल पॉवर ऑफ ॲटर्नी जे करणार त्याची स्टॅम्प डयुटी किती भरावी लागणार ? कारण त्याचा संबंध त्या मालमत्तेशी असतो असे आपण समजत आलो. पण ते कन्व्हेयन्स आहे की कन्व्हेयन्स करायचा अधिकार आहे हे स्पष्ट होत नाही. परंतु असे मुखत्यार पत्र जेव्हा हस्तांतरण करण्याची वेळ येईल तेव्हा पुन्हा त्यावर स्टॅम्प डयुटी भरावी लागेल काय हे समजत नाही. एखाद्या मालमत्तेच्या संदर्भात मला मिळालेले मुखत्यार पत्र पुन्हा हस्तांतरित करावयाचे असेल तेव्हा मूळ मालकाची गरज नव्हती कारण हस्तांतरणाचा मुखत्यारनामाच मला दिलेला आहे. परंतु आता ही दुरुस्ती केल्यानंतर अशा दस्तऐवजांवर मुद्रांक शुल्क किती आकारणार आहात हे स्पष्ट झाले पाहिजे. एखाद्या मालमत्तेची किंमत 70-80 लाख होत असेल ती घेत असताना स्टॅम्प डयुटी घेतली जाते परंतु ती विकल्यानंतर अथवा अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

प्रकारच्या इररिव्होकेबल पॉवर ऑफ ॲटर्नीच्या माध्यमातून पुन्हा ती हस्तांतरित करण्याची वेळ येईल तेव्हा किती स्टॅम्प डयुटी घेतली जाईल, ती डबल घेणार काय असा गोंधळ यामध्ये झालेला आहे. हे आतापर्यंत अनिवार्य केलेले नव्हते. आता मात्र ते अनिवार्य करण्यात आले आहे. पूर्वी नोटराईज्ड डाक्यूमेंटला तीन वर्षापर्यंत व्हॅलिडीटी होती पण आता अशी नोंदणी अनिवार्य केल्यामुळे मुद्रांक शुल्क हा विषय पुन्हा आलाच. अशी नोटरी करत असताना मला मुद्रांक शुल्क भरण्याची गरज नव्हती तर केवळ 100-200 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर ती करता येत होती परंतु आता पूर्ण मुद्रांक भरावे लागणार आहे अशी तरतूद या कायद्यात आपण करीत आहोत. यासंबंधीचे योग्य मार्गदर्शन आपल्या सर्व कार्यालयांमध्ये जाणे आवश्यक आहे. तसेच अशा मालमत्तेचे हस्तांतरण करीत असताना मुद्रांक शुल्काबाबत शासनाची कोणती भूमिका असणार आहे, काय धोरण असणार आहे हे देखील स्पष्ट होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

"ग" चा अर्थ मंत्री महोदयांनी या ठिकाणी समजून सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असतो की, एकदा एखाद्या सार्वजनिक उपक्रमाकरिता एखादे क्षेत्र जाहीर झाले की, त्या क्षेत्रातील त्याच्या शेताची खरेदी विक्री त्याला करता येत नाही. उपक्रम क्षेत्र जाहीर झाल्यानंतर ही जमीन सरकार घेतही नाही आणि तेथील शेतक-यांना ती जमीन विकताही येत नाही अशी परिस्थिती आहे. ग्रामीण भागातील शेतक-यांची ही एक मोठी तक्रार असते. राजस्थान राज्य विरुध्द बसंत नाहटा, 2005 चा जो निकाल आहे तो निकाल अतिशय चांगला आहे. हा निकाल सर्वसाधारण शेतक-यांच्या बाजूचा आहे. जोपर्यंत शासनाचा प्रकल्प पुढे जात नाही तोपर्यंत ती जमीन शासनही घेत नाही आणि ती जमीन शेतकरी विकूही शकत नाही. यामुळे त्या लाभक्षेत्रातील शेतक-याची कुचंबणा होत असते. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपकर यांनी कोकणातील शेतक-यांचा विषय मांडला होता. चार्टड अकाऊंट असोशिएशनचे परवा एक मोठे संमेलन भरले होते त्या कार्यक्रमावर विचार मांडण्यासाठी मला निमंत्रित करण्यात आले होते. मी तेथे सांगितले की, तुम्ही मोठमोठया धनिकांचे काम करीत असता परंतु छोटया शेतक-याकडे समाजकार्य म्हणून तरी बघणार आहात काय ? त्यानंतर या विषयावर त्या ठिकाणी बरीच चर्चा झाली. शेतक-याला इन्कम टॅक्स लागत नाही. ज्यावेळेस शासन शेतक-याची जमीन अधिग्रहीत करते त्यावेळेस शेतक-याला आपण इन्कम टॅक्स लावत नाही परंतु त्या जमिनीवर असलेल्या घराच्या संदर्भातील टीडीएस कापून घेत असतो. शेतकरी अनपढ असतो. टीडीएस परत मिळत असतो परंतु शेतक-याला यासंदर्भात काहीच माहीत नसते. टीडीएस परत घ्यावयाचा असेल तर शेतक-याला पॅनकार्ड काढावे लागते व पॅनकार्ड काढल्यानंतर रिफंड क्लेम करावा लागतो. हे सर्व व्याप तुम्ही शेतक-याच्या पाठीशी लावतात. सिधुंदुर्ग जिल्हयामध्ये सुध्दा असाच प्रश्न निर्माण झाला होता.

उपसभापती : आपण आपण या बिलावरील चर्चा थांबवून विनियोजन विधेयक चर्चेला घेऊ.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता हे जे बील सुरु आहे ते पूर्ण होऊ द्या. हे बील पूर्ण झाल्यानंतर पुढील कार्यक्रम बघू. प्रत्येक वेळेला तुमची सोय का बघावी ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

खालच्या सभागृहात सरकारची कुचंबणा झाली होती त्यावेळेस आम्ही तुम्हाला सहकार्य केले होते. माननीय सभापती महोदयांचा शब्द पाळून तडजोड केली. सन्माननीय मंत्री महोदय श्री. रामराजे निंबाळकर हे या सदनाचे सदस्य असून ते मंत्री आहेत. हे बील झाल्यानंतर विनियोजन विधेयक घ्याल आणि विनियोजन विधेयक झाल्यानंतर पुरवणी मागण्यांना सुरुवात झाली की, तुम्ही निघून जाल आणि येथे सन्माननीय मंत्री श्री. प्रकाश सोळंके यांना पीठ मळावयास बसून जाल.

सभापती महोदय, काल विरोधी पक्षाने मुंबईच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणली त्या चर्चेमध्ये शासन ध्येय धोरण सांगत नाही हे उघड झाले. आमदारांना केवळ येथे चर्चा करावयास लावतात.

सभापती महोदय, 22 "क" आपण रद्द केला त्याचा परिणाम काय होणार हा महत्वाचा प्रश्न आहे. अधिग्रहीत जमिनीचा मुद्दा हा शेतक-यांच्या दृष्टीने फार महत्वाचा आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

आता आपण त्यावर बंधून घालू शकणार आहात. त्यामुळे लाभक्षेत्र जाहीर केल्यानंतर ठराविक मुदतीच्या आत ते शासनाला आता ताब्यात घ्यावे लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एक तर ताब्यात घ्या नाही तर कुणालाही वर्षानुवर्षे टांगत ठेवू नका असा त्याचा अर्थ होतो. यापुढे सरकारच्या योजना मंजूर करत असताना हा जो रद्द झालेला महसूल कायदा आहे, त्याचा आता अनिवार्यपणे विचार प्रत्येक खात्याला, प्रत्येक प्रकल्पाच्याबाबतीत करावा लागेल. त्यामुळे शासन हे विधेयक मांडून मोकळे होणार नाही. ज्या ज्या खात्याचे प्रकल्प सुरू होणार आहेत त्यांना कळवावे लागेल की, ते वेळेमध्ये पूर्ण करावेत. तो आपल्याकडे ठेवेल काय याचे आता बंधन राहिलेले नाही. तो मुक्त झाला आहे.

न्यायालयाने एक चांगला निर्णय दिला आहे. एक चांगली बाब घडली आहे. कलम 69 मध्ये आपण सुधारणा केली आहे. ही सुधारणा इलेक्ट्रॉनिक माध्यमासंबंधी आहे. ही सुधारणा विधेयकाचा मूळ उद्देश आहे. त्यानिमित्ताने मी काही बाबी आपल्यापुढे मांडणार आहे. खंड 6 (क) मध्ये नमूद करण्यात आले आहे की, "पोट कलम(1) मध्ये, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल." पण याची मूळ तरतूद अशी आहे की, "राज्य शासन, सार्वजनिक धोरणाच्या विरोधातील कोणताही दस्तऐवज किंवा दस्तऐवजाचा प्रकार, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे घोषित करू शकेल. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, पोट कलम (1) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना लागू असणाऱ्या कोणत्याही दस्तऐवजाची नोंदणी करण्यास, नोंदणी अधिकारी नकार देईल." त्याच्या पुढे असे नमूद केले आहे की, "परंतु, आणखी असे की, जेव्हा असा दस्तऐवज इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करण्यात येईल, तेव्हा जातीने उपस्थित राहण्याची आवश्यकता नसेल." म्हणजे आता तो इंटरनेटवर जाईल. इंटरनेटवर नोंदणी करताना तो इकडचा नोंदणीकृत असायला हवा. तरच तो तेथे स्वत: आहे हे मान्य केले जाईल. परंतु, जेव्हा असे दस्तऐवज इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे सादर करण्यात येतील तेव्हा याबाबतीत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार चौकशी करण्यात येईल. याचा मी खुलासा मागणार होतो. परंतु, त्यासंबंधीचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या निवेदनामध्ये केला आहे. तो कुठे असेल याची फोड होत नव्हती. पण तो खुलासा मंत्रिमहोदयांनी केला आहे. त्यामुळे मी इंटरनेटवरील नोंदणी माझ्या घरातून करू शकणार नाही. हा विषय आहे. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, जेव्हा इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे दस्तऐवज सादर करण्यात येईल, तेव्हा व्यक्तीच्या तपासणीकरिता याबाबतीत तयार करण्यात आलेल्या नियमांद्वारे निर्धारित करण्यात आलेली कार्यपद्धती अनुसरण्यात येईल. ती पद्धती मंत्रिमहोदयांनी सांगितली आहे. यासंबंधी मघाशी माझ्या मनामध्ये प्रश्न निर्माण झाला होता. पण यासाठी संपूर्ण कार्यालये इंटरनेटने जोडावी लागतील. तशी परिस्थिती आहे काय ? आज तशी परिस्थिती नाही हे मी आपल्याला खात्रीने सांगतो. हा कायदा मंजूर करीत असताना आपली सर्व नोंदणी कार्यालये इंटरनेटशी जोडली आहेत काय ? याचा खुलासा करावा व त्यासाठी कोणती तरतूद केली आहे हे देखील सांगावे. जुनी जी पद्धत आहे ती बदलून अद्ययावत तंत्रज्ञान आणणार आहात काय ? याचा देखील खुलासा करावा. आज आपण पुरवणी मागण्या मंजूर करणार आहोत त्यामध्ये काही तरतूद आहे काय ? याचा देखील आपण खुलासा करावा. अन्यथा आपल्याला नागपूर पर्यंत थांबावे लागेल. आपले दुय्यम निबंधक कशा पद्धतीने तरतूद करून घेतात त्याचेही वर्णन मी पुढे करणार आहे. तेव्हा आपण म्हणाल तरतूद न करताच सगळे होत आहे. बरेच आहे. पण त्या मागचा मेवा महत्त्वाचा असतो. त्यामुळे तरतुदी होत असतात. आपला मुद्रांक शुल्क कायदा हा व्हॅल्युएशन बेसिसवर आला आहे.

यानंतर श्री.अजित....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सन 1995 नंतर हा कायदा आला. 1985 पूर्वी जे काही दस्तऐवज होते हे पाच रुपयात रजिस्टर व्हायचे त्यास मुद्रांक शुल्क वगैरे काही नव्हते. त्यावेळी रजिस्टर झालेल्या दस्तऐवजांना आता आपण सूट देत नाही. जर एखादा पुन्हा दस्तऐवज नोंदविण्यास गेला तर त्याचे प्रचलित दराने व्हॅल्यूएशन होईल व त्याप्रमाणे मुद्रांक शुल्क आकरण्यात येईल. दिनांक 10.12.1995 पासून बाजार मूल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारीत आहोत. 1985 पूर्वी पाच रुपयांत नोंदणी होत होती. त्या काळात आणि सन 2000 पर्यंत ज्यांनी बाजार भावाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरलेले नाही त्याबाबत शासनाची कोणती भूमिका राहणार आहे ? मी 30 वर्षापूर्वी जागा घेतली असेल आणि आज तेथेच राहत आहे. मी माझी जागा कोणालाही हस्तांतरीत केली नाही की विक्री केली नाही. मी मुद्रांक शुल्क पूर्ण भरलेले आहे, कायद्यातील तरतुदीप्रमाणे रजिस्टर्ड होऊन मला डॉक्युमेंट परत देखील मिळालेले आहे. आता ज्यावेळी सोसायटी रजिस्ट्रेशन होईल त्यावेळी त्या निवासी गाळ्यावर नवीन पध्दतीने मुद्रांक शुल्क आकारणी होईल ती आताच्या भावाप्रमाणे आकारणी होईल काय ? मी जागा विकत असेन तर आताच्या भावाने मुद्रांक शुल्काची आकारणी होईल,पण मी जागा विकणार नसेन तर मला मुद्रांक शुल्कामध्ये सूट मिळाली पाहिजे. मी जेव्हा गाळा विकेन तेव्हा शासनास मुद्रांक शुल्क भरणार आहे. तेव्हा शुल्क आकारण्यामध्ये काही गैर नाही.

काल माननीय मुख्यमंत्र्यांनी जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाची अट 1962 वरुन 1969 वर आणली आहे. या निर्णयामुळे जुन्या 3 हजार इमारतींना पुनर्विकासाचा लाभ मिळणार आहे. आतापर्यंत 16 हजार इमारतींना लाभ मिळणार होता, परंतु नवीन निर्णयामुळे 19 हजार इमारतींना लाभ मिळणार आहे. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, ज्यांनी 1985 पूर्वी रीतसर कायद्याला अनुसरुन आपल्या दस्तऐवजाची सरकारी कार्यालयात नोंदणी केली आहे. त्याच्याकडे नोंदणीची सर्व कागदपत्रे असतील आणि त्याने हस्तांतरण केले नसेल तर त्याच्यावर मुद्रांक शुल्क आकारता कामा नये. मात्र विक्री झाल्यानंतर आजच्या बाजारभावाने मुद्रांक शुल्क भरावे लागेल हे मी मान्य करतो. सहकारी सोसायटीच्या संदर्भातील डीम्ड कन्व्हेन्सचा कायदा मंजूर केला त्या संदर्भातील विषय आहे. ज्या सोसायट्या जुन्या झालेल्या आहेत त्यांना कारण नसताना मुद्रांक शुल्क भरावयास लावत आहोत हे योग्य नाही. विक्री केली तर मुद्रांक शुल्क भरण्यासंबंधीचा नियम योग्य आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, खंड 9 मधील 89 (ख) हा सावकरी संदर्भात कसा लागू होईल हा प्रश्न आहे. 89 (ख) मध्ये नमूद केलेले आहे की, "संपत्ती हस्तांतरण अधिनियम, 1882 याच्या कलम 58 मधील, खंड (च) अन्वये हक्कलेख निक्षेपाद्वारे स्थावर मालमत्ता गहाण ठेवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस, ती गहाण ठेवण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, कलम 21 द्वारे आवश्यक केल्याप्रमाणे, त्याने अशा पध्दतीने मालमत्ता गहाण ठेवली असल्याबाबतची माहिती देणारी नोटीस,त्याचे नाव, पत्ता, गहाणधारकाचे नाव, पत्ता, गहाण ठेवण्यात आल्याचा दिनांक, गहाण ठेवल्यामुळे प्राप्त झालेली रक्कम, देय व्याजाचा दर,जमा केलेल्या दस्तऐवजांची सूची व स्थावर मालमत्तेचे वर्णन या विषयीच्या तपशीलासह स्थित असलेल्या मालमत्तेचा संपूर्ण किंवा कोणताही भाग ज्या नोंदणी अधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्राच्या स्थानिक सीमांच्या आत येत असेल अशा नोंदणी अधिकाऱ्याकडे दाखल करील आणि उक्त अधिकारी त्याच्या पुस्तक क्र.1 मध्ये ती दाखल करील." आता ग्रामीण भागामध्ये कोणतीही वस्तू गहाण ठेवली तर त्याची नोंदणी केली पाहिजे अशी कायद्यात तरतूद आहे. असे न केल्यास 12 टक्के व्याजाने दर आकारण्यात येईल अशी नोंद आहे. याठिकाणी खंड 9 मधील 89(ग) मध्ये नमूद केलेले आहे की, "...एक वर्षापेक्षा कमी नसेल मात्र तीन वर्षापर्यंत असू शकेल." म्हणजे माझी प्रॉपर्टी मीच गहाण ठेवली आहे, पण मी त्याची नोंदणी केली नाही अशाप्रकारचा गुन्हा माझ्या हातून झाल्यास एक वर्षापेक्षा कमी नसेल आणि तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीपर्यंत कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येईल व द्रव्यदंडाची शिक्षाही प्राप्त होईल."

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

.सभापती महोदय, ही बाब कोणत्या दृष्टीने गंभीर आहे, हे मला सांगता येणार नाही. परंतु सावकाराकडे गहाण ठेवणा-या व्यक्तीने आयटेम जाहीर केले नाही, म्हणून गहाण ठेवणाऱ्याला शिक्षा करण्यात येणार आहे की, ज्याने प्रॉपर्टी गहाण घेतली त्या व्यक्तीला शिक्षा करण्यात येणार आहे? मी माझी प्रॉपर्टी सावकाराकडे ठेवली तर ते जाहीर करण्याचे बंधन माझ्यावर राहणार आहे. गहाण ठेवणा-यावर हे बंधन नाही. त्यामुळे शिक्षेला कोण पात्र राहणार आहे ? या वाक्याचा मला जो अर्थ लागतो, तो मी या ठिकाणी आपल्याला सांगितला आहे. तो चुकीचा आहे, याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा केला तर मला आनंद होईल. सावकार याचा अर्थ खाजगी व्यक्ती असू शकेल, बॅका असू शकतील किंवा अन्य कोणी असू शकेल. तेव्हा जो कोणी सावकार असेल त्याने जाहीर केले पाहिजे. दस्तऐवजामधील ज्या काही बारीक सारीक बाबी असतात, त्या सामान्य शेतक-याला माहीत नसतात. दस्तऐवजामध्ये कोणत्या बाबी लिहावयाच्या असतात, हे त्याला माहीत नसल्यामुळे ते लिहिण्यासाठी वेगळा कारकून असतो व त्यासाठी काही पैसे द्यावे लागतात. परंतु या विधेयकाच्या कलम 89 (ख) मध्ये असे म्हटलेले आहे की, त्याने अशा पध्दतीने मालमत्ता गहाण ठेवली असल्याबाबतची माहिती देणारी नोटीस त्याचे नाव, पत्ता, गहाणधारकाचे नाव, गहाणधारकाचे पत्ता, गहाण ठेवण्यात आल्याचा दिनांक इत्यादी माहिती द्यावयाची आहे. परंतु ही माहिती न दिल्याबद्दल मालमत्ता गहाण ठेवणा-या व्यक्तीला शिक्षा होणार असेल तर ती सूचना अत्यंत आनंद देणारी आहे, एक बंधन निर्माण करणारी आहे. राज्यात बेकायदेशीर सावकारी मोठया प्रमाणावर सुरु आहे. बेकायदेशीर सावकारीला प्रतिबंध घालणारे विधेयक आता येणार आहे. हे विधेयक सध्या कोठे अडकले आहे, हे मला माहीत नाही. मागच्या वेळी मला त्या विधेयकावर बोलावयाचे होते आणि त्या विधेयकाच्या संदर्भात माझ्या 21 उप सूचना होत्या. परंतु आम्ही सभागृहाबाहेर गेल्यानंतर विधेयक घाईघाईने मंजूर करण्याची प्रवृत्ती शासनामध्ये निर्माण झालेली आहे, ती बरोबर नाही. याबाबतीत मला एक बाब आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, विधिमंडळामध्ये एखाद्या विधेयकावर चर्चा होणे, हे लोकशाहीच्या चांगल्या आरोग्याचे लक्षण मानले जाते. कोणताही कायदा सर्वंकष चर्चेतून निर्माण व्हावयास पाहिजे. त्यासाठी थोडासा वेळ लागला तरी चालेल, परंतु चांगला कायदा तयार झाला पाहिजे. कोणताही कायदा हा कायम

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

स्वरुपी निर्माण होत असतो. एखादा कायदा जर मुळातच चांगला नसेल तर असा कायदा आणखी तीन महिन्यांनी झाला तर त्यामुळे फारसा काही फरक पडणार नाही. परंतु ज्यावेळी तो कायदा होतो, त्यावेळी तो कायम स्वरुपी होत असतो. म्हणून त्यावर सर्वंकष चर्चा होऊन चांगला कायदा तयार झाला पाहिजे. या विधिमंडळामध्ये माझे सरकारमध्ये किती प्राबल्य आहे आणि मी किती मजबूत आहे, हे दाखविण्या ऐवजी कायद्यावर सर्वकष चर्चा केली पाहिजे. एखादा तरी अक्कलवान या बाजूला असू शकतो आणि तो काही तरी चांगले सांगू शकतो. त्यामुळे त्या कायद्यामध्ये चांगली तरतूद येऊ शकते आणि ही तरतूद जनहिताची असते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. सरकारने कायदा केला हे मिरविण्यासाठी कायदा करण्यात येत नाही तर सर्वसामान्य लोकांसाठी आपण कायदा करीत असतो. त्यामुळे तो कायदा जनहिताय असला पाहिजे, सामान्य माणसाच्या उपयोगासाठी असला पाहिजे. म्हणून त्या विधेयकावर सविस्तर चर्चा झाली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. या ठिकाणी होणारी सगळीच चर्चा योग्य असते, अयोग्य असते, चांगली असते वाईट असते ,बरोबर असते वा चूक असते याचा विचार न करता ज्याच्या त्याच्या बुध्दीप्रमाणे या ठिकाणी चर्चा करण्यात येत असते आणि ती चर्चा स्वीकारावी लागते. फाफटभर पसा-यातून कधी तरी चुकून एखादी चांगली सूचना करण्यात येते आणि या विधेयकामध्ये असलेली एखादी चूक लक्षात येताच ती चूक दुरुस्त केली तर जनहितासाठी चांगला कायदा केला याचे श्रेय सरकाराला मिळेल. त्या दृष्टीने विधेयकावर सविस्तर चर्चा करणे आवश्यक असते परंतु आम्ही कधी गोंधळ घालून बाहेर पडल्यानंतर सत्ताधारी पक्षाला असे वाटते की, आता विधेयके भराभर मंजूर करुन घ्यावीत. असे करीत असतांना अमुक एवढी बिले आम्ही पास करुन घेतली यामध्येच आपल्याला आनंद असतो. परंतु तसे व्हावयास नको. ठीक आहे, हा प्रत्येकाच्या पध्दतीचा प्रश्न आहे एवढेच मला सांगावयाचे आपहे.

सभापती महोदय या विधेयकाच्या पान नंबर 5 वर 89 (2) च्या क मध्ये असे म्हटलेले आहे की, "ज्या पध्दतीने नोटीसेसच्या किंवा दस्तऐवजांच्या सत्य प्रती करण्यात येतील, ती पध्दत ... "तेव्हा सत्य प्रती म्हणजे झेरॉक्स आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय महसूल राज्यमंत्री उपस्थित आहेत. परंतु त्यांच्या ऐवजी माननीय महसूल मंत्र्यानी येथे उपस्थित रहावयास पाहिजे होते. ते मर्दानी असल्यामुळे एक्साईट होतात आणि "त्याप्रमाणे करण्यात येईल" असे पटकन बोलतात

(माननीय महसूल मंत्री सभागृहात येतात)

सभापती महोदय, मी त्यांच्या उपस्थितीचा मुद्दा मांडल्याबरोबर ते सभागृहात उपस्थित झाले आहेत त्यामुळे मला आनंद झाला आहे.

सभापती महोदय सत्य प्रती म्हणंजेच झेरॉक्स प्रत आणि सत्य प्रती तयार करण्यात येतील, असे या कलमात म्हटलेले आहे.या कायद्यातील महत्वाचा बदल मला असा अपेक्षित होता की, नोंदणी करता सादर केलेला ऐवज, पूर्ण नोंदणी शुल्क वसूल झाल्याशिवाय तो नोंदणी केला जाणार नाही. या बाबत कायदा नसल्यामुळे न्यायालयाने तो नोंदवून घेण्याचे आदेश आहेत. अगोदर हा दस्त नोंदवून घेण्यात यावा , तो नोदवितांना कमी फी भरली की, जास्त भरली हा नंतरचा मुद्दा आहे. परंतु प्रथम दस्त नोंदवून घ्या आणि नंतर त्यातील पुरक वसूल करण्यात यावा. मुद्रांक शुल्क कमी असल्यास म्हणजे इनबॉन्ड असल्यास तो मुद्रांक जिल्हा अधिका-याकडे पाठवावयाचा आणि जे कमी शुल्क वसूल केलेले आहे, ते वसूल करावयाचे अशी पध्दत होती.

नंतर श्री सरफरे

अशुधारित प्रत / शीर्षकासाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, मी एवढयासाठी या सत्यप्रतीवर आलो आहे की, मुंबईमध्ये सरकारी भाडेपट्टयांच्या बी 1 आणि बी 2 या जमिनी 30 वर्षे, 60 वर्षाच्या करारावर आहेत. या जमिनी लिजवर देण्यात आल्या आहेत. नोंदणीच्या वेळी तुम्ही दस्तऐवजाच्या झेरॉक्स प्रती मागता, त्यावेळी ज्याठिकाणी बी 1 आणि बी 2 लिहिले आहे त्याठिकाणी खोडून फक्त सी 1 करावयाचे, आणि त्या दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत तयार करुन ते डॉक्युमेंट लावायचे. त्यानंतर त्या डॉक्युमेंटची नोंदणी करावयाची. म्हणजे त्या सरकारी जमिनीचा कायम स्वरुपी भाडेपट्टा त्याचा झाला. अशाप्रकारे ती जमीन फ्रीहोल्ड होते. माननीय महसूल मंत्री सभागृहामध्ये उपस्थित झाले असल्यामुळे मी मुद्दाम यासाठी सांगत आहे की, मुंबईच्या उपनगरामध्ये बोरीवली, अंधेरी व कुर्ला तालुक्यामध्ये गेल्या पाच वर्षाच्या काळात अशाप्रकारे झेरॉक्स प्रतीमध्ये सी 1 बदल करुन जेवढया दस्तऐवजांची नोंदणी झाली आहे, त्यांची आपण चौकशी करावी. अशा 80 टक्के प्रकरणांमध्ये बी 1, बी 2 ची असलेली मालमत्ता झेरॉक्सच्या माध्यमातून सी 1 केल्याचे आपल्याला सापडेल. ही सरकारी जमिन कायम स्वरुपी कुणाला तरी भाडेपट्टयाने सी 1 करुन दिल्याचे आपल्याला आढळेल. झेरॉक्सच्या माध्यमातून हा फ्रॉड होत आहे. त्यामुळे अशापध्दतीने सत्यप्रती तयार करण्यात येतील . त्यामध्ये झेरॉक्सच्या माध्यमातून असे घोळ निर्माण होत असतात हे मी आपल्या निदर्शनास मुद्दाम आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, हे मी स्पष्ट करीत असतांना मुद्रांक शुल्क कार्यालयाच्या संदर्भात काही मूलभूत बाबी आपल्या निदर्शनास आणणार आहे. दस्तऐवज नोंदणीकरिता सादर करीत असतांना सोबत मालमत्ता पत्र किंवा प्रॉपर्टी कार्ड जोडणे आवश्यक आहे.मालमत्ता पत्राचे अभिहस्तांतरण, कन्वेअन्स डीड न झाल्यामुळे... कन्वेअन्स डीडचा प्रश्न सर्व ठिकाणी रेंगाळलेला आहे. त्यासाठी सरकारने कायदा केला आहे, त्याचे मी स्वागत केले आहे. सोसायटयांची नावे किंवा मालकांच्या वारसाची नावे नसल्यामुळे मुंबई शहरात व उपनगरात दस्त नोंदणीसाठी आल्यानंतर पक्षकाराची अडवणूक करण्यात येते. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिला असल्यामुळे दस्त नोंदणी अधिकाऱ्याला मालमत्तेचे मालक कोण हे बघण्याचा अधिकार नसतांनाही मी मघाशी सांगितल्याप्रमाणे ते नोंदवून घ्या व बाकीचे नंतर तपासा. परंतु आपले अधिकारी नेमका तो निर्णय बाजूला ठेऊन अडवणूक करतात. त्याच्या पाठिमागची कारणे मी सांगितली पाहिजेत असे नाही. त्यामध्ये "काय द्या" हे चालत असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, मी आणखी एक विषय याठिकाणी मांडणार नव्हतो परंतु मंत्रिमहोदय आले असल्यामुळे आणि तो नवीन विषय असल्यामुळे मांडतो. यामधून मार्ग कसा काढायचा? सर्वोच्च न्यायालयाने मालमत्तेच्या बाबतीत दिलेल्या निर्णयानुसार दुसऱ्या पत्नीला व तिच्या मुला-बाळांना सुध्दा मालमत्तेमध्ये हक्क आला, कुटुंबातील बहिणी लग्न करुन गेल्यानंतर त्यांना सुध्दा हक्क प्राप्त झाला. याबाबतचे सर्व निर्णय आता न्यायालयामध्ये लागले आहेत. विवाहित मुलाने वृद्ध माता-पित्याच्या मालमत्तेमधील आपला हक्क कोणताही मोबदला न घेता आपल्या भावाला व बहिणीला, आईला प्रदान करण्याची इच्छा व्यक्त केली तर सदर दस्तऐवजावर बाजार मूल्यांकन दराने मुद्रांक शुल्क आकारण्यात येते ते आकारण्यात येऊ नये तशाप्रकारची तजवीज तुमच्याकडून होणे आवश्यक आहे अशाप्रकारची सूचना मी या निमिताने करतो. मुंबईच्या उपनगरात बोरीवली येथे एक नवीन मुद्रांक शुल्क कार्यालय आपण सुरु केले. परंतु त्या कार्यालयाला जागा नाही. त्याठिकाणी उपनिबंधक हा अधिकारी नेमला, ते फार हुशार निघाले. बोरीवलीमध्ये नोंदणीचा एवढा मोठा झपाटा आहे, इतर ठिकाणी नोंदणीकरिता फक्त एकच यंत्र ठेवले आहे. परंतु बोरीवली येथे दोन यंत्रे ठेवली आहेत. त्याठिकाणी एका वेळी दोन डॉक्युमेंट रजिस्टर होतात. हे कुणी दिले? तुम्ही दिले कां?

(यानंतर श्रीमती थोरात)--

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, त्यांनी भाडयाने एक जागा घेतली. त्या जागेच्या मालकाचे आणि जागा घेणाऱ्याचे काही भांडण होते म्हणून कोर्टाने सिल लावले. त्यामुळे मुद्रांक शुल्क ऑफिस चार दिवस बंद होते. मुद्रांक शुल्क भरणे हे सरकारी कामकाज आहे. त्यांचा जागेचा वाद चालू आहे. पण भाडयाने घेतलेल्या जागेवर त्यांनी कार्यालय उघडले. कार्यालय उघडले म्हणजे त्या ठिकाणी टेबल, फर्निचर, खुर्च्या असायला पाहिजेत. पण त्या शासनाने दिल्या नाहीत. अधिकाऱ्यांनी त्या स्वत: उपलब्ध केल्या. त्यांनी संगणक, थंब इंप्रेशन, फायबर तसेच मुद्रांक शुल्काच्या कागदा पासून सगळया वस्तू विकत आणल्या. शासनाने अद्याप त्यांना एक कागद सुध्दा दिलेला नाही. बोरिवलीचे भाडयाच्या जागेवरील कार्यालय आजही चालू आहे. रोज एका वेळेला दोन दस्तऐवज नोंद होतात. संपूर्ण महाराष्ट्रात आणि संपूर्ण मुंबईत अशा पध्दतीने एका वेळेला कुठेच दोन दस्तऐवज नोंद होत नाहीत. ते फक्त बोरिवलीला नोंद केले जातात. हे स्वत:च त्यांनी निर्माण केलेले आहे. एवढी घाई कशासाठी आहे.? एक कार्यालय सुरु केल्यानंतर कागदाच्या चिठोऱ्यापासून, टेबल-खुर्चीपासून, संगणकापासून ते सगळया यंत्रापर्यंतच्या सगळया गोष्टी त्यांनी उपलब्ध केलेल्या आहेत. त्या कुठून उपलब्ध केल्या? तर. तेथे नोंदणीला येणाऱ्या सगळया बिल्डर्सनी एकत्र येऊन वर्गणी काढून त्या उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. सभापती महोदय, त्या ठिकाणी किती आवक असेल? किती घाई असेल? किती उत्पन्न असेल? मी त्यासंबंधीचा आकडा सांगत नाही. मुंबईतील एका-एका पोस्टिंगचा आकडा 50 ते 60 लाख रुपये आहे. मुंबईमध्ये सदनिकांची विक्री मोठया प्रमाणात चालू आहे. (सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे सभागृहाबाहेर जात असतात)

सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव आपण थोडा वेळ या सभागृहात बसावे. मी याठिकाणी शेतकऱ्यांसाठी सूचना करणार आहे. त्यावेळी.तुम्ही याठिकाणी उपस्थित असण्याची आवश्यकता आहे. कारण तुम्ही याबाबतीत पक्षाची धोरणे तयार करु शकता. माझ्या दृष्टीने ही सूचना मला महत्वाची वाटते. (सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आपल्या जागेवर बसतात)

सभापती महोदय, मुंबईमध्ये एखाद्या सदनिकेची विक्री करताना मुद्रांक शुल्क पूर्ण घेतले जाते. समजा मी एक सदनिका विकत घेतली पण एका वर्षाच्या आत मी पुन्हा ती सदनिका विकली आणि तिचे रजिस्ट्रेशन करावयास गेलो तर मी घेतलेल्या सदनिकेची किंमत त्यावेळी 50 लाख रु.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

असेल व पुनर्विक्रीमध्ये नवीन रेडीरेकनुसार तिची किंमत 55 लाख रुपये झाली असेल तर फक्त वाढलेल्या पाच लाख रुपयावंर नवीन शुल्क घेण्यात येते. म्हणजे मुंबईतील सदनिकेच्या पुनर्विक्रीमध्ये बेनिफिट देण्यात येतो. तक्रार त्या बद्दलची नाही. विदर्भात खास करुन वडिलांची जमीन पाच भावांमध्ये विभागलेली असते पण त्या बाबतची नोंद सात/बाराच्या उताऱ्यावर नसते म्हणून विदर्भातील आत्महत्याग्रस्त कुटुंबाला मदत मिळत नाही हे आपले दुखणे आहे. एखाद्या शेतकऱ्याकडे 40 एकर जमीन आहे त्याने ती पाच मुलांना वाटल्यानंतर ती प्रत्येकाला आठ-आठ एकर येईल. या पाच जणांपैकी कोणीही त्याच्या वाटयाला आलेला जमिनीचा तुकडा विकला तर त्याची नोंद होत नाही.

सभापती महोदय, एखाद्या शेतकऱ्याने जमीन विकत घेतली. शेतकऱ्यावर कोणतेही संकट येऊ शकते त्यामुळे त्याने ती विकली. विकत घेतल्यानंतर दोन-चार महिन्यांनी विकली तरी त्याला पूर्ण मुद्रांक शुल्क भरावे लागते. मुंबईमध्ये लाखो रुपयाची सदनिका एका वर्षाच्या आत विकली तर फक्त डिफरन्स ऑफ द प्राईस यावर मुद्रांक शुल्क घेण्यात येते. त्यामुळे त्यांना बेनिफिट मिळतो. हा फायदा शेतकऱ्यांना सुध्दा मिळाला पाहिजे. एखाद्या शेतकऱ्याने घेतलेली जमीन एका वर्षाच्या आतमध्ये विकली, किंवा शेतकऱ्यासाठी ती मुदत आपल्याला दोन वर्षे करता येईल. त्याप्रमाणे त्याला बाजारभावाच्या फरकावर मुद्रांक शुल्क आकारले जाईल अशा प्रकारची तरतूद कायद्यात करण्यात यावी. अशी मला याठिकाणी सूचना करावयाची आहे. हा धोरणात्मक भाग आहे. अशी तरतूद केली तर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सूट मिळेल. मुंबईतील लक्षाधीशांना जी सूट मिळते ती ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे. अशी माझी सूचना आहे.आता सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी गेले तरी चालेल. आपण पक्षाचे प्रमुख आहात आपण हे धोरण राबवाल म्हणून मुद्दाम मी आपल्या उपस्थितीत माझी सूचना मांडली आहे.

सभापती महोदय, बोरिवली येथील भाडयाच्या जागेत चालविण्यात येत असलेल्या कार्यालयाची माहिती घेण्यात यावी. बाजारमूल्य दरतक्ता मुद्रांक महानिरीक्षक कार्यालयाकडून दर वर्षी 1 जानेवारीला जाहीर करण्यात येतो परंतु यंदाच्या बाजार मूल्य दरतक्त्यात लोअर परेल, परेल, शिवडी, माहीम भागातील अनेक मालमत्तांचे अंतिम भूखंड तसेच सेज क्रमांक छापण्यात आलेले नाहीत.

यानंतर श्री. बरवड....

अशोधित प्रत / शोधनेसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

उपसंचालक, नगररचना मुंबई विभाग कार्यालय जुन्या जकातघरामध्ये पहिल्या मजल्यावर असताना त्या ठिकाणी भूखंडाची माहिती उपलब्ध होत नाही. मी त्या ठिकाणी स्वत: गेलो होतो. ते खाली आहे पण मिळत नाही. त्यामुळे दुय्यम निबंधक कार्यालयाकडून पत्र घेऊन बाजारमूल्य दर पूर्वी निश्चित करुन घेण्यात येत होते. पण आता ती पध्दत बंद करुन उपसंचालक, नगररचना पुणे यांच्याकडे ते निर्देशित करण्यात आल्यानंतर सदर दस्त नोंदणी होऊ लागले आहेत. यासंदर्भात आपण तात्काळ कोणती कारवाई करणार हा प्रश्न मी आपल्यापुढे उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, मुंबई शहर दुय्यम निबंधक कार्यालय जे जुन्या जकात घरामध्ये आहे त्याबाबत मी मागच्या वेळी सगळे मांडले होते. त्यासंदर्भात जी कारवाई केली त्याबाबत मी कौतुक केले. मला पहिल्यांदा असे वाटले की, या ठिकाणी बोलल्यानंतर ताबडतोब काही तासांमध्ये परिणाम झाला आणि दुसऱ्या दिवसापासून माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे यांनी ती सगळी योजना रद्द करुन टाकली आणि या ठिकाणी जे मांडले त्याबाबत ताबडतोब कारवाई केली. म्हणून मी सांगितले की, ते आले तर काही कारवाईच्या बाबतीत मला नक्की स्वरुपात फायदा दिसेल. एका मंत्र्यांनी या सदनामध्ये झालेल्या चर्चेची तातडीने कारवाई केल्याची मला आठवणारी ही पहिली घटना आहे. इतर मंत्री तसे करीत असतील तर मला आनंद आहे. सभापती महोदय, जुन्या जकातघराच्या कार्यालयाच्या ठिकाणी रेकॉर्ड रुम पावसाने भिजली आहे. आपण आता त्या ठिकाणी गेलात तरी चालेल. मी आपल्याला विनंती करतो. चार दिवस पाऊस पडत आहे. आपण त्या ठिकाणी जाऊन यावे. त्या ठिकाणी वर्षानुवर्षे पाणी गळते. त्या ठिकाणी पाणी साचते. दस्तऐवज खराब होत आहेत. 30 वर्षाच्या मालमत्तेच्या संदर्भातील अहवाल गोळा करणे, टायटल सर्टिफिकेट देणे...कारण कोणताही वकील ज्यावेळी एखाद्या प्रॉपर्टीचा सर्च करतो तो 30 वर्षाचा करतो. 30 वर्षाच्या सर्टिफिकेटची गरज असताना या मुंबईमध्ये सगळे पाण्यामध्ये भिजून गेले आहे. आपण ते मागितल्यानंतर कसे काय देणार आहात. आपल्याकडे जे जुने दस्तऐवज नोंदलेले आहेत ते ज्यावेळी तुम्हाला द्यावे लागतात त्यावेळी अशी जर परिस्थिती निर्माण झाली असेल तर माननीय मंत्रिमहोदयांनी त्या ठिकाणी मुद्दाम जाऊन पहावे. जो विभाग रेकॉर्ड संकलन करण्यासाठी आहे व

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

योग्य प्रकारे सांभाळण्यासाठी आहे ज्याच्यासाठी पक्षकारांकडून आपण हजारो रुपये, लाखो रुपये नोंदणी फी घेतो तसेच दस्तऐवजांचा शोध घेण्यासाठी फी आकारतो त्या विभागाची अवस्था कशी आहे ते माननीय मंत्रिमहोदयांनी खरेच उद्या जाऊन बघावे. या मुंबई शहराचे फार मौल्यवान दस्तऐवज त्या ठिकाणी पाण्यामध्ये भिजून खराब होत आहेत. नोंदणी झालेल्या अंधेरी तालुक्यातील दस्तांची छायाचित्र प्रत पक्षकारांकडून घेण्यात येते व ती बाईन्डींग करुन कार्यालयात ठेवण्यात येते परंतु डुकरे ज्या ठिकाणी राहतात अशा उकिरड्यापेक्षा घाणेरड्या अवस्थेमध्ये असलेल्या कौटुंबिक न्यायालयाच्या कॉरिडॉरमध्ये हे सर्व गट्ठे पडलेले आहेत. आपण उद्या जाऊन बघावे. मी आपल्याला मुद्दाम माहिती देत आहे. त्या कॅरिडॉरमध्ये उंदीर, कुत्रे वगैरे फिरतात त्या ठिकाणी हे महत्वाचे दस्तऐवज नुसते टाकून ठेवलेले आहेत. फक्त पैसेच गोळा करावयाचे आहेत काय ? सरकारकरिता ते करीत आहेत आणि ते करीत असताना स्वत:करिताही करीत आहेत. ते थांबणे न थांबणे हा नंतरचा भाग आहे. पण ज्यांच्याकरिता हे सगळे करतो ते थांबविण्याची आपली जबाबदारी नाही काय ?

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्वत:करिता करतात असा जो उल्लेख केला तो बरोबर नाही.

श्री. दिवाकर रावते : स्वत:करिता म्हणजे मी मंत्र्यांबाबत बोललो नाही. अधिकारी भ्रष्टाचारी मार्गाने हे करतात. सन्माननीय सदस्य ॲड. उषा दराडे यांना सांगू इच्छितो की, आपल्याला एवढा राग का येतो ? आपण सुध्दा उद्या रजिस्ट्रेशन करण्यासाठी गेलात तर आपल्यालाही पैसे द्यावे लागतील. ही सत्य परिस्थिती आहे. ते आपण कशासाठी नाकारता. पैसे दिल्याशिवाय कामच होत नाही. मी मंत्र्यांच्या बाबतीत बोललोच नाही. बिच्चारे मंत्री मघापासून हैराण आहेत की, हे सगळे होत असताना मला काहीच माहीत नाही, मला काहीच मिळत नाही. ते मघापासून भुवया वर करीत आहेत. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, असे करु नका. खरेच आपल्याला काही माहीत नाही. मी एका एका नावानिशी आपल्याला माहिती देऊ शकतो. त्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

मी थांबलो नाही. हे करावयास पाहिजे की नाही, आपण लाखो रुपये घेता, हजारो रुपये घेता आणि हे दस्तऐवज अशा प्रकारे खराब होतात. हे सगळे गठ्ठे तिकडे पडलेले आहेत. यासंदर्भात आपण स्वत: जाऊन बघावे आणि काय कारवाई करता येईल ती करावी अशी अपेक्षा आहे. कारण ते लोकांच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे.

सभापती महोदय, मुंबई शहराचे नकाशे नाहीतच. मी ते मागावयास गेलो. आज आपण मागावयास गेला तरी मुंबई शहराचे नकाशेच अस्तित्वात नाहीत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

ते नकाशे फाटलेले आहेत. त्यावरुन काहीच समजत नाही. हे नकाशे नागपूरला बनवायला दिले होते. हा विषय मी मागे मांडला होता. त्याचे काय झाले हे कळले नाही. या विधेयकाच्या अनुषंगाने मांडण्यासारखे खूप मुद्दे आहेत. आता मी सांगितल्या प्रमाणे दस्तऐवजांची ही दुर्दशा झालेली आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये कर निर्धारण खाते आणि जकात खाते एकच आहे. त्या खात्या मार्फत खूप महसूल जमा केला जातो. त्या खात्याचा एस्टॅब्लिशमेण्ट खर्च 3 टक्के आहे. राज्य शासनाचेही खाते तसेच आहे. राज्याला प्रचंड निधी या नोंदणी कार्यालयाच्या माध्यमातून मिळतो आणि त्याचा एस्टॅब्लिशमेण्ट खर्चही कमी आहे. मग हे कार्यालय अद्यावत करण्याचे अधिकार माननीय मंत्री महोदयांना नाहीत काय ? त्या कार्यालयासाठी खर्च करा. दुभती गाय असेल तर त्या गायीसाठी चांगला निर्जंतूक गोठा नको काय ? मी या ठिकाणी भ्रष्टाचाराचा उल्लेख केला त्यावेळी सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे या माननीय मंत्री महोदयांच्या संरक्षणासाठी उभ्या राहिल्या. मला आनंद वाटला. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी आपण गेलो तर तुम्ही आम्ही आमदार आहोत हे सुध्दा ते बघत नाहीत, पैसे दिल्या शिवाय ते कामच करत नाहीत अशी परिस्थिती आहे आणि हे दुर्दैव आहे. एक बाब या ठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे.मागच्यावेळी या सभागृहामध्ये बीडीओ चव्हाण याचा भ्रष्टाचार मांडला आणि 8 दिवसांनी त्याची उचलबांगडी झाली. माझा या गोष्टीवर विश्वास बसत नाही. पण काल परवा आमच्या अकोल्याच्या एका साठेनावाच्या अधिका-यावर कोर्टाने गुन्हा दाखल करण्याचे निदेश दिले. माझ्या दृष्टीने ते चांगले प्रशासकीय अधिकारी आहेत. मी आता जे सांगत आहे ते महसूल अधिकारी आहेत, त्यांच्यावर दुर्दैवाने कारवाई झाली.

सभापती महोदय, गट नोंदणी कायदा ज्याला तुकडे बंदीचा कायदा म्हटले जाते, हा कायदा 1965 साली करण्यात आला. मुंबईमध्ये त्यांची अंमलबजावणी 1972ला झाली. हा तुकडे बंदी कायदा म्हणून प्रसिध्द आहे. ग्रामीण भागामध्ये 140 एकर जमीन असेल आणि तीची 5 भावामध्ये वाटणी झाली आणि तुकडे विकले गेले तर त्याची नोंदणी कशी करावयाची हा प्रश्न ग्रामीण भागामध्ये निर्माण झालेला आहे. मुकुंद प्रकाशनने काढलेल्या पुस्तकामध्ये या कायद्यातील तरतुदींचे व्यवस्थित विश्लेषण केलेले आहे. कायदा वाचायला क्लिष्ट असतो. तो त्या पुस्तकामध्ये सोप्या भाषेत सांगितलेला आहे. कृषक आणि अकृषक असे दोन भाग आहेत. 2001मध्ये कायदा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

करण्यात आला की 80 गुंठया पेक्षा कमी अकृषक जमीन असेल तर ती विकता येणार नाही. आता 5 एकर ज्याच्याकडे जमीन आहे तो अल्पभूधारक समजला जातो. एक एकर, दोन एकर, तीन एकर किंवा त्या पेक्षा जास्त जमीन ज्याच्याकडे असेल त्यालाच ती जमीन विकता येईल आणि ज्याच्याकडे त्यापेक्षा कमी जमीन असेल तर त्या शेतक-याला ती जमीन विकता येत नाही, त्याच्या दस्तऐवजाची नोंद स्वीकारायची नाही अशी तरतूद होती. अशी कायद्याने बंदी असलेली जमीन विकायची असेल तर तलाठ्यापासून महसूल अधिका-यापर्यन्त विकण्यासंबंधीचे दाखले घ्यावे लागतात आणि ते घेतल्यानंतर ती जमीन विकता येते.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

कायद्यातील तरतुदीमुळे त्याच्यावर निर्बंध आले आहेत. म्हणजे कोणत्याही परिस्थितीत 80 गुंठ्याच्या आतील जमिनीच्या विक्रीला छाननी केल्याशिवाय किंवा तहसीलदार यांची परवानगी नसेल ती विकता येणार नाही. अशा प्रकारचे 80 गुंठ्याहून कमी जमिनीचे दस्तऐवज नोंदविले गेले आणि त्याला मान्यता नसेल तर ही नोंदणी बेकायदेशीर आहे. 1 गुंठा, 4 गुंठे जमिनीचे दस्तऐवज परवानगीशिवाय स्वीकारले जात आहेत. प्रत्येक दस्तऐवजासाठी मुद्रांक शुल्काच्या पलिकडे किमान 5 ते 25 हजार रुपये लाच म्हणून घेतले जात आहेत. म्हणजे जी रक्कम कायद्यानुसार स्वीकारता येत नाही ती घेऊन तेथे नोंदणी केली जाते. मी वाशिम जिल्हयाचे उदाहरण देत आहे. नोंदणी शुल्क भरता येणार नाही ते भरण्याचे अधिकार नसताना सुध्दा घेतले गेले. माहितीच्या अधिकारात आम्ही माहिती मागविली, ती माहिती अजूनही दिली जात नाही. ज्या दिवशी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळण्यासाठी अर्ज केला त्या दिवशीच संबंधित अधिकारी रजेवर गेले ते अद्याप रुजू झालेले नाहीत. बेकायदेशीर दस्तनोंदणीच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली आहे. अशाप्रकारे वाशिम येथील दुय्यम निबंधक श्रीमती दलभंजन यांचा कारभार सुरु आहे. मी या सदनामध्ये नोंदणीच्या विधेयकाच्या माध्यमातून वाशिम जिल्हयाचे उदाहरण दिले आहे. असे प्रकार अनेक ठिकाणच्या कार्यालयात घडत आहेत, त्याकडे मंत्रीमहोदयांनी लक्ष द्यावे. परंतु वाशिमच्या प्रकरणाची सीआयडी चौकशी करावी किंवा अन्य कोणत्या मार्गाने चौकशी करावयाची असेल ती करण्यात यावी आणि श्रीमती दलभंजन यांनी असे किती बेकायदेशीर दस्त नोंदविले याची सभागृहाला माहिती द्यावी. त्या जिल्हयातील पुढाऱ्यांच्या वाढदिवसाला जाहिरातीसाठी सरळ 1 लाख रुपये देतात. वाढदिवस साजरा करा आणि मजा करा. मी याठिकाणी मजा करते. मी ज्या संदर्भातील उदाहरण दिले त्याची चौकशी केली आणि तथ्य आढळून आले तर संबंधितांना शिक्षा देणार का? शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी सरकारने कायदा केला हा कौतुकाचा भाग आहे. सरकार कोणाचे आहे, कोण करीत आहे हा भाग महत्वाचा नाही. शेतकऱ्यांची 80 गुंठयापेक्षा कमी जमीन जाता कामा नये. जो जगला पाहिजे. अशा प्रकारच्या बेकायदेशीर विक्रीला पायबंद घालून असे प्रकार थोपविण्याचा प्रयत्न करीत आहात. परंतु भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना त्रास दिला जात आहे. शितावरुन भाताची परीक्षा होते. संपूर्ण महाराष्ट्रात संदेश गेला पाहिजे. मुद्रांक शुल्क कायद्यातील तरतुदीच्या विरुध्द जाऊन कोणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

भ्रष्टाचार करणार असेल, सरकारचे नियम धाब्यावर बसविणार असेल तर त्यांच्या मनात धाक निर्माण होईल अशी कृती शासनाकडून अपेक्षित आहे. मंत्रीमहोदयांनी उद्या त्या कार्यालयात कोणालाही पाठवावे. त्या कार्यालयाच्या बाहेर टायपिस्ट बसला आहे, त्याच्याकडे पैसे दिले की तुमच्या दस्ताची नोंदणी होते हे मी निदर्शनास आणले आहे. शासनाने या संदर्भात निश्चित कारवाई करावी. मी यापूर्वी काही बाबी शासनाच्या निदर्शनास आणल्यानंतर मंत्रीमहोदयांनी तातडीने पावले उचलली. महसूल विभागाशी सर्वसामान्य गोरगरीब लोकांचा संबंध येतो. मालमत्तेशी संबंध येतो. माझ्या जीवनात मी जे काही कमावले आहे, अस्तित्वात आहे त्याच्याशी या विभागाचा संबंध येतो. सावकारीपासून शिक्षेपर्यंतचे सर्व विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील उद्देश लक्षात घ्यावा. हा कायदा मंजूर करीत असताना दुय्यम निबंधक कार्यालये अद्यावत करणार आहात का हे मंत्रीमहोदयांनी सांगितले तर बरे होईल. हे अतिशय चांगले विधेयक आहे. दस्तऐवजाच्या नोंदणीमध्ये सुटसुटीतपणा यावा यासाठी तरतूद करण्यात आली आहे. परंतु अधिकाऱ्यांच्या मनामध्ये धाक निर्माण केला नाही तर 5-10 लोकांचे आंगठे टाकले जातील आणि सिस्टीम उद्ध्वस्त करण्याचे काम केले जाईल. आज दुय्यम निबंधक कार्यालयाबाहेर ठेवलेल्या दस्तऐवजासमोर उंदीर, घुशी फिरत आहेत. त्याची मंत्रीमहोदयांनी स्वत: भेट देऊन पाहणी करावी. याबाबत दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांबद्दल तक्रार नाही. त्यांच्याही काही अडचणी असतील. दुय्यम निबंधक कार्यालयासाठी चांगल्या जागा उपलब्ध करुन द्याव्यात आणि सर्वसामान्यांचे दस्तऐवज जपले पाहिजेत एवढीच विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

नंतर 4ओ.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकाच्या संदर्भात अतिशय तपशीलवार मांडणी केली आहे. तरी देखील चार पाच मुद्यांबाबत मी माझे विचार व्यक्त करणार आहे. ज्यावेळेस आपण उद्देश व कारणे मधील "ख" मध्ये पाचव्या ओळीत "बाहुविधवादांच्या" असा शब्दप्रयोग केला आहे त्या अनुषंगाने आपल्याला काय म्हणावयाचे आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. त्याचबरोबर मला चांगले आठवते की, याच सभागृहात पुण्यातील नोंदणी कार्यालयात एका पोलीस अधिकाऱ्याच्या संगनमताने खोटे दस्तऐवज कशा पध्दतीने तयार केली जात होती असा मुद्दा सभागृहात उपस्थित झाला होता तेव्हा माननीय उपसभापतीच सभापतीस्थानी होते आणि आताही माननीय उपसभापतीच आहेत. त्यांनाही आठवत असेल. त्यावेळेस माननीय उपसभापतींनी यात लक्ष घातले व त्याबाबत सभागृहात बराच उहापोह झाला होता. त्यातीलच एक अधिकारी श्री. आंधळकर हे आता नगर जिल्ह्यात आहेत. त्यांनी तेथील एक प्रकरण उघडकीस आणलेले आहे. ते म्हणजे नगर जिल्ह्यातील नाहाटा म्हणून एका व्यक्तिने राज्याच्या मुख्यमंत्र्यांपासून तहसीलदारापर्यंत सर्वांचे बनावट शिक्के तयार केले आहेत. त्यांनी या शिक्क्यांच्या आधारे कोट्यवधी रुपयांची फसवणूक या जिल्ह्यात केली आहे. त्याचबरोबर मला शासनाच्या असेही निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आपण अशा प्रकारे संगणकाच्या माध्यमातून दस्तऐवजांची नोंदणी करीत असताना पैसे स्वीकारण्याची सिस्टम मात्र कॅशमध्येच असणार आहे मग आपल्या इंटरनेटचा तसेच इलेक्ट्रॉनिक पध्दतीचा काय फायदा होणार आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. आपण आता नोदणी कार्यालयात नोंदणी करीत असताना थंब इम्प्रेशन, अंगठे घेऊन तसेच फोटो घेण्याची पध्दती सुरु केली ही गोष्ट चांगली आहे. परंतु त्यात सुध्दा पळवाटा काढल्या जातात आणि त्याचे उदाहरण द्यावयाचे म्हटले तर पुण्यातील दीपक मानकर यांचे प्रकरण. त्यांनी अशा प्रकारच्या नोंदी करुन घेतल्या. पुण्यातील खडकमाळ आळीमध्ये रजिस्ट्रेशन कार्यालय असताना खडकीच्या कार्यालयात नेले आणि ज्यांच्या सह्या व अंगठे घ्यायचे आहेत त्यांच्या मागे व पुढे शस्त्रधारी ठेवले. जर त्यांनी कागदपत्रांवर सह्या केल्या नाहीत आणि रजिस्ट्रेशनच्या कार्यालयात सीसीटीव्ही तसेच त्या यंत्रासमोर घाबरलेला दिसला तर आम्ही तुम्हाला मारुन टाकू अशा प्रकारची धमकी त्यांना देऊन ठेवली होती. हे करण्याचे कारण म्हणजे ज्याप्रमाणे बोरिवली येथील नोंदणी कार्यालयात पोलिसांची गर्दी तसेच इतर लोकांची गर्दी कमी असते आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

ओल्ड कस्टमच्या कार्यालयात बराच मोठा लवाजमा असतो त्याप्रमाणेच खडकमाळच्या कार्यालयात सुध्दा गर्दी कमी असते आणि खडकीच्या कार्यालयात गर्दी कमी असते म्हणून त्या कार्यालयात त्यांना नेऊन त्यांच्याकडून नोंदणी पत्रावर सह्या करुन घेतल्या. परिणामी थंब इम्प्रेशन देण्यासाठी तसेच फोटोसाठी जे बसलेले असतात त्यांच्या आसपास व मागे पुढे कोण लोक उभे असतात याची सुध्दा माहिती कोणालाच नसते. म्हणून माझी अशी मागणी आहे की, या कार्यालयांमधून सर्वच ठिकाणी सीसीटीव्ही लावावेत तसेच हे लोक कोण उभे असतात, कोण जाते कोण येते त्याची खात्री करुन घेतली पाहिजे. आपण आताच उल्लेख केला की या कार्यालयांमध्ये सुधारित सॉफ्टवेअर आणणार आहोत. परंतु हे सॉफ्टवेअर हॅक होणार नाही किंवा त्याचे बनावट सॉफट्वेअर कोणी तयार करणार नाही, त्याचा दुरुपयोग करणार नाही याची खबरदारी घेण्याची उपाययोजनाही करावी लागणार आहे. याचे एक मासलेवाईक उदाहरण मी या निमित्ताने देणार आहे. आपण वेगवेगळ्या प्रकारांनी फसवणूक रोखण्याचा प्रयत्न केला तरी पुण्यात घडलेली एक सत्य घटना आहे. त्या आमदारांचे मी नाव घेत नाही. पण या आमदार महोदयांनी ज्यांच्याकडून जमीन विकत घेतली त्याचे नाव गोविंदा आनंदा निकाळजे असे आहे. या आमदारांनी पॉवर ऑफ ॲटर्नी करुन घेत असताना त्यासंबंधीची काळजी घेतली. त्या माणसाचे वडील समजा तुकाराम असे त्यांचे नाव आहे प्रत्यक्षात या तुकाराम निकाळजे यांचा मृत्यू 25 वर्षापूर्वी झाला होता आणि त्याची पॉवर ऑफ ॲटर्नी आजोबांनी वडिलांच्या नावाने करुन दिली. अशा प्रकारे गोविंदा आनंदा निकाळजे ही व्यक्ती हयात नसताना प्रत्यक्षात दुसरीच व्यक्ती समोर आणली आणि हाच तो माणूस आहे म्हणून काम करुन घेतले. याचा अर्थ तोच माणूस खरा आहे, त्याचे आजोबा सिध्द करण्याची वेळ या माणसावर आली आहे. अशा प्रकारे खोटे शिक्के, खोटे पॉवर ऑफ ॲटर्नी हे करीत असताना भ्रष्टाचार कशा प्रकारे होतो याची काळजी घेण्याची गरज आहे. म्हणून मला सांगावयाचे आहे की, सन 2001 चा जो अर्ज होता त्याचा निकाल नक्की कधी लागला आणि तो निकाल लागून कलम 22 (क) करण्याचे प्रस्तावित केले असे आपण या उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे....

यानंतर श्री. जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ....

प्रत्यक्षात 22 (क) वगळण्याचा निर्णय कधी झाला आणि आपण कायदा कधी करीत आहात ? मधील काळात काय काय झाले याची कल्पना महसूल मंत्र्यांना आहे. महसूल विभगातील दुय्यम निंबधकाचे काम चांगल्या पध्दतीने काम होत आहे. त्यांना सगंणक देत आहात, नवीन तंत्रज्ञान या ठिकाणी आणीत आहात ही चांगली गोष्ट आहे. परंतु या ठिकाणी आमदारांच्या आमदार फंडातून संगणक घेतले जात आहेत. या ठिकाणी संगणकीकरणाची व्यवस्था चांगली झाली पाहिजे एवढे बोलून मी माझे विचार येथेच संपवते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी विचार मांडलेले आहेत. या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्याची नोंद घेण्यात आलेली आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, वाशिमच्या श्रीमती दलभंजन यांनी जो काही गैरप्रकार केलेला आहे त्याच्या बाबतीत निश्चित चौकशी केली जाईल. ठराविक क्षेत्रापेक्षा कमी जमीन असेल तर त्या नोंदणीला परवानगी दिली जात नाही. त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात चौकशी केली जाईल व त्यामध्ये दोषी आढळून आले तर संबंधितावर कडक कारवाई केली जाईल अशी मी या निमित्ताने ग्वाही देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या बिलाला पाठिंबा द्यावा व हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधयेक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 9, विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधयकाचे भाग झाले.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 1 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 1 विधेयक संमत झाले आहे.

--

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी गडचिरोली येथे "गोंडवाना विद्यापीठ" स्थापन करणे

मु.शी. : चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी गडचिरोली येथे "गोंडवाना विद्यापीठ" स्थापन करणे, या विषयाबाबत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचा ठराव

प्रा.वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 106 अन्वये खालील ठराव मांडते.

ज्याअर्थी, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 (1994 चा महा.35) याच्या कलम 3 च्या पोटकलम (2) अन्वये अधिसूचना काढून चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी गडचिरोली येथे "गोंडवाना विद्यापीठ" या नावाचे एक नवीन विद्यापीठ स्थापन करण्याचे प्रस्तावित केले आहे;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी ठराव संमत केल्याखेरीज अशी कोणतीही अधिसूचना काढली जाणार नाही, अशी उक्त अधिनियमाचे कलम 3 चे पोटकलम (2) याच्या परंतुकामध्ये तरतूद आहे;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 (1994 चा महा.35) याच्या कलम 3 च्या पोटकलम (2) च्या परंतुकानुसार, राज्य शासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात अंतर्भूत असलेल्या क्षेत्रासाठी गडचिरोली येथे "गोंडवाना विद्यापीठ" या नावाचे एक नवीन विद्यापीठ स्थापन करण्यात यावे, असा महाराष्ट्र विधानपरिषद याद्वारे ठराव करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड...

सभापती महोदय, हा विषय अनेक वेळा सभागृहात झालेला आहे. या संबंधी सभागृहात अशासकीय ठराव आला होता. गोंडवाना विद्यापीठ स्थापन व्हावे म्हणून आपण समिती गठित केली होती. या समितीच्या बैठका देखील झालेल्या आहेत. भंडारा,गोंदिया हे दोन जिल्हे वगळून चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यासाठी गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्यात येत आहे. हे दोन जिल्हे नक्षलग्रस्त आहेत. आदिवासी बहुल आहेत. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी,ज्ञानाचा प्रसार व्हावा,वन संपदेचे जतन व्हावे,त्यांचे जनजीवन सुधारावे या गोष्टीचा विचार करून हा ठराव मांडण्यात आला आहे.

ठराव प्रस्तुत झाला.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला फक्त एकच सूचना करावयाची आहे. गोंडवाना विद्यापीठाच्या पुढे भविष्यात कुणाचेही नाव लावले जाणार नाही, कायम गोंडवाणा विद्यापीठ असेच नाव राहील याबाबतची काळजी शासनाने घ्यावी.

श्रीमती वर्षा गायकवाड : सजेशन फॉर ॲक्शन.

ठराव मतास टाकून संमत झाला.

.....

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरु...)

उपसभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी भाषणास सुरुवात करावी.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 74,पृष्ठ क्रमांक 55 - वित्त विभाग दोनच दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात 16674 कोटी रुपयांचा राज्याला फटका, देशशिस्तीवर प्रहार असे छापून आले आहे.

केंद्र सरकारकडून राज्य सरकारला सेसद्वारे मिळणाऱ्या कोट्यावधी रुपयांचा वापर योग्य कारणाकरिता योग्यवेळी होत नाही,यावर देखरेख ठेवण्याकरिता शासनाने शासकीय व अशासकीय अशा स्वरुपांची संमिश्र यंत्रणा निर्माण करण्याची गरज असताना ती केली गेली नाही असे 31 मार्च,2009 रोजीच्या कॅगच्या अहवालात राज्य सरकारबाबत नोंदविण्यात आले आहे. महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधताना महालेखापरीक्षकांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठविले आहे. त्यामध्ये उल्लेख आहे की, "..अशी देखरेख करण्याकरिता राज्य शासनाने कोणतीही यंत्रणा ठेवली नसल्याचा उल्लेख केला आहे." यापूर्वी 1976 साली कै.यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री असताना सार्वजनिक उपक्रम समितीचे समिती प्रमुख श्री.नवीनभाई बार्शीकर यांनी समितीचा अहवाल मांडताना अशाप्रकारची मागणी केली होती..

आज आपल्या राज्यात सर्वशिक्षा अभियान किंवा राष्ट्रीय ग्रामीण रोजगार अभियानामार्फत जो निधी येतो त्याचा हिशोब ठेवण्याची कोणतीही यंत्रणा नाही. तेव्हा तशी यंत्रणा उभारण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 76, पृष्ठ क्रमांक 62 बांधकाम - सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक कामे निकृष्ट दर्जाची झालेली आहेत. जामसंडे-पिंपळवाडी साईड रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे तेथील ग्रामस्थानी ते काम थांबविले आहे अशाप्रकारची बातमी वर्तमानपत्रात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

माणगावमधील सर्वच कामे निकृष्ट दर्जाची झालेली आहेत. जामसंडे ते पिरावाडी रस्ता पूर्णपणे खचलेला आहे. भुईबावडा घाट पूर्णपणे नादुरुस्त झालेला आहे. आसोली पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. करंदेचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे.

बाब क्रमांक 82, पृष्ठ क्रमांक 26 - नियोजन विभाग - नियोजन विभागाने 147 योजना एकत्रित केल्याचे परिपत्रक दिनांक 3 डिसेंबर 2009 रोजी काढलेले आहे. अशाप्रकारच्या निर्णयामुळे जिल्हयासाठी येणारा निधी कमी झालेला आहे. यापूर्वी जिल्हापरिषदेच्या शाळेत उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकास जिल्हापरिषदेमार्फत पुरस्कार दिला जात होता. परंतु आता नवीन जी.आर.नुसार हा पुरस्कार देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडे देण्यात आला आहे. जिल्हापरिषदेकडून प्रस्ताव आल्यानंतर जिल्हाधिकारी त्याबाबत निर्णय घेणार आहेत.

त्याचप्रमाणे जिल्हापरिषद प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळांचे बांधकाम किंवा विशेष दुरुस्ती जिल्हापरिषदेमार्फत केली जात होती आता हे काम सुध्दा जिल्हा नियोजन विभागामार्फत केले जाणार आहे.

तालुका स्तरावरील एकत्रित कार्यालयाच्या इमारती संकुलासाठी येणारा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात येत होता. हा निधी सुध्दा जिल्हा नियोजन विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. जिल्हा नियोजन विभागाकडे अशाप्रकारे 147 योजना वर्ग केल्यामुळे जिल्हा नियोजनाचा सध्याचा आराखडा मोठा दिसत आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ..

परंतु राज्य सरकारकडून कमी निधी दिला जात आहे. बांधकामासाठी गेल्या आर्थिक वर्षात 7 हजार 500 कोटी रुपयांची तरतूद केली होती. परंतु या आर्थिक वर्षात 1800 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहेत. या संदर्भात काढण्यात आलेल्या जीआरमध्ये जिल्हयाला निधी वाढवून दिलेला आहे, असे दाखविण्यात आलेले असले तरी ख-या अर्थाने पूर्वी जिल्हयाला जो निधी दिला जात होता, तो कमी करण्यात आलेला आहे. त्यामुळे निधी वाढवून देण्यात यावा असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,यानंतर मला नियोजन विभागाची बाब क्रमांक 181, पान क्रमांक 264 संबंधी बोलावयाचे आहे. दिनांक 24 जून 2009 रोजी मंत्रिमडळाची सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एक बैठक घेण्यात आली होती आणि त्या बैठकीमध्ये 5 हजार 232 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. अनेक वृत्तपत्रामध्ये असे छापून आले होते की," कोकणामध्ये 5 हजार 232 कोटी रुपयांची भानामती ...कोकणाला कागदावर श्रीमंत करण्यासाठी हे पॅकेज देण्यात आलेले आहे."वर्तमानपत्रामध्ये जे छापून आले होते ते खरे ठरले आहे. आज कोकणाला पॅकेजप्रमाणे निधी देण्यात आलेला नाही. या पूर्वीच्या पुरवणी मागण्यांमध्ये कोकणातील खाडीतील गाळ काढण्यासाठी ड्रेझर खरेदी सबंधी नोंद करीत असतांना कोकण पॅकेज अंतर्गत ड्रेझर खरेदी करण्यात येतील, असे सांगण्यात आले होते. त्याच बरोबर इमारती बांधण्यासाठी तरतूद देखील दाखविण्यात आली होती. पंरतु प्रत्यक्षात मात्र ड्रेझरची खरेदी करण्यात आली नाही. इमारतीचे बांधकामही झालेले नाही. या वर्षीच्या पूरक मागण्यांमध्ये दोन इमारतीसाठी अडीच, अडीच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 2009-2010,2010-2011 आणि 2011-12 या तीन वर्षात कोकण पॅकेज अंतर्गत निधी देण्याच्या संदर्भात दिनांक 21 जुलै 2009 रोजी शासनाने निर्णय काढला होता. त्याचबरोबर दिनांक 20 जुलै 2009 रोजी नियोजन विभागाने देखील जी.आर. काढला होता. त्या जीआर प्रमाणे कोकणातील पाटबंधा-यासाठी 729 कोटी रुपये, आणि या वर्षी 247 कोटी रुपयांचा निधी द्यावयास पाहिजे होता, पंरतु तो निधी दिलेला नाही. अशा प्रकारे कोकणाला पॅकेज देऊन प्रत्यक्षात पैसे न दिल्यामुळे कोकणाची फसवणूक केलेली आहे ,तेव्हा पॅकेज अंतर्गत जे काही नमूद केले होते त्यानुसार कोकणाला तातडीने निधी देण्यात यावा,

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर..

त्याचबरोबर सर्व योजना तातडीने पूर्ण करण्यात याव्यात असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, पूरक मागण्यांवर बोलत असतांना मघाशी असे सांगण्यात आले की,मुंबईमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे 300 कोटी रुपये खर्च करुन भव्य स्मारक बांधण्याची घोष्णा केली होती. परंतु सिंधुदूर्ग किल्ल्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे जगातील एकमेव मंदीर आहे. त्या मंदिरासाठी निधी देण्यात यावा, अशी मागणी गेल्या चार वर्षापासून सातत्याने केली जात आहे. परंतु हा निधी दिला जात नाही. माननीय वित्त मंत्र्यांनी त्यासाठी सीएफ मधून पैसे देण्यात येतील असेही घोषित केले होते. परंतू या मंदिराचे सुशोभिकरण करण्यासाठी वा त्या ठिकाणी जी गळती होती ती दुरुस्त करण्यासाठी निधी दिला जात नाही. तेव्हा हा निधी देण्यात यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय , यानंतर मला मत्स्यव्यवसाय विभागाची बाब क्रमांक 41पान नंबर 33 सबंधी बोलावयाचे आहे. मत्स्य दुष्काळासंबंधी सभागृहात अनेकदा चर्चा झाली होती या संदर्भात गांभीर्याने विचार करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले आहे.

श्री रवीशेठ पाटील तसेच श्री हसन मुश्रीफ हे या पूर्वी या विभागाचे मंत्री होते. त्यांनी देखील आश्वासन दिले होते. मत्स्य दुष्काळ जाहीर करीत असतांना जी पध्दत ठरविण्यात आलेली आहे ती ब्रिटीश काळापासून चालत आली असून त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. परंतु ती पध्दत बदलण्यात येत नाही. कोकणामध्ये मत्स्य दुष्काळ जाहीर होण्यासाठी 50 टक्क्यापेक्षा कमी मत्स्य उत्पादन झाल्याचे दिसून येत नाही. आज पर्शियन नेटव्दारे मासेमारी करण्यात येते व त्याची नोंद योग्य प्रकारे केली जात नाही. त्यामुळे मत्स्य दुष्काळ जाहीर होऊ शकत नाही. तेव्हा यासबंधी जे सूत्र ठरविण्यात आले आहे, त्यात बदल होण्याची गरज आहे. हे सूत्र बदलण्यात यावे यासाठी सातत्याने मागणी करुनही कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही तेव्हा हे सूत्र बदलण्यात यावे अशी मी मागणी करतो.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर...

सभापती महोदय, मत्स्य उत्पादकांची किंवा मच्छिमारांची खऱ्या अर्थाने उन्नती करावयाची असेल, त्यांना दुष्काळामधून बाहेर काढावयाचे असेल तर त्यांना पर्यटनासारख्या अन्य व्यवसायाकडे वळविले पाहिजे. त्यांच्या माध्यमातून समुद्र किनाऱ्याचे सुशोभिकरण करण्याची योजना राबविली पाहिजे. त्याकरिता नियोजन विभाग, वित्त विभाग, मत्स्य व्यवसाय विभाग आणि पर्यटन विभाग या सर्व विभागांच्या योजना एकत्रितपणे एकाच छत्राखाली आणून या मच्छिमारांना दुष्काळापासून बाजूला काढण्यासाठी त्याठिकाणी पर्यटन व्यवसाय निर्माण करण्याची गरज आहे असे मला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 346 व बाब क्रमांक 218 च्या अनुषंगाने सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य विभागाचा बोजवारा उडाला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील जिल्हा आरोग्य रुग्णालयामध्ये अनेक वेळा तज्ज्ञ डॉक्टर नसतात. त्याठिकाणी ऑर्थोपेडिक डॉक्टर व अन्य तज्ज्ञ डॉक्टर नसल्यामुळे रुग्णांवर उपचार होत नाहीत. त्याठिकाणी तज्ज्ञ डॉक्टर नेमण्याची आपण घोषणा केली, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. हिवताप निर्मूलनाकरिता आरोग्य सेवकांच्या भरतीला देण्यात आलेली स्थगिती उठविण्याची गरज आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 45 आरोग्य सेवकांची पदे रिक्त असल्यामुळे फिल्ड वर काम करण्यासाठी प्रतिनियुक्तीवर आरोग्य सेवक आणावे लागत आहेत. तेव्हा स्थगिती उठवून आरोग्य सेवकांची रिक्त पदे तात्काळ भरण्याची कार्यवाही करावी अशी विनंती करतो. सभापती महोदय, तृतीय श्रेणीमधील कर्मचाऱ्यांच्या भरतीवरील स्थगिती उठविण्यात येईल असे सांगण्यात आले होते. जिल्हा परिषदेच्या सिव्हिल सर्जनच्या कार्यालयामध्ये भरती झाली, परंतु हिवताप अधिकाऱ्यांच्या कार्यालयामधील आरोग्य सेवकांच्या भरतीवरील स्थगिती तातडीने उठवावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, मालवण शहरासाठी देण्यात आलेल्या आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा दिला असल्यामुळे त्याला उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याबाबत सातत्याने मागणी करण्यात येते. या रुग्णालयाला मालवणमधील अनेक गावे व शहरे जोडली गेली असल्यामुळे, ग्रामीण भाग जोडला गेला असल्यामुळे त्याला उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्याची अत्यंत गरज आहे. सभापती महोदय, पृष्ठ क्र. 37 व बाब क्र. 52 च्या अनुषंगाने पशुसंवर्धन विभागामध्ये पशु पर्यवेक्षकांच्या पदाकरिता परिक्षा घेण्यात आली. त्यामध्ये सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगड या जिल्हयातील जवळ जवळ 25 उमेदवारांची निवड करण्यात आली. परंतु त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

नेमणुकीला स्थगिती देण्यात आली आहे.तशाप्रकारचे आदेश दि. 5 जून रोजी मंत्रालयातील श्री.मेहेत्रे नावाच्या उप सचिवांनी काढले. तेव्हा ती स्थगिती उठवून पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांची भरती तातडीने करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, बाब क्रमांक 236 व पृष्ठ क्रमांक 365 च्या निमित्ताने एका दुर्लक्षित विषयाकडे मी आपल्या माध्यमातून मंत्रिमहोदयांचे लक्ष वेधतो. महाराष्ट्रामधील जवळ जवळ बहुतांशी सूतगिरण्या बंद अवस्थेत आहेत. त्यांची आजची स्थिती पाहिली तर मोहेंजोदडो आणि हडप्पाचे प्रतिबिंब आपल्याला पहावयाचे असेल तर या सूतगिरण्या पहाता येतील. यानिमित्ताने माझी शासनाला एकच विनंती आहे की, या बंद सूतगिरण्यांवरील पत्रे उडून गेले आहेत, त्यांच्या विटा पडल्या आहेत, सिमेंट चोरुन नेले आहे, संचालकांनी लोखंड भंगारात विकले आहे. अशा स्थितीमध्ये असलेल्या या गिरण्यांचा आपण एक तर लिलाव करावा. आणि लिलावामध्ये जी रक्कम प्राप्त होईल त्यामधून राज्य शिखर बँकेचे पैसे देऊन टाकावेत आणि राहिलेली रक्कम राज्य शासनाच्या तिजोरीमध्ये जमा करावी अशी मी विनंती करतो.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

सभापती महोदय, जीवनदायी आरोग्य योजनेची बाब क्रमांक 217 पान क्रमांक 345 वर मी बोलणार आहे. यासाठी एक 1000 रुपयाची लाक्षणिक मागणी केलेली आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रात माध्यमिक शाळेमध्ये आणि प्राथमिक शाळेमध्ये शिकणारे जे विद्यार्थी आहेत त्यांना हृदयाचे अनेक रोग जडलेले आहेत. आपले आरोग्य अधिकारी त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांची योग्य तपासणी करीत नाहीत. राज्य शासनाच्या वतीने या सगळया हृदय रोग रुग्णांची शस्त्रक्रिया करावी आणि या मुलांना उत्तम आरोग्य द्यावे. शासन तरुणांविषयी आणि युविकां विषयी धोरण आखत आहे तेव्हा या दृष्टीने शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, बांधकाम विभागाची बाब क्रमांक 79 पान क्रमांक 67 वर मी बोलू इच्छितो. कोकणामध्ये पावसाळयामध्ये जाता येत नाही. तेथे खूप पाऊस पडतो. अशा स्थितीमध्ये मुंबईपासून गोव्यापर्यंत जावयाचे असेल तर किती दिवस घालवावे हा मोठा प्रश्न आहे. माझी राज्य शासनाला विंनती आहे की, मुंबई ते थेट कोकणच्या शेवटच्या टोकापर्यंत समुद्रकिनाऱ्याच्या माध्यमातून चौपदरी रस्ता करण्यात यावा अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 62 पान क्रमांक 45 वर मी बोलू इच्छितो. माननीय मंत्रिमहोदय श्री. शेट्टी हे या ठिकाणी उपस्थित आहेत. खेडयापाडयात शाळांमध्ये एकही क्रीडा शिक्षक आढळून येत नाही. तेव्हा माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, किमान 100 विद्यार्थ्यांच्या पाठीमागे एक क्रीडा शिक्षक असावा जेणेकरुन या राज्यामध्ये जे बी.एड.बी.पी.एड. आणि एम.पी.एड. झालेले आहेत त्या सगळया लोकांना सामावून घेता येईल.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण बाब क्रमांक 221 पान क्रमांक 350 वर मी बोलू इच्छितो. बीड जिल्हयामध्ये आंबेजोगाई या ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय आहे त्याठिकाणी आरोग्याची सेवा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राज्य शासन करीत आहे. गेल्या संघर्षाच्या काळामध्ये मराठवाडयातील आणि विशेषत: बीड जिल्हयातील धुरिणांनी मिळविलेले हे महाविद्यालय आहे. आज मात्र ते मोडकळीस आलेल्या स्थितीत दिसते. त्या ठिकाणी कुठल्याही आरोग्य सुविधा रुग्णांना मिळत नाही. प्राध्यापक, असोसिएट प्रोफेसर, सहायक प्राध्यापक हे सगळे लोक तिकडे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

येण्यास तयार नाहीत. तेव्हा राज्य शासनाला माझी विनंती आहे की, आंबेजोगाईतील या वैद्यकीय महाविद्यालयातील सगळया रिक्त जागा भरण्यात याव्यात आणि बीड जिल्हयाला न्याय द्यावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, बाब क्रमांक 215 पान क्रमांक 345 वर मी बोलू इच्छिते. नवरोजी वाडिया प्रसूति महाविद्यालयाला अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने मला माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, कोणत्याही शासकीय रुग्णालयात मूलभूत सुविधा देखील उपलब्ध नाहीत. पुणे महानगरपालिकेचे कमला नेहरु रुग्णालय हे अतिशय नावाजलेले रुग्णालय आहे. या ठिकाणी प्रसूतीगृह असून सुध्दा त्या ठिकाणी महिलांना बसण्यासाठी बेंचसुध्दा उपलब्ध नसतात. तेव्हा या रुग्णालयांच्या संदर्भात काही तरी नॉर्म्स असावेत या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी विचार करावा.

सभापती महोदय, भिंतीचे पापुद्रे निघालेले आहेत. केवळ दिखाऊपणासाठी नाही तर ते डिसइन्फेक्ट करण्याच्या दृष्टीने त्याची दुरुस्ती करणे अत्यंत महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे घाण आणि तेथील कचरा अतिशय निष्काळजीपणे फेकला जातो. मांजरांचा सुळसुळाट कसा झाला आहे यासंबंधीचा एक फोटो एका महिन्यापूर्वी वर्तमानपत्रात छापून आला होता. डिझॉस्टर मॅनेजमेन्टच्या वेळी शासकीय रुग्णालयात जेव्हा रुग्ण जातात परंतु त्यावेळी सुध्दा त्याठिकाणची यंत्रणा सुसज्ज नसते अशा प्रकारचे अनुभव आपल्याला आलेले आहेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 217 पान क्रमांक 345 वर मी बोलू इच्छिते. जीवनदायी योजनेच्या संदर्भात मला या ठिकाणी निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या योजना ज्यांच्यासाठी असतात त्यांच्यापर्यंत त्या पोहचत नाहीत म्हणून याबातीतील अवेअरनेस वाढविण्याच्या दृष्टिकोनातून बालवाडी, अंगणवाडी तसेच वेगवेगळया ठिकाणी यासंबंधीची भिंती पत्रके लावली पाहिजेत. जेणेकरुन जनजागृती होईल आणि अशा प्रकारच्या योजना अस्तित्वात आहेत याची लोकांना माहिती मिळेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 280 पान क्रमांक 392 वर मी बोलू इच्छिते. मुंबई नॅचरल हिस्ट्री सोसायटीला सहाय्यक अनुदान देण्यासाठी तरतूद केलेली आहे. मला या ठिकाणी निदर्शनास आणावयाचे आहे की, दिनांक 5 जून, हा आंतरराष्ट्रीय पर्यावरण दिन असतो आणि दरवर्षी त्याची थिम ठरलेली असते. यावर्षीची थिम बायोडायव्हर्सिटीची आहे. जैव वैविधतेचा कायदा झालेला आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांनी विशेष करुन महानगरपालिकांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/

ॲड. वंदना चव्हाण...

एक बायोडायव्हर्सिटी समिती स्थापन केली पाहिजे असे कायद्यातच म्हटलेले आहे. पण अद्याप एकाही ठिकाणी बायोडायव्हर्सिटी समितीची स्थापना झालेली नाही. या अनुषंगानेसुध्दा शासनाने निर्देश द्यावेत आणि या समित्या ठिकठिकाणी स्थापन कराव्यात. एका बाजूला आपण बायोडायव्हर्सिटीचे धोरण करतो, कायदा करतो पण दुसऱ्या बाजूला निर्णय घेत असताना त्याच्या पूर्णपणे विरोधात जातो असे चित्र आपल्याला बघायला मिळते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर)

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण ...

पुणे महानगरपालिका किंवा पुणे शहराच्या अनुषंगाने सांगावयाचे झाले तर डी.पी. प्लॅन मंजूर करुन शासनाकडे पाठविण्यात आला तेव्हा त्यामध्ये बायोडायव्हर्सिटी पार्कसाठी 1 हजार हेक्टरवर आरक्षण ठेवले होते. परंतु तो प्लॅन शासनाकडे आल्यानंतर प्रशासकीय मंडळी ते आरक्षण उठविण्यासाठी पुढाकार घेतात ही चुकीची बाब आहे. म्हणून याबाबत एकच धोरण असावे आणि त्याच पध्दतीच्या कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने पुढाकार घेतला पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला सांस्कृतिक कार्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 393 वरील बाब क्रमांक 283 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये मुंबई येथील छत्रपती शिवाजी टर्मिनसवर प्रकाश योजना करण्यासाठी 4 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, निश्चितपणे शहर चांगले दिसावे म्हणून या योजना करतो परंतु राज्यभर ज्यावेळी विजेची कमतरता आहे अशा वेळेला अशा पध्दतीची प्रकाश योजना करणे किती संयुक्तिक आहे याचा सुध्दा कोठे तरी विचार केला पाहिजे. सोलर एनर्जी, विंड एनर्जीचा वापर करु शकतो काय याचा विचार अशी योजना करीत असताना करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्याक विकास महामंडळातर्फे आपण कर्ज माफ करीत आहोत. पुणे महापालिका पुणे शहरामध्ये मोठमोठ्या नेत्यांच्या नावाने वास्तू उभ्या करतात. मी पुणे महापालिकेचे एक उदाहरण देते. त्या ठिकाणी मौलाना आझाद यांच्या नावाचे मेमोरियल केले ते गेले तीन वर्षे धूळ खात पडलेले आहे. ज्यावेळी मोठ्या नेत्यांची नावे अशा वास्तूंना दिली जातात तेव्हा अशा महामंडळांकडे काही योजना राबवित असताना यासंदर्भात काही अंतर्भाव करता येईल काय याचा विचार व्हावा. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 375 वरील बाब क्रमांक 252 बाबत बोलणार आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालय, पुणे, मुंबई व कोल्हापूर येथील सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या कार्यालयाचे संगणकीकरण व त्या कार्यालयांकरिता फर्निचर खरेदी करण्यासाठी प्रत्येकी 5 लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. वास्तविक पाहता सह संचालकांच्या कार्यालयाचे संगणकीकरण आवश्यक आहे हे बरोबर आहे परंतु प्रत्येक विद्यापीठवार अशी कार्यालये आवश्यक आहेत. कारण सोलापूर युनिव्हर्सिटी आणि शिवाजी युनिव्हर्सिटी हे एकाच कार्यालयाच्या अधिपत्याखाली ठेवल्यामुळे त्या ठिकाणी गैरसोय होते. म्हणून मी या निमित्ताने शासनाला अशी सूचना करतो की, प्रत्येक विद्यापीठासाठी स्वतंत्र संचालनालय असण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यानंतर मी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 380 वरील बाब क्रमांक 266 बाबत बोलणार आहे. यामध्ये अशासकीय अनुदानित कला संस्थांच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये पाचव्या वेतन आयोगाच्या संदर्भात हायकोर्टाच्या निर्देशानुसार 4 कोटी 17 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. खरे म्हणजे आता सहावा वेतन आयोग लागू झालेला असताना हायकोर्टाच्या आदेशाने आपण पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने देणी देण्यासाठी तरतूद करीत आहोत. त्यांना पुन्हा सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात हायकोर्टात जावे लागणार आहे काय असा प्रश्न निर्माण होईल. शासन त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. हे दुर्लक्ष होता कामा नये. त्यासाठी नियमितपणे तरतूद केली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 381 वरील बाब क्रमांक 268 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये नव्याने स्थापन झालेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या प्रशासकीय खर्चासाठी 28 कोटी 58 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. यामध्ये थकीत वेतनाचा उल्लेख केलेला आहे. वास्तविक पाहता आयटीआयमधील वेतन गेले चार-पाच महिने दिले गेलेले नाही. त्याचबरोबर आय.टी.आय मध्ये असलेल्या वर्कशॉपमध्ये असलेले लेथ मशिन किंवा इतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. भगवान साळुंखे .....

मशिन्स गंजलेल्या आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी चालू कंडीशनमध्ये असलेल्या मशिन्स शिल्लक राहिलेल्या नाहीत. त्याचबरोबर त्यांचे जे आधुनिकीकरण व्हावयास पाहिजे ते झालेले नाही. त्यांच्या सिलॅबसचे आधुनिकीकरण होण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या प्रशासकीय खर्चाची तरतूद करीत असताना तेथील मेन्टेनंन्स आणि आधुनिकीकरण्साठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पान क्रमांक 392 वरील बाब क्रमांक 281मध्ये पर्यटन क्षेत्रांच्या प्रसिध्दीसाठी 5 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. ही प्रसिध्दी कोणकोणत्या गोष्टींची करण्यात येणार आहे हा देखील आमच्या पुढे प्रश्न आहे. 1990मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतक-यांची 160 हेक्टर जमीन पर्यटनासाठी, ओबेराय ग्रुपच्या पंचतारांकित हॉटेलसाठी घेतली. परंतु आज 20 वर्षे झाले तरी तेथे पर्यटनाच्या दृष्टीने कोणतीही कामे झालेली नाहीत. पर्यटनासाठी घेतलेल्या जमिनीवर मागील 20 वर्षापासून पर्यटनाचे कोणतेही काम होत नसेल तर ज्या शेतक-यांच्या जमिनी घेतलेल्या आहेत त्यांना त्यांच्या जमिनी परत करा. कारण त्या जमिनीवर तुमचे पर्यटन होत नसेल तर निदान त्या जमिनीवर शेतक-यांचा उदरनिर्वाह तरी होऊ शकेल.

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये विमानतळ होऊन, जिल्ह्याचा उत्कर्ष होईल, लोकांना रोजगार मिळेल असे येथे सांगितले गेले. विमानतळासाठी 271 हेक्टर जमिनीची गरज असते. विमानतळासाठी जमीन संपादित केलेली असून त्यापुढे 900 हेक्टर जागा पुन्हा संपादित करण्यात आलेली आहे. त्यासंदर्भात माननीय महसूल मंत्र्यांनी असे सांगितले की, पर्यटनाच्या माध्यमातून विविध उद्योगधंदे येण्यासाठी 900 हेक्टर जमीन संपादित केलेली आहे. अशा प्रकारे सरकार जमीन घ्यायला लागले तर मला वाटते कोकणातील सर्व लोकांना मुंबई किंवा नवी मुंबईमध्ये येऊन रहावे लागेल. पर्यटनासाठी 20 वर्षापूर्वी ज्या जमिनी संपादित केल्या त्या जमिनीवर पर्यटनाच्या दृष्टीने कोणतीही कामे झाली नाहीत. तेव्हा अशा प्रकारे फसवी कारणे देऊन किंवा दिशाभूल करुन शेतक-यांच्या जमिनी घेण्याचे धोरण या सरकारने थांबवावे. कोकणामध्ये जेव्हा पर्यटन झाले नव्हते तेव्हा कोकणातील माणूस सुखी होता. दोन वेळ तो पोटभर जेवत होता. आता या जमिनी घेऊन त्याला वा-यावर सोडलेले आहे. मला या निमित्ताने शासनाला एवढीच विनंती करावयाची आहे की, हे कोकणातील पर्यटन धोरण मागे घ्यावे आणि संपादित केलेल्या जमिनी शेतक-यांना परत द्याव्यात. सभापती महोदय, सरकारला जर खरोखरच पर्यटन धोरण राबवायचे असेल तर कोकणामध्ये खाण आणि औष्णिक विद्युत प्रकल्प आणून निसर्ग सौंदर्य का खराब करण्यात येत आहे ? शासनाला जर ख-या अर्थाने पर्यटन धोरण राबवायचे असेल तर प्रथम तेथील खाण आणि औष्णिक विद्युत प्रकल्प

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. किरण पावसकर...

बंद करा आणि आपले ध्येय धोरण एक ठेवा. जर पर्यटन धोरण राबवायचे नसेल तर संपादित केलेली 160 हेक्टर आणि 900 हेक्टर जमीन शेतक-यांना परत द्या.

कृषि विभागाच्या पृष्ठ क्रमांक 35 वरील बाब क्रमांक 48मध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजनेखालील योजनांसाठी 447 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. कुक्कुट पालन, शेळी-मेंढी पालन या बरोबरच एम्यू फार्मिगला आपल्या राज्यात चांगला प्रतिसाद मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी एम्यू फार्मिंगला प्राधान्य दिलेले आहे. हे एम्यू फार्मिंग आपण कशा पध्दतीने करणार आहात ? एम्यू फार्मिंग विषयी आपले पशु वैद्यकीय डॉक्टर्स प्रशिक्षित आहेत काय, ते शेतक-यांना कोणते मार्गदर्शन करणार, या सर्व गोष्टीसाठी किती आर्थिक तरतूद केली जाणार या गोष्टीचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. कुक्कुट पालनाचा प्रसार आपण "सण्डे हो या मण्डे, रोज खाओ अण्डे" अशा प्रकारच्या जाहिरातीतून केला आणि त्यास चांगला प्रतिसाद मिळत गेला. या एम्यू फार्मिगचा जास्तीत जास्त शेतकरी अवलंब करतील यादृष्टीने शासनाने काही कार्यक्रम राबविण्याचे ठरविलेले आहे काय ? याचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

समाज कल्याण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 397 वरील बाब क्रमांक 284 मध्ये मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला प्रतिपूर्ती करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, मदरसामध्ये कोणतेही वाईट प्रकार होत नाहीत.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

सरकार चांगली मदत करीत आहे. १४.९७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. चर्चा करण्यासारखा हा विषय नाही. परंतु मी एक घटना टी.व्ही.वर पाहिली. मदरशामध्ये एका लहान मुलीला ॲसिड पाजण्यात आले. त्या मुलीला उपचारासाठी मालेगावहून मुंबईला आणण्याएवढी त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाही. मदरसा हे पवित्र ठिकाण मानले जाते. परंतु त्याठिकाणी अमानवी प्रकार केले जाणार असतील तर ते योग्य नाही एवढेच मला सांगावयाचे आहे. ज्यांनी हा प्रकार केला त्यांच्याविरुध्द मालेगावमध्ये मागील १४ दिवसात गुन्हा दाखल झाला नाही. १४ दिवसानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप आरोपींना अटक झालेली नाही. त्या मुलीचे वय अवघे ९ वर्ष आहे. तिला दवाखान्यात नेऊन उपचार करण्यासारखी त्या कुटुंबाची परिस्थिती नाही. त्यामुळे मालेगावच्या आमदारांनी मदत करुन तिला उपचारासाठी मुंबईत आणले. मी स्वत: त्या मुलीला भेटून आलो. सरकारचा तरतूद करण्यामागे उद्देश चांगला आहे. अल्पसंख्यांकाच्या विकासासाठी अल्पसंख्याक विकास विभागाची स्थापना करण्यात आली आहे. परंतु कोणी गैरफायदा घेत असतील तर त्याबाबत कारवाई करणार आहात का? भविष्यात असे प्रकार घडू नयेत यादृष्टीने उपाययोजना करणार आहात का?

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक ६७, बाब क्रमांक ८१ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारतींची दुरुस्ती व परिरक्षण करण्यासाठी २१३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची जेवढी यादी देऊ तेवढी ती कमी होईल. शासकीय इमारतींच्या दुरुस्तीवर ठराविक काळात करोडो रुपयांची उधळण केली जात आहे. रविभवन असेल, राजभवन असेल, आमदार निवास असतील, त्याठिकाणी वारंवार दुरुस्ती केली जात आहे. नागपूर येथील आमदार निवासामध्ये हिवाळी अधिवेशनानिमित्त राहण्याचा योग येतो. त्या आमदार निवासातील सदनिकांमध्ये तेच तेच गिझर, त्याच त्याच खुर्च्या दरवर्षी कशा दिसतात? या संदर्भात चौकशी केली असता अशी माहिती देण्यात आली की, अधिवेशन काळासाठी नवीन वस्तूंची खरेदी केली जाते आणि त्या वस्तू कॉन्ट्रॅक्टरला दिल्या जातात. दुसऱ्या वर्षी पुन्हा त्याच वस्तू आणल्या जातात. प्रत्येक वर्षी १९० कोटी रुपयांचा यासाठी खर्च दाखविण्यात येतो. या खर्चावर नियंत्रण आणणार आहात का? शासकीय इमारतींबरोबर ज्या ज्याठिकाणी शासकीय विश्रामगृहे आहेत त्यांची परिस्थिती काय आहे हे तपासून घेण्याची आवश्यकता आहे. विश्रामगृहांच्या दुरुस्तीवर करोडो

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

रुपये खर्च दाखवून निधीची लुटमार केली जाते. उदाहरण म्हणून सांगू इच्छितो की, ब्रिटिशांनी १८७८ साली बांधलेल्या मुंबईतील हायकोर्टाच्या इमारतीवरील दुरुस्तीसाठी मागील पाच वर्षाच्या काळात १६०० कोटी रुपये खर्च झालेला आहे. २००९ ते २०१० या काळात ६०० कोटी रुपये खर्च दाखविण्यात आला. लाकडांना पॉलिश, पेंटिंग यासाठी ५५० लाख रुपये खर्च करण्यात आले. या खर्चाबाबत नियंत्रण आणण्याची आवश्यकता आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून शासकीय निधीची लुटमार चाललेली आहे ती थांबविणार आहात की नाही? जो खर्च केला जातो त्याचे ऑडिट होणार आहे का? आतापर्यंत ऑडिट झाले नसेल तर ते केले जावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक ६७, बाब क्रमांक ८२ अन्वये मुंबई शासकीय ऐतिहासिक वारसाप्राप्त इमारती पूर्ववत करण्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मी या सदनामध्ये यापूर्वी देखील हा विषय मांडला होता. पुराभिलेख संचालनालयाची इमारत एल्फिस्टन कॉलेजच्या आवारात उभी आहे. पुरातत्व विभागाचे सर्व रेकॉर्ड त्या इमारतीत जतन करुन ठेवण्यात आले आहे. त्या कार्यालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी शासनाने कालिना येथे जमीन उपलब्ध करुन दिली असून इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध आहे. परंतु अद्याप स्वतंत्र इमारतीचे बांधकाम केले जात नाही. पुरातत्व विभागाच्या स्वतंत्र इमारतीचे बांधकाम लवकरात लवकर करण्यात यावे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग पृष्ठ क्रमांक ३४४, बाब क्रमांक २१३. या सदनामध्ये वारंवार हा मुद्दा उपस्थित झालेला आहे. आरोग्य विभागाची जीवनदायी योजनेमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. आरोग्य विभागात सुरु असलेला भ्रष्टाचार थांबविण्यात यावा. ग्रामीण भागातील रुग्णांपर्यंत अन्न पोहोचत नसले तरी किमान औषधे तरी चांगल्या पध्दतीची पुरविण्यात यावीत अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

नंतर ४वाय.१...

अशुधीरत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : महोदय, बाब क्र. 54, पृ.क्र. 38 कोकणातील मच्छिमार व्यवसायाच्या माध्यमातून किमान 3 हजार कोटीचे परकीय चलन मिळू शकते. दुर्दैवाने शासन त्याकडे गांभीर्याने पाहत नाही. काही मुजोर अधिकारी, हिटलरशाहीचे अधिकारी त्या ठिकाणी बसलेले आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, 50 टक्क्यापेक्षा जास्त मच्छिमारी होते म्हणून मत्स्य दुष्काळ जाहीर करता येत नाही. यासाठी एनसीडीसीकडून जो निधी मिळतो तो गेल्या चार वर्षात या चारही जिल्ह्यात मिळालेला नाही. यासाठी एकूण 346 प्रस्ताव आलेले होते त्यातील 47 प्रस्ताव मंजूर झाले आणि 299 प्रस्ताव अनिर्णितच आहेत. सुरक्षा वाहतुकीचे 10 प्रस्ताव होते ते सुध्दा मंजूर झालेले नाहीत. यासंसबंधी सातत्याने मागणी करुनही शासन लक्ष देत नाही. या प्रस्तावांच्या अनुषंगाने अद्याप एकही बैठक झालेली नाही. पूर्वी ही पध्दत होती की फिशरीज आयुक्तांच्या लेव्हलवर अशा प्रस्तावांना मान्यता मिळत होती व नंतर हे प्रस्ताव दिल्लीला पाठवायचे पण आता मात्र शासनाकडून अशा प्रस्तावांना मान्यता मिळून सुध्दा ही कामे होत नाहीत. यामध्ये अडचण अशी आहे की, फक्त 35 टक्के निधी राज्यशासन देते तर 65 टक्के निधी केंद्राकडून मिळतो. प्रत्येक जिल्ह्यात डीपीडीसीला मॅचिंग ग्रँट म्हणून ठेवली जाते ती सुध्दा गेल्या चार वर्षांपासून आपल्या विभागाकडून खर्च केली नाही याचाही मंत्री महोदयांनी विचार करावा. तसेच जे अधिकारी अशा प्रकारे मच्छिमारांना त्रास देत असतील आणि खोटी प्रकरणे मंजूर करीत असतील त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. नियोजन विभागाचे सचिव यासंदर्भात कोणतीच कार्यवाही करीत नाही. माझ्या माहितीप्रमाणे यासंदर्भात मार्च व एप्रिलमध्ये एक बैठक झाली होती पण त्या बैठकीचे इतिवृत्त अद्याप फायनल झालेले नाही. या सर्व गोष्टींचा मंत्री महोदयांनी विचार करावा. त्याचबरोबर माननीय फिशरीज मंत्र्यांचे मनापासून आभार मानतो कारण त्यांनी आम्ही मागणी केल्यानंतर सतत यादृष्टीने प्रयत्न केले आहेत. खऱ्या अर्थाने अर्थ व नियोजन विभागाचे आपलेच सचिव आपले ऐकत नाहीत. माननीय मंत्री महोदयांकडे सतत पाठपुरावा केल्यानंतर त्यांनी या बाबीकडे लक्ष दिले त्यांचा मी आभारी आहे. म्हणून खऱ्या अर्थाने हे प्रस्ताव कसे लवकर होतील यासाठी मंत्री महोदयांनी प्रयत्न करावा. मच्छिमारांसाठी शासनाला धोरण जाहीर करावे लागणार आहे. कर्नाटकात छोट्या बोटींसाठी तसेच लहान मच्छिमारांना छोट्या बोटींसाठी इंधन म्हणून डिझेल ऐवजी रॉकेलसाठी अनुदान देण्यात येते त्यात रॉकेल 10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली .....

रुपये दराने मिळते ते आपल्याकडे मागणी करुन देखील मिळत नाही. गुजरातमध्ये गॅस सिलेंडर देण्यात येते ही मागणी सुध्दा गेल्या चार वर्षांपासून आम्ही करीत आहोत. मच्छिमारांचा विकास करण्याचा आपण विचार करतो परंतु अशा प्रकारे लवकर निर्णय होत नसतील तर मच्छिमारांना त्याचा फायदा मिळणार नाही. परिणामी 3 हजार कोटीचे परकीय चलन चार जिल्ह्यातून मिळू शकते त्याला मुकावे लागणार म्हणून त्याकडेही मंत्री महोदयांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

पर्यटन विभागाच्या संदर्भात बाब क्र. 282, पृ.क्र. 393 च्या संदर्भात येथे सांगण्यात आले की, जाहिरातीसाठी 5 कोटीची तरतूद करण्यात आली. पण कोकण पॅकेज, विकासाचा कालबध्द कार्यक्रम सन 2009-10 मध्ये शासनाने मंजूर केला. त्यातून प्रत्येक जिल्ह्यासाठी दरवर्षी 65 कोटी रुपये प्रमाणे या चार जिल्ह्यांचा पैसा असताना देखील आपला विभाग हा पैसा खर्च करु शकला नाही, ही या विभागाची नामुष्की आहे. माननीय फिशरीज मंत्र्यांना व माननीय राज्यमंत्र्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. कारण आपल्या विभागातील अधिकाऱ्यांनी तसेच मंत्री महोदयांनी या चार वर्षात कोकणाकडे जातीनिशी लक्ष दिले आहे. माझे म्हणणे असे आहे की, गेल्या चार वर्षात केंद्रशासनाकडून या भागासाठी 1 रुपयाचाही निधी दिला नाही. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सांगितले की ओबेरॉयसाठी शासनाने जागा दिली होती तसेच ताज होटेलसाठी सुध्दा जागा दिली होती ती परत घेण्यात आली. या अनुषंगाने माझी मागणी आहे की, पर्यटन, पर्यटन म्हणून आपण म्हणतो पण त्या अनुषंगाने शासनाने धोरण जाहीर करावे. या कोकण पॅकेजमध्ये जो पैसा दाखविलेला आहे तो 12 व्या वित्त आयोगातून आलेला आहे, बजेटमधून एक रुपयासुध्दा दिलेला नाही. यासाठी अर्थसंकल्पातून तरतूद करण्याबाबत शासन निश्चित काय करणार आहे हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. 180 कोटी रुपये आपण खर्च करणार आहात त्यावेळेस बजेटमधून काही निधी देणार की नाही याचाही खुलासा करावा एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मला पुरवणी मागण्यावर विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद. बाब क्रमांक 278, पृष्ठ क्रमांक 391, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय स्मारकासाठी चैत्यभूमी येथे हिंदू मिलची 12.5 एकर जागा उपलब्ध करुन देण्यात येईल असे विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळेस माजी मुख्यमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी जाहिरनाम्यात आश्वासीत केले होते. व दोनच दिवसापूर्वी आमच्या कॉंग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी मा. मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण व राज्याचे कॉंग्रेस अध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे यांना सांगितले आहे की, आपण निवडणुकीच्या वेळेस जाहीरनाम्यात जी जी आश्वासने दिली होती त्या आश्वासनाची प्रतिपूर्ती करण्यात यावी. मागच्या वेळेस मी हाच प्रश्न विचारला होता तेव्हा मा.वस्त्रोद्योग मंत्र्यांनी उत्तर दिले होते की, "यावर योग्य कारवाई केली जाईल." दलितांचा हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे मा. सभापतींच्या मार्फत मी कळकळीची विनंती करतो की, चैत्य भूमी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी 12.5 एकर जागा लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 282, पृष्ठ क्रमांक 393, पर्यटन व सांस्कृतिककार्य विभागावर विचार व्यक्त करणार आहे. पर्यटनासाठी विविध सुविधा पुरविण्यासाठी श्री क्षेत्र हरिहरेश्वर, जिल्हा रायगड येथील मंदिरासाठी 10 लक्ष रुपये पुरवणी मागण्यामध्ये दिलेले आहे. माननीय तटकरे साहेबांना वित्तमंत्री पदाचा पहिल्यांदाच मान मिळालेला आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी लोटे परशुराम मंदिराच्या पायाभूत सुविधेसाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. श्री परशुराम हे रामाचे सहावे अवतार आहेत. श्री परशुरामांनी त्यावेळी कोकणाला शाप दिला होता की, "कोकणाची भूमी अर्धपोटी राहील". अशा कोकणातील श्री परशुरामाच्या मंदिरासाठी माननीय वित्त मंत्र्यांनी 10 कोटी रुपयांची तरतूद करुन कोकणाच्या भूमीला शापमुक्त केलेले आहे. पुरवणी मागण्यांमध्ये कोकणामध्ये एक पैसा देखील अद्यापी आलेला नाही त्यामुळे माननीय वित्त मंत्र्यांना माझी कळकळीची विनंती आहे की, त्यांनी श्री परशुरामाच्या मंदिरासाठी 10 कोटी रुपये निधी उपलब्ध करुन द्यावा व श्री परशुरामांचा आशिर्वाद घ्यावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, बाब क्रमांक 139, पृष्ठ क्रमांक 353, नियोजन विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. रोजगार हमी योजनेतील जवाहर विहीर योजनेत सिंधुदुर्ग जिल्हयातील सुमारे 988 जवाहर विहिंरीचा प्रस्ताव अद्यापही प्रलंबित आहे. जिल्हयातील पडीक जमीन क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी किमान 1 हजार विहिरींचा लक्षांक सिंधुदुर्ग जिल्हयासाठी मंजूर करावा असे मी या निमित्ताने सूचवतो.

सभापती महोदय, ग्रामविकास कार्यक्रम अतिशय महत्वाचा कार्यक्रम आहे. गाव तलाव, साठवण तलाव, बंधारे, सिमेंट नाला, पथदिवे, स्मशानभूमी यासाठी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक महामंडळाचे सन्माननीय अध्यक्ष, आमचे नेते श्री. उल्हासदादा पवार यांनी राज्यपालांकडे आपल्या राज्याच्या नियोजन विभागाचे प्रधान सचिव श्री. सोनी यांची तक्रार केलेली आहे. प्रधान सचिवांनी आर्थिक तरतूदीसाठी नामंजूरी दिलेली आहे. नियोजन विभागाचे प्रधान सचिव श्री. सोनी यांनी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक महामंडळाचे अध्यक्ष श्री. उल्हासदादा पवार यांना पत्र लिहिले आहे. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "आमदार, खासदारांचे प्रस्ताव मी मान्य करणार नाही. आमदारांचे, खासदारांचे ऐकणार नाही. सभापती महोदय, मी धामापूरच्या तलावासाठी त्यांच्याकडे असंख्यवेळा गेलो असतांना त्यावेळी मुख्य सचिवांनी त्यांना 20 ते 25 वेळा दूरध्वनी केले होते, परंतु नियोजन विभागाचे प्रधान सचिव हे राज्याच्या मुख्य सचिवांचे दूरध्वनी सुध्दा घेत नाहीत. यासंदर्भात उर्वरित महाराष्ट्र वैधानिक महामंडळाचे सन्माननीय अध्यक्ष श्री. उल्हासदादा यांनी मा. राज्यपाल महोदयांना यासंदर्भात पत्र दिलेले आहे. या पत्राची मा. राज्यपाल महोदयांनी दखल घेतली आहे. नियोजन विभागाचे प्रधान सचिव श्री. सोनी यांचे एक्सप्लेनेशन कॉल केलेले आहे. त्यामुळे मी सभागृहाच्या माध्यमातून आपण लोकप्रतिनिधींना संरक्षण द्यावे व अशा मदमस्त अधिका-यावर योग्य ती कारवाई करावी आणि नियोजन विभागाचे प्रधान सचिव श्री. सोनी हे राज्याच्या मुख्य सचिवांचा फोन घेत नाही त्यामुळे मुख्य सचिवांनी श्री. सोनी यांचे सीआर स्पॉईल करावे व विभागातून त्यांची ताबडतोब बदली करावी अशी सूचना करतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अब्दुल सत्तार (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्यांनी चर्चेमध्ये भाग घेतल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. या चर्चेमध्ये भाग घेताना सन्माननीय सदस्य ॲड.गुरूनाथ कुलकर्णी, श्री.जयंत प्र.पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे,श्री.जैनुद्दीन झव्हेरी,श्री.परशुराम उपरकर, प्रा.सुरेश नवले, श्री.किरण पावसकर सह अन्य सन्माननीय सदस्यांनी ज्या मौलिक सूचना केल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली असून बाब क्रमांक 76 ते 105 च्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करीत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरूनाथ कुलकर्णी, श्री.दिवाकर रावते, श्री.संजय केळकर, श्री.रामनाथ मोते, ॲड.उषा दराडे सह ज्या अन्य सन्माननीय सदस्यांनी मौलिक सूचना केल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली असून उच्च व तंत्रशिक्षण,वैद्यकीय शिक्षण,पर्यटन विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे.

.....

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, वित्त व नियोजन विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.परशुराम उपकर यांच्यासह ज्या सन्माननीय सदस्यांनी मौलिक सूचना केल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आली असून वित्त विभागाच्या बाब क्र.74,75 आणि नियोजन विभागाच्या बाब क्र.169 ते 211 या दोन्ही विभागांच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसिम खान (वस्त्रोद्योग व अल्पसंख्यांक विकास मंत्री) : सभापती महोदय, अल्पसंख्याक विकास व वस्त्रोद्योग विभागाच्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्य ॲड. गुरूनाथ कुलकर्णी, श्री.जयंत प्र.पाटील,श्री.एस.क्यू.जमा,श्री.जैनुद्दीन जव्हेरी,श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.पाशा पटेल, श्रीमती वंदना चव्हाण, प्रा.सुरेश नवले, श्री.किरण पावसकर, श्री.सुभाष चव्हाण सह अन्य सन्माननीय सदस्यांनी आपले मौलिक विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, काही गोष्टी रेकॉर्डवर आल्यामुळे त्यासंबंधी मला येथे खुलासा करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी सांगितले की, अल्पसंख्यांक विकास विभागाच्यावतीने राज्यातील मदरसांना मदत देण्यात येत आहे. त्यांनी मालेगाव मधील एका मदरसाचा उल्लेख केला आहे. यासंबंधी मी आपल्या माध्यमातून सदनाला सांगू इच्छितो की, राज्य शासनाच्या माध्यमातून राज्यातील कुठल्याही मदरशाला कसल्याही प्रकारची सध्या मदत करण्याची योजना सुरू झालेली नाही. पण तशा प्रकारची योजना सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. जेवढे मदरसे आहेत त्यांचे आधुनिकीकरण कसे करता येईल याचा येणाऱ्या काळामध्ये आम्ही नक्की विचार करणार आहोत.

सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांनी वक्फ बोर्डासंबंधी सूचना केली आहे. त्यांनी जिल्हा निहाय कार्यालय झाले पाहिजे अशी सूचना केली आहे. केंद्र शासनाचा 1995 मधील वक्फ ॲक्ट या राज्यामध्ये सन 2002 मध्ये लागू झाला आहे.

यानंतन श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान..

तो ॲक्ट लागू झाल्यानंतर औरंगाबाद येथे मुख्य कार्यालय उघडण्यात आले. संपूर्ण राज्यात मुंबई विभाग, कोकण विभाग, अमरावती विभाग, पुणे विभाग, नाशिक विभाग या ठिकाणच्या लोकांना तेथे जावे लागते याची आम्हाला देखील कल्पना आहे. आम्ही गेल्या महिन्यात निर्णय घेतला की, प्रथम रिजनवाईज नवीन कार्यालये उघडणार आहोत आणि त्याप्रमाणे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्याठिकाणी आवश्यक असलेल्या अधिकारी व कर्मचारीवर्गाची नियुक्ती करण्यासंदर्भातील आदेश देखील विभागाने निर्गमित केले आहेत.

सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी मौलाना आझाद महामंडळामार्फत चेकचे वाटप करण्यात येते त्याबाबत मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी सांगितले की, चेक एकाच्या नावावर आणि घेऊन जातो दुसरा असे प्रकार होत आहेत. मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, असे प्रकार होत नाहीत. विभागाकडे अशाप्रकारची एकही तक्रार प्राप्त झालेली नाही. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफीक तक्रार दिल्यास त्याबाबत निश्चितपणे चौकशी करण्यात येऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल. लाभार्थ्यांना नियमाप्रमाणे वाटप करण्यात येते. तेव्हा चेक वाटपामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होत नाही. मी जास्त काही बोलत नाही.

सभागृहाने वस्त्रोद्योग विभाग बाब क्रमांक 236,238,239,246 या मागण्या मंजूर कराव्यात अशी विनंती करतो. तसेच अल्पसंख्याक विभाग बाब क्रमांक 284 मागणी सभागृहाने मंजूर करावी अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवरील सार्वजनिक विभागाच्या मागण्यांवर जवळपास अकरा सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते उपस्थित आहेत. त्यांनी अपंगांना प्रमाणपत्र देण्यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत सांगू इच्छितो की, ठाणे जिल्ह्यामध्ये अपंगाना आठवड्यातून दोन वेळा प्रमाणपत्र देण्यात येते. परंतु आता दरदिवशी प्रमाणपत्र देण्याबाबात ऑडर्स काढल्या आहेत. त्याशिवाय ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकांना देखील अपंगांना प्रमाणपत्र देण्याबाबत परवानगी दिलेली आहे.

सभापती महोदय, याठिकाणी जीवनदायी योजनेसंदर्भात उल्लेख करण्यात आला. जीवनदायी योजनेसंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी काही मुद्दे मांडले. जुनी जीवनदायी योजना बंद करण्याचा निर्णय या सभागृहात घोषित करण्यात आला होता. त्याऐवजी नवीन राजीव गांधी जीवनदायी योजनेची अंमलबजावणी करणार आहोत. या संदर्भातील लीगल काम सुरु आहे. पुढील मंत्रिमंडळात हा प्रस्ताव आम्ही आणणार आहोत. या नवीन राजीव गांधी जीवनदायी योजनेमुळे लोकांचा फायदा होणार आहे. ही योजना सुरुवातीला सहा जिल्ह्यांमध्ये लागू करणार आहोत. त्यानंतर हळूहळू अन्य जिल्ह्यांमध्ये लागू करणार आहोत. परंतु हे सर्व करीत असताना जुनी जीवनदायी योजना सुरु राहणार आहे. ज्या जिल्ह्यामध्ये नवीन जीवनदायी योजना सुरु झाली असेल त्याठिकाणची जुनी जीवनदायी योजना बंद करणार आहोत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर यांनी औषध खरेदीमध्ये भ्रष्टाचार होत असल्याचा मुद्दा या ठिकाणी मांडला होता. सन्माननीय सदस्यांनी जे काही सांगितले ते खरे असून .त्यांच्या म्हणण्याला मी पूर्णपणे समर्थन देत आहे. राज्यातील हॉस्पिटलमध्ये गरिबांसाठी शासनाकडून ओषधे खरेदी केली जातात व त्यामध्ये भ्रष्टाचार होऊ दिला जाणार नाही अशा प्रकारची घोषणा मी सभागृहात केली होती. त्याचबरोबर नवीन प्रोक्युअरमेन्ट पॉलिसी राज्यासाठी घोषित केली होती. त्यासाठी जी.आर.सुध्दा काढला होता .सभागृहामध्ये मी हे सांगू इच्छितो की जेव्हा एखादे चांगले काम करण्यास आपण सुरुवात करतो तेव्हा काही मंडळी त्याला विरोध करीत असतात तशा प्रकारे नवीन प्रोक्युअरमेन्ट पॉलिसीच्या संदर्भात देखील प्रत्येक स्तरावर विरोध करण्यात येत आहे. त्याबाबतीत कोर्टात केसेस देखील दाखल करण्यात आल्या आहेत. मी या सभागृहाला सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री श्री अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेसचे जे शासन आज सत्तेवर आहे ते शासन आरोग्य खात्यामध्ये प्रोक्युअरमेन्ट पॉलिसीमध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होऊ देणार नाही हे आश्वासन मी सभागृहाला देऊ इच्छितो.

त्याचबरोबर या ठिकाणी मांडण्यात आलेल्या सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण , राजशिष्टाचार विभागाच्या मागण्या संमत कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

श्री.बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय,आदिवासी विकास विभागाच्या मागण्या क्रमांक 225 ते 229 सभागृहासमोर सादर करण्यात आल्या होत्या. त्यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते,रामनाथ मोते, संजय केळकर आणि दिलीपराव सोनवणे यांनी आपली मते मांडली आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी सांगितले की आदिवासी विभागाप्रमाणे सामाजिक न्याय विभागातही विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु करण्यात याव्यात. मी त्यांना सांगू इच्छितो की, संबंधित खात्याला आपली मागणी कळविण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री रामनाथ मोते यांना मी सांगू इच्छितो की आदिवासी उपयोजनेखाली आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत. 50 मुला पैकी 40 मुले जर आदिवासी असतील तर 10 बिगर आदिवासी मुले घेतली जातात त्यामुळे त्यांना घेण्यामध्ये काहीही अडचण येणार नाही. त्याचबरोबर आदिवासी क्षेत्राच्या बाहेरही ज्या ठिकाणी आदिवासी नाहीत त्याही ठिकाणी आश्रमशाळा काढण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्यामध्ये देखील काही अडचण आहे असे मला वाटत नाही. सर्व आश्रमशाळेमध्ये उपस्थितीसाठी बायोमॅट्रीक पध्दत सुरु करण्यात येणार आहे त्यामुळे उपस्थिती नोंदविण्यासाठी काहीही अडचण येणार नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या बाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की दरवर्षी 2500 मुले चांगल्या शाळेत पाठविली जातात त्याकरता साडेबारा कोटी रुपये खर्च करावे लागतात. त्या त्या भागात जी चांगली शाळा काम करते त्या शाळेची निवड केली जाते. त्या शाळा निवडण्यामध्ये देखील काही अडचण नाही यावर्षी देखील अत्यंत पारदर्शीपणे शाळांची निवड करण्यात आलेली आहे.या व्यतिरिक्त इतर शाळांचा जर चांगला रिपोर्ट असेल तर त्यांची निवड सुध्दा करण्यात येईल. एका विद्यार्थ्यासाठी 50 हजार रुपये दिले जातात परंतु काही शाळानी असे सागितले की आम्ही त्यापेक्षा कमी पैसे घेऊ. एखादी शाळा 50 हजार रुपयापेक्षा जर कमी पैसे घेत असेल तर त्यामुळे विद्यार्थ्याची संख्या वाढेल आणि त्याबाबातीत विचार चालू आहे एवढेच मी आपल्याला सांगू इच्छितो. आश्रम शाळा आणि इंग्रजी शाळाच्या बाबतीत शासनाने निर्णय घेतला आहे त्यासाठी केन्द्र सरकार पैसे देत आहे 66 तालुक्यात ज्या ठिकाणी आदिवासी आहेत त्या प्रत्येक ठिकाणी येत्या पाच वर्षात इंग्रजी शाळा काढावयाची आहे. त्याचबरोबर 16 जिल्हयामध्ये अकरावी बारावीची कॉलेजेस काढण्याचा देखील

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने निर्णय घेतला आहे. इग्रजी शाळेमधून एक लाख आदिवासी मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे त्याचबरोबर संगणकाचे देखील शिक्षण मिळाले पाहिजे हाच शासनाचा प्रयत्न आहे इतकेच नव्हे तर या विद्यार्थ्याला परदेशातसुध्दा जाता आले पाहिजे या दृष्टीने शासनाचा प्रयत्न असून त्याला व्यवसायाचे शिक्षण मिळावे यासाठी शासनाने लक्ष दिलेले आहे. त्याचप्रमाणे ज्या विद्यार्थ्यानी शाळा सोडली आहे त्या विद्यार्थ्याना पुन्हा शाळेत आणण्याचा देखील प्रयत्न केला जात आहे.नवीन विद्यार्थ्याचे नाव शाळेत घालण्यासाठी देखील कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.अशा प्रकारे शिक्षण आणि आरोग्याकडे लक्ष दिलेले आहे..सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे त्याप्रमाणे शासन कार्यवाही करील .या विभागाच्या मागण्या मान्य कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत (पशुसंवर्धन मंत्री) : सभापती महोदय, पशुसंवर्धन, दुग्ध विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाच्या मागण्या क्रमांक 49 ते 57 सभागृहासमोर सादर करण्यात आल्या असून या पूरक मागण्यांवर बोलत असतांना सन्माननीय सदस्यांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे मागण्यांना पाठिंबा दिला. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, ॲड. उषा दराडे.....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत...

माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, माननीय सदस्य सर्वश्री राणा जगजितसिंह पाटील, परशुराम उपरकर, किरण पावसकर, राजन तेली यांनी चर्चेमध्ये भाग घेतला. माझ्या विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असतांना रायगड जिल्हा परिषदेमध्ये डॉक्टर मिळत नाहीत अशाप्रकारचा मुद्दा माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केला. ही बाब ग्राम विकास विभागाच्या अखत्यारीत येत असल्यामुळे निश्चितपणे त्या विभागाला यासंबंधी कळविले जाईल.

माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मासळी दुष्काळ जाहीर करण्याच्या निकषाबाबत पुनर्विचार करावा असा मुद्दा उपस्थित केला. सागरी मच्छिमारांच्या प्रश्नासंबंधी अभ्यास करण्यासाठी निश्चितपणे अभ्यासगटाची स्थापना करण्यात येईल. मासळी उत्पादनाबाबतची आकडेवारी गोळा करुन शास्त्रीय पध्दतीने त्याबाबत विचार करण्यात येईल. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी मोलाचे विचार मांडले, त्याची सुध्दा राज्य शासन निश्चितपणे दखल घेईल.

माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी एनसीपीसीच्या कामासंबंधी अत्यंत मोलाचे विचार मांडले. एनसीपीसीच्या प्रश्नासाठी राज्य सरकारने नियोजन विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली तदर्थ समिती नियुक्त केली आहे. या समितीच्या दि.27 मार्च 2009 ते दि. 18 मे 2010 या कालावधीत बैठका झालेल्या आहेत. तसेच, या समितीच्या प्रमुखांशी मी आज सकाळी बोललो आहे. त्यांनी बैठकीच्या इतिवृत्ताला मान्यता दिली असून त्यासंबंधी लवकरच निर्णय घेण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यांनी आणखी एक प्रकर्षाने मुद्दा मांडला की, जे छोट छोटे नौकाधारक आहेत त्यांच्या बाह्य इंजिनासाठी केरोसिनचा कोटा मिळाला पाहिजे. याबाबत माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांबरोबर निश्चितपणे चर्चा करण्यात येईल व या कामाला गती देण्याचे काम माझ्याकडून होईल. तेव्हा अशारितीने पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

तालिका सभापती (श्री. परशुराम उपरकर) : सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चा आता संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक.

L.A. BILL NO. LXV OF 2010

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2011.)

श्री.विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 65 दिनांक 31 मार्च 2010 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

तालिका सभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 24 जुलै, 2010 रोजी सकाळी 10.30 वाजता पुन: भरेल. सकाळी 10.30 ते 12.30 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. या बैठकीमध्ये आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या नियम 260 अन्वये युवा धोरणासंबंधीच्या प्रस्तावावर चर्चा होईल. त्यानंतर दुपारी 12.45 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 03 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 24.7.2010 रोजीच्या सकाळी 10.30 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही